म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. ५५२

REFBK-0019104

REFBK-0019104

# जगाची सफर

ज. द. जोगळेकर

Travel, take a look at the world..You sir, who are rich, the first thing you have to do is to travel, away from this city in which you live, so that you can see with your own eyes what you can never see in your own country.........

Ahmad Faris at Shidyog
( Arnold Hottinger, the Arabs )

© ज. द. जोगळेकर

■

प्रकाशक
प्रमोद बाबुराव इनामदार
इनामदार बन्धु प्रकाशन
६३७ ( नवा ) सदाशिव, पुणे ३०

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
शनिवार पेठ, पुणे ३०

मुखपृष्ठ
सुभाष अवचट

इनामदार बंधु
प्रकाशन

प्रकाशन क्रमांक : ९५

किंमत दहा रुपये

## निवेदन

एकंदर आतापर्यंत मी पाच प्रवासवर्णने वृत्तपत्रांतून लिहिली. त्यांपैकी 'दक्षिण भारताचे धावते दर्शन' हे पुस्तकरूपाने १९६५ मध्ये प्रसिद्ध झाले. 'जगाची सफर' हे आता प्रसिद्ध होत आहे. हे वर्णन रविवारच्या नवशक्तीतून प्रसिद्ध झाले. त्याबद्दल येथेच नवशक्तीचे संपादक श्री. पु. रा. बेहेरे यांचे आभार मानत आहे.

परदेशात जे जे उत्तम आहे– म्हणजे कॅथिड्रल्स, चित्र नि वस्तू-संग्रहालय, नैसर्गिक सौंदर्यस्थाने तसेच ऐतिहासिक अवशेष नि ऐतिहासिक घटना या सर्वांचा मराठी वाचकाला परिचय व्हावा या दृष्टीने मी हे प्रवासवर्णन लिहिले. त्यातली माहिती नि वर्णने आवडली असे बऱ्याच वाचकांनी सांगितले. काहींनी तसे लिहिलेही. त्यातला अतिशयोक्तीचा भाग वगळला तर मजकूर वाचनीय झाला आहे असे त्या प्रतिक्रियेवरून मला वाटले. म्हणूनच हे प्रवासवर्णन पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यास तयार झालो.

जे कोणी देशाटन करायला निघतील त्यांना या पुस्तकातील माहिती थोडी उपयुक्त व्हावी आणि परदेशात काय पहावे याची आधी कल्पना मिळाल्याने त्यांचा वेळही वाचावा. हे खरे आहे की, मी पाहिले त्यापेक्षा न पाहिलेले खूपच आहे. पुन्हा योग आल्यास ते मी पाहीन आणि त्याविषयी लिहीनही. परंतु दुसऱ्या कोणी ते पाहिल्यास त्याविषयी मराठीतून त्याने अवश्य लिहावे. घरी बसले असूनही जगाचे पर्यटन दुसऱ्याच्या डोळ्यांनी केले तरीही काही कमी ज्ञानप्राप्ती होत नाही. जगाची माहिती व्हावी हा प्रवासवर्णनाचा माझ्या दृष्टीने प्रधान हेतू आहे. ते काम या पुस्तकाने अंशात्मक झाले तरी मला समाधान वाटेल.

माझ्या पत्नी डॉ. शोभा जोगळेकर यांच्यामुळे 'जगाची सफर' सर्वार्थाने शक्य झाली. म्हणून हे पुस्तक त्यांना अर्पण केले आहे.

पुस्तक प्रकाशनाच्या मार्गी लागायला माझे मित्र श्री. दि. वि. गोखले यांचे नेहमीप्रमाणे सहाय्य झाले हे नमूद करणे आवश्यक आहे.

ज. द. जोगळेकर


प्रवाशांचे असे छायाचित्र
परदेशातही घेतात.




लेखक व डॉ. शोभा जोगळेकर




केबलकार खालची
खोल दरी



पश्चिम बर्लिनमधले
बाँबहल्यामधून थोडे
वाचलेले कायसर विल्यिम
मेमोरियल चर्च



बाल्बेगचे रोमन अवशेष



रोम मधला कॅलोशियम



कामाकुरातली बुद्धमूर्ती



अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाच्या फेरी झडल्या
तो सेतू

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
संदर्भ शाखा

# बैरूट नि अ‍ॅथेन्स

काही म्हणा प्रवासाची एक और लज्जत असते. भटक्या वृत्तीचा अंश प्रत्येक माणसात खोलवर दबा धरून बसलेला असल्याने घर सोडून अनोळख्या प्रदेशात हिंडायला जाण्याची त्याला केव्हा ना केव्हा हुक्की येते. सुमारे पंचवीस वर्षांपूर्वी अशी हुक्की मला आली नि गप्पांच्या ओघात एका मित्राबरोबर युरोपला जाण्याची मी पैज घेतली. पुढे पाच वर्षांनी युरोप नि मध्यपूर्व यामध्ये काही काळ मी हिंडलो. खरे म्हणजे माझ्या मनात अमेरिकेला जाण्याचे होते. पण द्रव्याच्या अभावी ते जमले नाही. पुढे अशी काही एक घटना घडली की, त्यामुळे अमेरिकेला जाण्याच्या सीमेवर काही काळ मी निश्चित उभा होतो. परंतु ती संधी शेवटी स्वप्नवतच ठरली. मागच्या वेळेला खिशात छदाम नसताना युरोप पाहण्याचा बादशाही षोक मी केला होता, पण त्यामुळे माझी बरीच दमछाक झाली होती. म्हणूनच ऋण काढून सण साजरा करायचा नाही असे मी मनाशी ठरवले. त्यामुळे परदेशासंबंधीची इतरांची प्रवासवर्णने वाचत होतो, आणि स्वदेशात स्वतः केलेल्या प्रवासाची वर्णने लिहीत होतो. यात वर्षे सरकत होती.

सन १९६७ साल आले. सिडनी-ऑस्ट्रेलिया—येथे स्त्रीरोग चिकित्सक डॉक्टरांचे जग-संमेलन होते. त्यात वाचण्यासाठी एक प्रबंध माझी पत्नी डॉक्टर शोभा हिने पाठवला होता. तो मान्य झाल्याने तिने ऑस्ट्रेलियाला जायचे ठरवले.

मागच्या युरोपच्या प्रवासात माझा काही ऑस्ट्रेलियन मंडळींशी परिचय झाला होता. डॉक्टर सिडनीला येणार हे कळल्यावर मीही सिडनीला यावे आणि तिथल्या खर्चाची चिंता करू नये असे त्यांनी मला कळवले. पुढे एक दिवस डॉक्टर प्रवासाला निघून गेली. माझा जाण्याचा दिवस आला नि तोही निघून गेला. डॉक्टर एकटीच जपानपर्यंत जाऊन परत आली. या घटनेवरही दोन वर्षे लोटली. आमच्या परदेश-प्रवासाच्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या. या वेळी डॉक्टरांचे जग-संमेलन न्यू यॉर्कला होते. पण शेवटी पुढच्या वर्षी परदेश-प्रवासाला जावे असे आम्ही ठरविले. मग सन १९७० च्या डिसेंबर मध्ये निरनिराळ्या देशांतली महत्त्वाची मेडिकल सेंटर्स पाहण्याची योजना डॉक्टरने आखली. परदेशी-चलनाची चणचण भासू नये म्हणून जिथे आमचे मित्र होते त्यांना आम्ही पत्रे पाठवली. अशा प्रकारे पृथ्वीपर्यटनाची तयारी झाली आणि २९ मार्च १९७१ या दिवशी बैरूटला जाणाऱ्या विमानाने प्रवास करण्यासाठी आम्ही दोघे विमानतळावर आलो. आम्हांला निरोप द्यायला काही मित्रमंडळी आली होती. माझ्या धाकट्या भावाबरोबर माझा मुलगा नि मुलगी विमानतळावर आले होते. छत्तीस वर्षांपर्यंत एकटा जीव नि सदाशिव असा मी होतो. त्यामुळे प्रवासाला निघताना कोणाचे डोळे पाणावलेले पाहिले म्हणजे मला आश्चर्य वाटे. ते आश्चर्य आज दूर झाले.

विमानाने काही क्षणांत भूमी सोडली. विमान बैरूटच्या दिशेने निघाले. थोड्या वेळाने एअर होस्टेस आली आणि तिने वृत्तपत्रे नि स्विस एअरची माहिती देणारी पत्रिका नि नकाशा आम्हांला दिला. नंतर मेनूकार्ड आणून दिले. मुंबई-बैरूट मार्गावर थंड फराळ मिळेल असे त्यात लिहिले होते. आम्ही शाकाहारी असल्याचे तिला सांगितले तेव्हा ती म्हणाली की तशी सूचना आम्हांला मिळालेली नाही. तरी जमेल ते पहाते. मग टॉमॅटो, उकडलेले बटाटे, गाजरे इत्यादी पदार्थांची थाळी तिने आम्हांला दिली. ‘ बिअर मिळेल का ? ’ असे मी विचारताच तिने डॉर्टमॅंडर या जर्मन बिअरचा छोटा डबा पुढे आणून ठेवला. नंतर काही वेळाने त्याचे २५ फ्रँकचे बील तिने माझ्या हातात दिले. तेव्हा रुपयाचे नाणे चालेल का अशी मी पृच्छा केली. ती म्हणाली. ‘ नाही. परंतु पौंड किंवा डॉलर चालेल. ’ मी म्हणालो, ‘ डॉलर आहे. ’ ‘ क्वार्टर डॉलर दे , ’ तिने सांगितले. दैनंदिनी लिहिताना मेनूकार्डावर नजर टाकली त्यात

सूचना होती–

For alcoholic drinks please consult our price list.

भोजनानंतर विमानाच्या कप्तानाने सांगितले की, विमान अरबी समुद्रावरून उडत असून ५५० मैलांच्या वेगाने ते जात आहे. बैरूटपाशी कदाचित वादळ होईल, परंतु तत्पूर्वी मी हवामानाची माहिती देईन. मग होस्टेसने दिवे मालविले. साडे अकराच्या सुमाराला सात दिवे जळत होते. तासाभराने पुढे एक नि पाठीमागे माझा एक असे दोनच दिवे राहिले. बाकी सगळा अंधार. आता विमान अधूनमधून जोरात हलू लागले. मी जपान टाइम्समधला मासारू ओगावा याचा 'आवर टाईम' हा स्तंभ वाचला. त्याने लिहिले होते 'बऱ्याच लोकांना आश्चर्य वाटेल की १९६८–६९ या काळातले जहाल विद्यार्थी कुठे आहेत. बरेच जण ग्रॅज्युएट झाले आहेत आणि ज्या शासनाविरुद्ध ते झगडले त्याच्यातच ते गडप झाले आहेत.' बहुसंख्य जहालांचे असेच होते.

प्रवासी फार नसल्याने काही जण मोकळ्या आसनात पाय पसरून झोपले होते. मीही एक डुलकी काढली. आता खाली अधूनमधून दिव्यांची लुकलुक दिसली. पावणेतीन वाजता कप्तान म्हणाला, 'पंचवीस मिनिटांत बैरूट येणार.' मग होस्टेसने तोंड पुसायला लाल रंगाचे गरम रुमाल दिले. त्याच्या पाठोपाठ सरबताचा चषक आला. दूरवर शहर दिसू लागले. टेकडीवर वसलेले नि दिव्यांचा लखलखाट असलेले. विमान उंची सोडू लागले नि झेपावत भूमीकडे निघाले. सव्वातीनला बैरूट आले. हॉटेल कमांडरमध्ये येऊन पोहोचेपर्यंत पावणे-पाच झाले. पण ही मुंबई वेळ होती. या वेळी बैरूटमध्ये पावणेदोन वाजले होते.

हॉटेल द्वितीय श्रेणीचे होते. खोलीत टॉवेल कमी आणि रात्री पिण्याला पाणी नाही हा भाग सोडला तर बाकी सगळे राजेशाही नि अद्ययावत होते. आमची खोली सहाव्या मजल्यावर होती. शुभ्र चादरी पसरलेले बिछाने पाहिल्यावर मला झोप अनावर झाली. सुमारे वीस वर्षांपूर्वी मी बैरूटला आलो होतो. त्या वेळी एका अरब व्यापाऱ्याने त्याच्या घरी राहाण्याची व्यवस्था केली होती. तो भाग कुठला हे मात्र साफ विसरलो होतो. सुमारे दोन तासांनी जाग आली. मग आन्हिके उरकून चहा घेतला नि माहितीपत्रके घेऊन कुठली सहल घ्यावी ते पाहू लागलो. बालबेकचे रोमन भग्न अवशेष पाहण्यासारखे आहेत. मागच्या वेळेला मी बालबेकला थांबलो होतो. कमी खर्चात तिथे न्यायला एक

टॅक्सीवाला तयार होता. पण सहलीत मार्गदर्शक बरोबर होता. टॅक्सीवाल्या-कडून इतकी माहिती मिळणे शक्य नव्हते. शिवाय तो ठरलेल्या जागी नेत आहे हे समजणे कठीण. म्हणून बालबेकची सहल व्यायचे ठरवले.

परदेशातला हा पहिला दिवस. न्याहारीसाठी जाऊ असे डॉक्टरने सुचवले म्हणून चौकशी केली. तेव्हा समजले की, राहाणे नि चहा याचाच अंतर्भाव भाड्यात आहे, इतर गोष्टींसाठी स्वतंत्र पैसे. मग न्याहारीचा बेत रद्द करून बाहेर पडलो. सुमारे दहा मिनिटे चाललो, आणि दुकानांची रांग लागली. दुकाने वस्तूंनी भरलेली होती. पाव, खजूर, फळे, चीझ या वस्तू एका दुकानातून घेतल्या, नि त्यावर न्याहारी केली.

साडेआठ वाजता स्टेशनवॅगन आली. त्यातून आम्ही सहल-कार्यालयात गेलो. तिथे चिकार गर्दी होती. त्यातले बरेच लोक दमास्कसला जात होते. आमचा गट छोटा होता. बारा माणसांचा. सहा भारतीय, पाच जर्मन, नि एक डॉनिश. सहलीसाठी स्टेशनवॅगनच होती. गाडी जशी रस्त्यावर धावू लागली तशा पूर्वस्मृती अस्पष्ट स्वरूपात जागृत झाल्या. सुरुवातीला पथ विशाल होते. डाव्या हाताला शरणार्थींची छावणी दिसली. मग मोठा स्टेडिअम लागला. गावाला रेतीच्या वावटळीपासून मुक्त ठेवण्यासाठी देवदारवृक्षांची कशी विपुल लागवड केली आहे त्याकडे गाईडने लक्ष वेधले. आता चढ लागला. महाबळे-श्वरला जाताना लागतो तसा. वाटेवर लॅमर्टिन व्हॅली लागली. यात चेरी नि मलबेरीची विपुल वने आहेत. नंतर सेडर्स ऑफ लेबेनॉन ही पर्वतराजी लागली. येथून ती तुर्कस्थानापर्यंत जाते. यानंतर व्हॅली ऑफ कलर आली. रंगीबेरंगी गालिचांप्रमाणे रंग इथे दिसतात. पुढे माउंट हॅरमॉन लागला. या पर्वतावरून खाईस्टचे स्वर्गारोहण झाले असे गाईड म्हणाला.

वाटेवरच मद्याचा कारखाना होता. लेबेनॉनच्या ॲरकची अंमली ताकद काय आहे हे सांगताना गाईड म्हणाला की, पहिला चषक म्हणजे गंमत, दुसरा टीक, तिसरा झाला म्हणजे परदेशी मनुष्य अरबी बोलू लागतो आणि चवथ्याला रस्ता विसरतो. आता हनिमून व्हिलेज आले. मधुचंद्राला योग्य असेच थंड नि निद्रिस्त. येथून पुढे रस्ता फुटतो. एक जातो बालबेकला, दुसरा दमास्कसला. एका लहानशा हॉटेलात आम्ही कॉफीसाठी थांबलो. छोट्या अरबी कपातली ही कॉफी कडक होती. प्रवासाचा पल्ला खूप दूरचा असल्याने इथल्या सुव्हेनि-

असेच्या दुकानातील वस्तूंच्या मोहापासून आम्ही दूर राहिलो.

बालबेक आले. गाव फार प्राचीन. रोमन लोकांनी इथे प्रचंड मोठी मंदिरे बांधली. प्रथम मातीचा डोंगर उभा केला. मग त्यावर बाखस, व्हीनस नि ज्युपिटर यांची मंदिरे बांधली. त्यासाठी आस्वानहून पाषाण आणले. मंदिरातले स्तंभ चार मजले उंचीचे असावेत. यावरून मंदिराच्या विशालतेची कल्पना येते. कॉन्स्टंटाइन या सम्राटाने या मंदिराचे चर्चमध्ये रूपांतर केले. आमच्या गाईडचे नाव होते रशिद. त्याने मला विचारले ' तू हिंदू का पाकिस्तानी ? ' मी ' हिंदू ' म्हणताच त्याने हात जोडून नमस्कार केला. मंदिराची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितल्यावर तो मला म्हणाला, ' तुम्हा भारतीयांना या गोष्टी मोठ्या वाटणार नाहीत. तुमच्याकडेही मोठी मंदिरे आहेत. मला भारत बघायला यायचे आहे. पौर्णिमेला स्कॉच व्हिस्कीचा चषक घेऊन ताजमहाल पाहण्याचा आनंद लुटण्याचे माझे एक स्वप्न आहे. '

परत येताना अंजारला आलो. हे गाव रोमन लोकांनी बांधलेले. त्याचे भग्न अवशेष पाहण्यासाठी आम्ही थांबलो. अँटोनीने क्लिओपात्राबरोबर या गावात मधुचंद्र केला असे म्हणतात. भग्न अवशेषांच्या द्वारातून आत शिरत असताना एका द्वारपालाने मला थांबवून विचारले, ' तुम्ही भारतातून आलात का ? ' मी होकारार्थी मान हलविली तेव्हा तो म्हणाला, ' या गावाचे नाव गुजरातमधल्या अंजार गावावरून पडले असून अशोकाने बुद्धधर्माचा प्रसार करण्यासाठी इकडे उपदेशक पाठवले होते. इथल्या स्तंभावरचे चक्र तुमच्या ध्वजावरच्या चक्रासारखे आहे. त्याने दाखविलेले चक्र तितके सारखे नव्हते. वाटेत घाट लागला. चिपळूणला जाताना जसा घाट आहे तसा. शिशिर ऋतू संपला नसल्याने रस्त्याच्या कडेला गोठलेले हिम अजूनही होते.

चारच्या सुमारास हॉटेलवर परत आलो. प्रवासाच्या पहिल्याच टप्प्याला नवीन बॅगेचे हँडल तुटले होते. ते दुरुस्त कुठे होईल त्याची चौकशी करायला बाजारात गेलो. प्रथम आली भाषेची अडचण. पण खुणा वगैरे करून चांभाराचे दुकान गाठले. तिथेही भाषेची अडचण होती. तो अरबी भाषेत बोलत होता. मी खुणांच्या. शेवटी त्याने डोळ्यांवर बोट ठेवले. मी समजलो त्याला बॅग पाहायची आहे. मी हॉटेलवर आलो. बॅग रिकामी केली. ती खाली आणताना पाहून दोन चपराशी पळत आले. च लनाच्या कमतरतेमुळे बिदागी देणे शक्य नसल्याने मी

त्यांना परत रवाना केले आणि बॅग चांभाराच्या दुकानात आणली. त्याने दुरुस्तीचा एक पौंड–तेरा रुपये–सांगितला. अडला नारायण अशी स्थिती असल्याने कबूल झालो. दुसऱ्या बॅगची रिंग निघाली होती. तिच्या दुरुस्तीचे विचारले तेव्हा त्याने ती घेऊन येण्यास सांगितले. परत आल्यावर मी त्याला बॅग धर, हातोडी मार असे कामात थोडे साहाय्य केले. मग त्याने मला सिगरेट दिली. चार मिनारसारखी वाटली. दोन चार झुरके मारल्यावर त्याने विचारले,

‘ इंडिया ? ’

‘ होय. ’ मी उत्तरलो.

‘ हिंदू ! ’

‘ होय ! ’

‘ हिंदू गूड, पाकिस्तानी नो गूड. किल पिपल. ’

‘ हं. ’

‘ लाइक इंडिया. ’

‘ गुड. ’ मी म्हणालो.

दोन्ही बॅगा दुरुस्त झाल्या होत्या. मी त्याचे आभार मानून निघालो. त्याने बॉन व्हायेज केले. बॅग-दुरुस्तीचा खर्च अपरिहार्य होता. पण तो भरून काढण्यासाठी रात्रीचे जेवण रद्द केले. सकाळच्याच पदार्थांवर भागवले.

कॅसिनोला जायचे की नाही याची चर्चा झाली. सुमारे सहा पौंड प्रत्येकी खर्च होणार होता. मागे बगदादला मी बेली डान्स पाहिला होता. त्यासाठी पुन्हा खर्च करायला मन तयार होईना आणि बाकीचे प्रकार जगभर एकच असतात. दुसऱ्या दिवशी डॉक्टरच्या स्नेही मंडळींकडून कळले की रात्रीच्या सहलीत बेली डान्स दाखवण्यात आला नाही.

रात्री बैरूटमध्ये हिंडायला गेलो. वीस वर्षांपूर्वीचे बैरूट राहिले नव्हते. बायकांचा गोषा अजीबात गेला होता. अरब मुली देखण्या असतात. त्यांचा थाटही युरोपीय आहे. तरुण मंडळींत कल्ल्यांची फॅशन होती. कॅफे, रेस्टॉरा भरलेली होती. मोटरहाक्यांत विशेष शिष्टाचार दिसला. रस्ते साफ करण्याचे काम रात्री चालते. कचरा टाकायला स्तंभावर पेट्या होत्या. स्वराज्य आल्यावर आपल्याकडेही अशाच पेट्या लागल्या होत्या. पण खोटे अनुकरण तात्पुरतेच

असते ! बैरूट अगदी स्वच्छ वाटले.

सकाळी टॅक्सीने विमानतळावर आलो. पासपोर्ट, चलनबदली वगैरे आटपून आम्ही आत शिरलो. अ‍ॅथेन्सकडे जाणाऱ्या विमानाला उशीर असल्याने लाउंज-मध्येच हिंडत होतो. सुटणाऱ्या एका विमानातला युरोपीय प्रवासी बायकोचा निरोप घेत होता. दोघांमध्ये लोखंडी गज होते. निघताना त्याने तिच्या ओठांचे चुंबन घेतले. त्या दोघांच्या पलीकडे काळ्या कपड्यांतल्या अरब बायका उभ्या होत्या. त्या कुतूहलाने त्या युरोपीय जोडप्याकडे पाहात होत्या. ते पाहाताना मला मौज वाटली.

विमानतळावरचा बुक स्टॉलही मोठा होता. त्यात लैंगिक विषयांवर विपुल पुस्तके होती. बरीचशी 'केस हिस्टरी' प्रकारची. ती वाचताना कोणाचीही सविकल्प समाधी लागावी. अर्थात हेच स्फोटक साहित्य केवळ तिथे नव्हते. क्रांती नि क्रांतिकारक यांच्यासंबंधीचे साहित्य तिथे होते. शिवाय हो-चि-मिन्ह, माओ, नासेर, चर्चिल, द गॉल यांची चरित्रे होती. पुस्तके पाहात असताना विमानाच्या उड्डाणवेळेची घोषणा झाली. त्यानंतर वीस मिनिटांनी आम्ही विमानाकडे निघालो. एअर फ्रान्स विमानाचे प्रवेशद्वार पाठीमागे असून आसनांची पद्धतही जरा वेगळी होती. विमानात मोकळ्या जागा बऱ्याच होत्या. पावणेआठला ते सुटले. थोड्या वेळातच समुद्र लागला. पण ढगांमुळे खालचा भाग स्पष्ट दिसेना. अर्ध्या तासाने कप्तान म्हणाला की, विमान ऱ्होड बेटावरून जात आहे. आता वातावरण मोकळे झाले. खाली एजिअन समुद्रातली छोटी बेटे दिसू लागली. समुद्र सरोवरासारखा शांत होता. सुरुवातीच्या बेटांवर वस्ती नव्हती. पुढे ती दिसू लागली. प्राचीन काळी ग्रीक लोकांच्या टोळ्या वसाहती-साठी स्थलांतर वगैरे करीत याचा इतिहास मी वाचला होता. तो प्रदेश आज मी डोळ्याने पाहात होतो. त्याचा क्षणिक आनंद असतो.

साडेनऊला अ‍ॅथेन्सच्या विमानतळावर विमान उतरले. तळ अद्यतन पण गावापासून दूर आहे. हॉटेल अ‍ॅस्टरमध्ये आमच्या राहाण्याची सोय कंपनीने केली होती. सामान नेण्यासाठी पोर्टरला बिदागी द्यावी लागेल अशी सूचना होती. अंतर किती आहे याची कल्पना नसल्याने पोर्टर ठरवला. पण पन्नास हातांवरच बाहेर जाण्याची जागा होती. बाहेर येईपर्यंत बस निघून गेली होती. तेव्हा टॅक्सीने हॉटेलवर आलो.

पूर्वी मी ॲथेन्सला आलेलो होतो. तेव्हा येथे पाहण्यासारखे काय आहे याची मला कल्पना होती. म्हणून नगर-सहलीत जाण्याऐवजी आम्ही स्वतंत्र जाण्याचे ठरवले. दूरवर ॲक्रोपोलीस दिसत होता. पण पायपीट करण्याऐवजी बस वा ट्रॅमने जावे म्हणून मोठ्या रस्त्यावर आलो. ॲथेन्स किती तरी बदलले आहे. रहदारीही अफाट झाली होती. वाहतूक थांबली म्हणून मी मोटारीच्या रांगेतून निघालो. शेवटच्या रांगेपर्यंत येईतो रहदारी सुरू झाली. एक मोटार जरा जोरात आली. मी तिच्यावर आदळणार होतो. पण लहानपणी केलेल्या कसरतीच्या खेळांनी हात दिला. बोनेटवर हात ठेवून उडी मारली. गुडघ्याला थोडा मार लागला. चूक माझी असल्याने ड्रायव्हरची माफी मागितली.

ॲक्रोपोलीसकडे कोणते वाहन जाते याची चौकशी करून योग्य ट्रॅममध्ये चढलो. भाडे देताना थोडा गोंधळ झाला. पण एका सहप्रवाश्याने मदत केली. ट्रॅम तीन थांबे गेली आणि वळणावर ॲक्रोपोलीस दिसला. आम्ही उतरलो. ॲक्रोपोलीस म्हणजे डोंगरावरचे गाव. १९५३ मध्ये मी आलो होतो तेव्हा इथे फारशा सोयी नव्हत्या. आज खूपच दिसल्या. प्रवाश्यांची गर्दी होती. प्रवेशद्वारापाशी तिकिटे काढली. त्यावर पार्थिनॉनचे आणि एका ग्रीक नेत्याचे चित्र होते. शिवाय त्या नेत्यासंबंधी प्लुटार्कचे वाक्य दिले होते. " ही मेड धी सिटी ग्रेटेस्ट ॲंड ग्र्यु टू बी सुपीरिअर इन पॉवर टू किंग्ज ॲंड टायरंटस, बट ही डिड नॉट मेक हिज इस्टेट ए सिंगल शिलिंग ग्रेटर. " असे वर्णन लिहिण्याची शक्यता आपल्याकडे आज दिसते का ?

ॲथेन्सला यायचे म्हणजे लोकशाहीची परंपरा निर्माण करणाऱ्या गावाला यायचे, वक्तृत्वाच्या कलेचा पितामह डेमॉस्थेनीस याच्या गावाला यायचे, युरोपचा बृहस्पती जो सॉक्रेटीस त्याच्या गावाला यायचे, पेरिकल्सच्या गावाला यायचे— ॲक्रोपोलीसवर चढताना वरील गोष्टी माझ्या मनात आल्या. थोड्याच वेळात आम्ही प्रॉपेली म्हणजे प्रवेशद्वारापाशी आलो. उत्कृष्ट शिल्पकलेसाठी त्याची प्रसिद्धी आहे. प्रवेशद्वारातून आत शिरले की, उजव्या हाताला नजरेत येतो तोच पार्थिनॉन. पेरिकल्सने बांधला. डोरिक कलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून त्याचा उल्लेख होतो. पार्थिनॉन मूळचे ग्रीक मंदिर. मग त्याचे चर्च झाले. तुर्कांच्या आधिपत्याखाली त्याची मशीद झाली. पुढे व्हेनेशियन नौदलाने

तोफमारा केला असता पार्थिनॉनमध्ये ठेवलेल्या दारूगोळ्याने भडका घेऊन हे मंदिर उध्वस्त झाले. त्या स्वरूपात आज ते दिसते. त्यावरूनही त्याच्या पूर्वीच्या भव्यतेची कल्पना येते.

ॲक्रोपोलिसवर आम्ही तासभर होतो. खूप थंडी होती.. फोटो काढून झाल्यावर आम्ही गावाची कल्पना येण्यासाठी ॲक्रोपोलिसच्या बाजूने चक्कर टाकली नि डोंगरमाथ्यावरून थिएटर ऑफ डॉयोनिसास, टेंपल ऑफ झेप वगैरे गोष्टी पाहिल्या. खाली आल्यावर डॉक्टरने मला विचारले. ' किती बदल झाला आहे ? ' मी म्हणालो की, पूर्वी वर जाणारा रस्ता बांधलेला नव्हता. तसेच वाटेवर जिथे कॉफी घेतली तो बार नव्हता. इतके मार्गदर्शक नव्हते. मोटारी नव्हत्या. टेंपल ऑफ झेपला कुंपण नव्हते. मग टेंपल ऑफ झेप पाहून आम्ही एका ग्रीक चर्चमध्ये गेलो. जुन्या देवळासारखे होते. तिथल्या एका भिक्षुणीने एक चित्र दाखवले. त्यात मेरीच्या डोळ्यातून रक्ताचे अश्रू येत आहेत असे दाखवले आहे. येथून आम्ही डिफेन्स ॲकेडेमीच्या उद्यानातून हिंडत हॉटेलवर परतलो.

दिवसभरच्या रपेटीने पाय दुखू लागले होते. त्यांना आराम पडावा यासाठी गरम पाण्याच्या टबात बसलो. नंतर रात्रीच्या भोजनासाठी गेलो. हेडवेटरला भारतीय पदार्थांची माहिती होती. त्यानं भात, भाजी, आमटी यांची व्यवस्था केली. शिवाय दही. त्याचे इतके वाटगे नकोत असे सांगूनही त्याने ऐकले नाही. तो म्हणाला ' संपवा '. जेवणाची सोय हॉटेलच्या गच्चीवर होती. आता दिवे लागले होते. ॲक्रोपोलिसवरही रोषणाई होती. पार्थिनॉन दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघाला होता. ते दृश्य रमणीय होते.

सकाळी टॅक्सीने विमानतळावर आलो. ग्रीक नाणी परत केली. तरीही चिल्लर राहिली. म्हणून ॲथेन्सची चित्रे, ग्रीक बॉलपेन, नि ग्रीक सिगरेटचे—'पॅपॅस्ट्राटोस—पाकीट घेतले. ही खरेदी चालली असतानाच विमानाच्या उड्डाणाची घोषणा झाली. म्हणून लगबगीने निघालो. आत शिरण्याच्या गजापाशी गेलो तेव्हा बी. इ. ए. च्या होस्टेसने पलीकडच्या टेबलापाशी जा असे सांगितले. तिथे गेल्यावर एका मुलीने डॉक्टरला पर्स उघडण्यास सांगितले नि दुसरीने मला हातातली बॅग. पावडरचा डबा नि खजुराची पिशवी या माझ्या बॅगेतल्या वस्तूंनी तिचे लक्ष वेधून घेतले. म्हणून मी तिच्या हातातून खजुराची पिशवी

घेतली नि त्यातला एक खजूर तोंडात टाकला. ते पाहून त्या दोघी हसल्या. विमान पळवण्याचे ते साधन नव्हते ! बॅग बंद करून तिने ती परत दिली. मी दारापाशी आलो. इतक्यात एक मनुष्य पुढे आला आणि त्याने एकदम बगलेत हात घातला. मी हात वर केले. त्याने वरपासून खाली नि खालपासून वर असे चाचपून पाहून मला जाण्यास सांगितले.

बाहेर ट्रेलर उभा होता. आम्ही काही भारतीय नि थोडे अमेरिकन वगळून बाकीचे सर्व प्रवासी इंग्रज होते. विमानापाशी ट्रेलर येताच सर्वांना सूचना मिळाली की स्वतःचे सामान आले की नाही ते पाहून घ्या. ते काम करून आम्ही विमानात चढलो. बि. इ. ए. चे विमान आणखीच निराळ्या प्रकारचे होते. त्यातली आसने समोरासमोर होती. आमच्या दोघांची आसने शेजारी आहेत असे सांगण्यात आले होते. पण निघाली निराळ्याच जागी. तेव्हा इंग्रज प्रवाश्याने त्याचे आसन मला दिले. पण तेही समोर निघाले. तेव्हा डॉक्टरच्या शेजारच्या प्रवाश्याने आपली जागा मला दिली. जागा बदलण्याचे काम चालत असतानाच विमानाचा आवाज सुरू झाला. ते धावू लागले नि क्षणार्धात त्याने आकाशाकडे झेप घेतली. सकाळचे नऊ वाजले होते.

# रोम

न्याहरी आटोपल्यावर कप्तान म्हणाला की, विमान कॉर्फ्यू-वरून व्हेसुव्हिअसच्या बाजूने जाणार आहे. काही समया-नंतर पर्वतराजी लागली. पण सगळेच डोंगरमाथे हिमाच्छादित होते. तेव्हा कोणता व्हेसुव्हिअस ते कसे समजणार ! आता विमान उंची सोडू लागले. ९–५० ला रोम आले. कस्टम्समध्ये अधिकाऱ्याने मला विचारले, ' व्हिस्कीच्या बाटल्या किती आहेत ? ' ' आम्ही भारतातून आलो आहोत,' मी उत्तरलो. तो मोठ्याने हसला नि न उघडताच त्याने बॅगेवर खूण केली. इथेही हमालाला बिदागी द्यावी लागते. तेव्हा मीच सामान उचलले. डॉक्टरने बसची तिकिटे काढली नि इटालियन चलन आणले. विमानतळ तसेच बाहेरील पटांगण विस्तृत आहे. पण स्वच्छता कमी होती. ॲथेन्सप्रमाणे रोमही बदलले आहे. बसमध्ये माझ्या शेजारी एक इटालियन तरुण होता. त्याने संभाषणाला सुरुवात केली. ' भारतात सर्वांना इंग्रजी येते का ? '

' शाळा-कॉलेजातल्या मुलांना येते, ' मी सांगितले.

' मी कोणत्या देशाचा वाटतो ? ' त्याने पृच्छा केली.

' तुम्ही इटालियन असून अमेरिकन उच्चाराने बोलत आहात,' मी म्हणालो.

' पूर्वी रोमला आला होतात ? '

वीस वर्षांपूर्वी आलो होतो असे सांगून इम्यान्यूएलचे स्मारक, सेंट पिटर ही स्थाने दाखवली. त्याची खात्री झाली.

त्याचे बोलणे थांबले तेव्हा मी नोंदवही काढली. दोन चार शब्द टिपतो तोच त्याने बोलायला सुरुवात केली. तेव्हा टिपणे थांबवले. वही हातातच होती बस एअर टर्मिनलपाशी आली. सामान काढणे, टॅक्सी स्टँडपाशी नेणे ही जिकीरीची कामे केली. टॅक्सी निघाली नि वाटेत बंद पडली. पाठीमागून हॉर्न वाजू लागले. ड्रायव्हरने मॉरिस शेव्हेलिअरसारखे हात पसरून आपली अगतिकता व्यक्त केली. मग पोलिस आले. त्यांनी गाडी ढकलून कोपऱ्याला लावली. ड्रायव्हरने एंजिनशी काही खटाखट केली आणि गाडी चालू लागली. आम्ही हॉटेल पेंशॉन सिसिलियापाशी आलो. चौथ्या मजल्यावर हे पेंशॉन आहे. अत्यंत सामान्य. पण कमी खर्चात यापेक्षा निराळे काय मिळणार ! सामान वर येऊन खोल्या तयार होण्यास वेळ लागणार होता. म्हणून दैनंदिनी लिहिण्यास घेतली. पण नोंदवहीच खिशात मिळेना. मग लक्षात आले की वही बसमध्ये पडली असावी. तेव्हा बस स्थानकावर फोन केला. त्यांनी दोन वाजता बोलावले. खाली येऊन एक टॅक्सी थांबवली. पण आम्हांला कुठे जायचे आहे ते टॅक्सीवाल्याला समजायला थोडा वेळ लागला. बस स्थानकापाशी आल्यावर त्याला एक नोट दिल्यावर तो म्हणाला की, सुटे पैसे नाहीत. तेव्हा डॉक्टर म्हणाली की, ते काही नाही ९० लिरे परत हवेत. त्यावरोबर तितकी रक्कम घेऊन तो मार्गस्थ झाला. मग लक्षात आले की, हजार लिरेची नोट दिली होती पाचशेची नाही. कार्यालयात गेल्यावर एकाकडून दुसऱ्याकडे असे करत योग्य जागी पोहोचलो. तिथल्या माणसाने सांगितले की, बस रात्री डेपोत येईल तेव्हाच माहिती मिळेल. मग आता कशाला बोलावले असे मी विचारल्यावर त्या माणसाने खांदे उडवले.

परत पायीच निघालो. येताना रस्त्याच्या खुणा लक्षात ठेवल्या होत्या. त्या खुणांच्या दिशेने निघालो. बरेच अंतर गेल्यावर रस्ता चुकलो असे वाटले. म्हणून हॉटेलचे कार्ड दोघा-तिघांना दाखवून शेवटी स्वस्थानी परतलो. मागच्या वेळी इटलीत प्रवास करताना व्हिनो मद्याची चव घेतली होती. त्याचा एक चषक पाठवायला मालकाला सांगितले. तो म्हणाला, ‘ बाटली मिळेल, चषक नाही. ’ तेव्हा बाटली नको असे त्याला सांगितलं. थोड्या वेळाने चषक आला. व्हिनोची चव द्राक्षासवासारखी वाटली. मात्र थोडी कडक.

रात्रीच्या भोजनासाठी आम्ही रिस्टोरॉं-पिझेरियाल कुपेलात गेलो. खाली

तळघरात भोजनालय असून वातावरण जुन्या जमान्याची आठवण देणारे होते. मेणबत्त्या लावलेल्या होत्या. आम्ही शाकाहारी आहोत असे सांगितल्यावर वेटरने थाळी भरून भाज्या आणून ठेवल्या. त्यात वांग्याचे काप होते. इथे स्पॅगेटीला ४५० लिरे पडले. शिवाय सर्व्हिस चार्जेस निराळे. स्नॅक बारमध्ये याच प्लेटला २५० लिरे पडत होते. उत्तम जेवण आणि व्हिनो. झोप केव्हा लागली तेच कळले नाही.

सकाळी व्हॅटिकन म्युझियमकडे गेलो. बसमध्ये सुमारे वीस प्रवासी होते. नि एक वयस्क बाई गाईड म्हणून होती. पंधरा मिनिटांत व्हॅटिकन आले. सर्वांना प्रवेश तिकिटे दिल्यावर ती म्हणाली, ' जपून ठेवा तिकिटे. नाही तर मागच्या वेळेसारखे होईल.' साहजिकच एकाने विचारले, ' मागे काय झाले ? ' " मागच्या वेळेला प्रवेशद्वारापाशी आल्यावर एक प्रवासी म्हणाला की, माझं तिकीट सापडत नाही. मी त्याला पुन्हा नीट पाहा असे सांगितले पण त्याला सापडेना. शेवटी मी रागावून नवीन तिकिट घेण्यास गेले. तेव्हा तो ओरडला, ' तिकीट सापडले.' त्याचा गळा दाबावा असं मला झालं." दर वेळी सांगण्याचा हा ' टुरिस्ट विनोद ' असावा !

प्रथम आम्ही ग्रीक विभागात गेलो. ग्रीक लोक सौंदर्याचे भोक्ते. त्यांच्या सर्व शिल्पकृतीत त्यावर भर दिसतो. काही नमुने फारच सुंदर आहेत. इथे सुमारे दोन अडीच फूट रुंदीचे एक दगडी पाऊल ठेवलेले होते. ते नक्षीकाम असलेल्या सॅडल्स-मध्ये होते. त्या नक्षीकामावरून पुतळा किती रेखीव असेल याची कल्पना करता येते. रोमन सम्राटाचे पुतळे भव्य असले तरी ते सुंदर वाटत नाहीत. मिनीस्कर्ट घातलेल्या एका छोट्या पोरीच्या पुतळ्याकडे आमचे लक्ष वेधून गाईड म्हणाली, ' मिनीस्कर्ट हा आधुनिक पेहेराव नाही हे यावरून दिसते. '

यानंतर गॅलेरी ऑफ टॅपिस्ट्रीकडे आलो. मोठ्या पडद्यात चित्रे विणलेली असून ते पडदे भिंतीला लावलेले आहेत. सोळाव्या शतकातील ही कला. इथली दोन चित्रे लक्षात राहतात. जीझसला मारण्यासाठी एक वर्षाच्या बालकांची कत्तल करण्याचे ठरल्यानंतर लहान पोरांना कसे कापण्यात येत होते ते दाखवणारे चित्र नि दुसरे सिझरचा खून. रॅफेलच्या शिष्याने ती विणली होती. नंतर सेंट पिटर्सची छोटी प्रतिकृती पाहिली. सेंट पिटर्स बांधून होण्यापूर्वी मायकेल एंजेलोचे देहावसान झाले तर अडचण येऊ नये म्हणून त्याच्याकडून पोपने ही प्रतिकृती

तयार करून घेतली. ती दर्शनीय आहे. लिओनार्डो, मायकेल एंजेलो, रॅफेल असे श्रेष्ठ कलाकार देशात जन्माला यावे हे भाग्य खरंच. पण त्यांच्याकडून कामे करून घेणारे राज्यकर्ते निघावे ही गोष्ट तितकीच भाग्याची !

फ्रेस्को विभागातली रॅफेल नि लिओनार्डो यांची चित्रे लक्षणीय आहेत. लिओनार्डोने प्लेटो नि ॲरिस्टॉटलचे चित्र केले आहे. त्यात प्लेटो कल्पनावादी असल्याने त्याचा हात वर दाखवलेला आहे नि ॲरिस्टॉटल जडवादी असल्याने त्याचा हात खाली दाखवला आहे. लिबरेशन ऑफ सेंट पिटर हा रॅफेलचा फ्रेस्को हृद्य आहे. पाहिल्या चित्रात रक्षक पिटरला मुक्त करत असून दुसऱ्यात त्याला बाहेर नेत आहेत असे दाखवले आहे. यात पिटरच्या आकृतीवर उजेड पडलेला दिसेल अशी रंगयोजना आहे. येथून आम्ही सिस्टाईन चर्चमध्ये गेलो. हे चर्च सोळाव्या शतकात बांधण्यात आले. यातली रॅफेल नि मायकेल एंजेलो यांची चित्रे नितान्त रमणीय आहेत. ॲडम नि इव्ह यांना स्वर्गातून ढकलण्यात येत असलेले चित्र विशेष ध्यानात राहते.

व्हॅटिकन लायब्ररीत शेकडो वर्षांची जुनी पुस्तके आहेत. त्यात पेट्रॉर्क, डांटे यांच्या ग्रंथांची हस्तलिखिते आहेत. सर्व कपाटे बंद होती. एक मात्र उघडे होते. त्यातली हस्तलिखिते काढून एक म्हातारा इसम ती लावत होता. त्याचा चेहरा पाहिला नि मला डिकन्सच्या पिकविक पेपर्सचे स्मरण झाले. नाकावरून ओघळणारा जुना लोखंडी चष्मा, नाकाच्या शेंड्यावरचे चार मोटे केस, लोकांकडे पाहाताना त्याची शंकित नजर, काळ्या कापडाचे जुने कपडे. डिकन्सने वर्णन करावे असाच तो इसम होता.

दुपारी गावाबाहेरच्या सहलीला गेलो. बस न्यू एपिअन वेने निघाली. राजवाडे, हवेल्या इत्यादी उत्खननात मिळालेल्या रोमन वास्तू राजरस्त्यात दिसतात. अलबोनो सरोवरापाशी बस प्रथम थांबली. सरोवराच्या तिन्ही बाजूला डोंगर असून त्यावर हिरवी गडद झाडी होती; भूकंपाच्या धक्क्याने हे सरोवर तयार झाले. आज पाऊस पडल्याने हवा विलक्षण थंड होती. कडक कॉफी घेऊनही थंडी कमी झाली नाही. तेथून बस डोंगर चढू लागली. वाटेत श्रीमंत लोकांच्या लहान लहान वस्त्या लागत होत्या. डोंगराच्या माथ्यावर पोपचा समर पॅलेस आहे. तो बंद होता. तेथून रोम नगरीचे सम्यकदर्शन होते.

यानंतर बस थांबली ती मॅरिनो गावापाशी. गाव टुमदार आहे. त्याची आज

प्रसिद्धी आहे ती सोफिया लॉरेन्सचे गाव म्हणून. दर ऑक्टोबर महिन्यात ' फेस्टिव्हल ऑफ वाइन ' हा उत्सव येथे होतो आणि तो जिथे होतो त्या चौकातल्या कारंज्याला ' फाउण्टन ऑफ वाईन ' म्हणतात. इथल्या रेस्टॉरंटमधले पदार्थ सर्वोत्कृष्ट समजतात. बसने शेवटला विराम घेतला फ्रिसकाटी गावापाशी. इथले मद्य प्रसिद्ध आहे. त्याची छोटी बाटली मी घेतली. त्यातले मद्य १९६० मधले होते. रोममध्ये भुयारी रेल्वे सुरू करण्याचे ठरले असून त्याच्या कामाची सुरुवात झाली होती. त्याचे खोदकाम चाललेले परतीच्या वाटेवर दिसले. व्हिला द ब्रिंडिनी, चित्रपट स्टुडिओ या विभागातून हिंडून बस परतली.

दुसऱ्या दिवशी सकाळी गावातल्या सहलीसाठी आम्ही व्हिला बोर्गेसपाशी आलो. सहलीची व्यवस्था पाहणारा इसम लक्षात राहील असाच होता. उंच पण सडसडीत, उत्तम कपडे, काळा चष्मा, लांब कल्ले, हातात पेन्सिल. तिचा उपयोग तो लिहिण्यासाठी किंवा सिगारेटसारखी तोंडात धरण्यासाठी करीत असे. कोणी उशिरा येवो, तक्रार करो, तो कधीच रागावत नसे. हसायचा नि म्हणायचा ' नो वरी, सी सी '. आजचा गाईडही लक्षात राहील असाच होता. अत्यंत देखणा, हसतमुख. इंग्लिश, जर्मन, स्पॅनिश या भाषांचे त्याला उत्तम ज्ञान होते. शिवाय माहितीला पक्का नि विनोदी स्वभावाचा होता.

बोर्गेस हे प्रसिद्ध इटालियन कुटुंब. त्याचा व्हिला नि उद्यान प्रेक्षणीय आहेत. उद्यानात हिंडायचे म्हटले तर एक दिवस लागेल ! सहलीला प्रारंभ येथून झाला. सुरुवातीला दोन हजार मोटारींसाठी भुयारी तबेला बांधला जात असलेला गाइडने दाखवला. रोमची वस्ती आहे तीस लाख आणि मोटारी आहेत पंधरा लाख. गटेच्या स्मारकावरून पुढे गेले की, रोमचा प्राचीन तट दिसू लागतो. तो अकरा मैलांचा असून त्याला चौदा प्रवेशद्वारे नि चार हजार मनोरे आहेत. परकीय आक्रमणाला तोंड देण्यासाठी तिसऱ्या शतकात तो बांधण्यात आला. त्याचे काम पाच वर्षे चालले.

बस फाऊन्टन ऑफ मोझेसवरून रिपब्लिकन स्क्वेअरकडे आली. इथे डाव्या हाताला डायोक्लेशियन बाथ दिसतो. त्याच्या पुढील वास्तू म्हणजे रोमन मार्केट. सुपर मार्केटची कल्पना किती जुनी आहे याची कल्पना त्याच्या विशाल अवशेषांवरून येते. या मार्केटमधून रोमन सरदार आपल्या बायकांसाठी फुले नि प्रेयसींसाठी हिरे विकत घेत असत असे गाईडने सांगितले.

स्क्वेअर ऑफ व्हेनिसचे वर्णन इटलीचे प्रातिनिधिक केन्द्र असे करतात. सन १८७० साली काव्हूरच्या नेतृत्वाखाली इटलीचे एकीकरण होऊन त्याला राष्ट्रपदाची प्राप्ती झाली तो सगळाच इतिहास चित्तथरारक आहे. जवळच मुसोलिनीचा राजवाडा आहे. मुसोलिनीचे छोटे फोटो नि काही मजकूर असलेल्या दगडी पाट्या काही दुकानांत मी पाहिल्या होत्या. पण मजकुराचा अर्थ समजला नव्हता. पुढे सोरेंटोला एका दुकानदाराने त्याचा अर्थ इंग्रजीत सांगितला. तो असा : "तू वाईट नव्हतास, खूप चांगलाही नव्हतास, तुझ्या कारकीर्दीत साहित्यिकांची बूज राखली जात होती. शत्रूंनाही तू क्रूरतेने वागवले नाहीस. इटलीला पूर्ववैभव प्राप्त व्हावे यासाठी तू यत्न केलास. पण आजचे राज्यकर्ते..." हे भाषांतर किती खरे आहे कोणास ठाऊक! मुसोलिनी साहित्यिकांची बूज राखत होता हे मात्र खरे. त्याची ग्वाही मला स्मरते त्याप्रमाणे स्टिफन झ्वाईगने दिली आहे.

ज्युलिअस सिझरच्या फोरमपाशी बस थांबली. या भागात रोमची पहिली वसाहत झाली. रोम सात टेकड्यांवर वसले आहे. त्यांपैकी पॅलेटाईन टेकडीवर पहिली वसाहत झाली. सिनेट, टेंपल, मार्केट अशी या फोरमची व्यवस्था होती. संप चालू असल्याने हे भग्न अवशेष आतून पाहाता आले नाहीत. अशा भग्न अवशेषांत बसले असतानाच गिबनला रोमन साम्राज्याचा इतिहास लिहिण्याची कल्पना सुचली असे त्याने स्वतःच्या ग्रंथाच्या शेवटी लिहिले आहे. येथून आम्ही कलोशिअमकडे आलो. केवढी अवाढव्य वास्तू आहे. गरीब रोमन लोकांना दोन गोष्टी मोफत मिळत. एक रोटी नि दुसरी या कलोशियममध्ये होणाऱ्या माणसामाणसातल्या किंवा माणूस नि पशू यांच्यातल्या जीव घेणाऱ्या झुंजी पाहाणे. या कलोशियमचा एक-तृतीयांश भाग अजून उभा आहे. पडलेल्या वा पाडलेल्या भागातल्या अनेक गोष्टींचा वापर व्हॅटिकन नि सेंट पिटर्स यांच्या उभारणीत करण्यात आला असे सांगतात. 'कलोशियम पाहिल्यावर पिरॅमीडचे कौतुक नको,' असे एक इटालियन कवी म्हणाला होता. तरी रोमन सम्राटांना पिरॅमीडचे कौतुक होते. म्हणूनच पॉल गेटपाशी एका इटालियन राजाने स्वतःचे दफन करण्यासाठी पिरॅमीड बांधला होता. तो आजही दिसतो.

गावात जसा सेंट पिटर्स तसा गावाबाहेर सेंट पॉल बॅसिलिका आहे. वीस वर्षांपूर्वी रोमला आलो असताना सेंट पॉलकडे आलो नव्हतो. पूर्वी तो लाकडाचा

बांधलेला होता. आणि उत्तम शिल्पाचा नमुना असा त्याचा गौरव होत असे. सन १८२३ मध्ये आग लागून त्याचा दोन-तृतीयांश भाग जळून गेला. कॅनोपी-पासूनचा भाग वाचला. त्यामुळे कॅनोपी नि त्याच्या पाठीमागची मोझाइक्स वाचली. जळलेला भाग पुन्हा बांधण्यात आला. पण पाषाणात. चाळीस हजार भाविक राहू शकतील इतका मोठा तो आहे. पाठीमागच्या भागाला क्लॉइस्टर आहे. तोही आगीतून वाचलेला. जुन्या वाड्यासारखा दिसतो. बेनेडिक्टाईन साधू इथे रहातात. प्राचीन काळाप्रमाणे आजही ते मद्य-निर्मिती करतात. त्याच्या छोट्या बाटल्या इथे विकत मिळतात.

दुपारीही गावाच्याच सहलीला गेलो. त्याची सुरुवात लिंकन साईटने केली. या उद्यानात इटलीतील श्रेष्ठ पुरुषांचे पुतळे आहेत. येथे एक वॉटर क्लॉक आहे. पण ते चालत नव्हते. येथून बस राष्ट्राध्यक्षांचा निवासाकडे आली. वाडा जुना आहे. आणि त्याला रंगही बऱ्याच वर्षांत लागला नसावा. एक तर राष्ट्राध्यक्षाला त्याचे महत्त्व वाटत नसावे किंवा आपल्या निवासावर खर्च कशाला असे त्याला वाटले असावे. तसे असेल तर त्याचे समाजवादाचे धडे पक्के झालेले नसावे !

ट्रेव्ही फाऊन्टन हे रोममधले प्रसिद्ध कारंजे. निकोला सालवी याने सन १७६२ मध्ये ते बांधले. अनेक चित्रविचित्र पुतळे नि जलधारा हे त्याचे भौतिक वैशिष्ट्य. दुसरे आहे ते असे : या कारंजाकडे पाठ करून तीन इच्छा करायच्या नि एक नाणे पाण्यात टाकायचे. त्या इच्छा कोणत्या ? रोमला परत यायची संधी मिळो, प्रेयसी भेटून लग्न होवो नि लवकरच घटस्फोट मिळो. मागच्या वेळी इथे नाणे टाकले नव्हते तरीही रोमला आलो. म्हणून या वेळीही नाणे टाकले नाही. नंतर आलो ते स्पॅनिश स्टेप्सपाशी. हिप्पींच्या मुक्कामाची ही जागा. बसमध्ये बहुसंख्य प्रवासी अमेरिकन असल्याने आमचा गाईड मिस्किलपणे म्हणाला, ‘ हे हिप्पी इटालिअन नाहीत. ’ तेव्हा मी त्याला विचारले, ‘ ते कुठे गेले ? ’ तो हसला.

जवळच तीन हजार वर्षांची प्राचीन इजिप्शियन ओबेलिक्स आहे. ती दुसऱ्या शतकात रोममध्ये आणण्यात आली. अलीकडे थोड्या अंतरावर बर्नीनीने बांधलेली दोन चर्चे आहेत आणि त्यांच्याच आसमंतात ऑगस्टसची समाधी आहे. पॅलेस ऑफ जस्टिसवरून आम्ही पॅन्थिऑनपाशी आलो. हे रोमन लोकांचे

मंदिर. अर्थात त्याचे नंतर चर्च झाले. पण ते पूर्वी ज्या स्वरूपात होते तसेच आज आहे. दुसरी जुनी गोष्ट म्हणजे रोमन कालातले दोन सेतू. रहदारीसाठी आजही त्यांचा वापर होतो. यानंतर बस इटालियन महाकवी डांटे याच्या घरावरून सर्वांत उंच असणाऱ्या जेनोस हिलवर आली. इथे गॅरिबाल्डी चौक आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात तरुणांना ज्या परकीय देशभक्तांच्या चरित्रांनी स्फूर्ती दिली त्यांपैकी एक गॅरिबाल्डी. आजही त्याचे चरित्र वाचताना मन पुलकित होते.

सहलीचा शेवटचा टप्पा होता सेंट पिटर्स बॅसिलिकापाशी. पूर्वी मी इथे येऊन गेलेलो असल्याने नावीन्याचे औत्सुक्य नव्हते. सेंट पिटर्स हे जगातले सर्वांत मोठे ख्रिश्चन चर्च. त्याचा बाहेरचा चौकही विशाल आहे. त्यात भाविक लोक जमतात तेव्हा उजव्या हाताच्या कोपऱ्यातल्या इमारतीच्या वरच्या मजल्यावरून पोप त्यांना आशीर्वाद देतात. चौकात २८० स्तंभ असून १५० मूर्ती आहेत. या चौकाचा आराखडा बर्निनीचा.चर्चचा आराखडा मायकेल एंजेलोचा. चर्चच्या आत गेल्यावर तिथल्या भव्यतेने मन चकित होते. स्तंभावरचे काम, मोझाइक्स अवर्णनीय आहेत. मोझाइक्सची कला व्हॅटिकनमध्ये गेल्या शतकात इतकी परिणत पावली की, निरनिराळ्या रंगांच्या ११,००० छटा निर्माण करण्यात आल्या. क्रुसावरून उतरवलेल्या ख्रिस्ताला मांडीवर घेऊन बसलेली मेरी हा मायकेल एंजेलोने केलेला पुतळा– पिएटा– इथे आहे. ती एक श्रेष्ठ कलाकृती समजली जाते. खरोखरच सेंट पिटर्स ही भव्य वास्तू आहे.

□

# सोरेंटो नि व्हेनिस

इटलीचा दक्षिण किनारा रम्य वनश्रीने नटलेला आहे तो पाहण्याच्या उद्देशाने नेपल्स, पॉंपी, सोरेंटो, काप्री येथे जाणाऱ्या दोन दिवसांच्या सहलीला आम्ही गेलो. सकाळी आठ वाजता राजमार्गावरून बस धावू लागली. हा पथ एका खाजगी कंपनीने युद्धानंतर बांधण्यास घेतला. काही ठिकाणी अजूनही त्याचे काम चालू होते. वीस वर्षांनी या पथाचे राष्ट्रीयीकरण होणार. अशीच गोष्ट आपल्याकडे करायची म्हटली तर !

पंधरा मिनिटे बस धावली नि धुके लागले. नंतर झिमाझिम पाऊस पडू लागला. तेव्हा काप्री बेटाची सहल हुकणार अशी मला शंका आली. दक्षिण इटली हा प्रामुख्याने शेतीप्रधान आहे. त्यामुळे सगळा भू-प्रदेश हिरव्या वनश्रीने नटलेला होता. छोटी घरे, द्राक्षांचे मळे, भाज्यांच्या बागा, मध्येच नांगरलेली जागा, भोवताली चरणारी गुरे, चढता डोंगराळ भाग, डोंगरमाथ्यावरचे उंच मनोरा असलेले चर्च, हे दृश्य पुन्हा पुन्हा दिसे. तासाभराच्या प्रवासाने नि मोटरीच्या एका विशिष्ट आवाजाने मला जरा डुलकी येऊ लागली. पण डाव्या हाताला माउंट कॅसिनो मॉनॅस्टरी आहे या गाईडच्या उद्‌गाराने मी जागा झालो. ही जागा गेल्या महायुद्धात जर्मन दलाने मोठ्या ईर्ष्येने लढवली होती. चढाई करणाऱ्या दोस्त सैन्यात भारतीय सेनेची चौथी डिव्हिजन होती. तिच्यात मराठा लाईट इन्फंट्रीचा समावेश

होता. लढाईमध्ये मोनॅस्टरीचे खूप नुकसान झाले. आता ती पुन्हा बांधण्यात आली आहे. उंच डोंगरावरच्या एका बाजूला मोनॅस्टरीची पांढरी भिंत दिसते. नंतर वाटेवर बॅरोक पद्धतीचा कसाटीचा राजवाडा दिसला. नेपल्सच्या राजासाठी बाराव्या शतकात तो बांधण्यात आला.

अकराच्या सुमारास बस नेपल्सच्या सीमेत शिरली. व्हेसुव्हिअस डाव्या हाताला होता. ढगात नि धुक्यात लपेटलेला. पाऊस झिमझिम पडतच होता. सुरुवातीला दिसले ते १३०० खोल्या असलेले अनाथालय. सतराव्या शतकात चार्लस राजाने ते बांधले. नंतर आले बोटॅनिकल उद्यान. युरोपमध्ये त्याचा दुसरा क्रमांक लागतो. बस जुन्या वस्तीतून गेली. त्यात समोरासमोर घरांना दोऱ्या बांधल्या असून त्यावर कपडे वाळत घातलेले होते. त्यांचे वर्णन आंतरराष्ट्रीय ध्वज असे गाईडने केले. एका भागातून जाताना ती म्हणाली की, हे ब्लॅक मार्केट. इथे काहीही मिळते. तुमचा पासपोर्टही तयार करून मिळेल. निकोलाय स्क्वेअरचे वैशिष्ट्य म्हणजे इथल्या चार घरांचे प्रवेशद्वार एकाच पद्धतीचे आहे. नेपल्समधल्या महाविद्यालयाचा विशेष हा की, त्यात पौर्वात्य भाषांचे अध्ययन करण्याची व्यवस्था आहे.

नेपल्स बंदर मोठे असून त्यात जलदुर्ग आहे. येथून वळलो नि बोगदा ओलांडून नेपल्सच्या उच्च नागरी विभागात आलो. सुरुवातीलाच विजय चौक लागतो. त्यात पॉंपी शहराच्या उत्खननात जे पुतळे मिळाले ते ठेवण्यात आले आहेत. यानंतर युद्धकाळात जिथे प्रचंड बॉंबहल्ले झाले त्या भागातून गेलो. पंचवीस वर्षांनंतरही जळलेली घरे, आणि फक्त उभ्या भिंती दिसतात. हे पाहिल्यावर युद्धाच्या ज्वाळा किती प्रखर असतात याची कल्पना येते. येथून बस बाहेर पडली नि नेपल्स सालेर्नो या राजपथावरून धावू लागली. हा पथ मुसोलिनीच्या आज्ञेने बांधण्यात आला. या प्रदेशात स्पॅगेटीचे शंभर कारखाने आहेत. आता रस्त्याच्या कडेला पाईन वृक्षांची रांग लागली. या वृक्षांचा आकार छत्रीसारखा असल्याने त्यांना अंब्रेला पाईन म्हणतात.

वाटेवरच शेलवर कलाकुसरीचे काम करणाऱ्या एका कारखान्यात थांबलो. आपल्याकडे हस्तिदंतावर जसे काम होते तसे इथे शेलवर होते. ही कला दोन हजार वर्षांची जुनी असून परंपरागत काही कुटुंबात चालत आलेली आहे. येथून आम्ही पॉंपी शहराकडे आलो. खिस्ताब्द ७९ मध्ये व्हेसुव्हिअसमध्ये

प्रचंड स्फोट होऊन त्याच्या भोवतालची तीन गावे लाव्हारसात बुडाली. त्यातले एक पॉंपी. ' लास्ट डेज् ऑफ पॉंपी ' या चित्रपटात तो भयानक प्रसंग दाखवलेला आहे. सतराव्या शतकात चार्लेस राजाच्या आज्ञेने येथे उत्खनन सुरू झाले. संप असल्याने आत जाता आले नाही. पण हे शहर मागच्या मी खेपेस पाहिले होते. एक मोठी पेठ, त्यातली घरे, इत्यादी गोष्टी बाहेरून दिसतात. त्यावरून प्राचीन गावाची कल्पना येऊ शकते.

दुपारचे जेवण नव्या पॉंपीतल्या अलबर्टो रोझेरियो या उच्च श्रेणीच्या हॉटेलात झाले. आम्ही शाकाहारी आहोत असे सांगितल्यावर तिथल्या लोकांची जरा गडबड झाली. पण हेडवेटरने थोड्या वेळात शाकाहारी जेवण तयार केले. भोजनानंतर बसप्रवास सुरू झाला. आता आकाश निरभ्र झाले. सूर्य तळपू लागला. बस सोरेंटो ड्राइव्हवर पळू लागली. हा रस्ता समुद्रकिनाऱ्याने जातो. समुद्राचे पाणी गडद निळे दिसते. गाडी डोंगर चढू लागली. अर्ध्या वाटेवर आल्यावर मागच्या सहलीत आम्ही इथेच कुठे तरी रात्रीचा तळ टाकला होता असे मला स्मरण झाले. डोंगर ओलांडला नि ऑलिव्ह झाडांची दरी लागली. तीन हजार झाडे यात आहेत. आता सोरेंटोच्या आसमंतात आलो. चार गावे मिळून सोरेंटो झाले आहे. सोरेंटोत लिंबू नि मुसंबी विपुल आहेत. पिवळ्याजर्द फळांच्या असंख्य बागा नजरेला भेटतात.

सोरेंटो बे हा डोंगरांच्या रांगेने चार ठिकाणी कापला गेला असून ज्या दऱ्या झाल्या आहेत त्यात आतवर पाणी आले आहे. आमचा मुक्काम बेलएअर या हॉटेलात होता. राहाण्याच्या जागेपासून शंभर फुटांवर समुद्र होता. हॉटेल डोंगर-कपारीतच बांधलेले होते. खोलीच्या गॅलरीतून सोरेंटो बेचे रम्य चित्र दिसते. हॉटेलच्या वरच्या गच्चीवरून पाहिले की, उजव्या हाताला चार चढते डोंगर दिसतात. त्यांच्या कपारीतून घरे होती. तसेच काही माथ्यावर होती. जसा अंधार होऊ लागला तसे दर्याच्या पाण्याचे रंग बदलू लागले नि वाऱ्याला गारव्याची धार चढली.

बेल एअरमधला हेड-वेटर भारतीय रिवाजांशी परिचित दिसला. त्याने नमस्कार करून आमचे स्वागत केले. शाकाहारी आहोत असे सांगितल्यावर सूप, भाज्या वगैरे रुचकर जेवणाची त्याने व्यवस्था केली. भारत-पाकिस्तान यांची तुलना करून पूर्व पाकिस्तानात चाललेल्या हत्याकांडाविषयी त्याने नापसंती

व्यक्त केली. रात्री स्वतःच्या मोटारीने तो घरी गेला.

हवा खराब असल्याने काप्रीऐवजी अमाल्फीला न्यायचे प्रवासी कंपनीने ठरवले. अर्थात प्रवासी काप्रीला जायचेच असे म्हणाले तर तिकडे न्यायला कंपनीचे लोक तयार होते. मागच्या वेळेला मी काप्रीला गेलो होतो. काप्रीला आज गेलो तरी वाईट हवामानामुळे ब्लू ग्रोटोला जाता येणार नव्हते. तेव्हा अमाल्फीला जाणे बरे असे आम्ही ठरवले.

अमाल्फीकडे जाणारा मार्ग डोंगरातून असून काश्मिरच्या प्रवासाची आठवण देतो. बहुतेक रस्ता असा होता की, एका बाजूला डोंगर नि दुसऱ्या बाजूला सरळ डोंगरकपार नि खाली सुमारे हजार फुटांवर पाणी. काही वेळा डोळे फिरावे असाच हा रस्ता होता. त्याचे नावही स्नेक ड्राइव्ह. त्याची सुरुवात डोंगर चढायला लागताच झाली आणि दोन तासांनी तो उतरल्यावर संपली. एक डोंगर पार केल्यावर नेपल्स बे मागे पडून सोर्लेनो वे सुरू झाला. आकाश मोकळे होते. समुद्रावरचे धुकेही कमी झाले होते. त्याच्या पाण्याचा रंग पाचूच्यासारखा वाटला. हा प्रवासमार्ग निसर्गरम्य दृश्यांनी भरलेला होता. पोपीटाना पासले हे दृश्य पाहा. उंचच्या उंच डोंगर, त्यात ओट्यासारख्या मोठ्या जागा, त्यावर बांधलेली छोटी मोठी घरे, एका घराकडून दुसऱ्या घराकडे जाण्यासाठी किंवा खाली समुद्राकडे जाण्यासाठी पायऱ्या, त्याला लागून बाग, घराच्या मागच्या बाजूला टोलेजंग वृक्ष, आणि पलीकडे लगेच कडा असे दृश्य निरनिराळ्या स्वरूपात दिसले.

अमाल्फीत आलो तेव्हा प्रवाश्यांची झुंबड होती. इथे न थांबता आम्ही पुढे रॅव्हेलोला गेलो. रॅव्हेलोही डोंगरमाथ्यावर आहे. सहा-सात वळणे घेऊन बस डोंगरमाथ्यावर आली. प्रथम आम्ही गार्डीनो डाय रूपालो या व्हिलाकडे आलो. प्रसिद्ध संगीतकार वॅग्नर या उद्यानात आल्यावर 'जादूचे गंधर्व उद्यान सापडले' असे उद्‌गार काढता झाला. वॅग्नरच्या स्मरणार्थ दर वर्षी इथे संगीत मैफल भरते. व्हिलाच्या पाठीमागे समुद्र आहे. डाव्या हाताला दूरवर मायुरी-मिनोरी दिसतात. इटलीवरच्या स्वारीत दोस्त सैन्य तिथे उतरले होते. रॅव्हेलोचे चर्च अगदी जीर्णावस्थेस आलेले होते. त्याची घंटाही मोडली होती. त्याच्या दुरुस्ती-साठीच्या निधीला साहाय्य द्यावे असा विनंतीफलक तिथे होता.

अमाल्फीत दुपारच्या भोजनाची व्यवस्था ज्या हॉटेलात होती त्याचा भोजनाचा

मोठा हॉल समुद्राला लागूनच होता. आम्ही तिथे असताना एक छोटा वाद्यवृंद आला. त्यातल्या एकाच्या हातात माठ होता. त्यात जेवणाऱ्याने खुषीने द्रव्य टाकायचे होते. अर्थात आपल्या टेबलापाशी थांबलेल्या माणसाच्या माठात द्रव्य टाकायचे नाही हे कसे जमणार ! बाहेरच्या चौकातच एक पुतळा आहे. फ्लाव्हिओ जिओआचा. पुतळ्याच्या पाठीमागे एक नकाशा असून त्यात मरमेड, जुन्या प्रकारची गलबते नि विचित्र आकाराचे देश दाखवले होते. या चौकाच्या पुढच्या गल्लीतून आत गेले म्हणजे चर्च येते. पण त्यात प्रवेश करायला साठ पायऱ्या चढाव्या लागतात. दरवाजापाशी सूचना होती की, अर्धी चड्डी, उघडी छाती, मिनी स्कर्ट, असा पेहेराव असणाऱ्यांना प्रवेशबंदी आहे. या चर्चमध्ये सेंट अँड्रीयाच्या अस्थी आहेत. मात्र त्याच्या दर्शनासाठी शुल्क द्यावे लागते. इथली मोझाइक्सही छान आहेत. येथून बस सोरेंटोला परत आली. समजुतीच्या घोटाळ्याने आम्हांला रोमला परत नेणारी बस उशिरा आली. परतीचा प्रवास डुलक्या घेतच केला.

टॅक्सीने एअर टर्मिनलवर आलो. बॅग ठेवताना तिचे हँडल पुन्हा तुटले. कसे तरी करून बॅग पुढे रवाना केली. एअर पोर्टवर दाट धुके असल्याने विमान तासभर निघणार नाही असे सांगण्यात आले होते. पण वीस मिनिटांनी विमान सुटणार असे जाहीर झाले. आजच्या एअर इटालियाच्या एअर होस्टेसीस देखण्या होत्या. पावणे अकराला विमान सुटले. पाहता पाहता ते ढगात गेले नि पाच मिनिटांनी बाहेर आले. आकाश उघडले होते. पण विमान हालत होते. खाली दोन नद्यांची पश्चिमेकडून पूर्वेकडे जाणारी विशाल पात्रे दिसली. थोड्या वेळाने पुन्हा ढगांची गर्दी झाली. काहीच दिसेनासे झाले. तासाभराने विमान व्हेनिसला उतरले. हवा खूपच थंड होती. ढकलगाडीतून सामान बाहेर आणले आणि बसने व्हेनिसच्या एअर टर्मिनलवर आलो. येथून जलमार्गाकडे येण्याचा रस्ता जरा लांब आहे. हँडल नसलेली बॅग नेताना माझा दम निघाला. वॉटर बसने सेंट झकारिया स्थानकावर आलो. हॉटेल शोधण्यास वेळ लागला. मग बॅगा खांद्यावर घेऊन हॉटेल कॅस्टेलोवर आलो. या हॉटेलच्या बाथरूममध्ये साबण नव्हते !

व्हेनिसला काचेचे अनेक कारखाने आहेत. त्यात काचेच्या अप्रतिम वस्तू तयार करतात. आम्ही एक कारखाना पाहण्यास गेलो. वस्तू करण्याची प्रक्रिया

पाहिल्यावर तयार वस्तूंचे प्रदर्शन पाहिले. वस्तू बऱ्याच महाग होत्या. येथून वॉटर बसने सेंट मार्कोला आलो. जवळच सेंट मार्क कॅथिड्रल आहे. उत्कृष्ट शिल्पाचा अत्युत्तम नमुना, असे या चर्चचे वर्णन करतात. मार्क चौकाच्या उत्तरेला जी इमारत आहे त्यावर मोठी घंटा आहे. प्रत्येक तासाला त्या घंटेवर दोन पुतळे घण मारून ठोके काढतात. गेली पाचशे वर्षे हे चालू आहे. ते दृश्य पाहण्यासाठी शेकडो माणसे उभी असतात. चौकाच्या एका भागात असंख्य कबुतरे बसलेली असतात. ती इतकी माणसाळलेली आहेत की, प्रवाश्याच्या हातातून दाणे टिपतात.

सेंट मार्कपाशी उभा राहून कबुतरे, सुंदर इटालियन ललनांना न्याहाळत होतो तरी मनाने अस्वस्थ होतो. म्हणून तिथून निघालो नि बॅगेची चौकशी करायला स्टँडा डिपार्टमेंट स्टोअरमध्ये आलो. इथली बॅग महाग वाटली. निदान बॅग बांधायला दोरी असावी म्हणून खुणा वगैरे करून शेवटी एक मोठी दोरी मिळवली. मग परत हॉटेलवर आलो. हॉटेलच्या मालकाच्या ओळखीचा चांभार होता. त्याच्याकडे चौकशी केली. त्याने सकाळी बॅगा घेऊन बोलावले.

सकाळची न्याहारी चहा नि पाव अशी कॉंटिनेंटल पद्धतीची होती. न्याहारी-नंतर बॅगा घेऊन आम्ही चांभाराच्या दुकानाकडे आलो. त्याने बैरूटला दुरुस्त केलेले हँडल मोठ्या बॅगला लावले. मोठ्या बॅगचे हँडल दुरुस्त करून छोट्या बॅगला लावणे महागात पडेल असे सांगितल्याने दोन्ही बॅगा घेऊन हॉटेलवर आलो. अजून प्रवासाचा टप्पा खूप होता. म्हणून नवीन बॅग आणायला गेलो. एका दुकानात बॅग पाहात उभा असताना बाहेर शिट्ट्या ऐकू आल्या. म्हणून चौकशी केली. इकडे मोर्च्यात घोषणांऐवजी शिट्ट्या वाजवतात. ही माहिती देणारी बाई म्हणाली की, इथे कशासाठीही संप होतो. आमच्या हे सर्व अंगवळणी पडले आहे. तुमच्याकडे कसे काय? मी हसलो. यानंतर चार-सहा दुकानांत बॅग पाहिली. एका दुकानातली पसंत पडली. तिथल्या विक्रेत्याने वाढवलेली किंमत कमी करून आम्हांला कमी किंमतीत वस्तू मिळाल्याचे समाधान दिले. बॅगच्या निमित्ताने व्हेनीसची सगळी बाजारपेठ पालथी घातली.

सायंकाळी आम्ही मार्क चौकात गेलो. हळूहळू दिवे लागत होते. थोड्या वेळात रोषणाई पूर्ण झाली. लोकांची गर्दी वाढली होती. चौकातल्या हॉटेलात प्रवाश्यांसाठी वाद्य संगीत वाजवले जात होते. थोडा वेळ तिथे उभा राहिलो.

मग ग्रँड कॅनॉलच्या भागाकडे गेलो. आता अंधार झाला होता. जलाशयावर धुके जमत होते. वाऱ्यामुळे किंवा भरतीमुळे पाणी उसळत होते. त्यावर वॉटर टॅक्सी, गंडोले, लहान नौका डोलत होत्या. दोन मोठी जहाजे कॅनॉलच्या बाजूने जात होती. अनेक देशांचे लोक, किंवा रंगांचे म्हणणे जास्त बरे, ग्रँड कॅनॉलच्या बाजूने हिंडत होते. अनेक हिच हायकर्सनी कॅनॉलच्या बाजूलाच रात्रीचे बस्तान पसरले होते.

आता आम्ही रिॲल्टोकडे आलो. व्हेनीसचे हे सर्वांत मोठे आकर्षण. आज इथे फार गर्दी नव्हती. हॉटेल रिॲल्टो बाहेरच्या भागात कोणीच प्रवासी नव्हते. मागे आलो होतो तेव्हा इथे चिकार गर्दी होती. रिॲल्टो ब्रीज तसा मोठा. त्यावरून तीन दिशेला जाणारे रस्ते असून त्यावर दुकाने थाटलेली आहेत. रिॲल्टोवरून कॅनॉलचा देखावा रम्य दिसतो.

व्हेनीसमधल्या बोटवाल्यांचा संप होण्याची भीती असल्याने रात्रीच आम्ही वॉटर टॅक्सी ठरवली. पहाटेच्या सुमारास सामान घेऊन जलमार्गाच्या स्थानकावर आलो. पंधरा मिनिटांनी व्हेनीसच्या जलाशयातून बाहेर भूमीवर आलो. धुके अफाट होते. थंडी कडाक्याची असल्याने सामान उचलून बोटे दुखू लागली. एअर टर्मिनलवरून बसने आम्ही विमानतळावर आलो. तिथेही धुके खूप होते. त्यामुळे विमान-वाहतूक स्थगित झाली होती. धुक्याचा जोर कमी होताच विमानात बसण्याची सूचना मिळाली. साडेनवाला विमान सुटले. उड्डाण थोड्या वेळाचे असल्याने वृत्तपत्राशिवाय विमानात काहीच देण्यात आले नाही. एल इटालियाच्या हाऊस मॅगेझिनमध्ये चंद्रवीरांचे बोस्टनशी झालेले संभाषण दिले होते. सुमारे पन्नास मिनिटांनी मिलान आले.

जीनिवाला जाणारे विमान संध्याकाळी साडेचारला होते. त्यामुळे मोकळा वेळ फार होता. म्हणूनच एका कोपऱ्यात दैनंदिनी लिहीत बसलो. दुपारी स्नॅकबारमध्ये दूध नि सँडविच घेतले. सँडविचमध्ये हॅम होते. मागच्या खेपेच्या युरोपच्या प्रवासात हॅम खात होतो. पण मधल्या वेळेत ती सवय तुटली होती. आज महाभारतातल्या विश्वामित्राच्या कथेचे स्मरण केले नि सँडविच संपवले. साडेतीन वाजता पासपोर्ट तपासणी होऊन आम्ही आतल्या लाउंजमध्ये गेलो. तिथे माझ्या शेजारी एक हॉलंडमधला प्रवासी येऊन बसला. त्याला इंग्रजी येत होते. आज या विमानतळावर दोन तास संप होता. तेव्हा

संपावरून गप्पा सुरू झाल्या. तो म्हणाला, ' या देशात नेहमीच काही ना काही गडबड चालू असते. आमचे हॉलंड कसे शांत आहे. आमच्याकडे सुबत्ता आहे. इंग्लंडची आर्थिक स्थिती नीट नसल्याने युरोपच्या व्यापारी संघराज्यात त्याला वर्ष दीड वर्ष प्रवेश मिळणार नाही. पण मला तो देश आवडतो.' मग मी विचारले, ' जर्मनीचे काय? ' तो म्हणाला, ' गेल्या युद्धातल्या गोष्टी विसरणे कठीण. तो काळ पाहिलेली माणसे अजून आहेत. त्या काळातल्या गोष्टी विसरायला पाऊणशे वर्षे लागतील. माझे काही जर्मन मित्र आहेत. पण त्या राष्ट्राविषयी मला प्रेम नाही. अजूनही त्यांच्यातला श्रेष्ठ जातीचा – हेरेन फोक– अहंकार गेलेला नाही. '

पंधरा मिनिटांनी विमान सुटले. हवा सुरुवातीला बरी होती. ती एकदम बदलली. ढग आले. विमानाच्या पंखावर बर्फ जमू लागले. अर्थात प्रवास अर्ध्या तासाचा होता. विमानतळाच्या रक्षणासाठी तेथे सशस्त्र सैनिक आहेत अशी आम्हांला सूचना देण्यात आली. पण स्टेनगन घेऊन पावित्र्यात उभा असलेला सैनिक दिसेल अशी अपेक्षा नव्हती. विमानतळावरच्या इमारतीमधले कॉरिडर लांबच लांब असल्याने प्रवाशयांच्या सोईसाठी सपाट एस्कॅलेटर्स लावलेले आहेत. त्यावरूनही माणसे पळतात. येथून बसने एअर टर्मिनलवर आलो, नि तिथल्या माहिती केन्द्रात हॉटेल किती दूर आहे याची चौकशी केली. पाच मिनिटांच्या रस्त्यावरच हॉटेल आहे, टॅक्सी करायला नको असे तिथल्या बाईने सांगितले. मग मी हॉटेलाच्या शोधार्थ गेलो.

हॉटेल रूसो हे रूसो रस्त्यावरच आहे. फ्रान्समधून पळाल्यावर, माझ्या स्मरणाप्रमाणे, रूसो जीनिवात होता. त्याच्या स्मरणार्थ हे नाव रस्त्याला आहे की काय कोणास ठाऊक ? हॉटेलचा दर्शनीय भाग आकर्षक नव्हता. पण आतली व्यवस्था छान होती. जीनिवात दोन भारतीयांना भेटायचे होते.

जीनिवाच्या हॉस्पिटलमध्ये डॉक्टरला जायचे होते. त्यासाठी आम्ही ट्रॅमनाक्यावर आलो. तिकीट बाहेर काढायचे असते हे माहीत नसल्याने आम्ही तसेच ट्रॅममध्ये शिरलो. तेव्हा एका बाईने स्वतःजवळची दोन तिकिटे दिली नि एका मुलीने पुढच्या थांब्याला बाहेर जाऊन पंच करून आणली. डॉक्टरला हॉस्पिटलकडे सोडून मी शहांचे घर शोधण्यास गेलो. नकाशाच्या मदतीने नि माहिती विचारत रू अकाशिया गाठला. येथून घर थोड्या अंतरावर होते. मग परत वळून आरी नदीच्या काठाशी मी एका बाकावर बसलो. ढगाळलले होते. मात्र हवेत विलक्षण गारवा होता. नदीच्या प्रवाहाला जोर असून पाण्याचा रंग सफेद मातकट दिसला. काही म्हातारी माणसे काठावर उभी होती. मी इथे थोडी दैनंदिनी लिहिली.

दुपारी अडीच वाजता जीनिवा शहराच्या सहलीला गेलो. मागच्या खेपेस मी इथे आलो होतो. त्यामुळे गावाचे अंधुक स्मरण होते. सुरुवातीलाच प्रचंड सरोवर दिसले. त्याच्याखाली मोटरींसाठी मोठे गराज बांधण्यात येत होते. सरोवरावरचा पूल ओलांडला की, डाव्या हाताला फुलांचे घड्याळ दिसते. दहा-पंधरा फुटांचा त्याचा परिघ असावा त्याला सेकंदाचाही काटा होता. यानंतर गुलाबाची वाटिका येते. त्यात दोनशे कलमे आहेत. परदेशी पाहुण्यांचे सत्कार

इथे होतात. त्यानंतर बस रशियन चर्चच्या बाजूने गेली. या चर्चला सोन्याचे नऊ घुमट आहेत. या भागाला रशियन वसाहत म्हणतात. लेनिन, डोस्टोयेस्की वगैरे लोक इथे राहिले होते. येथून आर्ट अँड हिस्टरी म्युझिअमवरून बस बंदीशाळेकडे गेली. ही बंदीशाळा म्हणजे १५१५ मध्ये कालव्हिनने काढलेली शाळा. बस थांबली ती रिफॉर्मेशन मॉन्यूमेंटपाशी. हे स्मारक मोठ्या उद्यानात आहे. त्यात फॅरेल, कालव्हिन, बेझ नि नॉक्स यांचे भव्य पुतळे आहेत. शिवाय क्रॉम्वेल वगैरेंचे छोटे पुतळे आहेत. कॅथॉलिक संप्रदायाविरुद्ध वैचारिक बंड करणाऱ्या लोकांची माहिती देणाऱ्या स्टिफन झ्वाइगच्या ‘ द राइट टू हेरेसी ’ या पुस्तकाचे या वेळी मला स्मरण झाले.

यानंतर बस ऱ्होन नदीवरून गेली. याच भागात जगातला घड्याळांचा पहिला कारखाना १७५५ मध्ये उभा झाला. अजून तो आहे. ब्रून्स्विकच्या दुसऱ्या चार्लसची समाधी तिच्यासंबंधीतल्या गमतीदार घटनेमुळे लक्षात राहते. चार्लस इथे आला असताना भोवतालच्या रम्य वनश्रीने इतका मोहित झाला की त्याने समोरचा मॉंट ब्लांक रोज दिसावा म्हणून आपले इथे दफन व्हावे अशी इच्छा प्रदर्शित केली. पुढे त्याचे इथे दफन झाले. मात्र गडबडीत त्याचे डोके ठेवले गेले मॉन्ट ब्लांकच्या दिशेला.

इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनचे कार्यालय जीनिवात आहे. ते जिथे आहे त्या विभागाला या संस्थेच्या एका प्रवर्तकाचे नाव—अल्वर्टी थॉमस—देण्यात आले असून कार्यालयासमोर चार कामगारांचा पुतळा आहे. यानंतर लीग ऑफ नेशन्सच्या इमारतीकडे आलो. ती बांधणाऱ्या आर्किटेक्टला नोबेल पारितोषिक मिळाले होते ! मुंबईप्रमाणे जुनी घरे पाडून नवीन टोलेजंग इमारती जीनिवात बांधण्यात येत आहेत. त्यामुळे शहराचे जुने वैशिष्ट्य जात आहे.

सहल आटोपल्यावर पर्यटन-कार्यालयात गेलो. दुसऱ्या दिवशीच्या सहलीची तिकिटे काढली. सोरेंटोच्या अनुभवावरून ही तिकिटे भोजनविनाची घेतली. पण त्यामुळेच उपाहाराच्या काही वस्तू घेण्यासाठी जवळच्या प्लॅसेट या भांडारात गेलो, नि ब्रेड, चीझ, सफरचंदे विकत घेतली. संध्याकाळी बाबूभाई शहांकडे जेवायला गेलो. हँडल तुटलेली बॅग समुद्रमार्गे मुंबईला पाठविण्यासाठी त्यांच्याकडे दिली. रात्री बसने परत आलो. दिव्याच्या प्रकाशातले जीनिवा हे विलोभनीय दृश्य आहे.

'आयगील डू मिडी' या सहलीला पावणेनवाला सुरुवात झाली. सहलीत तीन बसेस होत्या. पण गाईड एकच होती. सहलीच्या मार्गाची माहिती देऊन ही मुलगी गायब झाली. पंधरा मिनिटांच्या प्रवासानंतर बसने गुईलॉर्डपाशी फ्रेंच सीमेत प्रवेश केला.

देश बदलताच वेश बदलतो त्याचप्रमाणे गावाघराच्या रचनेतही बदल होतो. इथून रम्य वनश्रीला सुरुवात झाली. दूरवर डोंगर दिसू लागले. त्यांची शिखरे हिमाच्छादित होती. मधेच पाईन झाडांचे वन लागे. किती दाट झाडी. सगळा रस्ता मोठा नि डांबराचा होता. फक्त गावातून जाताना तो चिंचोळा होई. साडेनवाच्या सुमारास डोंगरांची रांग जवळ येऊ लागली. त्यांच्या उतरणीवर शेतीची लागवड होती. नि त्याला लागून टुमदार घरे होती. वाटेत एक गाव लागले. त्यात जुन्या ठेवणीची नवीन घरे बांधली जात होती. आता रस्ता डोंगरात शिरला. ऊन्ह जाणवेल इतके कडक होते. दहाच्या सुमारास मॉन्ट ब्लांक दिसू लागला. मॉन्ट ब्लांक म्हणजे शुभ्र डोंगर. तो हिमाच्छादित असल्याने ते नाव त्याला आहे. गाडी घाट चढू लागली. अल्पाइन वृक्षांची गर्द झाडी लागली. वितळणाऱ्या हिमाचे छोटे धबधबे डोंगरातून कोसळताना दिसत होते. साडेदहाला शॉमॉनी गाव आले.

गाईडने तिकिटांचे वितरण केले. केबलकारमध्ये शिरण्यासाठी आमचा क्रमांक येईपर्यंत अकरा वाजले. दरवाजा बंद झाला. गाडी सुरू झाली. सुरुवातीपासूनच ती चढाला लागते. पाहता पाहता गाव पाठीमागे पडू लागले, रस्ते चिंचोळे दिसू लागले. खालची दरी प्रचंड झाली. अजस्त्र हिमाचे कडे दृष्टिपथात आले. ज्याला झोपाळाही लागतो त्याला केबलकार मधून वर जाताना झोके बसले म्हणजे काय होत असेल याची कल्पना यावी. पंधरा मिनिटांत सात हजार फूट उंच आलो. येथून दिसणारे खालचे दृश्य डोळे फिरवणारे होते. ही केबलकार इथे सोडून दुसरीने पुढील टप्प्याकडे जाण्यास निघालो. एका पाठोपाठ एक दरी मागे पडत होती. बर्फावरून घसरण्याचा खेळ खेळणाऱ्या लोकांच्या टोळ्या इकडून तिकडे घसरत होत्या. आमच्या कारमध्ये स्की करणाऱ्यांचा गट होता. अगदी माथ्यावरून घसरत येण्यासाठी ते वर जात होते.

वीस मिनिटांनी ही कार १२,००० फुटांवर आली. आम्ही बाहेर आलो. काही प्रवाश्यांना श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. पळत जिना चढल्याने जसा

दम लागतो तसे होऊ लागते. थंडी बेसुमार होती. हातपाय बधिर झाले. इथल्या उपाहारगृहात कॉफी घेतल्यावर थोडे बरे वाटले. या उपाहारगृहाच्या खिडक्यांतून भोवतालच्या प्रदेशाकडे नजर टाकली म्हणजे निसर्गाच्या रौद्र स्वरूपाची कल्पना येते. उंचीचा त्रास काय होतो ते परतीच्या प्रवासात दिसले. कारमधल्या एका म्हाताऱ्या अमेरिकन माणसाचे ओठ निळे झाले. उतरताना कारला जास्त झोके बसले. जमीन जशी जवळ आली तसे रस्ते मोठे दिसू लागले. दूरवर एक आगगाडी जाताना दिसली नि मोटरी दृष्टिपथात आल्या.

खाली आल्यावर गाईडने दुसऱ्या स्थानी कसे जायचे याची कल्पना नकाशावरून दिली. तिथे पोहोचायला मैलभर चालावे लागले. त्यातच रस्त्याला चढ होता. त्यामुळे थोडा दम लागला. इथेही कारमध्ये प्रवेश मिळायला तास लागला. मागच्या प्रवासापेक्षा या प्रवासात कार अधिक सरळ चढते. जवळजवळ लिफ्टसारखी. ऊन्ह चांगले पडले होते. दहा मिनिटांनी पहिले स्थानक आले. इथे मोठे रेस्टरॉं होते. त्यात स्की करणाऱ्या लोकांची चिकार गर्दी होती. बाजूने स्कीचा मार्ग होता. त्याच्या अंतिम टोकाकडे जाण्यासाठी केबलचेअर्स होत्या. त्यातून खेळाडू जात होते. ' माय सन माय सन ' या चित्रपटात जर्मनीतून पळणारे जोडपे नि त्याच्या पाठलागावर असणारे नात्झी सैनिक यांचे स्किईंगचे रोमांचकारी दृश्य होते. तसे स्किईंग आज पाहिले.

इथल्या स्थानकाहून पुढच्या स्थानकाकडे जाण्याचा मार्ग हिमाच्छादित होता. त्यातून चालताना पाय घसरत होता. आणि अधिक घसरला म्हणजे संपलेच. एकदा माझा पाय घसरलाही आणि क्षणभर श्वास थांबला. आता दुसऱ्या केबलकारने आम्ही वर निघालो. इथे एक दरी ओलांडावी लागते. हे दृश्य खरोखरच चित्तथरारक होते. कुठेही नजर टाका शुभ्र धवल हिम. स्थानकावर गच्चीसारखी जागा आहे. तिथे उभा असताना थंडीने काकडलो. स्वच्छ ऊन्ह असल्याने समोरचा मॉंट ब्लांक दिसत होता. ही जागा ७९०० फूट उंच आहे. या सहलीचे नाव होते ' ल ब्रेव्हा. '

तीन वाजता रेल्वे स्थानकापाशी आलो. बसेस आलेल्या होत्या. तासाभराने आम्ही निघालो. परतीचा प्रवास आणि दिवसाची दगदग, त्यामुळे डुलक्या घेत जीनिवाला आलो. रात्री बसने शहांकडे आलो. जेवणानंतर त्यांनी आपली जीवनकथा सांगितली. अकरा नंतर बसने परत निघालो. टर्मिनसला आल्यावर

ड्रायव्हरने पुन्हा तिकिटे काढण्यास सांगितले. तेव्हा मी त्याला म्हणालो, ' काल अशाच तिकिटावर आम्हांला परतीच्या प्रवासाचा एक टप्पा करता आला होता. ' पण मी काय म्हणतो ते त्याला समजेना. म्हणून मी तिकिटे काढली. शहांनी दूरध्वनी केलेला असल्याने हॉटेलचे दार उघडे होते.

ईस्टरच्या सुटीमुळे गावातले सगळे व्यवहार बंद होते. तरी गावातून फेरी मारली. मग हॉटेलवर परत येऊन सामान घेऊन रेल्वे स्थानकावर आलो. वीस वर्षांपूर्वी मी ऑस्टेंड ते इस्तंबूल असा रेल्वेप्रवास केला होता. त्यानंतर युरोप-मधल्या आगगाडीच्या प्रवासाचा हा पहिला अनुभव. स्थानकावर उभा असताना ' युरोपा एक्सप्रेस ' आली. गाडी लहानशी होती. पूर्वीच्या कॉंटिनेंटल एक्सप्रेसची ही नवीन आवृत्ती असावी.

गाडीला गर्दी होती. पण बसायला जागा मिळाली. गाडीने थोडे अंतर कापले नि स्विस ग्रामीण विभाग सुरू झाला. छोटी जुनी घरे, मोठमोठी शेते, त्यातले द्राक्षांचे मळे, मधूनच आढळणारे आधुनिक घर– हे चित्र पुन्हा पुन्हा दिसे. प्रवास सुरू झाल्यावर थोड्या वेळाने माझ्या शेजारी बसलेल्या प्रवाश्याने बीअरची बाटली काढली नि ती माझ्याकडे करून ' घेणार का ? ' अशी पृच्छा केली. माझ्याजवळ मद्याची बाटली होती. ती दाखवून मी त्याला साभार नकार दिला. माझ्या भोवतालचे चार प्रवासी चक्क झोपी गेले. दोघे मोठ्याने बोलत होते. युरोपचे नंदनवन ते रोज पाहात होते. आमच्यासारख्या क्षणभराच्या प्रवाश्यांना त्याचे नावीन्य !

आता डोंगरांची रांग लागली. काही शेतांची कुंपणे लोहमार्गाला लागून होती. काही घरांना ओटे होते. हिरवी शेती, मधूनच नांगरलेली पिवळसर जमीन, त्या लगतच द्राक्षांचे मळे, त्याच्याभोवती कँप करणारे लोक,– असे रेखीव चित्र दिसले. तासाभरात बर्न आले. इथे इंटरलाकनला जाणारी गाडी व्यायची होती. तीन वाजता ती आली. या गाडीलाही सुरुवातीला गर्दी होती. ब्राएनझर्सी नि थुनर्सी या दोन सरोवरांच्या मधला प्रदेश म्हणून त्याचे नाव इंटरलाकन. निसर्गसौंदर्याचा भोक्ता स्वित्झर्लंडला आला तर इंटरलाकनला भेट देतो. जेम्स हिल्टनच्या ' रँडम हार्वेस्ट ' या कादंबरीत या प्रदेशाचे वर्णन आहे.

स्पाइझ स्थानकापासून नितान्त रमणीय प्रदेश सुरू होतो. लोहमार्गाच्या बाजूने जाणारा मोटारीचा रस्ता, त्याच्या पलीकडचे विशाल सरोवर, उंच वृक्षराजी,

डोंगराच्या कुशीत असणारी छोटी घरे, आणि त्यामध्ये दिसणारे गोथिक टॉवरचे चर्च-- आपण अनेक वेळेला कॅलेंडरवर स्वित्झर्लंडची चित्रे पाहातो. त्यांची जिवंत प्रतिकृती दिसली.

थुन सरोवरानंतर इंटरलाकन आले. स्थानक तसे लहान. मात्र जमिनी-पासून दीड फूट उंचीचे चार फलाट त्यात होते. स्थानकावर सामान ठेवण्याची व्यवस्था आहे की नाही, हॉटेल किती दूर आहे, यांच्या चौकशीला डॉक्टर गेली. मी भोवतालचे दृश्य न्याहाळत उभा होतो. आजूबाजूला गगनचुंबी डोंगरांच्या रांगा होत्या. स्थानकाच्या पूर्वेकडच्या नि दक्षिणेकडच्या गिरिशिखरां-वर हिम होते. उत्तरेकडे डोंगराऐवजी प्रचंड दगडी भिंत आहे असा भास होत होता. या डोंगराच्या डाव्या बाजूला नेहमीचे दृश्य दिसले. छोटा चौक, त्यातले सुळकेदार गोपुर असलेले चर्च, त्यावरचे घड्याळ, भोवतालची चंद्रमौळी घरे, आणि अगदी पलीकडे डोंगराच्या माथ्यावर असलेले एक लहानसे चर्च. चित्रकार लुब्ध होईल असेच हे दृश्य होते.

टॅक्सीने आम्ही हॉटेल डिलापेक्सवर आलो. तीन मजली घराचे हॉटेल-मध्ये रूपांतर करण्यात आले आहे. आमची खोली रस्त्याला लागून होती. फक्त त्याला बाथरूम नव्हती. पण त्यामुळे त्याचा दर बारा फ्रँकने कमी होता. गाव तसे लहान वाटले. संध्याकाळ झालेली होती. आलेले प्रवासी जाण्याच्या मार्गावर होते. दुकानेही बंद होण्याच्या तयारीत होती. ईस्टरच्या सुट्टीवर आलेल्या लोकांची डिलापेक्समध्ये गर्दी होती. त्यांच्यासाठी फिस्ट होती. आम्ही शाकाहारी असल्याने मालकिणीने सूप, आमलेट, उकडलेले वाटाणे, मशरूम, गोड गाजरे, शिवाय पुडींग असे जेवण दिले. प्रवासात दोन्ही बॅगा उचलून पाय भरले होते. त्यातच सुमार नाही अशी थंडी आणि हे मस्त जेवण. पुडींग खातानाच डोळ्यावर झापड आली.

युंग फ्रॉला जाण्यासाठी इंटरलाकन इस्टकडून मार्ग होता. आमचा मुक्काम होता इंटरलाकन वेस्टकडे. इस्टकडे जाणारी बस निघून गेलेली असल्याने आणि दुसरीला तासाचा अवधी असल्याने आम्ही आगगाडीने तिकडे गेलो आणि युंग फ्रॉची तिकिटे काढली. इंटरलाकनच्या भोवतालच्या डोंगरावरती प्रचंड धुके होते. आज सहलीला जाणारे चार हौशी प्रवासी असले तर स्की करायला जाणारे चाळीस होते. माथेरानला जाणाऱ्या आगगाडीसारखीच पण थोडी

मोठी अशी ही आगगाडी होती.

सुरुवातीला गाडी छोट्या विमानतळाच्या बाजूने गेली. धुक्याच्या आवरणात दोन तीन लहान विमाने तिथे उभी होती. शांत पाण्यावर जशी बदके असतात तशी. पाच मिनिटांतच विल्डरस्वील स्थानक आले. आता गाडी चढाला लागली. लोहमार्ग डोंगराच्या कडेनेच जातो. उजव्या हाताला लूटशाईन नदी होती. प्रवाह उतरत असल्याने पाण्याला जोर नि खळखळाट होता. घरे जुन्या ठेवणीची, काही तर झोपड्यांसारखी होती. आता खरा घाट सुरू झाला. डब्यात स्कीसाठी जाणाऱ्या लोकांची इतकी गर्दी होती की, जागेवरून हालणे शक्य नव्हते. आता हिमाने भरलेली पठारे दिसू लागली. त्यावरून स्की करणाऱ्या लोकांचे थवे विखुरले होते. ऊन्ह चांगले असल्याने हिम वितळू लागले आणि त्या पाण्याचे छोटे धबधबे झाले होते. आता बोगदे लागू लागले नंतर वेंगेन स्थानक आले. इथून हिमाच्छादित नसलेला भूभाग कुठेच दिसेना.

लहान लहान स्थानकांवर गाडी थांबत होती आणि स्की करण्यासाठी छोटे छोटे गट गाडीतून बाहेर पडत होते. अगदी शेवटच्या टोकापर्यंत जाणारे थोडे निघाले. त्यांच्यासाठी केबलकारची व्यवस्था होती. निरनिराळ्या पठारांवर शेकडो माणसे स्कीईंग करत होती. त्यात चार-पाच वर्षांची मुले होती. काही लोक कपडे काढून बर्फात झोपले होते.

क्लाईन शैडेगपाशी गाडी बदलायची होती. इथल्या फलाटावर उभे राहिले असता आपण हिमालयातच आहोत असे वाटते. थोड्या वेळात दुसरी गाडी आली. हा पुढचा प्रवास जवळ जवळ बोगद्यातून झाला. एकाजागी गाडी थांबली. इथे बोगद्यात मोठी खिडकी आहे. त्यातून निसर्गाचे भीषण रूप दिसते. खिडकीत काही क्षण उभे राहून परत आलो.

एक वाजल्यानंतर युग फ्रॉ जॉश पठार आले. इथे गाडी थांबली. भोवतालचे दृश्य नीट दिसावे म्हणून इथे एक मोठी गॅलरी आहे. युंग फ्रॉहून खाली जाणारा जो हिममार्ग आहे तो पाहाण्यासाठी आपल्याला लिफ्टने वर जावे लागते. या ठिकाणी रेल्वेची जबाबदारी संपते अशी पाटी आहे. इथल्या गॅलरीतून तो हिममार्ग छान दिसतो. येथून वर जाण्यासाठी एक पायवाट आहे. त्याच्या आसपास माणसे हिमात निजली होती. ऑईस पॅलेस जवळच आहे. तो पाहाण्याचे शुल्क एक फ्रँक होते. डॉक्टर पाहून आली. त्यांत मोटर, गराज,

फुले, राष्ट्रध्वज, खुर्च्या, सभागृह इत्यादी हिमाच्या वस्तू ठेवलेल्या आहेत.

स्फिंक्स पाहण्यासाठी लिफ्टने वर जावे लागते. त्यासाठीही भाडे पडते. वर जाताना वाटेत लिफ्ट बंद पडले. दुरध्वनी करून माणसे बोलवावी लागली. मग लिफ्ट सुरू झाले. वरून युंग फ्रॉ नि मॉंक ही सर्वोच्च शिखरे दिसतात. या नंतर आम्ही युंग फ्रॉ पठाराच्या दुसऱ्या बाजूकडे गेलो. येथून कुत्र्यांनी ओढलेल्या गाड्या जातात. आम्ही थोडे अंतर पायी जाऊन आलो. या भागातही काही माणसे हिमात निजली होती. एक दोन युगुले प्रणयात गुंगली होती. स्थानकाजवळ मोठे सभागृह आहे. तेथे युंग फ्रॉ रेल्वेचा जनक झेलर याचा पुतळा आहे. या हॉलमध्ये सेंट्रल हिटींग आहे. ऑईस पॅलेसकडे जाणाऱ्या बोळकंडीत प्रवाशांनी आपली नावे कोरली होती. तसे नाव कोरण्याचा मलाही मोह झाला.

उतरताना क्लाईन शैडेगपर्यंत रस्ता तोच होता. तेथून तो बदलला नि गाडी ग्रिंडेल वॉल्डकडे आली. आता सूर्यास्त होऊ लागला होता. आकाश लालसर झाले. दुपारच्या कडक उन्हाने हिम वितळून लोहमार्गाच्या बाजूने त्याच्या पाण्याचे ओहोळ खळखळत वाहात होते. गाडी डोंगर उतरून जशी पठाराकडे येऊ लागली तसे धुके पसरू लागले. या लोहमार्गावरून प्रवासी नि स्की करणारे लोक यांना घेऊन तीन गाड्या एका पाठोपाठ येत होत्या. पहाता पहाता सपाट भूमी आली. गाडीने वेग घेतला. हॉटेलवर येईपर्यंत रात्र झाली. गरम सूप घेताच श्रमपरिहर झाल्याचा आनंद झाला.

पक्ष्यांच्या किलबिलाटाने जाग आली. सूर्योदय झाला नव्हता. पण लख्ख प्रकाश होता. गावातून एक फेरी मारली. मग टॅक्सी करून इंटरलाकन इस्टला आलो. या स्थानकावर वेणू गोपाळ नावाचे एक दाक्षिणात्य गृहस्थ भेटले. तांत्रिक काम शिकण्यासाठी त्यांच्या कंपनीने त्यांना हॉलंडला पाठवले होते. बरेच दिवसांनी भारतीय मनुष्य भेटल्याने त्यांना आनंद झाला.

गाडीला गर्दी फारशी नव्हती. सरोवराच्या काठाने ती जाते. सुरुवातीलाच बोगदा लागला. तो पार झाला नि सुरूची झाडी सुरू झाली. अजून वसंत ऋतूला प्रारंभ झाला नव्हता. झाडांचा विपुल पाचोळा पडला होता. ब्रुनीग हॅसलीबर्ग स्थानकात बर्फ होते. गाडी उतारावर होती. आता खोऱ्यातले शहर दिसू लागले. लुनगर्न स्थानकापासून मोठे सरोवर दिसते. गाव डोंगरावरून

खाली येते का ते खालून वर जाते हे समजत नाही. दिसते ते चित्र असे. डोंगरमाथा धुक्यात, त्यानंतर थोड्या अंतरावरून घरे सुरू होऊन उतरत उतरत खाली सपाटीपर्यंत येतात. दरीतल्या सपाट भागात दाट वस्ती दिसते. जुनी वा नवी घरे, शिखर असलेले छोटे चर्चे, त्यावरचे घड्याळ मधूनच वाहाणारा कालवा, आखीव डांबरी पथ त्यातून निघालेले घराकडे जाणारे कच्चे रस्ते, हिरवीगार शेती किंवा द्राक्षाचे मळे.

कायसेर स्टूलपासून गाडी पुन्हा उताराला लागली. आता दरी धुक्यात होती. मग गिसवील स्थानक आले. अगदी छोटे. फलाटावर कोणीच नव्हते. डब्यातही कोणी बोलत नव्हते. याच वेळेला गावातल्या चर्चेचे ठोके झाले. त्यानेच निःस्तब्धतेचा भंग केला. फ्रुटलँड साचसेन या स्थानकापाशी मोठे सरोवर लागले. इथलेही दृश्य वर सांगितल्याप्रमाणे होते. थोड्या वेळाने बोगदा ओलांडला नि लुझर्न स्थानक आले.

सामान स्थानकावरच लगेजरूममध्ये ठेवले. माहिती केंद्रातून गावाचा नकाशा घेतला. तसेच हॉटेलकडे जाणाऱ्या रस्त्याची माहिती घेतली. मग थोडे चुकत गोल्डनस्टर्न या हॉटेलवर आलो. पूर्वी इथे आलो असताना गावात हिंडलो होतो. पण नौकासहलीला गेलो नव्हतो. सरोवरावर नौकाविहार करणाऱ्यांची गर्दी होती. मोटार लॉंचेस, सेलबोट, पॅडेलबोट, वल्हीवाल्या नौका– असे सगळे प्रकार होते. नौकास्थानकावर सहलीची चौकशी केली. दीड तासाची सहल होती. सुरुवातीला आम्ही पाच-सहा जण होतो. पण बोट आली नि गर्दी वाढू लागली. सुटली तेव्हा दीड-दोनशे लोक होते.

साडेचारला भोंगा वाजला नि बोटीने किनारा सोडून ती विरुद्ध दिशेला वळली. किनाऱ्याच्या एका बाजूला सुरूचे वन दिसले. अगदी समोर दूरवर चंद्रकोरीच्या आकारात डोंगरांची माळ होती. सूर्यप्रकाश लख्ख होता. त्यामुळे पाण्याला चंदेरी झाक होती. निक्लासेन स्थानकापाशी बोट प्रथम थांबली. त्याच नावाचे एक हॉटेल तिथे आहे. काही प्रवासी चढल्यावर नि काही उतरल्यावर बोट निघाली. गाव मागे पडले. वाऱ्याला धार आली. जलाशयात लाटा उसळू लागल्या. जलमार्ग चिंचोळा झाला. दोन्ही बाजूला डोंगर आले. त्यावर वस्ती होती. कास्टानीएंबान हे स्थानक मागे टाकल्यावर बोट पलीकडच्या किनाऱ्या-कडे गेली. या विभागातले सृष्टिचित्र रम्य होते. एक लहानसे चर्चे, त्याच्या

भोवती मिनारासारखी चार झाडे, त्याच्या पलीकडे वसंतऋतुची वाट पाहात असलेली पण आज पर्णहीन असलेली झाडे आणि अगदी दूरवर हिरवी गर्द झाडी चर्चचे नाव होते ओपस ख्रिस्ती.

आता सूर्य तोंडावर आला. सगळेच जलाशय रूपेरी रंगाचे झाले. लहानशी वस्ती दिसेनाशी झाली. डोंगरही उंचच उंच झाले. त्यावरची झाडेही तशीच उंच होती. मधेच एखादी लहानशी बोट दिसे. लाटा अधिक उसळू लागल्या. डोंगरांची माळ वेडीवाकडी झाली. त्यामुळे जलमार्गही तसाच झाला. दहा मिनिटांनी वस्ती दिसू लागली. डाव्या हाताला मध्ययुगीन किल्ला होता. तो मागे पडला. स्टँस्टाड स्थानक आले. आता बोट वळली. वाऱ्याला गारव्याची अशी जोरदार धार आली की, बरेच लोक केबीनमध्ये गेले. कोणी पत्ते खेळू लागले. कोणी बीअरचे चषक रिते करू लागले. पक्ष्यांचे कळप घरट्याकडे परतताना दिसले. एक मोळी बांधणारा दिसला. त्याचे घर जुनेच होते. पण त्याच्या हाताला घड्याळ होते, तोंडांत पाइप होता. सेंट निकोलसपाशी एक शॅटो नि पाण्यातले वॉचटॉवर दिसले. सूर्य कलला होता. पण अंधार नव्हता. बोट स्थानकात शिरताना सहा वाजले. त्याच वेळी निरनिराळ्या चर्चमधून घड्याळांचे ठोके झाले.

रूस नदीवरचा चॅपेल ब्रीज नि वॉटर टॉवर ही लक्षात राहातात. चौदाव्या शतकात गावाच्या रक्षणासाठी तो बांधण्यात आला. हेन्रीक वॅगमनने गावाच्या इतिहासातील ठळक प्रसंगांची चित्रे सेतूच्या भिंतीवर काढलेली आहेत.

हॉटेलच्या खोलीतून समोरचे मोठे चर्च दिसे. त्याच्या घड्याळाच्या ठोक्यांनी जाग आली. चर्चच्या बाहेर चौक असून त्यातल्या बागेत निळ्या, पिवळ्या पांढऱ्या रंगांच्या फुलांची रेलचेल होती. चर्चमध्ये आलेली म्हातारी माणसे विसाव्यासाठी बाहेरच्या बाकांवर बसलेली आढळत. इथल्या एका मोठ्या वृक्षाच्या आधाराने जाहिरातीचा फलक लावण्यात आला होता.

स्थानकावर आलो. सामान घेऊन तिकीट काढले. गर्दीचा त्रास कमी व्हावा म्हणून धूम्रपानास मनाई असणाऱ्या डब्यात चढलो. गाडी सुरू झाल्यावर माझ्या समोर बसलेल्या पोरीने सिगरेट पेटवली. मला वाटले की, तिकीट तपासणारा तिला सिगारेट न पिण्याविषयी सांगेल. पण तसे काही झाले नाही ! तो तिकिटे तपासून निघून गेला. गाडी तेज होती.स्थानके वेगाने पाठीमागे पडत

होती. टुमदार शहरे, दूरवरची डोंगरांची माळ, मधूनच एखादे सरोवर असा देखावा अधूनमधून दिसे. तासाभरात गाडी झुरिकला आली.

झुरिक हे जीनिवा आणि लुझर्नसारखेच टुमदार शहर आहे. गावात कॅनॉल, त्याच्यावरचे पूल, प्रवाशांची गर्दी, चित्रविचित्र कपड्यांतले तरुण नि तरुणी, त्यांचे वाद्यवादन, इत्यादी नेहमी दिसणाऱ्या गोष्टी इथेही होत्या. इथल्या उद्यानात रंगीबेरंगी फुलांची रेलचेल होती. हिमाच्छादित अल्पाईन पर्वतराजी गावातूनही दिसत होती. गावात हिंडून झाल्यावर कॅनॉलकडे आलो. आमच्या शेजारच्या दोन बाकांवर म्हातारे बसले होते. काही वेळाने एक मुलगी आली. थोडा वेळ बाकावर बसली. मग उठली आणि जलाशयाच्या काठाकडे गेली. पाण्यात रंगीबेरंगी बदके विहार करत होती. त्यांना पावाचे तुकडे घालून ती निघून गेली. आम्हीही उठलो.

स्वीस एअरच्या कार्यालयात विमानतळावर जाणाऱ्या बसची चौकशी केली. अंतराअंतराने बस सुटत होती. मी इथल्या लाउंजमध्ये बसलो. इतर प्रवासी बसले होते. काही निघण्याच्या तयारीत होते, काही दुसऱ्यांची वाट वाट पाहात होते. अपेक्षित व्यक्ती आली की, भेटणाऱ्याचा चेहरा, त्याचे हावभाव, डोळ्यांतले विकार, इत्यादी गोष्टी पाहात माझा वेळ कसा गेला ते समजले नाही. मग झुरिक विमानतळावर आलो. इथेही तपासणी कडक होती. खोलीत नेऊन अंगझडती तसेच बॅगची तपासणी झाली. शोभा डॉक्टर आहे हे कळताच तिची तपासणी करणाऱ्या बाईने स्वतःच्या ऑपरेशनची हकीगत तिला सांगितली. पावणे नवाला विमान सुटले. तासाभरात व्हिएना आले. एअर टर्मिनलवरून टॅक्सीने हॉटेल वेंडालवर आलो.

# व्हिएन्ना ते बर्लिन

युरोपची सांस्कृतिक राजधानी कोणती— पॅरिस का व्हिएन्ना? या प्रश्नाचे उत्तर देणे कठीण. संगीत, चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला अशा अनेक क्षेत्रांत व्हिएन्ना गेली अनेक शतके आघाडीवर आहे. इतकेच नाही तर वैद्यकशास्त्रातही. म्हणून व्हिएन्नाचे तसेच ग्राझचे मेडिकल सेंटर पाहाण्याचे डॉक्टरने ठरवले होते. त्या कामासाठी सकाळी डॉ. गिस्ट यांना भेटायला ती गेली. एक वाजता परत आली. नंतर जवळपास स्वस्त रेस्टरॉं कुठे आहे याची चौकशी हॉटेल वेंडालमधल्या माणसाकडे केली. त्याने पाच मिनिटांच्या रस्त्यावरची दोन तीन दुकाने सुचवली. आम्ही पिझेरिया ब्रिस्टोलमध्ये आलो. इथल्या बाईला इंग्रजीचे तुटपुंजे ज्ञान होते. काय पदार्थ हवे ते सांगितल्यावर तिने विचारले, 'पिणार काय?' मी म्हणालो, 'पाणी'. तेव्हा ती हसत म्हणाली, 'ऑस्ट्रीयन मद्याची चव घेणार नाही का?' 'जे स्वस्त असेल त्याचा एक ग्लास आण,' मी सांगितले. 'रेड का व्हाईट?' तिने विचारले. 'रेड,' मी उत्तरलो. पहिल्याच घोटात माझ्या ध्यानात आले की या मद्याला धार आहे.

गावाची सहल दुपारनंतर निघाली. सुरुवातीलाच बस जुन्या फळबाजारावरून गेली. डाव्या हाताला डॅन्यूबचा कॅनॉल लागला. याच वाटेवर विधवा बायकांसाठी एका सम्राटाने बांधलेला आश्रम लागतो. गरीबांविषयी अनुकंपा

असायला मनुष्य समाजवादीच पाहिजे असे नाही. शुंब्रुन राजवाडा हे व्हिएन्नातले मोठे आकर्षण. राजवाडा बॅरोक कलेच्या मांडणीचा आहे. आतील चित्रे लक्षणीय आहेत. पहिला फ्रान्स या राजाच्या चित्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे तोंड नि पाय आपण चित्र पाहाताना जसे वळतो तसे वळतात. जोसेफ रोझाने मेरिया थिरेसाचे चित्र तिच्या मुलांसह काढले आहे. या चित्राची माहिती देताना गाईड म्हणाला की, हे चित्र काढल्यानंतर थिरेसाला जशी मुले झाली तशी रोझाने या चित्रात नंतर काढली. या राणीला चिनी कलाकुसरीच्या वस्तू फार आवडत. त्यांची खरेदी कॉन्स्टेटिनोपलमध्ये ती करत असे. एका दालनात त्यांचा संग्रह आहे. तसेच मोगल पेंटिंग्ज आहेत.

इटालिअन चित्रकार गिलेमा याने केलेला ऑस्ट्रियन सामर्थ्याचे प्रतीक दाखवणारा फ्रेस्को छान आहे. कॉसर्टच्या चित्रात सहा वर्षांचा मोत्सार्ट आहे. राणीसाठी तो या वयापासून वाद्य वाजवू लागला. पहिल्या महायुद्धातल्या पराभवानंतर ऑस्ट्रियन सम्राटाने राज्यत्यागाच्या पत्रकावर या वाड्यातच सही केली. एका खोलीत नेपोलिअनच्या मुलाचे स्मारक आहे. जासेफाईनला घटस्फोट दिल्यानंतर त्याने ऑस्ट्रियन राजकन्येशी विवाह केला होता. तिचा हा मुलगा. तो लहानपणीच गेला. त्याचा आवडता पक्षी होता. तो भरलेला पिंजऱ्यातला पक्षी तिथे दाखवतात. असे सांगतात की, एक दांडगा बैल रोज या राजवाड्याच्या उद्यानात येत असे. एक दोनदा त्या बैलाला पाहिल्यावर चॅन्सेलर मॅटरनिखने ही गोष्ट राजाच्या नजरेला आणली. तेव्हा राजा म्हणाला की, इथे येताना कोणाचे शिफारपत्र नसलेला हाच एक प्राणी आहे. सप्तवार्षिक युद्ध, व्हेनिसने तुर्कांचा केलेला पराभव हे नृत्यागारातले फ्रेस्को, तसेच निरनिराळ्या टॅपिस्ट्रीज प्रेक्षणीय आहेत.

बेलव्हेडर पॅलेसकडे जाताना वाटेत हॅंडलचे स्मारक, आर्ट म्युझिअम, हिरोज स्क्वेअर, राष्ट्रपतींचे कार्यालय, रशियन स्मारक वगैरे लागले. ऑस्ट्रियन पैशाने ऑस्ट्रियन भूमीवर बांधलेले रशियन स्मारक असे वर्णन करून गाईड म्हणाला, 'दोस्त राष्ट्रांनी इथून सैन्य काढायचे ठरल्यावर आम्हांला इतके वाईट वाटले की, आम्ही तीन रात्री नाचरंगात घालविल्या.' रोमन सम्राट ऑरेलिअसने गॉलांचा पराभव करून त्यांना हाकलले. त्याची स्मृती म्हणून त्याचे एका रस्त्याला नाव दिले आहे. त्यावरून जाताना गाईड म्हणाला, ' आमच्या देशाला रोमन

लोकांनी मद्याची भेट दिली, तुर्कांनी कॉफीची, अमेरिकनांनी कोकाकोलाची, पण आम्हांला आवडते ऑस्ट्रियन बीअर.'

बेलव्हेडर पॅलेस हा प्रिन्स युजेनचा. त्याला चौदाव्या लुईच्या सैन्यात दाखल व्हायचे होते. पण त्याची उंची कमी पडली. शिवाय त्याला कुबड होते. म्हणून 'तू मंक हो,' असे लुईने त्याला सांगितले. पुढे ऑस्ट्रियन सैन्यात शिरून मोठा सेनानी म्हणून त्याने नावलौकिक मिळवला. त्याने तुर्कांचा पराभव केला होता. हा राजवाडा आज बंद होता. तो बांधताना आर्किटेक्टने काय कलात्मक गमती केल्या त्याची माहिती गाईडने दिली. पण त्यातली बरीच अगम्य होती.

डॉ. गिटझना काम असल्याने भारतीय डॉक्टरांना मेडिकल सेंटर नि तिथली शस्त्रक्रिया त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखविली होती. संध्याकाळी डॉ. गिटझनी फोन केला की, उद्या एक शस्त्रक्रिया करणार आहे तरी लवकर हॉस्पिटलवर या. मग ग्राझला जायचे डॉक्टरने रद्द केले. दुपारी हॉस्पिटलवरून परत येताना ट्रॅमने आलो. भाषेच्या अडचणीमुळे थोडा चुकलो. एका ट्रॅमने अर्धा रस्ता येऊन मग दुसरीत बसलो. थोड्याच वेळात हिरोज स्क्वेअर वगैरे परिचित भाग दिसल्याने मी निःश्वास सोडला.

स्टिफन्स डोम हे प्रेक्षणीय कॅथिड्रल आहे. त्याची रचना गोथिक पद्धतीची असून ते ऑस्ट्रियातले सर्वोत्तम चर्च समजले जाते. बाराव्या शतकात त्याच्या उभारणीला सुरुवात झाली. त्याचे टॉवर खूप उंच असून आतल्या शिल्पकलेने मन थक्क होते. दुसऱ्या महायुद्धात त्याचे नुकसान झाले होते. पण आता ते दुरुस्त झाले आहे. मेरिया थिरेसा प्लात्झ हा व्हिएन्नाचे केन्द्र आहे. सर्व प्रेक्षणीय स्थळे त्याच्या जवळपास आहेत. चौकाच्या मध्यभागी मेरिया थिरेसाचा पुतळा असून त्याच्या भोवती तिच्या सेनापतींचे नि राजधुरंधरांचे पुतळे आहेत. इथून थोड्या अंतरावर आर्ट गॅलरी आहे. रॅफेल, व्हॅन डाईक, रूबेन्स, टिशिअन, या जागतिक कीर्तीच्या चित्रकारांची चित्रे त्यात असून बहुतेक चित्रे छान आहेत. पण बेलेटीने काढलेली व्हिएन्नाची दृश्ये, आल्प्स ओलांडणारा नेपोलिअन, कॉक्सीचे पॅरॅडाइज लॉस्ट ही चित्रे लक्षात राहतात. चित्रकलेशिवाय इजिप्शिअन, चिनी, ग्रीक नि रोमन या कलांचेही विभाग आहेत.

जवळच डाव्या हाताकडे लोकसभेची भव्य इमारत आहे. प्रवेशद्वाराकडे जायला जिना असून त्याच्या कडेला थुसिडाइस, हिरोडिटस, झेनोफेन या

इतिहासकारांचे पुतळे आहेत. लोकसभा सदस्याला इतिहासाचे ज्ञान असावे असे आर्किटेक हैसन यांना सुचवावयाचे होते काय ! इमारतीच्या उजव्या हाताला जेकब, रूमान, व्हिक्टर ॲडलर, फर्डिनंड हनुश यांचे पुतळे आहेत. पहिल्या महायुद्धात पराभव झाल्यानंतर ऑस्ट्रियात लोकतंत्र आले. त्याचे हे शिल्पकार. डाव्या हाताला कार्ल रेनरचा पुतळा आहे. थोड्याच अंतरावर रॉथहॉस म्हणजे टाऊन हॉल आहे. ही भव्य वास्तू फ्रेडरिक श्मिडझनी १८६१ मध्ये बांधली. त्याच्या भोवताली विशाल उद्यान असून ग्रीष्म ऋतूत तिथे ओपन एअर कॉन्सर्टस होतात.

दुपारी व्हिएन्ना वुडची सहल सुरू झाली. प्रथम आम्ही सिग्रोटोकडे आलो. इथे पूर्वी खाण होती. त्यात पाणी येऊ लागल्याने त्याचे ग्रोटोत रूपांतर झाले. इतके मोठे भुयारी सरोवर युरोपात नाही. पाचशे फूट चालल्यावर मग काही वळणे घेऊन जिन्याने खाली उतरले की, पाणी लागते. त्यातून होडीने आम्ही एक फेरी मारली. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीच्या हेंकेल या लढाऊ विमानाचे सर्व भाग इथे जुळवून विमान तयार होत असे. रशियन सैन्य व्हिएन्नात घुसण्यापूर्वी जर्मनांनी बॉम्ब उडवून इथली यंत्रसामुग्री नष्ट केली.

सहलीचा दुसरा टप्पा होता मोनॅस्टरी ऑफ हाइलीजेनक्रुझ. त्याच्या आवारातच जुलिओ जुलिअन या इटालिअन चित्रकाराने बांधलेला स्तंभ आहे. मोनॅस्टरीत एक झरा असून मध्ययुगीन काळात शेतकरी पाणी पिण्यासाठी इथे येत. लिओपोल्ड हा मोठा लढवैय्या. त्याने पहिल्या बायकोला टाकून दुसरे लग्न केल्याने त्याचे दफन चर्चमध्ये होणे शक्य नव्हते. तेव्हा मृत्यूपूर्वी त्याने ' मंक ' झाल्याचे घोषित केले. पूर्वायुष्यावर अशा प्रकारे पडदा टाकल्याने त्याचे इथे दफन होऊ शकले. फ्रेडरिक द फायटरचेही दफन या जागी झाले आहे. दक्षिण भारतातल्या मंदिरांमधल्या मूर्तीवर प्रहार करून मुसलमानांनी त्यांना जसे विद्रूप केले आहे तसेच फ्रेडरिकच्या निद्रित पुतळ्याचे तुर्कांनी पाय तोडले आहेत. प्रसिद्ध संगीतज्ञ शुबर्ट इथे ऑर्गन वाजवत असे. त्याचे घरही मोनॅस्टरीच्या रस्त्यावर होते.

मेअरलिंग हे ऑस्ट्रियन राजघराण्याचे शिकारीला गेले असता राहण्याचे ठिकाण. आता त्याचे चर्च झाले आहे. तसे चर्च होण्याची कथा विलक्षण आहे. प्रिन्स रूडॉल्फ नावाचा एक विलासी राजपुत्र होता. त्याच्या अनेक मैत्रिणींपैकी

एक हंगेरिअन होती. तिच्या मोहाखातर त्याने राज्यहिताविरुद्ध काही कृत्य केले. त्याचा बभ्रा झाल्यावर राजाने राजपुत्राला आत्महत्या करण्यास सांगितले. तेव्हा रूडॉल्फ इकडे आला. आपल्याबरोबर आत्महत्या करण्याची त्याने मैत्रिणींना विनंती केली. सोळा वर्षांच्या एका मुलीशिवाय कोणी तयार झाले नाही. तिचा अंत झाल्यावर पाच तासाने त्याने स्वतःच अंत केला. ही हकीगत आईला कळल्यावर ती दुःखी झाली. पण आत्महत्या केलेल्या मुलाच्या स्वर्ग-प्राप्तीविषयी तिला शंका आल्याने तिने या घराचे चर्चमध्ये रूपांतर केले. ते कार्मेल पंथाचे आहे.

परतीच्या प्रवासातील प्रदेशाने काही वेळा गोव्याकडे तर पावसाळ्यानंतरच्या घाटाकडचे स्मरण दिले. व्हिएन्नात बस शिरताच आम्ही उतरलो नि कार्ले-स्कीशे चर्चेकडे आलो. व्हिएन्नामधले बॅरोक पद्धतीचे हे सर्वांत मोठे चर्च. त्याच्या प्रवेशद्वारी दोन मिनार आहेत आणि माथ्यावर डोम आहे. चर्चच्या पायऱ्यांवर आज सिगरेटची थोटके पडली होती आणि आत थोडे भक्त होते नि त्यांपैकी बहुतेक वृद्ध होते.

व्हिएन्नाहून बर्लिनला जाताना वाटेवर फ्रँकफूर्टला काही तास आम्ही काढ-णार होतो. विमान तासाभरात फ्रँकफूर्टला आले. जड सामान बर्लिनला रवाना झाले होते. आम्ही बसने गावात जाण्यास निघालो. बसमध्ये शिरताना काही प्रवाशांनी दाटी केली. मी काही बोलणार इतक्यात समोर मोकळे आसन दिस-ल्याने बसलो. गावात गेल्यावर माझ्या लक्षात आले की, हिपपॉकेटमधले आठ डॉलर्स गेले होते. इथे अमेरिकन सैनिक खूप असून त्यांत निग्रोंची संख्या बरीच होती. जवळच फ्रँकफूर्ट—इस्तंबूल बस सर्व्हिसचे स्थानक होते. जर्मनीत तुर्की लोक कामाला आहेत.

दुपारी नगरसहल निघाली. गाईड मुलगी होती. तिचे बोलणे ठसक्याचे, मुद्देसूद नि आवश्यक तेवढी माहिती देणारे होते. जर्मन माणसातला श्रेष्ठतेचा भाव तिच्या वागण्यात होता. पुढे बोटानिकल गार्डनमध्ये हिंडताना तिने तुमच्या कॅमेऱ्यावर फोटो घेऊ का असे विचारल्याने तिचा परिचय झाला. तिचे नाव आयझोल्ड व्हॉन बारूस्की. मूळची ती बव्हेरियातली. आता फ्रँकफूर्टमध्ये औषधाच्या कंपनीत काम करते. शिवाय फावल्या वेळात गाईडचे. तिला पाच-सहा भाषा अस्खलित येत होत्या. फ्रॅंकफूर्टमधल्या ओरिएंटल इन्स्टिट्यूटची

ती सभासद होती.

महायुद्धाच्या अंताला फ्रँकफूर्ट जवळजवळ जमीनदोस्त झाले होते. १९५३ मध्ये मी जेव्हा या गावाला आलो तेव्हा त्याची पुनर्बांधणी सुरू झाली होती. स्वतःच्या राखेतून जन्म घेणाऱ्या फोनिक्स पक्ष्याप्रमाणे हे गाव पुन्हा उभे राहिले. गावाला युद्धाचा तडाखा लागला होता हे दाखविणारे अवशेष पडलेल्या भिंतीच्या स्वरूपात अजून काही ठिकाणी दिसतात. ते सोडले तर बाकीचे शहर अगदी अद्ययावत आहे.

सुरुवातीलाच भेटले ते सेंट पॉल चर्च. १८४८ मध्ये जर्मन राष्ट्राच्या एकीकरणाच्या चळवळीने जोर धरल्यावर जी बैठक झाली ती या चर्चमध्ये. या बैठकीत बिस्मार्कने भाग घेतला होता. बिस्मार्कची व्यक्तिरेखा मी लिहिली असल्याने तो सगळा इतिहास मला ठाऊक होता. या चर्चमध्ये प्रेसिडेंट केनेडी यांनी भाषण केले होते. येथून पुढे जुन्या पुलावरून बस ट्युटॉनिक नाईटच्या वास्तूवरून कॅथिड्रलकडे आली. जर्मन सम्राटाची निवड झाली की, त्याचे राज्यारोहण इथे होत असे. आता बस गटे मेमोरिअलकडे आली. गेल्या महायुद्धातील बॉम्बहल्ल्यात सर्व गाव भुईसपाट झाले. त्यात गटेचे घरही झाले. पण तत्पूर्वी आतील सामान हलवण्यात आले. युद्धानंतर वाचलेल्या सामानाचा वापर करून ते घर पूर्वीच्या स्वरूपात बांधण्यात आले.

जुन्या पद्धतीचे स्वयंपाकघर आहे. एका खोलीत वॉटरपंप आणि मेणबत्त्यांचे दिवे आहेत. मध्ययुगात गरीब लोकांना दोन मेणवत्त्यांचे दिवे वापरण्याची मनाई असे. रात्रीच्या वेळी कुठे जायचे असेल तर श्रीमंतांच्या आश्रयाने त्यांना जावे लागे. गटेच्या काळात इटली हे कलेचे केन्द्र होते. सधन लोक कलाकुसरीच्या वस्तू इटलीतून आणत. गटेचे वडील नगराध्यक्ष होते. उत्तम लॅंडस्केप चित्रे, पोर्सिलिनच्या वस्तू इत्यादी त्यांनी जमा केलेल्या इटालिअन वस्तू इथे मांडलेल्या आहेत. अनेक गोष्टी दाखवणारे कपाटाएवढे मोठे घड्याळ इथे आहे. गटेच्या काळात प्रॉटेस्टंट नसणाऱ्या लोकांना राजकीय क्षेत्रात बंदी असल्याने त्यांच्यातले बुद्धिमान लोक तांत्रिक कामाकडे वळत. गटेच्या अशा एका मित्राने हे घड्याळ तयार करून गटेला बक्षीस दिले.

गटेचे शॉर्लोट नावाच्या मुलीवर प्रेम होते. पण त्यांचे लग्न झाले नाही. त्या काळात फोटोची कला नसल्याने गटेने काळ्या कागदात तिच्या चेहऱ्याचे चित्र

कापून ते भिंतीवर लावले. ते आजही तिथे आहे. तिच्याविषयी गटेने फॉस्टमध्ये लिहिले आहे असे बारुस्की म्हणाली. त्याच्या वडिलांच्या खोलीत कायद्याची पुस्तके वगैरे आहेत. या खोलीच्या खिडकीतून गटे रात्री कोणाबरोबर येत आहे यावर वडील लक्ष ठेवत.

जर्मन राजांना सम्राटपदाची प्राप्ती झाल्यानंतर जे भोजन व्हायचे ते रोमरच्या असेंब्ली हॉलमध्ये. जर्मन सम्राटांची चित्रे त्या हॉलमध्ये लावलेली आहेत. ही चित्रे गेल्या शतकात नाण्यांवरून तयार करण्यात आली होती. चित्रांची सुरुवात शार्लेमेनपासून आहे. युद्धकाळात ही चित्रे हलवण्यात आली होती. बोटानिकल गार्डन हा सहलीचा शेवटचा टप्पा. या उद्यानात बहुतेक प्रकारची झाडे आहेत. सहल संपली. भारत-दर्शनाला येण्याची इच्छा बारुस्कीने दाखवल्याने डॉक्टर तिला कार्ड द्यायला गेली. या घाईत आम्ही ओव्हरकोटाशिवाय बसच्या बाहेर आलो नि बस गेली. पण बारुस्कीने अवधान राखून कोट परत मिळविले. मग एका उपाहारगृहात तिच्याबरोबर कॉफी घेऊन आम्ही एअर टर्मिनलकडे आलो.

अर्ध्या तासाने बस निघाली. थोड्या वेळात विमानतळ आला. या तळाचा उपयोग ५६ विमान कंपन्या करत असल्याने त्याच्यावर विमानांची गर्दी होती. वेस्ट बर्लिनला केवळ बी. ई. ए. नि एअर फ्रान्सची विमाने जातात. आजचे बी. ई. ए. चे विमान भरलेले होते. सिगरेटच्या धुराने जीव बेजार झाला. हवा वाईट होती. विमान भीती वाटावी इतके एकदा हादरले.

तासाभरात बर्लिन आले. सामानाची वाट पाहात उभा होतो. सर्वांचे सामान आले. फक्त मी आणि दुसरा एक प्रवासी यांचे आले नाही. म्हणून तो चौकशीला गेला. त्याच्या पाठोपाठ मी गेलो. जड बॅग पाहून अधिकाऱ्याने ती उघडण्यास सांगितले. मी उघडली. कपडे पाहून त्याने बंद केली. ढकलगाड्या नसल्याने सामान उचलून आणावे लागले. माहिती केन्द्रात हॉटेल रॉक्सीची चौकशी केली. तेव्हा क्रमांक १६ च्या बसने किंवा टॅक्सीने तिथे जाता येईल असे आम्हांला सांगण्यात आले. रात्रीचे दहा वाजले होते. म्हणून टॅक्सीने निघालो. काही वेळा अंधाऱ्या रस्त्याने वळणे घेत टॅक्सी हॉटेलवर आली. बर्लिनसारखे शहर, रात्रीची वेळ, टॅक्सी अंधाऱ्या रस्त्याने जाई तेव्हा मनात विचित्र विचार येत!

पूर्व आणि पश्चिम बर्लिनची सहल सकाळी दहाला होती. साडेसहा फूट

उंचीचा, विशाल भालप्रदेशाचा नि मिस्किलपणे हसणारा आजचा गाईड होता. रोमेलच्या आफ्रिका कोअरमध्ये तो छत्रीधारी सैनिक होता. पुढे पकडला गेल्यावर युद्धबंदी असताना तो इंग्रजी भाषा शिकला. त्याशिवाय त्याला फ्रेंच नि इटालियन भाषा येत होत्या. बसमध्ये बसल्यावर तो म्हणाला की, पूर्व बर्लिनच्या व्हिसासाठी ३ मार्क द्यावे लागतील, शिवाय तुमच्याजवळच्या परदेशी चलनाची माहिती द्यावी लागेल. मात्र ट्रॅव्हलर चेकची नको. मग माहिती घेत घेत तो माझ्याकडे आला. मी त्याला भारतीय नाणी दाखवली. तो म्हणाला. 'ही माहिती नको.' तेव्हा मी त्याला सांगितले की, भारत सरकारने परदेशी चलन फक्त माझ्या पत्नीला ती डॉक्टर असल्याने दिले आहे. मला काही नाही. यावर तो आणि इतर प्रवासी हसले.

पूर्व बर्लिनला जाण्यासाठी बस चेक पॉईंट चार्लीकडे निघाली. युद्धाच्या अखेरीला बर्लिनही सपाट झाले होते. आता त्याची नवीन बांधणी झाली आहे. मात्र बर्लिनची फाळणी झाली असल्याने जिथे बर्लिन भिंत आहे, त्याच्या आसपास तसेच पूर्वीच्या राजदूतालयाच्या जागेवर बांधकाम होत नाही. वाटेवरच्या इमारतीकडे बोट दाखवून गाईड म्हणाला की, गोअरिंगच्या विमान-दलाचे ते कार्यालय बॉम्बहल्ल्यातून वाचले. त्याला धक्का लावायचा नाही असा दोस्त राष्ट्रांचे विमानदल नि जर्मन विमानदल यांच्यात संकेत होता असे सांगतात.

चेक पॉईंट चार्ली आला. फोटोला मनाई असल्याने कॅमेरे बाहेर काढू नका अशी गाईडने सूचना दिली. मग 'सुखरूप परत या' असे म्हणून तो बसमधून उतरला. त्यानंतर एक स्त्री अधिकारी पासपोर्ट तपासायला आली. विनाहाम्य चेहेरा, पासपोर्ट तपासताना प्रवाशांच्या चेहेऱ्याकडे पाहाताना नजरेतला कडकपणा, माफक शब्द यावरून साम्यवादी पोलिस खात्याची कल्पना येते. तपासणी संपवून ती बाई गेली, नि एक दुभाष्या आला. त्याचे इंग्रजी उच्चार अमेरिकन होते, नि त्याच्या बोलण्याची ढब पक्क्या कम्युनिस्टाची होती. गोअरिंगचा उल्लेख त्याने वॉर क्रिमिनल गोअरिंग असा केला.

बर्लिनमधली ऐतिहासिक स्थाने पूर्व भागात आहेत. सहलीची सुरुवात हिटलरच्या राईस चॅन्सेलरीपासून झाली. आता तिथे मैदान असून त्यावर हिरवळ नि एका जागी उंचवटा आहे. इथून हिटलरने लढाईचे नेतृत्व केले नि शेवटी आत्महत्या केली. ट्रेव्हार रूपरच्या 'लास्ट डेज ऑफ हिटलर' या पुस्तकात या

काळाचे वर्णन आहे. येथून बस ब्रेडेनबर्ग गेटपाशी आली. वास्तुशिल्पाचा उत्तम नमुना असा त्याचा लौकिक आहे. पलीकडेच राइश टॅगची इमारत आहे. पण ती पश्चिम बर्लिनच्या हद्दीत आहे. यानंतर आम्ही ऑपेरा बिल्डिंगपाशी आलो. बॉम्बहल्ल्यात ते नष्ट झाले होते. उत्तम नाटके बर्लिनमध्ये होतात ही ख्याती पुढे चालविण्यासाठी नवीन नाट्यगृह बांधण्यात आले. मॉन्यूमेन्टपाशी ' चेंजिंग ऑफ द गार्ड ' हा सोहळा पाहिला. अजूनही जर्मन सैनिक गुजस्टेपमध्ये चालतात. पौर्वात्य विषयांचा विशेष अभ्यास होतो ती होम्बोल्ड युनिव्हर्सिटी जवळच आहे.

सगळ्या इमारती अद्ययावत दिसल्या. घर नि अन्न या आवश्यक गोष्टी इथे स्वस्त आहेत. चैनीच्या गोष्टी महाग आहेत. टेलिव्हिजन टॉवर शेजारीच तेराव्या शतकातले चर्च आहे. एका रस्त्याच्या मध्यभागी लेनिनचा पुतळा आहे. एका चौकाला मार्क्सचे नाव आहे. पूर्वी त्याचे नाव स्टॅलिन ॲव्हेन्यू होते. बर्लिनच्या लढाईत वीस हजार रशियन सैनिक मारले गेले. त्यांच्या स्मरणार्थ बांधलेले प्रचंड स्मारक पाहण्यासाठी आम्हाला प्रथम बसमधून खाली उतरवण्यात आले. स्मारकापाशी रशियन मुलांची परेड चालली होती. प्रत्येक मुलगा काही पाठांतरित वाक्ये मोठ्याने म्हणत होता. तेव्हा गाईडकडे एकाने त्याविषयी पृच्छा केली. तेव्हा निर्विकार चेहेऱ्याने तो म्हणाला की, मला भाषा समजत नाही. पूर्व जर्मनीतल्या शाळांत रशियन भाषा आवश्यक विषय म्हणून शिकविली जाते असे सुरुवातीला तो म्हणाला होता याचा त्याला या वेळी विसर पडलेला दिसला.

बरोलिना या आधुनिक हॉटेलपाशी आम्ही उतरलो. इथल्या सर्वच वस्तू महाग होत्या, रस्त्यावर मी उभा होतो तेव्हा पश्चिम बर्लिनमधून आलेले लोक आपल्या नातेवाइकांशी बोलत असलेले दिसले. त्यांच्या बोलण्याच्या पद्धतीवरून साम्यवादी जगाच्या व्यवहाराची थोडी कल्पना येते. चेक पाईंट चार्लीपाशी परत आल्यावर तो गाईड उतरला. सकाळची बाई परत आली. पासपोर्ट तपासणी करताना या वेळी तिने किंचित स्मित केले. ती गेल्यावर आमच्या बस ड्रायव्हरने गाडी पुढे घेतली. इथले अडसर असे आहेत की, गाडी नागमोडी न्यावी लागते. बाहेर जाण्याचे कागद देऊन ड्रायव्हर परत आल्यावर आमच्याकडे मिस्किलपणे पाहात म्हणाला, ' सुखरूप परत आलो. '

पश्चिम बर्लिनमध्ये परत आल्यावर जुना गाइड आला. पूर्व बर्लिनमधून पळण्यासाठी लोक काय युक्त्या योजतात याची त्याने काही उदाहरणे दिली. एकदा तिघांनी मोटारीची धडक देऊन सीमा पार केली असे त्याने सांगितले. बस राईशटॅगपाशी प्रथम आली. या इमारतीला आग लावण्याचा कट नात्झी पक्षाने घडवून आणला होता. या कटात प्रसिद्ध साम्यवादी नेता डिमिट्राफ याला गोवण्यात आले होते. कोर्टात त्याची नि गोअरिंगची शाब्दिक चकमक झाली होती. ती त्या वेळी गाजली होती. पश्चिम जर्मनीची राजधानी बॉनला असल्याने या राईशटॅगचा आता उपयोग राहिलेला नाही. शिवाय दुरुस्तीचा खर्च फार असल्याने ते काम पडून आहे.

जवळच रशियन स्मारक आहे. तिथल्या पहाऱ्यासाठी रशियन सैनिक असतात. या स्मारकाविषयी बर्लिनचे लोक म्हणतात की, शहर पडल्यावर रशियन सैनिकांनी लोकांकडून घड्याळे काढून घेतली. त्या घड्याळांच्या वजनामुळे या स्मारकातल्या सैनिकाला हात उचलता येत नाही. येथून आम्ही फ्रेडरिक विलियमच्या भावासाठी बांधलेल्या प्रासादाकडे आलो. हल्ली त्याचा उपयोग राष्ट्राध्यक्षांचा निवास म्हणून होतो. आता बस व्हिक्टरी कॉलमकडे आली. सन १८७१ मधल्या विजयाचे हे स्मारक. त्या साली जर्मनीचे एकीकरण पूर्ण झाले. हे कार्य बिस्मार्कचे. या कामात त्याला साहाय्य झाले ते रून या संरक्षणमंत्र्यांचे नि मोल्टक या सेनानीचे. त्या तिघांचे पुतळे बिस्मार्क प्लात्झमध्ये आहेत. इथल्या एका रस्त्याला प्रथम बिस्मार्कचे नाव होते, मग हिटलरचे देण्यात आले, आता थिओडर हुसचे आहे. रस्त्यांची नावे बदलण्याची आपली प्रथा वाटते तितकी हास्यास्पद नाही.

शीतयुद्धाच्या काळातल्या बर्लिनसंबंधीच्या काही गोष्टी गाईडने सांगितल्या. एकदा पूर्व बर्लिनमधून येणाऱ्या विजेच्या पुरवठ्यात कपात झाली. कडाक्याच्या थंडीचा उपयोग नागरिकांचे मनोधैर्य मोडण्यासाठी करण्यात आला. त्यांना संध्याकाळचे जेवण करता येईल इतकेच इंधन मिळत होते. पण जनतेने हिंमत सोडली नाही. अमेरिकेने विमानातून वीजनिर्मितीची यंत्रे आणून वीजपुरवठा चालू केला. भुयारी प्रवासावरूनही असाच आणीबाणीचा प्रसंग निर्माण झाला. त्या वेळी पश्चिम बर्लिनच्या लोकांनी भुयारीवर बहिष्कार घातला. प्रसंग बोलके आहेत !

आता आम्ही ऑलंपिक स्टेडियमवर आलो. १९३६ च्या बर्लिन ऑलंपिक्स स्पर्धेमध्ये जर्मनीने पहिला क्रमांक मिळविला होता. आजच्यासारख्याच एका सहलीत या गाईडची ऑलंपिक्समध्ये भाग घेतलेल्या अमेरिकन खेळाडूशी चर्चा झाली. त्या खेळाडूने अमेरिकेने किती बक्षिसे मिळविली याची यादी सांगताच हा गाईड त्याला म्हणाला, ‘ आम्हालाही दहा वर्षे द्या. आमचेही काळे-निग्रो-खेळाडू अशीच बक्षिसे मिळवतील. ’ अमेरिकन विजेते गोरे लोक नाहीत हे त्या खेळाडूला त्या गाईडने सुचविले. हिटलरचे तत्त्वज्ञान अजूनही मोर्चे धरून आहे !

सहल संपण्याच्या सुमारास बस नवीन वसाहतीतून गेली. या भागातल्या इमारती बांधण्यास जगातल्या मोठमोठ्या आर्किटेक्सचे साहाय्य घेण्यात आले होते. हंझा भागातल्या एका इमारतीची गंमत सांगताना गाईड म्हणाला की, इथल्या रहिवाशाला कोणत्याच गोष्टीसाठी बाहेर जाण्यास लागू नये अशीच घरबांधणी होती. मनोरंजनासाठी अगदी वरचे मजले मोकळे ठेवण्यात आले. मात्र तिथे जाण्यासाठी लिफ्ट नव्हते !

सहल संपल्यावर आम्ही कायसर विलियम मेमोरिअल चर्चकडे गेलो. बॉम्ब-हल्ल्यातून त्याचा अर्धा भाग वाचला होता. युद्धाची आठवण म्हणून तो तसाच ठेवण्यात आला आहे. मात्र त्याच्या शेजारी नवीन मांडणीचे चर्च बांधण्यात आले. आम्ही आतून एक फेरी टाकली नि हॉटेलवर परत आलो. तिथल्या लॉजमध्ये एक मुंबईचे बंगाली गृहस्थ भेटले. त्यांच्याशी थोडा वेळ गप्पा मारल्या.

# कोपेनहॅगन नि स्टॉकहोम

बर्लिन ते हॅमबुर्ग उड्डाण कमी अंतराचे होते. तासाभरात हॅमबुर्ग आले. डेन्मार्ककडे जायचे असल्याने आम्हाला प्रादेशिक तळावरून आंतरराष्ट्रीय तळाकडे यावे लागले. इथली तपासणी कडक होती. अंगावरच्या धातूच्या वस्तू अधिकाऱ्यासमोर ठेवून एका इलेक्ट्रॉनिक्सच्या दरवाजातून प्रत्येक प्रवाशाला जावे लागले. विमानात शिरण्यापूर्वी दारापाशी ठेवलेल्या जेवणाच्या डब्यातून एक डबा प्रवाशाने उचलावा अशी सूचना देण्यात आली.

पाहता पाहता विमान पांढऱ्या ढगांवर आले. हे ढग कापूस पिंजल्यासारखे वाटले. पंधरा मिनिटांनी ते पाठीमागे पडले. खाली समुद्र दिसू लागला. त्यात खूप बेटे आढळली. काही बेटांवर वस्ती होती. एका जागी नागमोडी आकाराचा भूमीचा पट्टा दूरवर समुद्रात गेलेला होता. या वेळी पाण्याचा रंग निळा भासला. काही गावे दिसली पण पुन्हा छोटी खेडी, आखीव शेते, नागमोडी रस्ते आढळले. आता विमान उतरू लागले. पुन्हा पांढऱ्या ढगांची गर्दी झाली. काही क्षण काळे ढगही आले. नंतर ते सर्व पाठीमागे राहिले. पुन्हा समुद्र आला. मोठ्या बोटी पाणी कापत जात होत्या. पाण्याचा रंग पोपटी झाला. धुके आल्यासारखे झाले. पण निमिषमात्र. दोनच्या सुमारास विमानाने धावपट्टीस स्पर्श केला. कळलेही नाही. इतके छान उतरले.

मिशन हॉटेलची इमारत टोलेजंग आहे. खोलीतल्या दरपत्रकावर हॉटेलचे ब्रीदवाक्य आढळले–" हॉटेल्स खिश्चन परंपरेनुसार चालवायची तसेच त्यातले वातावरण घरगुती ठेवायचे हे मिशन हॉटेलच्या संघटनेच्या सभासदांचे उद्दिष्ट आहे."

आमचे मित्र शहाणी यांनी कोपनहॅगनमधल्या त्यांच्या परिचयाच्या डॉ. किलबर्ग यांना आम्ही तिकडे येत असल्याचे पत्र टाकले होते. डॉक्टरने त्या बाईंना फोन केला तेव्हा सहा वाजता येते असे त्या म्हणाल्या. त्याला बराच अवधी होता. म्हणून आम्ही हिंडायला बाहेर पडलो. एका मोठ्या रस्त्यावर शंभर पावले चाललो नि लैंगिक विषयावरच्या पुस्तकांचे दुकान दिसले. पोर्नोग्राफीविषयी स्कॅंडिनेव्हियन देशांत पूर्ण स्वातंत्र्य असल्याचे, तसेच त्याविषयी प्रदर्शन भरल्याचे मागे मी वाचले होते. दुकानात अल्पवयीन मुलांना प्रवेशबंदी होती. पण बाहेरची चित्रेच अशी होती की, आत शिरण्याची आवश्यकता नव्हती. या रस्त्यावरून शेकडो लोक जात होते. काही थांबत होते. त्यातले स्थानिक लोक थोडे, प्रवासी जास्त. दक्षिण भारतातल्या काही मंदिरांमधल्या चित्रांकडे जसे स्थानिक लोकांचे लक्ष नसते तसेच इथे.

सहा वाजता डॉ. किलबर्ग आल्या. डेन्मार्कमध्ये लवकर जेवणाची प्रथा असल्याने प्रथम त्यांनी आम्हाला एका चिनी उपाहारगृहात नेले. जेवण सुंदर पण महाग वाटले. नंतर बाईंनी मोटारीतून आम्हाला गाव दाखवायला नेले. टाऊन हॉल, नॅशनल म्युझिअम, पार्लमेंट यावरून आम्ही पॅलेसपाशी आलो. लंडनच्या बकिंगहॅम पॅलेसबाहेर ज्या गणवेशात सैनिक दिसतो अगदी तसाच इथला दिसला. 'आम्ही मोटर इथे ठेवून जरा हिंडून येऊ का?' बाईंनी त्याला विचारले. तो हसत 'नाही' म्हणाला. 'आपण गडबड करू असे त्याला वाटले असेल,' बाई मिस्किलपणे आम्हाला म्हणाल्या.

आता आम्ही कोपनहॅगनच्या मरीन ड्राइव्हसारख्या भागाकडे आलो. इकडेच मरमेडचा पुतळा आहे. कोपनहॅगनला आलेला प्रवासी हा पुतळा पाहिल्याशिवाय जात नाही असे त्या म्हणाल्या. संध्याकाळ होऊन आता हळूहळू दिवे लागू लागले. समोर बंदर होते. त्यात बोटी होत्या. दूरवरचा स्वीडनचा कोट दिव्यांच्या उजेडात अस्पष्ट दिसत होता. एक मोठी बोट तिकडून येत होती.

घरी आल्यावर कोणते लिक्यूर घेणार असे डॉ. किलबर्गनी मला विचारले.

'जीन, ब्रँडी, व्हिस्की, बीयर ही नावे मला ठाऊक आहेत. लिक्यूरची नाहीत,' मी त्यांना म्हणालो.

' मी तुला छान पोर्ट देते आणि एक मस्त छोटी सिगार,' त्या म्हणाल्या. या दोन्हींचा आस्वाद घेत आम्ही गप्पा मारत बसलो.

' कॅसल टुअर ऑफ नॉर्थ सी लँड ' ही सहल टाऊन हॉलपासून सुरू होते. दहाला बस आली. आजची गाइड होती सुमारे पन्नाशीची आणि शरीराने स्थूल. मात्र तिला अनेक भाषा येत होत्या. बसमधले सगळे प्रवासी इंग्रजी समजणारे आहेत असे पाहून ती म्हणाली की, आज बोलण्याचा ताण कमी होणार. थंड वारा असला तरी स्वच्छ उन्ह होते. पण यावरून कोपनहॅगनच्या हवामानाची कल्पना येत नाही. उन्ह, पाऊस, हिम, गार वारा याचा एका दिवसात अनुभव मिळतो असे गाईडने सांगितले. सुरुवातीला बस पूर्वीच्या प्रासादावरून गेली. त्याचे रूपांतर आता शाळेत झाले होते. डेन्मार्कमध्ये शिक्षण मोफत आहे. तसेच दहा क्रोनीज भरले की, कोणत्याही युरोपीय भाषेच्या वर्गात प्रवेश मिळतो. गावात सायकलींचा वापर फार दिसला.

आता बस बाल्टिक समुद्राच्या किनाऱ्याने निघाली. बाजूला बर्च झाडांची जंगले लागत होती. बराच वेळ या रस्त्यावर केवळ आमचीच बस धावत होती. आम्ही प्रथम थांबलो ते क्रोनबर्ग कॅसलपाशी. १५१८ मध्ये तो बांधण्यात आला. त्याच्यावर डच रेनेसन्सचीच छाप आहे. उन्ह चांगलेच असल्याने मी ओव्हरकोट न घेता बसबाहेर आलो. खंदकाजवळच्या दारापाशी उभा असताना थंड वाऱ्याची पहिली झुळूक आली. मग धारदार गार वारा सुरू झाला. थंडीची संवय असणारे लोकही शहारले. माझी काकडलेली स्थिती पाहून गाईड माहिती सांगताना थांबली नि हात पसरून म्हणाली, ' तू काकडत आहेस. ये, माझ्या कुशीत ये.'

' आलो असतो. पण माझी बायको पलीकडे आहे, ' असे मी म्हणताच बाकीचे प्रवासी हसले.

' तुझ्या बायकोने मला पाहिले आहे. ती काही म्हणणार नाही,' या तिच्या प्रत्युत्तरावर सर्वजण पुन्हा हसले नि आम्ही पुढे निघालो. वाटेत एक द्वारपाल भेटला. त्याच्या गालाचे चुंबन घेऊन आमच्याकडे पहात ती म्हणाली, ' याची बायको पलीकडेच आहे.'

१०१०४

राणीच्या ऑडिअन्स रूममधली टॅपिस्ट्रीज हॉलंडमधली असून सुंदर आहे. शेक्सपिअरच्या हॅमलेट नाटकात हॅमलेटची जी खोली दाखविली आहे ती या खोलीपलीकडची. तिच्या संबंधात गाइड म्हणाली, 'हॅमलेटची कथा फार प्राचीन आहे. सोळाव्या शतकात ही वास्तू उभी झाली. म्हणून हॅमलेटची खोली काल्पनिक आहे. परंतु शेक्सपिअरच्या नाटकाने जनमानसावर एवढा परिणाम केला आहे की, लोक इथे आल्यावर ती खोली कुठे आहे ते प्रथम विचारतात. इथला बँक्वेट हॉल खूप मोठा असून त्यातली चित्रेही लक्षणीय आहेत.

दुपारच्या भोजनासाठी थांबलो ते हेलबेक या छोट्या नि शांत गावात. तासाभरात दोन तीन मोटारी गेलेल्या दिसल्या. एका आलिशान हॉटेलात भोजनाची सोय होती. पण प्रत्येकी खर्च वीस एक रुपये असल्याने आम्ही जवळच्या पबमध्ये गेलो.

आता बस फेरेंस्बर्ग राजवाड्याच्या दिशेला धावू लागली. रस्ता दाट जंगलातून होता. पण त्यातली झाडे पर्णहीन होती. अर्थात वसंतऋतूची चाहूल लागली असल्याने काही झाडांना पालवी येत होती. अंतराअंतरावर छोटी घरे लागत. बहुतेक एक मजली नि पुढे बाग असलेली. वाटेत एक घर असे दिसले की त्याचे छप्पर जवळ जवळ जमिनीपाशी आले होते. राजवाडा बंद होता. तरीही थोडा वेळ थांबलो. इथे मोटार सायकलवरून आलेली मुली-मुले सायकलींगवरचे कसरतीचे खेळ करून लोकरंजन करीत होती.

फ्रेडेरिक्सबर्ग हा किल्ला चौथा ख्रिश्चन या डॅनिश राजाने बांधला. आता त्याचे रूपांतर म्युझियममध्ये झाले आहे. सुंदर टॅपिस्ट्रीज्, रंगीत चित्रे, सिलींग पेंटिंग्ज यांनी तो विशोभित आहे. इथल्या सभागृहात उभे असताना डेनीश लोकांना राजघराण्याविषयी का ममत्व वाटते हे सांगताना गाईड म्हणाली, 'आमचे राजघराणे लोकशाहीवृत्तीचे असून त्यांना प्रजेविषयी खरे प्रेम आहे. युद्धकाळात राजा-राणी सायकलवरून हिंडत. राणीचा एक भाऊ जर्मन सैन्यात होता. जर्मनीने डेन्मार्क जिंकल्यावर हा भाऊ तिला भेटायला आला. तेव्हा राणीने त्याला भेट नाकारली. 'भाऊ म्हणून भेटायला आलो आहे' असे तो म्हणाल्यावर, 'नागरी वेषात आलास म्हणजे भेटेन' असा राणीने निरोप पाठवला. ज्यू लोकांनी गळ्यात क्रॉस घालून हिंडले पाहिजे असा जर्मन अधिकाऱ्यांनी दंडक काढल्यावर राजाने जाहीर केले की, डेन्मार्कमध्ये प्रजेत भेदभाव करण्यात

येत नसल्याने राजघराण्यातील लोकही गळयात क्रॉस घालतील. आजही राजघराण्यातले लोक सामान्य लोकांसारखे डिपार्टमेन्ट स्टोअरमध्ये खरेदीला येतात, हिंडतात. राजाला भेटायचे असेल तर कोणालाही पाच मिनिटे भेट मिळते.

राजेशाही शासनातील राजघराण्याच्या वर्तनाची प्रजासत्ताकीय शासकांच्या वर्तनाची तुलना केली म्हणजे भारतीय सामाजिक जीवनात सभ्य वर्तनाच्या बाबतीत किती प्रगती व्हायला हवी आहे ते दिसते. या राजवाड्यातील कलाकुसरीच्या वस्तू पाहाताना तास केव्हाच संपला.

दिवस मावळायला बराच उशीर असल्याने सहल संपल्यावर गावात गेलो. वाटेत एक चर्च दिसले. म्हणून आत शिरलो. त्या चर्चेचा म्युझियम झाला होता. तळमजल्यावर आधुनिक चित्रकलेचे प्रदर्शन होते. दुसऱ्या मजल्यावर रॉयल नेव्हीचा म्युझियम होता. येथून आम्ही कॅनॅलवरच्या पुलाकडे आलो. दोन बोटी आल्या तेव्हा पूल दुभंगला नि त्याचे दोन्ही भाग उचलले गेले. बोटी गेल्यावर ते पूर्ववत जागी आले. इतके की, ट्रॅमच्या लोहमार्गाचे सांधेही बरोबर बसले नि त्यावरून ट्रॅम गेली. प्रवासी मोसमाला वेळ असल्याने रिव्होली उद्यानात रंगीत रोषणाई सुरू झाली नव्हती. परंतु त्याची तयारी झाली होती.

गावात येताना काही गोष्टींची नोंद घेतली नव्हती. ती आता विमानतळाकडे जाताना घेतली. जुनी घरे पाडून त्या जागी टोलेजंग इमारती बांधल्या जात होत्या. अर्थात काही ठिकाणी छोटी डॅनिश घरे टिकाव धरून होती. इथे सज्जांना प्रथम पडदे पाहिले. शिवाय पांढऱ्या नि लाल रंगाचा वापर अधिक दिसला. स्टॉकहोमला जाणारे विमान थोडे उशिरा सुटणार होते. विमानतळावर प्रवाशांची गर्दी असून त्यात जपानी अधिक होते. त्यांच्या सोयीसाठी जपानी भाषेत सूचना होत्या. ही गोष्ट इतर काही ठिकाणीही दिसली. देशाचे महत्त्व त्याच्या खऱ्या शक्तीमुळे वाढते. घोषवाक्यामुळे नाही !

विमानाने आकाशात झेप घेतली त्या वेळी उन्ह असूनही विलक्षण गारवा जाणवला. डाव्या हाताला शेतजमीन नि उजव्या हाताला समुद्र लागला. पण थोड्या वेळाने समुद्र दृष्टिआड गेला. काही वेळ विमान भूमीवरून गेले. त्या वेळी खाली विशाल सरोवरे दिसली. पुन्हा एकदा समुद्र आला. मग खाली निळे पाणी, वर निळे आकाश आणि क्षितिजापाशी पांढरे ढग असे दृश्य दिसले. काही वेळाने बेटे दिसू लागली. या बेटांची संख्या मोजलेली नाही असे विमानात

मिळालेल्या नकाशात म्हटले होते. यातली काही छोटी होती. जी मोठी होती त्यावर वस्ती आढळली.

आता शुभ्र मेघांची गर्दी होऊ लागली. त्यातून जाताना विमान हादरले. हे ढग पाठीमागे पडले. खाली मोठे बेट दिसले. त्यावर किल्ल्यासारखे काही तरी होते. नंतर चंद्रकोरीच्या आकाराची जमीन पाणी कापून खूप आत गेलेली आढळली. विमान उतरू लागले त्या सुमारास ढगांची गर्दी झाली. पण त्यातून ते बाहेर आले नि खाली शेते आणि आखीव रस्ते दिसू लागले. मग लाल रंगाची छोटी घरे नि मधूनच अनेक मजली इमारती नजरेत आल्या. रस्त्यावरून जाणारी मोटारींची रांग, नंतर एक मनोऱ्याचे चर्च नि दूरवर घनदाट झाडी-- विमान भूमीकडे झेपावत असताना दिसलेले स्टॉकहोमचे हे चित्र.

विमानतळाभोवती सुरूची झाडे खूप होती. तीच गोष्ट मोटारींची. बसने एअर टर्मिनलकडे निघालो. रस्ता मोठा असूनही तो विस्तृत केला जात होता. त्याच्याही कडेला सुरूची झाडे होती. डाव्या हाताला मोठे सरोवर दिसले. नंतर पर्णहीन झाडी लागली. पुन्हा एकदा सरोवर दिसले. या रस्त्यावर प्रथम मला पांढरे खकड आढळले. गावाची वेस जशी जवळ आली तशा उंच इमारती दिसू लागल्या.

हॉटेल हेमेट पेंशॉन असल्याने दर माफक होते. मात्र लिफ्ट चालू नसल्याने सामान चार मजले मला वर न्यावे लागले. काउंटरवरच्या बाईने घरून आलेले पत्र दिले. खुशाली कळल्यामुळे मन जरा हलके झाले. मग ॲमस्टरडॅममधल्या हॉटेलच्या बुकिंगशी चौकशी करायला सास कंपनीच्या कार्यालयात गेलो. प्रवाशांची गर्दी असल्याने तिथली हॉटेल्स भरली आहेत असे मला जेव्हा सांगण्यात आले तेव्हा प्रोव्हिजनल बुकिंग झालेले आहे तरी पुन्हा चौकशी करा अशी मी तिथल्या बाईला विनंती केली. तसेच ॲमस्टरडॅमला विमान रात्री जाणार असल्याने विमानात आम्हाला शाकाहारी भोजन मिळावे असे सांगितले. यावर बाईने सेल सर्व्हिस गाईड पाहून 'अंडी चालतील का?' असे विचारले. मी हो म्हटले आणि कुतूहल म्हणून ते गाईड चाळले. त्यात लिहिले होते—

(1) Recommended for religious Vegetarians — eggs.

(2) Recommended for idealistic Vegetarians–no eggs!

हेमेटमधल्या बाईने शाकाहारी उपाहारगृह म्हणून रोटुंडाचे नाव सांगितले

होते. त्याची जागा पाहून मग नगरसहलीच्या चौकशीला गेलो. बरेच चालावे लागले. पण स्वच्छ उन्ह, गार वारा, मोकळे वातावरण यामुळे थकवा वाटला नाही. इथेही काही रस्त्यांवर पार्नो पुस्तके विकणारी दुकाने होती. तिथे फार माणसे थांबत. एका दुकानाशी एक जोडपे थांबलेले दिसले. त्यांच्याबरोबर पाच-सात वर्षांची दोन मुले होती. सात वाजल्यापासूनच स्टॉकहोममध्ये शुकशुकाट होऊ लागतो. शिवाय बोचरे वारे सुरू होतात ते निराळेच.

माझे एक स्नेही श्री. जोशी यांनी मिसेस अनिता ग्रॅडीन यांना आम्ही स्टोक-होमला येत असल्याचे कळवले होते. सकाळी त्यांना दूरध्वनी केला. मिसेस ग्रॅडीन तिथल्या लोकसभेच्या सदस्य असून समाजवादी आहेत. दुपारी पार्लेमेंट चालू असल्याने त्या थोड्याच वेळात हेमेटवर आल्या. चहाबरोबर गप्पा झाल्या. भारतातील लोकसंख्येचा प्रश्न कसा सोडवला जात आहे याची त्यांनी माहिती विचारली. त्यावरून गर्भपाताचा प्रश्न निघाला. स्वीडनमध्ये गर्भपाताला अजूनही संपूर्ण स्वातंत्र्य नाही असे त्या म्हणाल्या. तेव्हा मी त्यांना म्हणाले, ' विमान-तळावर मिळालेल्या स्टॉकहोमच्या माहितीपत्रकात लैंगिक विषयासंबंधी पुस्तके विकणाऱ्या चार दुकानांची जाहिरात आहे, उलट चर्चमधल्या प्रार्थनाविषयी एकच आहे. लैंगिक विषयासंबंधी इतकं स्वातंत्र्य असताना हे कसे ? '

' लैंगिक विषयासंबंधी लोकांत अज्ञान असते. शिवाय बाहेर कारखान्यात मोकळेपणाने बोलणारा पुरुष खोलीत बायकोबरोबर मूकस्तंभ होतो. म्हणून असे स्वातंत्र्य नुकसानकारक नाही. त्या पुढे म्हणाल्या, ' इकडे बायकांसाठीही ब्ल्यू फिल्म्स तयार करण्याचा प्रयत्न झाला, पण त्यांना मागणी नव्हती. शिवाय लोकांनाही त्या विषयाचा उबग झाला असून हा धंदा मागे पडत आहे.' तरुण पिढीविषयी बोलताना त्यांनी सांगितले की, या पिढीला समाजवादी विचार-सरणीचे आकर्षण नाही. पण समाजपरिवर्तनासाठी क्रांतीशिवाय तिला पर्याय दिसत नाही. ही पिढी फार जागृत आणि अस्वस्थ आहे. तिचे वाचनही चौफेर असते. माझी मुलगी कादंबऱ्यांऐवजी शास्त्रीय पुस्तके वाचते.

डॉक्टरला स्टॉकहोमच्या हॉस्पिटलमध्ये जायचे होते नि मिसेस ग्रॅडीन यांना पार्लेमेंटमध्ये काम होते. तेव्हा त्या दोघी आपापल्या कामाला निघून गेल्या.

' अंडर द ब्रिजेस ऑफ स्टॉकहोम ' या जलसहलीसाठी ऑपेरा हाऊस-समोरच्या जलस्थानकावर आम्ही दुपारी तीनच्या सुमारास आलो. बोटीला

काचेच्या खिडक्या नि छप्पर होते. गाईड तरुण मुलगी होती. तिला चार भाषा येत होत्या. या सहलीत तिला जर्मन नि इंग्रजी भाषेत बोलावे लागले. ऑपेरा हाऊस, जुनी लोकसभा, राजवाडा, तेराव्या शतकातले चर्च, या इमारतींच्या बाजूने बोट पाण्यातल्या एका दारापाशी आली. मग ते उघडण्यात आले. बोट पुढे गेल्यावर ते बंद झाले. मग पुढचे दार उघडले, आणि बोट सरोवरात शिरली. पंधरा दिवसांपूर्वी हे सरोवर गोठलेले होते. आता त्याच्यातून जाताना डाव्या हाताला तुरळक झाडी होती नि उजव्या हाताला नवीन घरांची वस्ती. या सुमारास सीगल पक्ष्यांचा थवा आला. मग समोर एक उंच पूल लागला. जुन्या शहराला दक्षिण स्वीडनशी त्याने जोडले आहे. काही वेळाने पुन्हा वस्ती लागली. इथून युरोपियन हायवे क्रमांक ४ दिसला. हा मार्ग फिन्लंड नि पोर्तुगाल अशा भिन्न दिशांना जात असल्याचे गाईडने सांगितले.

आता छोट्या बोटींचे वार्फ आले. दोन्ही बाजूंला झाडी होती. त्याच्यातून लाल नि पांढऱ्या रंगांची लहान घरे दिसतात. ढगाळल्याने थंडी वाजू लागली. एक पूल ओलांडला नि अर्धवट बुडालेली बोट दिसली. यानंतर मद्याचे कारखाने लागले. इथले मद्यनिर्मितीचे कारखाने सरकारी अखत्यारीत आहेत. आता सरोवर खूप विस्तृत झाले. त्यात जलविहाराच्या चिकार होड्या होत्या. पलीकडे समर हौसेस होती. पुन्हा एक दरवाजा आला. तो ओलांडल्यावर बोटीने बाल्टिक समुद्रात प्रवेश केला. प्रचंड जोराचा वारा सुटून लाटा उसळू लागल्या. इथे मोठमोठ्या बोटी नांगर टाकून उभ्या होत्या. लांबवरच्या डोंगरउतरणीवर छोटी घरे नि माथ्यावर उंच इमारती दिसल्या. मार्गावरच वासा या बोटीचा म्युझियम लागतो. हे लढाऊ जहाज १६२८ मध्ये प्रवासाला निघताच बुडाले. सुमारे दहा वर्षांपूर्वी ते बाहेर काढण्यात आले. त्याच्यावरच्या म्युझियमची सहल असते. अंधार पडत असतानाच सहल संपली.

सकाळी मिसेस ग्रॅडीन यांना भेटायला आम्ही पार्लमेन्टवर आलो. त्यांनी लोकसभेची इमारत दाखवली. मग त्यांच्या कार्यालयात गेलो. इथे थोडा वेळ बसून डॉक्टर नगरसहलीला गेली. नंतर मिसेस ग्रॅडीन यांनी स्वीडिश समाजजीवनाची मला माहिती दिली. त्यांच्या मते सामान्यजन अजूनही सुखी झालेला नाही. समाजवादाची अंमलबजावणी नीट व्हावी म्हणून इथल्या करपद्धतीत बदल झालेला आहे. त्यामुळे डॉक्टर वगैरे धंदेवाईक लोक नाराज आहेत.

काही देश सोडून जात आहेत. पण सर्वांनाच परदेशात– अमेरिकेत– श्रेष्ठ स्थान मिळणार नाही. अर्थात असे काही लोक गेले तरी फारसे बिघडत नाही !

भारतीय समाजवादी चळवळीविषयी तिकडे फारशी माहिती नाही. युरोपमधली चळवळ त्यांना जवळची वाटते. आणि ते स्वाभाविक आहे. अर्थात इकडच्या समाजवादी चळवळीत पूर्वीचा जोम राहिलेला नाही. कदाचित शंभर वर्षांपूर्वी आखलेल्या समाजरचनेच्या मानचित्राप्रमाणे गोष्टी घडल्या नसल्याने पूर्वीचा उत्साह राहिलेला नसावा. अशी अडचण सर्व चळवळींना केव्हा ना केव्हा तरी भेडसावते. व्हिएतनाम युद्धाविषयी मात्र तरुणवर्गात प्रतिक्रिया तीव्र असून अमेरिकेविरुद्ध वातावरण आहे असे त्या म्हणाल्या. म्हणून भारतावरच्या चिनी आक्रमणाच्या वेळेला किंवा पूर्व बंगालमधील हत्याकांडाविषयी काय प्रतिक्रिया असेल असे मी विचारले. प्रश्नाचे उत्तर अपेक्षिणे व्यर्थ होते.

बराच वेळ झाल्याने मी उठलो. हॉटेलवर आलो. तेथून सामान घेऊन विमानतळाकडे आलो. साडेचारला विमान निघाले. सव्वा तासाने कोपेनहॅगन आले. इथे अर्धा तास थांबून पुढचा प्रवास सुरू झाला. ॲमूस्टरडॅमला उतरेपर्यंत दिवेलागणी झाली होती. बसने एअर टर्मिनलवर आलो. हॉटेल तसे जवळ होते. पण पाऊस पडत होता. टॅक्सी नव्हती. सुमारे तासभर तरी अर्धवट अंधार असलेल्या रस्त्यावर आम्ही काही प्रवासी उभे होतो. मग एकदम तीन चार टॅक्सी आल्या. हॉटेल सेंट्राल जरा महाग होते. मात्र बुटाला पॉलिश करण्याची साधने खोलीत होती. ही सोय प्रथम मिळाली. खोलीचा पडदा दूर केल्यावर ॲमूस्टरडॅमचा मोठा विभाग नजरेत येत होता. जवळच्या मुख्य रस्त्यावरून जाणाऱ्या ट्रॅमचा खडखडाट जुन्या गिरगावची आठवण करून देत होता.

## ॲम्स्टरडॅम नि ब्रसेल्स

परमेश्वराने जग निर्माण केले तर डचांनी नेदरलँडची निर्मिती केली ही म्हण हॉलंडमध्ये समुद्र हटवून भूमी संपादन करण्यात आल्याने प्रचारात आली. सहलीच्या सुरुवातीला म्युझियम ऑफ नेव्हिगेशन, २८ साली झालेल्या ऑलिंपिक्सचा विभाग, फ्रि युनिव्हर्सिटी हॉस्पिटल, अशा विभागांतून बस गेली. कनॅलच्या एका भागाकडे विपुल झाडी दिसते. हे मानवनिर्मित जंगल आहे असे गाईड म्हणाला. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या सामाजिक परिवर्तनात ॲम्स्टरडॅममधला स्लम विभाग संपला. त्या जागी अद्यतन इमारती बांधण्यात आल्या आहेत. या विभागातील शाळांतून श्रीमंत नि गरीब अशा दोन्ही थरांतील मुले शिक्षण घेतात.

हॉलंडमधल्या टुलिप वगैरे सुंदर फुलांना जगभर मागणी आहे. या फुलांचे घाऊक-व्यापार केन्द्र असलेल्या अल्समीरपाशी बसने पहिला विराम घेतला. फुलांच्या गाड्यांकडे लक्ष ठेवून चाला असे आत शिरताना गाईडने सांगितले. आतल्या गर्दीने गाईडच्या सूचनेचे महत्त्व आम्हाला पटले. या केन्द्राच्या हॉलमध्ये लाल, पिवळ्या, गुलाबी व निळ्या अशा भिन्न रंगांच्या फुलांचा सडा पडला होता. घाऊक व्यापार चालतो ती जागा ॲफीथिएटर-सारखी असून त्यात व्यापारी बसतात. खाली टेबलावर फुलांचे गुच्छ ठेवण्यात येतात. ज्याला दर योग्य वाटतो तो

व्यापारी बसल्या जागेवरून घंटी दाबतो. मग त्या व्यापाऱ्याच्या नावावर त्या फुलांची खरेदी चढते. नंतर फुले पेट्यांत भरून युरोप, अमेरिका, जपान इत्यादी देशांकडे त्या पेट्या रवाना होतात. वर्षानुवर्षे न वाळणारी काही फुले होती. त्यांचा एक गुच्छ आम्ही विकत घेतला.

येथून बाहेर पडलो आणि युरोपा हॉल, जपानी हॉटेल ओकुरा, शेलच्या भव्य इमारती, इत्यादींवरून आम्ही सतराव्या शतकातल्या विंडमीलपाशी आलो. एका उद्यानात ही विंडमील होती. तिच्या आतल्या तळमजल्यावर छोटे हॉटेल होते. त्यात कॉफी घेतल्यावर ही विंडमील कशी चालते ते पाहाण्यासाठी वर गेलो. तिच्या पहिल्या मजल्यावर राहाण्याची व्यवस्था होती. दुसऱ्या मजल्यावर विंडमीलची आतली चाके वगैरे होती. आता ही विंडमील फिरती नाही. पण या मजल्यावरून विंडमीलच्या उंचीची कल्पना येते. कॉफीसाठी ज्या कागदाच्या पिशवीतून साखर देण्यात आली तिच्यावर या विंडमीलचे सुंदर चित्र होते.

आता बस रॉयल पॅलेस, नॅशनल मॉन्यूमेंट, सेंट निकोलस चर्चकडून टॉवर ऑफ टिअर्सपाशी आली. तीनशे वर्षांपूर्वी पूर्वेकडच्या देशांकडे जाणारी जहाजे इथून निघत. त्यावर काम करणाऱ्या खलाशांना या धक्क्यावर त्यांची कुटुंबीय मंडळी साश्रूनयनाने निरोप देत. म्हणून त्याला 'टॉवर ऑफ टिअर्स' असे नाव मिळाले. जागा तशी लहान आहे. आता तेथून फक्त छोट्या जहाजांची वाहतूक होते. हेन्री हडसन 'हाफ मून' या गलबतावरून जगप्रवासाला या धक्क्यावरून निघाला. जवळच अँथनी गेट आहे. हा ज्यू लोकांचा विभाग. त्याला न्यू जेरूसलेम हे नाव होते. इथले ज्यू मंदिर अकराव्या शतकातले आहे. स्पेन आणि पोर्तुगाल या देशांत ज्यू लोकांवर अत्याचार झाल्याने ते लोक ॲमस्टर-डॅमला आश्रयासाठी आले. व्यापारात त्यांचा हातखंडा असल्याने या गावाला व्यापारी भरभराट आली. ज्यू लोकांनी स्वतःबरोबर अनेक कला आणल्या. त्यांपैकी एक हिरे बनविण्याची. त्यांचे इथे अनेक कारखाने आहेत.

शोलशुजेन स्टोलटाय या सतराव्या शतकातल्या हिऱ्याच्या कारखान्याकडे आम्ही आलो. हिरा कसा कापतात, त्याला कसा आकार देतात, त्याची किंमत कशी ठरवतात, इत्यादी गोष्टी आपल्याला इथे पाहण्यास मिळतात. आम्ही आलो तेव्हा कारखान्याच्या बाहेर लोक क्यू करून उभे होते. आम्हांला दुसऱ्या दरवाजाने आत नेण्यात आले. कोपऱ्यात एक इसम डोळ्याला भिंग लावून

काम करत होता. ‘ शांतता ठेवा. कल्पक माणूस काम करत आहे, ’ अशी त्याच्या टेबलावर सूचना होती. काही क्षणांनंतर दुसरा कारागीर आला. त्याने कारखान्याच्या लहान विभागातून हिंडवून हिरा कसा तयार होतो त्याचे प्रात्यक्षिक दाखवले. नंतर वरच्या मजल्यावरच्या विक्री-केन्द्रात आम्हाला त्याने नेले. इथे हिऱ्याच्या वस्तू पाहाण्यासाठी बाहेर काढून ठेवल्यावर तो कारागीर म्हणाला की, हिऱ्याची आंगठी कोणी बोटात घालून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला तर त्याला अडवण्यात येणार नाही, फक्त त्याचे एक बोट कमी झालेले असेल. हिऱ्याच्या वस्तू पाहाण्याचा उत्साह सुरुवातीला सर्वांनी दाखवला. मग पुरुष मंडळी बाजूला झाली नि सिगरेट ओढत उभी राहिली. काही बायकांची हौस बराच वेळ टिकली. मात्र दागिने घेणाऱ्या दोघीच निघाल्या.

बाहेर आलो तेव्हा झिमझिम पाऊस पडत होता. जवळच्या कनॅलमध्ये एका छोट्या नौकेवर हिप्पी संप्रदायी लोक गिटारवर गाणी वाजवत होते. आता आम्ही नॅशनल म्युझियमकडे आलो. बाहेर तरुण होतकरू चित्रकार बसले होते. हौशी प्रवाशाला अर्ध्या तासाच्या अवधीत नि अल्प किंमतीत त्याचे चित्र काढून देत होते. रेनेसन्सच्या उद्‌भवानंतर या प्रदेशात चित्रकलेचा विलक्षण आविष्कार झाला. त्याचे जतन निरनिराळ्या म्युझियममध्ये केले आहे. या म्युझियममधली डोळ्यांत भरलेली पुढील चित्रे : पिटर रूडॉल्फ क्राईनचे एक लँडस्केप, व्हँडेव्हेल्डचे खवळलेल्या समुद्रातील बोट नि ॲम्स्टरडॅमचे बंदर ( हे चित्र भिंतीएवढे आहे ). निकोलस मासचे पंधरा फूट उंचीचे वुमन सेईंग ग्रेस ( या चित्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्यातील बाईकडे कोणत्याही बाजूने पाहिले तरी ती आपल्याकडे पाहात आहे असे वाटते ), आणि रेंब्रॉची होली फॅमिली, पिटर्ज, डिनायल ज्युइश ब्राईड, नि नाईट वॉच.

चारच्या सुमारास बाहेर पडलो. बहुतेक दुकाने बंद झाली होती. एका दुकानात एक इसम काम करत होता. परंतु दुकान बंद असल्याची पाटी बाहेर होती. इथे मी उभा असताना एक वृद्ध गृहस्थ आला नि का उभा आहेस असे मला त्याने विचारले. ब्रेड नि चीझ मिळाले तर पाहातोय असे मी त्याला सांगितले. तेव्हा त्या गृहस्थाने दुकानाचे दार ठोठावले. पण आतल्या इसमाने लक्ष दिले नाही. दुकानापासली गडबड पाहून वरच्या मजल्यावरच्या बाईने दुकान बंद असल्याचे सांगितले. तेव्हा तो वृद्ध गृहस्थ थोडा चिडला आणि

आम्हाला पुढच्या रस्त्याला घेऊन गेला. तिथल्या दुकानदाराकडून हव्या असणाऱ्या वस्तू घेऊन दिल्यावर जाताना तो मला म्हणाला की, परदेशात मदत करणारी थोडी तरी माणसे असतात असे आपल्या लोकांना सांगा.

रात्री साडेआठच्या सुमाराला कँडललाईट क्रूजसाठी आम्हाला टॅक्सीने जलस्थानकाकडे नेण्यात आले. पहिली बोट प्रवाशांनी भरल्याने दुसरीत बसलो. तीही चटकन भरली. अगदी शेवटच्या क्षणी कंबरेखाली अपंग झालेली बाई आली. अशा विकलांग स्थितीत ती प्रवास करत होती. शिकलेली होती. तसेच तिला मुलेबाळेही होती. बोटीच्या आत येताना मी थोडी मदत केली. माझे आभार मानताना ती म्हणाली की, अमेरिकेतील काही भारतीयांशी माझा परिचय आहे. भारतीय लोक चांगले असतात !

आजची गाईड वीस-बावीस वर्षांची देखणी मुलगी होती. तिला तीन-चार भाषा येत होत्या. बोट सुरू होताच प्रथम तिने मद्य आणले. डॉक्टरने ऑरेंज ज्यूस मागितला तेव्हा ती म्हणाली, ‘ गेल्या वर्षी मी कराचीपर्यंत आले होते. तुम्ही भारतीय लोक मद्य पीत नाही याची मला कल्पना आहे. ’

‘ मद्यबंदी नि मद्यपान यात आपण फरक करा, ’ मी तिला हसत सुचविले.

बोटीला काचेच्या खिडक्या नि छप्पर होते. आत मेणबत्त्यांचे दिवे होते. मंद सुरांत पाश्चात्त्य संगीत वाजत होते. मद्याबरोबर रुचकर डच चीझ नि दाणे दिले होते. प्रवासी हंगाम सुरू झाला की, सगळ्या पुलावर दिवे लावून रोषणाई करण्यात येते. त्याला अजून आठवड्याचा अवधी असल्याने काही पुलांवर दिवे होते.

चार पाच छोटे पूल ओलांडल्यावर ॲमस्टर नदी नि तिच्यावरचा सेतू लागला. त्यावर रोषणाई होती. त्यानंतर लॉ मेजरचे घर लागले. लॉ मेजर ही काय गोष्ट आहे कोणास ठाऊक ! •त्यानंतर दोन सारखी घरे लागली. त्यांना ट्विन सिस्टर्स हे नाव आहे. यानंतर बोट प्रिन्स कॅनॅलमध्ये शिरली. तिथे सलग दहा बारा हाऊस बोटी होत्या. त्यात विजेचे दिवे, रेडिओ, टेलिव्हिजन या सुखसोई दिसल्या. मग मोठे चर्च लागले. आता पाऊस पडू लागला. त्यामुळे बाहेरचे दिसेनासे झाले. या वेळी बोट जुन्या वस्तीच्या भागाकडून जात असावी. कारण दिव्यांचा उजेड कमी झाला.

सुमारे वीस एक पुलांखालून गेल्यावर एक मोठा पूल आला. आता आमची

बोट बरीच जोरात हलू लागली. हार्बर बिल्डिंग पाठीमागे पडल्यावर बोट मोठ्या जलाशयावर आली. रॉटरडॅम हे हॉलंडमधले पहिल्या क्रमांकाचे बंदर तर ॲमस्टरडॅम दुसऱ्या क्रमांकाचे. या बंदरात वर्षभरात ९,००० जहाजे येतात. साडे अकराला सहल संपली. पाऊस जोरात आला. कोणी कोणत्या बसमध्ये बसायचे याविषयी गोंधळ झाला. शेवटी पार्क हॉटेलवर जाणारी बस मिळाली. तेथून चालत आमच्या हॉटेलवर आलो. सहलीला नेताना ज्या सोयी असतात त्या परत येताना मिळतीलच असे नाही !

सकाळी न्याहारीला पांढरा ब्रेड नव्हता. शिवाय वेटरही एकच होता. त्याने रायब्रेड आणून ठेवला. न्याहारी संपण्याच्या सुमाराला पांढरा ब्रेड आला. पण आम्हाला विमान पकडण्याची घाई होती. दहाच्या सुमारास विमान सुटले. धावपट्टी सोडून बाकीचे हिरवेगार वन होते. पाऊस गेला होता. विमान वर चढले नि खाली हिरवी शेती, शानदार, चिमुकली घरे असे फ्लेमीश चित्रकाराने काढलेले चित्र असावे असे दृश्य दिसले. थोड्या वेळाने ढगांची गर्दी झाली. विमान खूप हलू लागल्याने पट्टा बांधा अशी सूचना झळकली. ब्रसेल्स जवळ येताच ढगाचे आवरण फारच झाले. सुमारे दहा मिनिटे काही दिसेना. विमान उतरू लागले तसे ढग वरती राहिले. गाववस्ती दिसू लागली. मागच्याप्रमाणेच आखीव शेती, टुमदार घरे, लोहमार्ग, मोटारींच्या रांगा नजरेत आल्या. सुमारे पस्तीस मिनिटांत ब्रसेल्स आले.

लाउंजमधली रिडर डायजेस्टची जाहिरात अभिनव प्रकारची होती. या मासिकाचे १३ भाषेत अंक निघतात नि त्याच्या २८ दश लक्ष प्रती खपतात. ही माहिती पृथ्वीचा मोठा गोल दाखवून दिली होती. दुसरीकडे एका फलकावर बेल्जमची माहिती होती— लोकसंख्या ९६,६००००, प्रत्येक चौरस मैलाला ८४० लोकवस्ती, प्रत्येक माणसामागे १६५० सिगरेट, २०० पाईंट बीअर, नि १५० पाईंट दूध असा खप आहे. सायकल चालवणे, फुटबॉल खेळणे, नि उत्तम कबुतरांची निर्मिती करणे हे राष्ट्रीय खेळ. हवा समशीतोष्ण.. वर्षातल्या २२० दिवस झिमझिम पाऊस पडतो.

सामान संध्याकाळी पॅरिसला मिळणार होते. दिवस मोकळा होता. तेव्हा आम्ही ब्रसेल्स शहरातून एक चक्कर टाकायचे ठरवले. जवळच आगगाडीचे स्थानक होते. सुरुवातीला काही वेळ गाडी भुयारीत असते. मग वर येते.

ब्रसेल्सला वीस वर्षांपूर्वी मी आलो होतो. तेव्हा गावाचे थोडे स्मरण होते. सुरुवातीला आम्ही मॅन्शन डू रॉय, हॉटेल ड व्हिले, स्टॉक एक्स्चेंज या प्रसिद्ध वास्तू पाहून चर्चकडे आलो. दुरुस्ती चालली असल्याने त्याचे प्रवेशद्वार बंद होते. बाजूच्या दरवाजाने आत गेलो. चर्च भव्य आहे. पण दोन चार प्रवाशां-शिवाय आत कोणीच नव्हते. चर्चमधून बाहेर पडून म्युझियमकडे आलो. म्युझियम लहान आहे. पण त्यातली चित्रे मनोज्ञ आहेत. उदाहरण म्हणून रूबेन्सच्या ' ल अडोरेशन द मॅगी ' या सुमारे पंधरा फूट उंचीच्या चित्राचा मी उल्लेख करीन.

म्युझियमकडून मॉन्युमेंटकडे आलो. पहिल्या महायुद्धात जे सैनिक कामास आले त्यांच्या स्मरणार्थ हा स्तंभ उभारलेला आहे. इथे उभे राहिले की, ब्रसेल्सचे सम्यक चिन्ह दिसते. संध्याकाळ होऊ लागल्याने एअर टर्मिनलकडे आलो. तेथून भुयारीने विमानतळ.

साडेसातला विमान सुटले. आकाशात काळे ढग होते. त्यांमधून मावळत्या सूर्याची लाल किरणे विमानाच्या खिडकीतून गर्दीने आत येऊ लागली. पण थोडा वेळच. पुन्हा ढगांचा जोराचा लोंढा आला नि त्यात विमान गुडूप झाले. त्यातून काही क्षणाने ते वर चढले. आता खाली पांढरी जमीन असावी असा भास होऊ लागला. पण हे ढगही मागे पडले. आता छोटी गावे दिसू लागली. दूरवर दिव्यांचा लखलखाट दिसला. पॅरिसचा ऑर्ली विमानतळ आला होता. युरोपमध्ये इंग्रजी बोलणारे बरेच भेटतात. त्यामानाने फ्रान्समध्ये कमी, त्यामुळे काय त्रेधा होते याची कल्पना अनुभवाशिवाय येणार नाही.

प्रवास सुरू झाल्यापासून प्रथम आम्ही परदेशी माणसाच्या घरी उतरणार होतो. आमचे मित्र शहाणी यांच्या परिचयाच्या बाईकडे राहाण्याची व्यवस्था झाली होती. आम्हाला याविषयी पुढील सूचना होत्या. ' टॅक्सीने त्या घरी यायचे. घराची घंटा वाजवायची नाही. घराची किल्ली हाऊसकिपरकडून घ्यायची. मुक्काम संपला की, तिच्याकडेच किल्ली परत करायची. टॅक्सी केल्यावर टॅक्सीवाल्याला कुठे जायचे आहे तो पत्ता दाखवला. त्याने फक्त पाहिल्यासारखा केला. शंका वाटली म्हणून पुन्हा दाखवला. त्याचा त्याला राग आला. काही न बोलता त्याने गल्ल्याबोळांतून हिंडवत मिसेस हरडेल यांच्या घराशी आम्हाला आणून सोडले. रस्ता चिंचोळा होता नि उजेड माफक होता.

सामान घेऊन घराच्या लोखंडी दरवाजापाशी आलो. तो बंद होता. धक्का दिला तरी तो उघडेना. घंटा न वाजवण्याची सूचना होती. आता काय करायचे? एव्हढ्यात एक वयस्क इसम आला. त्याने जवळच्या पोस्टाच्या पेटीत पत्र टाकले. आम्हाला सामानासह पाहून आम्ही तिथे उतरणार आहोत हे त्याने हेरले नि खुणेने घंटा दाबण्याची सूचना केली. मी त्याला हातातले पत्र दाखवत 'नाही' म्हणालो. तो काय समजला कोणास ठाऊक? त्याने स्वतःच घंटा दाबली. आणि काय? दरवाजा उघडला. आम्ही आत गेल्यावर तो बंद झाला. आम्ही अंधारात उभे होतो. जवळच्या खोलीत कोणी टाइपरायटरवर काम करत होता. दिवसभर उपजीविकेचे काम करून रात्री साहित्य-निर्मिती करणारा होतकरू बाल्झॅक असावा तो! त्याच्या दारावर टकटक केले तेव्हा तो ओरडला.

हॉटेलात गेलो असतो तर ही विचित्र परिस्थिती आली नसती असे चडफडत स्वतःशी म्हणत असताना जिन्यावरून दोन तरुण नि तरुणी खाली उतरल्या. त्यांना विचारले. पण त्यांना भाषा समजेना. या सुमारास एक मध्यमवयीन बाई आली. तिच्याशी हे तरुण बोलले. मग माझ्याकडे वळून त्या बाईने पृच्छा केली, 'तुला इंग्रजी येते?'

'तीच भाषा फक्त मला येते,' मी उत्तरलो. छान! असा उद्गार काढून ती म्हणाली, 'मिसेस हरडेल खाली राहातात. रविवार असल्याने हाऊसकिपरला रजा आहे. बाराच्या सुमारास ती येईल. तोपर्यंत तुम्हाला थांबायला हवे.' हे सांगून ती बाई लिफ्टने वर गेली नि ती मुले बाहेर गेली. जिन्याच्या पायऱ्यांवर अंधारात आम्ही हाऊसकिपरची वाट पाहात बसलो.

थोड्या वेळानंतर ती आली. मी निःश्वास सोडून तिच्याकडे किल्ली मागितली. त्यावर ती म्हणाली, 'किल्ली नाही.' तेव्हा मी पत्र दाखवले. मग तिच्याबरोबरचा पुरुष खोलीत गेला. त्याने तपास केला. आणि बाहेर येऊन तो म्हणाला, 'किल्ली ठेवलेली नाही.' 'आला का पुन्हा प्रश्न!' असे मी डॉक्टरला म्हणत असतानाच त्या हाऊसकिपरला मिसेस हरडेल यांच्या घरात पावलांचा आवाज आला. म्हणून तो पुरुष दरवाजापाशी गेला. आणि त्याने त्याला कान लावला. मग काही क्षण ती दोघे आपसात बोलली. माझी एक सिगरेट संपली. क्षण युगाचा वाटू लागला. इतक्यात त्या हाउसकिपरला काय वाटले कोणास ठाऊक तिने घंटा दाबली.

दरवाजा उघडला. मिसेस हरडेल दारात उभी होती. डॉक्टरकडे पाहात म्हणाली, ' डॉ. जोगळेकर ! दोन तास मी तुझी वाट पाहात आहे. '

' गेले दोन तास आम्ही बाहेर उभे आहोत. घंटा वाजवायची नाही नि किल्ली हाऊसकिपरकडून घ्यायची अशी तुमची सूचना होती. '

' मुंबईला पत्र पाठवल्यावर माझ्या लक्षात आले की, हाऊसकिपर सुट्टीवर असेल. म्हणून मी थांबले. प्रवासात तुम्हाला कळवणं शक्य नव्हतं. तुम्हाला थोडा त्रास झाला. चला घरात. जेवणार ना ? '

' विमानात जेवण झाले आहे. आता उशीवर डोके टेकायचे बाकी आहे. '

बिछान्यात पडलो होतो. आज मिसेस हरडेल घरात नसती आणि हाऊसकिपरकडे किल्ली मिळाली नसती तर रात्री बारा वाजता पॅरिसच्या रस्त्यावर आपण काय केले असते ? झोप उडवणारा प्रश्न होता.

▭

# पॅरीस

पॅरीसला काय पाहावे असे मला कोणी विचारले तर त्याला लूव्हेला जा असे मी सांगेन. लूव्हेवरून मला ट्रॉटस्कीची गोष्ट आठवली. सैबेरियातून पळाल्यावर तो पॅरीसला आला होता. इथे त्याच्या मैत्रिणीने त्याला एक दिवशी लूव्हेमध्ये नेले. पण या काळात ट्रॉटस्की हा पेटलेला तरुण होता. त्यामुळे लूव्हेमधून हिंडताना तो कंटाळला. मात्र कलेचे महत्त्व नि तिच्यापासून मिळणारा आनंद यांची त्याला पुढील आयुष्यात कल्पना आली आणि मग पक्षाच्या बैठकींना हजर राहण्यासाठी लंडन, पॅरीस, म्युनिक वगैरे शहरांत जेव्हा तो येत असे तेव्हा वेळात वेळ काढून तो लूव्हे, टेट गॅलरी अशा चित्रशाळांना न चुकता भेट देत असे. या कथेचे तात्पर्य इतकेच की, जो कोणी पेटलेला नसेल त्याने अशा सांस्कृतिक केंद्रांना अवश्य भेट द्यावी.

आम्ही भुयारीने लूव्हे स्थानकावर आलो. बाहेर झिमझिम पाऊस पडत होता. क्षणभर कोणत्या दिशेला जायचे याची मनात शंका आली. परंतु थोड्या अंतरावर एक मोठी इमारत दिसली. म्हणून तिकडे गेलो. बाहेर खूप गर्दी होती. लूव्हे उघडायला थोडा वेळ होता. आम्ही तिकिटे काढली नि दरवाजे उघडताच आत गेलो. जवळ जवळ संध्याकाळपर्यंत तिथे होतो. तरीही पाहिले ते घाईतच.

रोम, ग्रीस, इजिप्त वगैरे देशांतल्या शिल्पकलेच्या सुंदर कृती विभागवार इथे ठेवल्या आहेत. तसाच विभाग

टॅपिस्ट्रीचा आहे. पण डोळ्यात भरतो नि लक्षात राहातो तो विभाग चित्रकलेचा. गेल्या चारशे-पाचशे वर्षांत युरोपीय चित्रकलेचा जो अफाट आविष्कार झाला. त्याचे सर्वोत्कृष्ट नमुने इथे संग्रहीत केलेले आहेत. बोटोसेली, लिओनार्डो, टिशिअन, रॅफेल हे इटालियन चित्रकार; एल ग्रेको, रिबेरा, व्हॅलाक्वेझ हे स्पॅनिश चित्रकार; रूबेन्स, रेब्राँ, जॉर्डन, व्हॅन डाईक, डेव्हिड हे डच चित्रकार— या सर्वांच्या श्रेष्ठ कलाकृती इथे आहेत. मानवी प्रतिभा किती विलक्षण असते आणि मानवी हात किती हळुवार नि कुशल असतो याचे ही चित्रे पुरावे आहेत. पुन्हा पुन्हा चित्रे पाहाण्यास यावे अशी ही चित्रशाळा आहे.

चारच्या सुमारास आम्ही बाहेर आलो. लूव्हंपासून ते आर्च द ट्रायंफपर्यंत अगदी सरळ असा राजमार्ग आहे. इथून समोर पाहिले की प्लास द ला कंकॉर्डमधली क्लिओपाट्रा निडल नि तिच्या पलीकडे आर्च द ट्रायंफ दिसतात. ट्युलेरिझ उद्यानातून चालत आपण प्रथम कंकॉर्डकडे येतो. पंधराव्या लुईच्या कारकीर्दीत गेब्रिअलने या विशाल चौकाची आखणी केली. मध्यभागी लुईचा पुतळा होता. तो फ्रेंच राज्यक्रान्तीत उखडण्यात आला नि त्या ठिकाणी अश्वारूढ गिलोटीन आले. त्याच्यावर सोळावा लुई, मेरी ॲन्टोनेट वगैरे एकंदर ६,००० लोकांचा वध झाला. या काळात या जागेला प्लास द ला रेव्होल्यूशन हे नाव होते. ते पुढे बदलून कंकॉर्ड ठेवण्यात आले. मध्यभागी क्लिओपाट्रा निडल आहे. तिची उंची तेवीस मीटर असून पाषाणाचा रंग गुलाबी आहे. चौतीस शतकाची ही प्राचीन वस्तू इजिप्तच्या महंमद अलीने फ्रान्सला भेट म्हणून दिली. ऑक्टोबर १८३६ मध्ये ती इथे उभी करण्यात आली.

येथून शाँझ एलेजे हे रम्य उपवन सुरू होते. त्यातून चालत पुढे गेले की, दुकाने, चित्रपटगृहे लागतात. रस्त्याच्या शेवटी आर्च द ट्रायंफ आहे. नेपोलिअनच्या आदेशावरून आर्किटेक्ट शालग्रीनने ही विजयाची कमान बांधली. ती ४९ मीटर उंच नि ४५ मीटर रुंद आहे. खाली मध्यभागी अज्ञात सैनिकांचे स्मारक म्हणून एक पेटती ज्योत आहे.

काल एटवाल स्थानकापासून आयफेल टॉवर जवळ दिसले. म्हणून भुयारीने तिकडे आलो. पण प्रत्यक्षात खूप पायपीट करावी लागली. सीन नदीकडे येऊन तिच्या बाजूने थोडे चालल्यावर उजव्या हाताला अर्धवर्तुळाकृती संगमरवरी भव्य इमारत लागली. तिच्यासमोरच्या पुलावरून आम्ही आयफेल टॉवरकडे

आलो. लिफ्ट सुरू झाले नव्हते. लोकांनी तिकिटांसाठी रांग धरली होती. थंडी खूप होती. थोडे ढगाळलेले होते. शिवाय काल रात्री पाऊस पडला होता. तिकिटे मिळाल्यानंतर आम्ही लिफ्टमध्ये शिरलो. ते वर जाऊ लागताच काही बायकांनी भेदरल्याचे आवाज काढले. थोड्या वेळात लिफ्ट पहिल्या मजल्यावर आले. तेथून पुढच्या मजल्यावर जायला दुसरे लिफ्ट होते. टॉवर पोलादाचे आहे. त्याची उंची ३०० मीटर असून ते जानेवारी १८८७ मध्ये उभारण्यात आले. त्याच्या प्लॅटफॉर्मवरून सगळे पॅरीस दिसते.

खाली उतरल्यावर एका पोलिसाकडे जवळच्या भुयारी स्थानकाची चौकशी केली. त्याने बीर हकीमकडे जाण्यास सांगितले. तिथून ॲन्व्हर्स स्थानकाकडे आलो. मग बाहेर येऊन लहान बोळाने 'साक्रेस द मॉन मात्र' या चर्चकडे आलो. सुमारे शंभर वर्षांपूर्वी ते बांधण्यात आले. डोंगराच्या माथ्यावर असून ते बांधण्यासाठी संगमरवरी दगडाचा उपयोग करण्यात आला आहे. इथे फ्युनिक्युलर गाडी आहे. वर जाण्यासाठी ४० नि खाली उतरण्यासाठी २० सेंटिमे भाडे आहे. फ्युनिक्युलरने आम्ही वर गेलो. अर्थात पायी जाणाऱ्यांसाठी दगडी पायऱ्यांच्या तीन वाटा आहेत. चर्च प्रेक्षणीय वाटले. त्याच्या उद्यानातील बाकांचा नि एकांताचा उपयोग प्रार्थनेशिवाय आणखीही कशासाठी होऊ शकतो !

भुयारीने शॅटलेट स्थानकाकडे येऊन मग सीन नदीकडे आलो. वीस वर्षांपूर्वीच्या प्रवासाचे क्षण आठवले. नदीकाठच्या रस्त्यावर दोन्ही बाजूला पुस्तकांची दुकाने दिसली. त्याच्या पलीकडे फुलांच्या घाऊक व्यापाराची जागा आहे. तिथे किती तरी प्रकारची फुले होती. येथून नॉत्रदाम चर्चकडे आलो. कॉलेजात असताना हंचबॅक ऑफ नॉत्रदाम हा चित्रपट पाहिल्यापासून हे नाव लक्षात आहे. बाराव्या शतकात मॉरीस द सुलीने हे चर्च बांधण्यास सुरुवात केली. दोनशे वर्षांनी ते काम पुरे झाले. आज शाळकरी मुलांची चर्चमध्ये गर्दी होती. शिवाय हौशी प्रवासी होतेच. प्रवेशद्वारापाशी एक जोगीण मेणबत्ती लावलेले तबक हातात घेऊन उभी होती. येणारे जाणारे त्यात दान टाकत होते. जवळच हॉटेल द व्हिले आहे. त्याच्या दर्शनीय भागावर द गॉलचा संदेश कोरलेला असून अगदी वरती फ्रेंच राज्यक्रांतीतील 'स्वातंत्र्य, समता नि बंधुभाव' हे घोषवाक्य आहे.

रात्री फॉली बर्जेरच्या खेळाला गेलो. सुरुवातीला नाट्यगृहाचा रस्ता सापडेना. एकदोघांना विचारले. पण ते काय म्हणाले ते समजले नाही. मग पोलीस दिसला. त्याला रस्ता विचारला. त्याने तो दाखवला. तिकिटांसाठी प्रेक्षकांनी अफाट गर्दी केली होती. प्रवेशद्वारापासचा हॉल मोठा आहे. त्यात लाल गालीचे असून वर झुंबरे होती नि दिव्यांचा लखलखाट होता. तरुणांपासून ते म्हाताऱ्यांपर्यंत सर्व वयाचे लोक प्रेक्षकांत होते. गॅलरीकडे जाणाऱ्या जिन्यावर मार्गदर्शनासाठी भपकेदार कपड्यांतल्या मुली उभ्या होत्या. दरवाजापासल्या बाईने आम्हाला आसनांकडे नेले. खुर्चीत बसत असताना तिने सूचना केली ' महाशय, टीप द्यायला विसरू नका. '

खेळ सुमारे साडेतीन तासांचा होता. त्याची सुरुवात ऑर्केस्ट्राच्या प्रचंड वाद्-नाने झाली. मग छतापासून तीन पिंजरे पाळण्यासारखे खाली आले.त्यात वस्त्रहीन सुंदरी होत्या. रंगमंचावर वस्त्रहीन काही प्रकार झाल्यावर इतर खेळ नि प्रयोग झाले. त्यातले काही शक्तीचे, काही युक्तीचे नि काही जादूचे होते. पेटत्या सळई-खालून कमान करून जाण्याचा प्रयोग फारच छान झाला. प्रत्येक वेळेला सळई खाली आणण्यात येई. शेवटी दीड दोन फूट उंच राहिली असावी. जमिनीला पाठीचा स्पर्श न होता नृत्यकाराने आपले अंग पेटत्या सळईखालून काढले तेव्हा प्रेक्षकांनी टाळ्यांचा गजर केला. एका बाईने गाण्याच्या नकला केल्या. तिचा आवाज छान होता. सहा वर्षांची मुलगी अंगविक्षेप करून गाणे कसे म्हणेल ते तिने प्रथम दाखवले. मग तरुण स्त्री कसे गाणे म्हणेल ते दाखवले. शेवटी फ्रँक सिनात्र्याची नक्कल तिने केली. हे सर्व प्रकार प्रेक्षकांना फार आवडले.

व्हर्साइल्सला जाण्यासासाठी ऑपेराकडे आलो. कोपऱ्यावरच्या पोलिसाकडे रू ऑबेर कुठे आहे त्याची चौकशी केली. त्याने नुसते समोर बोट केले. त्या रस्त्यावर पॅरीस ट्रॅव्हल सर्व्हिसचे कार्यालय होते. इथल्या बसने शाँझ एलेजेपाशी आलो. तिथे निरनिराळ्या सहलींसाठी बसेस उभ्या होत्या. आम्ही व्हर्साइल्सकडे जाणाऱ्या बसमध्ये जाऊन बसलो.

पॅरीसपासून बारा मैलांवर व्हर्साइल्सचा प्रासाद आहे. तो चौदाव्या लुईने बांधला. त्याचा वास्तुशिल्पी मॉसॉ. फ्रेंच राज्यक्रांतीत सोळाव्या लुईला येथून पॅरीसला नेण्यात आले. पहिल्या महायुद्धाच्या तहावरच्या सह्या याच राजवाड्यात झाल्या. कॅंकॉर्ड मॉडार्न म्युझियम, आयफल टॉवर, न्यू रेडियो सेंटर वगैरे

भागांतून बस नॉर्मंडी, ब्रिटानी या भागाकडे आली. वाटेवर छोट्या वस्त्या लागल्या. थोड्या वेळाने बस राजमार्गावर आली. हिरवीगार वनश्री, नि दाट झाडी यातून हा मार्ग जात होता. पॅरीसच्या गडबडीला कंटाळलेले सधन लोक किंवा निवृत्त झालेले लोक व्हर्साइल्सला राहातात. प्रासादाकडे जाणारा रस्ता अजूनही दगडीच आहे. राजवाडा थोड्या उंचावर असून त्याच्या भोवती लोखंडी कुंपण आहे. पटांगणात समोर चौदाव्या लुईचा अश्वारूढ पुतळा आहे. चौदावा, पंधरावा, सोळावा नि एकोणिसावा लुई या राजांनी या प्रसादात निवास केला होता.

आतल्या कलात्मक वस्तू नजरेत भरतात. भिंतीवरची, छतावरची आणि पडद्यावरची चित्रे शोभिवंत आहेत. नेपोलिअनचा इजितमधला पराभव तसेच नेपोलिअन विजयी सैनिकांना ध्वज देत आहे, ही दोन चित्रे विशेष लक्षात राहतात. हॉल ऑफ मिरर हे प्रेक्षणीय सभागृह आहे. मॉसॉ नि लेब्रू या कलाकारांनी त्याला विलक्षण सजवला आहे. प्रासादाच्या पाठीमागे विशाल उद्यान असून ते म्हैसूरच्या वृंदावन उद्यानाची आठवण देते. त्याची कल्पना नि आखणी अँद्रे नॉत्रेची. संस्थानात राहिलेल्या माझ्यासारख्या माणसाला अशा राजवाड्याचे नि अशा उद्यानाचे विशेष कौतुक वाटत नाही.

पॅरीसला येईपर्यंत दुपार झाली. तेव्हा वाटेतच मॅडेलीन चर्चपाशी उतरलो. त्याचा दर्शनीय भाग पार्थिनानसारखा आहे. येथून भुयारीने इन्व्हलीड स्थानकाकडे आलो. येथून थोडे अंतर चालले की, आपण नेपोलिअनच्या समाधीकडे येतो. सुरुवातीला चौक भेटतो. त्यात अनेक तोफा ठेवलेल्या आहेत. शिवाय गेल्या महायुद्धातला एक रणगाडा आहे. आत चर्च आहे त्यात शत्रुपक्षाकडून फ्रेंच सैनिकांनी जिंकालेल्या असंख्य पताका लावलेल्या आहेत.

दुसऱ्या बाजूने आपण नेपोलिअनच्या समाधीकडे येतो. प्रवेश करण्यास शुल्क द्यावे लागते. आत मध्यभागी खोलगट जागेत नेपोलिअनचे अवशेष ठेवले असून भोवताली त्याच्या नेतृत्वाखाली लढल्या गेलेल्या मॅरेंको, ऑस्टरलित्झ, मॉस्को, रिव्होली, पिरॅमिड, जीना या लढायांची नावे आहेत. त्याचप्रमाणे जोसेफ बोनापार्ट, व्होंब्रा, फॉक, डुरॉक, बेट्रॉ, लाउटी या फ्रेंच सेनानींच्या समाध्या आहेत. त्यांपैकी काही सेनानी नेपोलिअनचे सेनापती होते. शांतता, कायदा, व्यापार, समृद्धी, ऐक्य वगैरे संबंधात नेपोलिअनने फ्रेंच जनतेसाठी

काय केले याची चित्रमय कथा भिंतीवर काढलेली आहे. नेपोलिअनविषयी जगभर कौतुकाची भावना आहे. मग फ्रेंच लोकांना त्याच्याविषयी अधिक कौतुक वाटले तर ते स्वाभाविक आहे.

भुयारीने घराकडे परत आलो. सामान आवरून टॅक्सी आणायला गेलो. मागच्या अनुभवाने टॅक्सी ठरवताना मी जरा अस्वस्थ होतो. या वेळेचा टॅक्सी-वाला थोडा वयस्क होता. एअर टर्मिनलला मला जायचे आहे, एअरपोर्टवर नाही हे त्याला मला नीट समजावून सांगता येईना. पण अखेर तो समजला आणि हसला. घराशी आल्यावर त्याने सामान टॅक्सीत ठेवले, तसेच टर्मिनलवर आल्यावर त्याने ते बाहेर काढले. भाडे चुकते केल्यावर सलाम करून हसत तो गेला. टॅक्सीवाला इतका चांगला वागू शकतो हा सुखद धक्का होता.

सहाला विमान लंडनच्या दिशेने उडाले. आखीव शेती, चंद्रमौळी घरे, हिरवीगर्द झाडी हे परिचित चित्र थोड्याच वेळात धुक्याने झाकले. त्यातून विमान बाहेर आले तेव्हा खाली इंग्लिश खाडी होती. सायंकाळच्या सूर्यप्रभेने पाण्याला सोनेरी झाक आली होती. खाडी ओलांडली. इंग्लंडचा किनारा मागे पडला. लाल विटांची इंग्लिश घरे दिसू लागली. पुन्हा काही क्षण ढग नि धुके लागले. आता विमान उतरू लागले. सातच्या सुमारास विमानांच्या चाकांनी लंडनची भूमी पकडली. बरोबर अठरा वर्षांनी मी या भूमीवर पाय ठेवत होतो. साहजिकच जुन्या आठवणींनी मनात गर्दी केली.

पासपोर्ट-तपासणी कडक होती. पण ऑक्स्फर्ड नि लंडन इथली मेडिकल सेंटर्स पाहाण्याला डॉक्टर आली आहे हे समजताच अधिक काही न विचारता आम्हाला प्रवेश देण्यात आला. कस्टम विभागात खेळीमेळीचीच बोलणी झाली.

‘ नमस्ते ! लंडनला कशासाठी ! ’ अधिकाऱ्याने विचारले.

‘ जगाच्या सफरीतला एक टप्पा,’ मी उत्तरलो..

‘ बरं ! भेटी किती आणल्यात ? ’

‘ या दोन बॅगाभरून. ’

‘ वा छान. मुक्काम किती दिवस ? ’

‘ सुमारे दहा दिवस. ’

‘ आनंद करा दहा दिवस,’ असे म्हणून कस्टमच्या अधिकाऱ्याने आम्हाला पुढे जाण्यास सांगितले.

मुंबईच्या बेस्ट अंडरटेकिंगमधला माझा मित्र सिंहा सात वर्षांपूर्वी लंडनला गेला. त्याचे ख्रिसमसच्या सुमाराला पत्र आले होते. त्यात त्याने घर घेतल्याचे लिहिले होते आणि सफरीला मी निघाल्यास त्याच्याकडे उतरावे असे त्याने आमंत्रण दिले होते. एप्रिलच्या अखेरीस मी लंडनला येत असल्याचे त्याला कळवले होते. परंतु इंग्लंडमधील पोस्टाच्या संपामुळे ते पत्र त्याला मिळाले असेल की नाही याची मला शंका होती. म्हणून विमानतळावर मला न्यायला ये असे पत्र मी त्याला पॅरीसहून टाकले होते.

एस्केलेटरपाशी सामानाची वाट पाहात असताना पाठीवर थाप पडली. म्हणून मी वळलो. सिंहाने खांद्यावर हात ठेवला. तो आजारी होता. तरी पण पत्रातील सूचनेमुळे तो आला होता. मी सामान बाहेर आणले. सिंहाने टॅक्सी ठरवली. आम्ही त्याच्या घराकडे निघालो. टॅक्सी वगळता सगळेच नवीन वाटले. मीटरचा आकडा सरकू लागला नि रस्ता संपेना तेव्हा मला सिंहा किती दूर राहातो याची जाणीव झाली. शेवटी घर आले. सामान उतरवून मी टॅक्सीवाल्याला किती भाडे झाले ते विचारायला गेलो. तेव्हा सिंहा म्हणाला, ‘ ते मी पाहातो, तू सामान घरात घे.’ परकी चलनाची चिंता थोड्या प्रमाणात कमी झाली होती.

सामान लावल्यावर सिंहाने विचारले, ‘ जेवणार काय ?’

‘. विमानात खाणे झाले आहे,’ मी सांगितले.

‘ आता काय जेवणार ते विचारत आहे.’ सिंहा म्हणाला. मग भात, भाजी वगैरे पदार्थांचे भोजन झाले. त्यानंतर बेस्ट अंडरटेकिंग, भारतीय राजकारण, इंग्लंड इत्यादी विषयांवर आम्ही बराच वेळ गप्पा मारल्या.

▭

भुयारीने ऑक्सफर्ड सर्कसला आलो. स्थानकावरून बाहेर येताच पूर्वस्मृती जागृत झाल्या. पण रस्ता चार दिशेला फुटत होता. स्वीस एअरच्या कार्यालयाकडे जाणारा रस्ता कोणत्या बाजूला आहे ते समजेना. कोपऱ्यावर एक वृत्तपत्र-विक्रेता होता. त्याच्याकडून ' व्हिजिटर्स गाइड टू लंडन ' विकत घेऊन त्याच्याकडे रस्त्याची चौकशी केली. त्याने माहिती दिली नि मला विचारले, ' आपण प्रवासी आहात ? '

' होय, ' मी म्हणालो.

' आज सूर्यप्रकाश लख्ख आहे. कालपर्यंत हवा वाईट होती. तुम्ही छान हवा बरोबर आणलीत. तुमच्या मुक्कामात ती तशी राहून तुमचे दिवस आनंदात जावोत, ' असे आपल्या कॉकनी उच्चारात तो मला म्हणाला. त्याचे आभार मानून मी मार्गाला लागलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूंला सल्फरीज, इव्हान्स, अशा प्रकारचे टोलेजंग डिपार्ट-मेन्ट स्टोअर दिसत होते. त्यातल्या वस्तू , कपडे, विक्रीच्या जाहिराती पूर्वीसारख्याच होत्या. ब्रिटिश साम्राज्याचा अंत जवळ जवळ झाला होता तरी १९५१ च्या काळात एका विशिष्ट पोशाखातले इंग्रजी स्त्री-पुरुष खूप दिसत. आज जवळ जवळ दिसले नाहीत असे म्हटले तरी चालेल. रस्त्यावर मोठ्या संख्येत आढळले ते भारतीय नि आफ्रिकी लोक.

बरेच चाललो. तरी हवा तो रस्ता दिसेना. शेवटी पोलिसाला गाठले. तो म्हणाला, असे सरळ जा म्हणजे हव्या असणाऱ्या रस्त्याला धडक द्याल. त्याने दाखवलेल्या रस्त्याने निघालो. लैंगिक स्वातंत्र्याची आलेली लाट काय आहे हे दाखवणारी पुस्तकांची दुकाने या रस्त्यावर होती. स्वीस एअरमधले काम पुरे केले. मग ऑक्सफर्ड सर्कसकडे आलो. तेथून भुयारीने व्हिक्टोरिया स्थानकाकडे आलो.

लंडनच्या प्रमुख विभागातून जाणारी बसची सहल दर तासाला इथून निघते. त्या बस थांब्याकडे आलो. सुरुवातीला बसमध्ये थोडी माणसे होती. पण मग ती भरली. बहुसंख्य प्रवासी अमेरिकन होते. दोन चार इटालिअन, तितकेच जर्मन. राउंड लंडन साईटसिईंग टुअर हे हातभर लांबीचे नि पाच बोटे रुंदीचे माहितीपत्रक बसमध्ये तिकिटाबरोबर मिळाले. बस ज्या मार्गाने जाणार होती त्याचा लहान नकाशा, मार्गावरच्या ऐतिहासिक स्थानांची चित्रे नि त्यांची थोडी माहिती त्यात होती. गाईडचे कामही ड्रायव्हर करत होता.

वृद्ध नि अपंग सैनिकांसाठी दुसऱ्या चार्लसच्या राजवटीत रेनने बांधलेले चेलसी हॉस्पिटल प्रथम लागले. नंतर बॅटर्सी पार्क, बॅटर्सी पावर स्टेशन, टेट गॅलरी, लॅंबेथ पॅलेस, नेल्सनच्या जीवनावरच्या चित्रपटाची आठवण देणारा वॉटर्लू ब्रीज, ब्रिटिश वृत्तपत्रांचे आगार असणारा फ्लिट स्ट्रीट, सेंट पॉल, मॅन्शन हाऊस, यावरून बस मान्युमेन्टकडे आली. लंडनला १६६६ मध्ये भीषण आग लागली होती. तिचे हे स्मारक. २०२ फूट उंचीचे नि ३११ पायऱ्या असलेले हे मॉन्युमेन्ट १६७९ मध्ये बांधण्यात आले. मागच्या खेपेस मी वर गेलो होतो.

आता बस टॉवर ब्रिज, द टॉवर ऑफ लंडन, कॅप्टन स्कॉटच्या नेतृत्वाखाली ॲन्टार्टिककडे गेलेले ' डिस्कव्हरी ' हे जहाज, याकडून क्लिओपाट्रा निडलकडे आली. हार्ट ऑफ लंडन या पुस्तकात ' दॅट सॅड स्टोन ' या शीर्षकाखाली या निडलविषयी मॉर्टन लिहितो — लंडन अज्ञात होते, ग्रीस जन्माला आले नव्हते, सात टेकड्यांवर रोमची निर्मिती झाली नव्हती, अशा सुमारे साडेतीन हजार वर्षांपूर्वी तिसऱ्या फॅरोह थोतमेसने हेलिओपोलीसच्या मंदिरासाठी स्मारक स्तंभ उभारा अशी आज्ञा दिली. मग शिल्पकाराने एका अजस्र दगडावर आकृती काढली. शेकडो गुलाम कामाला लागले. चाबकाच्या जोरावर एक वर्षात तो स्तंभ उभा झाला. काळ सरकला. रामासेस गेला. क्लिओपाट्राचा अंत झाला.

राजवंश आले नि गेले. नवीन साम्राज्य उदयास आले. जगाच्या अनेक भागांवर लाल रंग पसरू लागला. एके दिवशी ही निडल जहाजावरून लंडनच्या दिशेला निघाली, नि बे ऑफ बिस्केपर्यंत आली. उसळलेल्या समुद्रात या जहाजाचा टगशी संबंध तुटला. पाच खलाशांनी त्या जहाजावर जाण्याचा प्रयत्न केला. पण ते खलाशी बुडाले. आठ दिवस गेले. नंतर दुसऱ्या जहाजाने त्या जहाजाला ओढून आणले, मग लंडनमध्ये तो स्तंभ उभा झाला. शेवटी मॉर्टन लिहितो. ' आपण या पाषाणाला नष्ट करत आहोत. एक वेळ तो लाल होता. आता तो काळ झाला आहे. तीन हजार वर्षांत जे नुकसान झाले नाही ते गेल्या ४७ वर्षांत झाले आहे.'

येथून पार्लमेन्ट, वेस्ट मिन्टर, व्हाईस हाऊस, ट्राफलगार स्क्वेअर, नॅशनल गॅलरी, बकिंमहॅम पॅलेस, वेलिंग्डन आर्च, पिकॅडेली सर्कस, ऑक्सफर्ड स्ट्रीट, बॉण्ड स्ट्रीट, मार्लबरो आर्च, हाईड पार्क, स्पिकर्स कॉर्नर– इथे कोणत्याही विषयावर कोणीही भाषण करू शकतो हे सांगून ड्रायव्हर म्हणाला की, इंग्लिश नि रबीश या दोन भाषांचा त्यासाठी वापर होतो – सायन्स म्युझिअम, अलबर्ट म्युझिअम, साउथ केसिंगटन, ब्रॉम्प्टन ऑरेटरी–हे कार्डीनल न्यूमनचे स्मारक आहे – स्लोअन स्ट्रीट, स्लोअन स्क्वेअरने मूळ जागी आलो. मॉर्टनच्या शब्दात सांगायचे म्हणजे आम्ही हार्ट ऑफ लंडन पाहिले. डॉ. जॉन्सन म्हणत असे की, जेव्हा मनुष्य लंडनला कंटाळतो तेव्हा तो जीवनाला कंटाळतो. कारण आनंदी जीवनाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी लंडनमध्ये आहेत. जॉन्सनला तसे का वाटले असेल त्याची कल्पना या दोन तासांच्या सहलीने येते.

येथून आम्ही बेकर स्ट्रीटकडे आलो. या भागात मॅडम टुसार्डचा वॅक्स म्युझिअम आहे. त्यात मागच्या वेळेचे काही पुतळे निवृत्त होऊन नवीन पुतळे त्यांच्या जागी आले होते. नेल्सनचा मृत्यु, मेरी क्वीन ऑफ स्कॉटचा वध, स्पिलिंग ब्यूटी, दि मर्डर ऑफ प्रिन्सेस इन टॉवर ऑफ लंडन ही चित्रे वेधक वाटली. शॉ, वेल्स, मेकॉले, डिकन्स, मॉम हे साहित्यिक, विल्सन, मॅक्मिलन, चर्चिल हे राजकीय नेते, टिटो, केनेडी, निक्सन, माओ, हो, मिसेस गांधी हे परदेशी नेते, वगैरेंच्या प्रतिमा इथे आहेत. किंग्ज ऑफ यस्टरडे, आणि हिरोज ऑफ टुडे हा विभागही पाहण्यासारखा आहे. पण लक्ष वेधून घेतात त्या गोष्टी म्हणजे बॅटल ऑफ ब्रिटन आणि ट्राल्फगारची लढाई. पहिला चित्रपट आहे

आणि दुसऱ्याची प्रतिकृती आहे. दोन्हीही सतत दाखवतात. या गोष्टी पाहत असताना पानिपतच्या लढाईची अशी प्रतिकृती का तयार होऊ नये हा विचार माझ्या मनात आला.

चेंबर ऑफ हॉरर्स या विभागात काही क्षण घालवून आम्ही द लंडन प्लेनेटोरिअममध्ये गेलो. आकाशात असलेल्या निरनिराळ्या ग्रहांचे, त्यांच्या निर्मितीचे, एक मोठे चित्र कृत्रिम आकाशात दाखवून माहिती दिली जाते. आकाशाचा असा वेध घेतला जात असताना वीर सावरकरांच्या ' जगन्नाथाचा रथोत्सव ' या कवितेतल्या ' ह्या सूर्यशताच्या किती मशाली जळती | मधुनची शतावधि चंद्रजोति ह्या उडती... ' या ओळींचे मला स्मरण झाले.

सकाळी भुयारीने टॉवर हिलकडे येऊन चालत टॉवर ऑफ लंडनकडे गेलो. विल्यम द फर्स्टने लंडनच्या संरक्षणासाठी हा भुईकोट किल्ला बांधला. तो किल्ला होता, राजवाडा होता, कैदखाना होता. आता रत्नाचे अलंकार ठेवण्यासाठी त्याचा उपयोग होतो. ब्लडी टॉवरमध्ये वॉल्टर रॅलेला बंदी म्हणून ठेवलेला होता. त्याचे चित्र आहे. तसेच त्याने लिहिलेल्या जगाच्या इतिहासाची एक प्रत इथे आहे. बाहेर थोड्या अंतरावर वधःस्तंभाची जागा आहे. तिथे ॲन बोलीन, कॅथेरीन हॉवर्ड, लेडी जेन ग्रे, नि अर्ल ऑफ एसेक्स यांचा शिरच्छेद झाला.

ज्युएल हाऊसमध्ये स्वोर्ड ऑफ स्टेट, लॉर्ड चॅन्सेलरची मेस, व्हिक्टोरिया क्रॉस, ऑर्डर ऑफ मेरीट, स्टार ऑफ इंडिया, ऑर्डर ऑफ द गार्टर नि त्याचा पेहेराव अशा वस्तू आहेत. खाली तळघरात राजमाता एलिझाबेथचा मुकुट, दिल्ली दरबारासाठी पाचव्या जॉर्जसाठी केलेला मुकुट, स्टार ऑफ आफ्रिका, इत्यादी हिरे आहेत. ही रत्ने पाहात असताना एक रक्षक डॉक्टरला म्हणाला, ' काही अलंकार घालावेसे वाटतात ना ? '

' फार किंमती आहेत, ' मी म्हणालो. '

' बाईच्या स्मिताची किंमत त्यापेक्षा अधिक आहे. ' असे हसत म्हणून ' काईप मुव्हिंग प्लाईज– " Keep moving please "– हे पालूपद त्याने सुरू केले.

व्हाईट टॉवर हे शस्त्रांचे आगार आहे. नेपोलिअनची पिस्तुले, बॅटल ऑफ ट्राफल्गारच्या कामगिरीसाठी ॲडमिरल लॉर्ड लोर्लींगला लंडनने भेट दिलेले

खड्ग, निरनिराळ्या जातींच्या बंदुका, माणूस नि घोडा यांची चिलखते, लोखंडी धनुष्ये, सप्टेंबर १६७९ मध्ये कोणत्या वस्तू आत नि कोणत्या बाहेर गेल्या यांची खतावणी, भारतीय तलवारी– त्यांच्यासंबंधी टीप होती की, त्यांची निर्मिती युरोपमधली आहे– अठराव्या शतकातल्या ग्वाल्हेरकडच्या मराठा सैनिकाचा बाण, भाता, रजपुतांची चिलखते, टिपूचे शिरस्त्राण, इत्यादी वस्तू इथे आहेत.

बेस्टमधले माझे सहकारी श्री. तोरसेकर यांचे चिरंजीव दुपारी भेटायला आले. त्यांच्याबरोबर गप्पा झाल्यावर आम्ही बाहेर पडलो. मार्क्स, लेनिन, शॉ वगैरे महाभागांनी ब्रिटिश म्युझिअममध्ये अध्ययन करून ग्रंथनिर्मिती केली होती. तिथे निदान जाऊन आल्याचे समाधान मिळावे म्हणून म्युझिअमकडे आलो. सर हॅन्स स्लोअननी जमा केलेल्या वस्तूंच्या संग्रहाची नीट व्यवस्था करण्यासाठी पार्लमेंटने १७५३ च्या कायद्याने एक विश्वस्त मंडळ स्थापन केले. इतका हा म्युझिअम जुना आहे. ज्ञानाचा विस्तार वाढविण्याची साधने उपलब्ध करून देणे, वाङ्मय, इतिहास, पुराणवास्तुशास्त्र, कला, यांच्या अभ्यासाला साहाय्य देणे, चित्रप्रदर्शन करणे, कॅटलॉग, गाईडबुक तयार करणे आणि विचारलेली माहिती पुरवणे, हे या म्युझिअमचे कार्यक्षेत्र आहे.

वॉल्टर रॅलेची प्रवास-टिपणे, बेन जॉन्सन, हॉब्ज, सॅम्युएल पेपी, यांचे साहित्य, मॅग्नाकार्टाची प्रत, शेक्सपिअरने लिहिलेले गहाणखत, एसेक्सच्या वधाची आज्ञा, अशा प्रकारचे कागद, पुस्तके नि हस्तलिखिते या विभागात आहेत. ग्रीक, इजिप्शिअन, ॲसिरिअन, रोमन अवशेषांचा संग्रह, तसेच आशिआई देशांतील वस्तूंचा संग्रह नमुनेदार आहे. मध्यभारत, काश्मिर, दक्षिण भारत, पूर्व भारत नि महाराष्ट्र या प्रदेशांतल्या कलावस्तूही आहेत.

१९५२ मध्ये मी गॉवर स्ट्रीटवर राहात होतो. तो भाग पुन्हा पाहावा म्हणून तिकडे गेलो. १०९, १११ या क्रमांकांची घरे दिसली, पण क्रमांक ११२ चे घर दिसेना. तेव्हा युनिव्हर्सिटीच्या प्रवेशद्वारापासल्या रक्षकाकडे चौकशी केली. त्याने सांगितले की, तो सगळा भाग– यातला काही भाग बॉंबहल्ल्यात नष्ट झाला होता– आता युनिव्हर्सिटीच्या विस्तारात जमा झाला आहे. मग वोबर्न चौकाकडे आलो. इथेही पूर्वीची घरे दिसेनात. कोपऱ्यावरच्या वृत्तपत्राच्या दुकानाची जागा नव्या छोट्या इमारतीने घेतली होती. या चौकात

उभा राहून डॉक्टरला पूर्वीची माहिती सांगत होतो. तेवढ्यात एक बाई आमच्याकडे येऊन म्हणाली, ' मी काही मदत करू ? '

' मी इथे राहिलो होतो. पण आता पूर्वीच्या इमारती दिसत नाहीत, ' मी उतरलो.

यावर ती बाई मोठ्याने हसली नि आपला हात डोक्यावरून फिरवत म्हणाली, ' च्याएंज् – ( change ) सगळे बदलले आहे. '

जगातला सर्वांत मोठा नि भव्य राजवाडा असा विंडसर कॅसलचा लौकिक आहे. विलियम द कॉंकररने तो बांधला. राजदंपती त्याचा उपयोग राहण्यासाठी अजून करते. श्री. वेंगुर्लेकर यांनी विंडसर दाखवायला त्यांच्या मोटारीतून आम्हाला नेले. थोड्या वेळात गावे मागे पडून हायवेवर मोटर धावू लागली. हिरवीगार वनश्री क्षितिजापर्यंत पसरलेली दिसत होती. मधूनच एखादे छोटे गाव डोके वर काढताना दिसे. विंडसर कॅसल जसा जवळ येतो तसा तो किती टोलेजंग आहे याची कल्पना येते.

मोटर गावात शिरली. रस्ते चिंचोळे झाले. दुकानेही छोटी होती. त्यातल्या काही जाहिराती गमतीदार होत्या. त्यांपैकी एक अशी – ' यू डोन्ट हॅव टू बी मॅड टू वर्क हीअर. बट इफ यू आर, इट हेल्प्स.' विंडसरकडे जाणाऱ्या रस्त्याला चढ आहे. प्रवासी हंगाम सुरू झाला नसल्याने विंडसर बंद आहे हे आत शिरल्यावर समजले. तेव्हा किल्ल्याच्या बाहेरून फेरी टाकली. त्याच्या पाठी-मागचा थोडा भाग मलबार हिलसारखा वाटतो.

जवळच थेम्स नदी आहे. संथ पाणी, छोट्या नौका, प्रवाहात विहार करणारे बदकांचे कळप, लहान मुलांची गर्दी, बदकांना पावाचे तुकडे टाकण्याची त्यांची धडपड, मधूनच येणाऱ्या सेलबोटी, शिवाय प्रवाशांनी भरलेली फेरीबोट, हे चित्र पाहात थेम्सच्या किनाऱ्यावर काही वेळ आम्ही उभे होतो.

येथून आम्ही विंडसर सफारी पार्ककडे आलो. वीस वर्षांपूर्वी हा पार्क नव्हता. त्यामुळे मला कुतूहल होते. माझ्यासारखे कुतूहल असणारे शेकडो लोक होते. मोटर ठेवायला जागा नव्हती इतकी गर्दी होती. पार्कमधून जाताना मोटारीच्या काचा बंद ठेवून जावे लागते. प्रथम भेटते ती वानरसेना. खाद्यपदार्थांच्या आशेने काही वानर मोटारीवर बसतात. या सेनेवर लक्ष ठेवायला एक रक्षक असतो. त्याच्या पॅन्टच्या खिशात हात घालून काही वानरे दाणे काढीत होते.

यानंतर लागला तो हिंस्र जनावरांचा विभाग. अर्थात त्याच्याभोवती उंच कुंपण आहे. वाघ, सिंह, चित्ते यांच्या विभागातून बाहेर पडल्यावर आम्ही लहान पशूपक्ष्यांच्या विभागात थोडा वेळ पायी हिंडलो. येताना श्री. वेंगुर्लेकर यांनी भारतीय वस्तीच्या भागातून मोटर आणली. त्यातून जाताना आपण इंग्लंडमध्ये आहोत असे वाटले नाही. रविवार असल्याने चित्रपटगृहाबाहेर भारतीय लोकांची गर्दी होती. कटी पतंग नि मनकी आंखे हे चित्रपट चालू होते.

ऑक्सफर्डला जाण्यासाठी पॅडिंग्टनवर आलो. तिकीट देणारे गृहस्थ भारतीय होते. रिटर्न तिकिट मागितल्यावर त्यांनी मला वेळ घेऊ नका असे सांगितल्याने मी जरा बुचकळ्यात पडलो. पण माझ्या शेजारी उभ्या असणाऱ्या प्रवाशाने तशी तिकिटे मिळायला थोडा वेळ आहे असे सांगितल्याने मी एक-वेळचे तिकीट काढले. गाडी आकाराला थोडी लहान होती नि तिला गर्दीही नव्हती. थोडे पिंजारलेले केस नि गळ्यापर्यंतचा स्वेटर, जाड कोट नि, कॉड्राय पॅन्ट असा पेहेरावा असलेला एक प्रवासी आमच्या डब्यात होता. एका वहीमध्ये तो नोटेशन्स लिहीत होता. गाडी उपनगरातून धावत होती. दोन्ही बाजूला छोट्या घरांच्या रांगा लागत होत्या. एलींग ब्रॉडवेला एक मुलगी आमच्या डब्यात शिरली. तिच्या हातात लंडन टाइम्स होता. यापूर्वी मिरर, एक्सप्रेस, सन किंवा डेली टेलेग्रॅफ दिसायचा.

आता उपनगरे मागे पडली. वसंतऋतूचे आगमन झाले असल्याने झाडांना पालवी फुटली होती. गाडी छोटी स्टेशने घेत नव्हती. स्लाव स्थानकावर गाडी थांबली. फारसे प्रवासी नव्हते. फलाटावर दोन हमाल बोलत होते. त्यांचाच फक्त आवाज. आता पेंट रिसर्च लेबॉरेटरीज, स्टार्च लिमिटेड, हंटले पामर असे काही कारखाने लागले. याशिवाय मोडीत काढलेल्या लोखंडी सामानाचे आवार दिसले. त्याच्या भोवतालच्या घाणीने आठवण दिली... ! आता छोटी मोठी सरोवरे, लहान डोंगर, दाट झाडी, मैलोमैलीची हिरवी गर्द शेती, गुबगुबीत मेंढ्या, नि गाईंची खिल्लारे दिसली. थोड्या वेळात ऑक्सफर्ड आले. टॅक्सी करून आम्ही चर्चिल हॉस्पिटलवर आलो. डॉक्टर आत गेली आणि मी गावाकडे वळलो.

या रस्त्याला रहदारी नव्हती. कचरा जमा करणारा नगरपालिकेचा ट्रक, त्यावर काम करणारी दोन माणसे नि एक गावठी कुत्रा याशिवाय कोणी नव्हते.

हमरस्त्याला त्या मानाने गर्दी होती. एका हॉटेलात चहा घेतला, नि त्याच्या पुढच्या दुकानातून गार्डियनचा अंक नि छोटी डायरी विकत घेतली. थंडी असल्याने उन्हात बसून सबंध गार्डियन वाचला. पिटर जेन्किन्सचा ' पोर्नो कॉनर ' या स्तंभातला लॉर्ड लॅंगफोर्डवरचा लेख बोचक भाषेत लिहिलेला होता.

दोन वाजता ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीची पायी सहल होती. वेळ कमी असल्याने टॅक्सीने निघालो. टॅक्सीवाला बोलका होता. भट्टाचार्य नावाचा भारतीय डॉक्टर त्याच्या परिचयाचा होता असे त्याने सांगितले. लांब केस ठेवणाऱ्या मुलांविषयी तो म्हणाला, ' पुन्हा लढाई झाली तर ही पोरे लढू शकणार नाहीत.' त्याचे हे म्हणणे मला पटले नाही. दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी ऑक्सफर्डच्या विद्यार्थ्यांनी आम्ही देशासाठी लढणार नाही, असा ठराव केला होता. हिटलरला युद्ध करण्यास त्यामुळे प्रोत्साहन मिळाले असे म्हणतात. परंतु युद्ध सुरू झाल्यानंतर इथले विद्यार्थी ईर्ष्येने लढले हे तितकेच खरे.

सहलीसाठी आम्ही ऑक्सफर्ड इन्फरमेशन सेंटरवर आलो. या हॉलमधल्या काही जाहिराती ऑक्सफर्डमधल्या चळवळी बोलक्या होत्या.

( १ ) इंटरनॅशनल व्हॉलंटरी सर्व्हिस. ' लेट अस फेस इट नाऊ. ' एका म्हातारीच्या चित्राखाली लिहिले होते की, हिच्यासारख्या स्त्रिया खूप आहेत. आजारी नि वृद्ध यांची आम्ही काळजी घेतो. हे काम दुसऱ्यावर सोपवू नका.

( २ ) नाही म्हणायला घाबरू नका. एक अधिक चषक घेतल्यामुळे तुमचा लायसेन्स बारा महिने रद्द होईल. त्याला काही अर्थ आहे.

( ३ ) सायमॉन यूथ आर्गेनायझेशन-- जे सोशल मिसफीट आहेत त्यांच्या-बरोबर पूर्ण वेळ काम करणारे स्वयंसेवक हवे आहेत.

( ४ ) डोंट ड्रॉप इट कॅंपेन.

ऑक्सफर्डची तुलना आपल्याकडच्या प्राचीन नालंदा विद्यापीठाशी होऊ शकते. सन ९१२ पासून ऑक्सफर्डला महत्त्व प्राप्त होऊ लागले. पण विद्यापीठ म्हणून त्याचे माहात्म्य सुरू झाले ते ११९० पासून. यापूर्वी अभ्यासाला विद्यार्थी पॅरीसला जात. पण या वर्षी तिकडचे विद्यार्थी ऑक्सफर्डला आल्याने इथले शैक्षणिक युग सुरू झाले. सुमारे चाळीस वर्षांनंतरची गोष्ट. धनुर्विद्येचा अभ्यास करताना एका विद्यार्थ्याचा बाण लागून बाई मेली. त्यामुळे दंगा होऊन जे लोक पळाले त्यांनी केंब्रीजची स्थापना केली. पुढे काही काळाने ऑक्सफर्डला

स्वायत्तता मिळाली. सुमारे दिडशे वर्षांनंतर पुन्हा एकदा ' टाऊन नि गाऊन ' यांच्यात दंगा झाला. तेव्हा दरवर्षी सेन्ट मेरी चर्चमध्ये ऑक्सफर्डच्या महापौराने इतर ६२ नागरिकांसह उपस्थित राहून ६३ पेन्स दंड द्यावा अशी राजाने त्या गावाला शिक्षा दिली. १८२५ पर्यंत या शिक्षेचा अंमल झाला.

ऑक्सफर्डला महाविद्यालये काढण्याची प्रथा डरहॅमच्या आर्चे डिकॉने देणगी दिल्यापासून सुरू झाली. त्याच्या देणगीने युनिव्हर्सिटी कॉलेजची स्थापना झाली. त्यानंतर मर्टन कॉलेज उभे झाले. मग बाकीची. सहलीची सुरुवात झाली ती खाईस्ट चर्च या कॉलेजपासून. त्याची स्थापना कार्डिनल वुल्स्लीने केली. या कॉलेजातले चौदा विद्यार्थी पंतप्रधान झाले नि अकरा व्हाइसरॉय झाले. त्याच्या डायनिंग हॉलमध्ये एलिझाबेथ राणी जेवायला येत असे. या कॉलेजच्या चॅपेलचा मनोरा सर्वांत प्राचीन आहे. त्याच्या हॉलकडे जाणारा जिना वास्तुशिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना समजला जातो. इथल्या दरवाजावर ' नो पील ' हे गेल्या शतकातले निवडणूक घोषवाक्य आहे.

मर्टन कॉलेजची लायब्ररी सर्वांत जुनी. दुसरी प्रसिद्ध लायब्ररी म्हणजे बोल्डियन. पहिल्या एलिझाबेथचे राजदूत सर थॉमस बोडले यांनी ती स्थापन केली. इंग्लंडच्या यादवी युद्धात पहिला चार्लस ऑक्सफर्डला आला. या वेळी गावाने त्याला सर्व प्रकारचे साहाय्य दिले. मात्र त्याची एक विनंती अव्हेरण्यात आली. ३० डिसेंबर १६४५ या दिवशी राजाने बोल्डियन लायब्ररीतून एक पुस्तक मागवले. लायब्ररीबाहेर पुस्तक नेता येत नाही असे ग्रंथपालाने कळविले. राजाने नियम पाळला. आपल्याकडे स्वराज्यात असे काही घडेल काय ? एका भागात हस्तलिखिते आहेत. त्यातली काही म्हणजे, कोलंबसाचे पुस्तक, शेक्सपिअरचे नाटक, शॉने मरेला लिहिलेले पत्र, लॉरेन्स ऑफ अरेबियाचे पुस्तक, ही होत. रेनने बांधलेले शेल्डोनिअन थिएटर पाहिल्यावर सहल संपली.

बसप्रवास स्वस्त असतो. म्हणून लंडनला परत बसने यायचे ठरवले. त्यासाठी बसस्थानकाकडे आलो. दहा मिनिटाने बस सुटली. हिरवीगार शेते, लहान ओढे, गर्द झाडी, छोटी घरे अशा रम्य ग्रामीण विभागातून बस गेली. ब्राउनिंग म्हणाला होता, ' ओह टू बी इन इंग्लंड नाऊ दॅट एप्रिल इज देअर.' एप्रिल संपून नुकतेच तीन दिवस झाले होते. तेव्हा या समयाला इंग्लंड कसे असेल याची कल्पना यावी.

—

लंडनची नॅशनल गॅलरी १८२४ मध्ये स्थापन झाली. बहुतेक श्रेष्ठ कलाकारांची चित्रे त्यात लावलेली आहेत. या गॅलरीची तुलना पॅरीसच्या लुव्हरशी होऊ शकेल. मात्र इथे प्रवेश-शुल्क नाही. निवांतपणे चित्रे पहायची ठरवली तर एक दिवस पुरणार नाही. आम्ही घाईतच चित्रे पाहिली. तरीही पुढील चित्रांपाशी पाय थबकले. क्लॉडचे नार्सिसस, पौसीनचे ॲडोरेशन ऑफ द गोल्डन काफ्, शॉपेनचे थ्री पोर्ट्रेटस् ऑफ रिशेल्यू आणि द व्हिजन ऑफ सेन्ट जोसेफ, व्हलॅक्वेझचे द इम्याक्युलेट कन्सेप्शन आणि टॉयलेट ऑफ व्हीनस, मोनेटचे वॉटर लिलिज्, ग्रेकोचे खाईस्ट ड्रायव्हिंग द ट्रेडर्स फ्रॉम द टेंपल, गेन्सबरोचे द मॉर्निंग वॉक, रेनॉल्डचे कॅप्टन ओर्म, रूबेन्सचे वॉटरिंग प्लेस, पीस ॲन्ड वॉर, आणि शॅटू द स्टीन, व्हॅन डाईकचा पहिला चार्लस, रेब्रॉंचा सेल्फ पोर्ट्रेट, टिशिअनचे मॅडोना ॲन्ड द चाइल्ड, मायकेल एंजेलोचे मॅडोना ॲन्ड द चाईल्ड, लिओनार्डोचे व्हर्जिन ऑफ द रॉक्स.

गॅलरीतर्फे सेल्फ सर्व्हिस कॅफेटेरिया चालवण्यात येतो. तिथे फराळ करून बसने टेट गॅलरीकडे आलो. ब्रिटीश चित्रांचा संग्रह करण्याची पहिली कल्पना सर फ्रॅन्सिस शॅंट्रेची. त्यासाठी त्यांनी अमाप पैसा रॉयल ॲकेडमीला दिला. त्यानंतर अनेकांनी आपले चित्रसंग्रह इथे दिले. अखेर हेन्री टेट यांनी आपला संग्रह दिला. आणि सर्व

चित्रे एक जागी असावी म्हणून आर्ट गॅलरी बांधण्यासाठी त्यांनी ८००० पौंडांची देणगी दिली. या गॅलरीचे उद्घाटन १८९७ मध्ये झाले.

गेन्सबरोचे सन सेट नि मार्केट कार्ट, स्कॉटचे ॲन ऑर्च ऑन वेस्टमिन्स्टर ब्रीज, जेम्स बेरीचे किंग लिअर विपिंग ओव्हर द् डेड बॉडी ऑफ कार्डेलिया, टर्नरचे डिस्ट्रक्शन ऑफ सोडोम नि हॅनिबाल क्रॉसिंग द आल्प्स, जॉन क्रोमचे स्टेट क्वॉरीज, फ्रॅन्सिस डॅन्बीचे द वुड निफ्ज हाईम टू द राइझिंग सन— नोंद-वहीत टिपलेल्या सुंदर चित्रांची ही नामावली.

परतीच्या रस्त्यावर पार्लमेन्टची इमारत होती. जवळच बिगबेन दिसले. पार्लमेंटच्या कॉरिडॉरच्या भिंतीवर थॉमस रोची दिल्ली भेट. वॉल्टर रेलेला मिळालेला परवाना, वगैरे चित्रे आहेत. पुढे हॉल लागतो. इथे अर्ज करून स्ट्रेंजर्ज गॅलरीत जाण्याची परवानगी मिळवली. गॅलरीत प्रेक्षक जास्त होते. खाली सभासद थोडे. एका सभासदाचे भाषण चालले होते. १९५२ मध्ये मी बेव्हानला इथे बोलताना ऐकले होते. पिट, फॉक्स, बर्क, शेरिडन, ग्लॅडस्टन, डिझरेली, लॉईड जॉर्ज, चर्चिल या महान वक्त्यांनी गाजवलेला हा हॉल ! हाऊस ऑफ कॉमन्समधून हाऊस ऑफ लॉर्डस्कडे आलो. इथेही सभासद थोडे होते. चर्चाही संथपणे चालली होती. थोडा वेळ बसून बाहेर आलो. थोड्याच अंतरावर वेस्ट-मिस्टर ॲबे होता. ही वास्तू एडवर्ड द कन्फेसरने १०६५ मध्ये बांधली. त्याच्या-पासून ते दुसऱ्या जॉर्जपर्यंत झालेल्या राजांचे तसेच थोर इंग्लिश पुरुषांचे दफन त्यात झाले आहे.

संध्याकाळी घरी आल्यावर कळले की, सकाळी रूथचा दूरध्वनी आला होता. १९५२ मध्ये स्पेनच्या सहलीत रूथ आमच्या बरोबर होती. म्हणून इथे आल्या-वर मी तिला एक पत्र टाकले होते की, आम्ही लंडनला आलो असून चार दिवसांनी कॅनडाकडे जाणार आहोत. भेटू शकत नसल्याने हे पत्र टाकले आहे. रात्री मी पबवर गेलो असताना तिचा पुन्हा दूरध्वनी आला आणि तिने डॉक्टरला सांगितले की, निदान दोन तासांसाठी तरी तुम्ही येऊन जा. मी तसे पत्रही आज तुम्हास लिहिले आहे. सकाळी रूथला फोन केला. दुपारच्या गाडीने तिच्याकडे जाण्याचे ठरले.

भुयारीने आम्ही सेन्ट पॉल कॅथिड्रलकडे जाण्यास निघालो. वाटेत एका स्थानकावर एक आंधळा गृहस्थ गाडीत शिरला. सुशिक्षित होता. कदाचित

गेल्या महायुद्धात त्याचे डोळे गेले असावे. मला गंमत वाटली ती या गोष्टीची की, त्याने डब्यात सिगरेट ओढण्याची परवानगी आहे का असे विचारले. जेव्हा इतरांनी हो सांगितले तेव्हा त्याने सिगरेट पेटवली. धूम्रपानास बंदी असणाऱ्या डब्यात सिगरेट ओढून डोळस माणसे नियमभंग करीत होती तिथे हा आंधळा समाजाचे नियम कटाक्षाने पाळत होता !

सेन्ट पॉल कॅथिड्रल ही सर ख्रिस्टोफोर रेन यांची कलाकृती. व्याप्तीच्या अंगात या कॅथिड्रलचा क्रमांक सेन्ट पिटरच्या खाली लागतो. युरोपीय वास्तु-शास्त्राचा एक श्रेष्ठ नमुना अशी या कॅथिड्रलची ख्याती आहे. दुसऱ्या महा-युद्धातील बॉम्बहल्ल्यात भोवतालच्या बऱ्याच इमारती नष्ट झाल्या. मात्र कॅथिड्रल-वर दोनच बॉम्ब पडले. या हल्ल्याच्या काळातील रात्र कशी असे याचे वर्णन कॅथिड्रलच्या रक्षणाचे काम करणाऱ्या स्वयंसेवकांनी केले आहे. ते चित्रासह इथे ठेवलेले होते. कोळशावरील करातून जो पैसा जमला त्याचा विनियोग हे चर्च बांधण्यासाठी करण्यात आला. दहा वर्षांच्या अवधीत सेन्ट पॉल कसे बांधले ते दाखवणाऱ्या मॉडेल्सची चित्रे आणि माहिती प्रवेशद्वारापाशी होती. चर्च भव्य असले तरी सेन्ट पिटरची सर त्याला नाही.

घाई असल्याने गडबडीत व्हिक्टोरियाऐवजी ऑक्सफर्ड सर्कसची तिकिटे काढली. मग स्वतःवरच चिडलो. ऑक्सफर्ड सर्कसला बाहेर पळत जाऊन व्हिक्टोरियाची तिकिटे आणली. तिथे आल्यावर फॅवरशॅमची तिकिटे काढली. गाडी सुटायला दोन-तीन मिनिटे बाकी असताना आम्ही डब्यात शिरलो. गाडी स्थानकाबाहेर आली नि पुराणे लंडन दिसले. काळी पुटे चढलेली जुनी घरे, त्यांच्या अंगणात वाळत घातलेले कपडे किंवा कपडे वाळत घालत असलेली बाई, तिच्याभोवती बागडत असणारे एखादे मूल किंवा उन्हात देहाची गुंडाळी करून झोपलेले मांजर, अथवा जुन्या वस्तीत बांधली जात असलेली टोलेजंग इमारत नि नवीन चौक असा देखावा काही वेळ दिसला.

डब्यात एकच प्रवासी होता. इंग्लंडमध्ये नव्याने स्थापन झालेल्या एका विद्यापीठात तो शिकत होता. देशाचे सामाजिक जीवन समाजवादी पक्ष बदलू शकेल असे त्याचे मत होते. इंग्लंड हे साम्राज्याचे केन्द्र राहिलेले नसून ते 'लिटल इंग्लंड' झाले आहे याची लोकांना आता जाणीव होत आहे असे त्यांच्या बोलण्यावरून दिसले. बाहेरच्या जगाची त्याला फारशी माहिती नव्हती

किंवा ती असावी अशी त्याला उत्सुकता नव्हती. असा तरुण क्वचित भेटतो. महाविद्यालयीन विद्यार्थी असूनही त्याने इंग्लंडचा किनारा सोडला नव्हता.

स्थानकावर रूथ उपस्थित होती. सुमारे अठरा वर्षांनी आम्ही भेटत होतो. अधूनमधून तिच्याकडून ख्रिसमस कार्ड येत असे.माझ्याकडे पाहून हसत म्हणाली, 'तुझ्यात फारसा फरक पडलेला नाही.' 'तुझ्यात तरी कुठं पडलाय?' मी तिला म्हणालो. तिचे घर बरेच दूर होते. वाटेवरच तिच्या यजमानांची बागाईत होती. तिच्यातून फेरी टाकून घराकडे आलो. रूथची धाकटी मुलगी शाळेतून वरी आली नसल्याने आम्ही त्या शाळेकडे गेलो.खेडेगावात असूनही शाळा अद्ययावत् होती. परत आल्यावर रूथने तिचे घर दाखवले. अठराव्या शतकातले ते घर असून त्यातल्या काही वस्तू त्याच काळातल्या होत्या. घराला लागून दोन नवीन खोल्या बांधण्यात येत होत्या. घरबांधणीच्या संबंधात तिने केलेली गाऱ्हाणी आपल्याकडच्यासारखीच होती. जॉन – रूथचे यजमान – परत आल्यावर आम्ही काही वेळ भारतीय लोकशाही, इंग्लंड, कॉमन मार्केट, इत्यादी विषयांवर गप्पा मारल्या. मग रूथने फराळाला बोलावले. या वेळी हिंदू नि ख्रिश्चन संप्रदाय यावर चर्चा झाली. फराळ आटोपल्यावर रूथने आम्हांला स्थानकावर आणून सोडले. आम्ही गाडीत शिरतोय तोच ती सुटली.

डॉ. मिस भट्टाचार्य हिने सांगितले होते की, किंग्ज कॉलेज हॉस्पिटलकडे येणाऱ्या बसचा थांबा स्थानकाबाहेर आहे. एलेफंट अँड कॅसल या स्थानकाबाहेर बस थांबे अनेक होते.चौकशी करून योग्य बस थांब्यावर उभे राहिलो. बस आली. बेस्ट अंडरटेकिंगमध्ये मी नोकरीला आहे. तेव्हा नकळत माझी नजर बसवर फिरू लागली. मुंबईतल्यापेक्षा चित्र निराळे नव्हते. ड्रायव्हरने कोट काढला होता. डोक्यावर टोपी नव्हती, कंडक्टरने कोटाच्या बाह्या वर चढवल्या होत्या. रिलिफ पॉईन्ट येण्यापूर्वीच कंडक्टरने बॅग गुंडाळली नि तंबाखू कागदात ठेवून सिगरेट वळली. चार बायका बसमध्ये चढल्या. त्यांना तो म्हणाला की, तिकिटे पुढच्या कंडक्टरकडून घ्या. बस थांबताच तो उडी मारून नाहीसा झाला. बसमध्ये जुनी तिकिटे, कागदाचे तुकडे पडले होते. बस धुतली गेली होती की नाही याची शंका होती.

नवे कर्मचारी आले. बस सुटली. यानंतरच्या बस थांब्यावर काही माणसे बसमध्ये चढली. कंडक्टरने त्यांना तिकिटे दिली. मात्र पूर्वीच्या प्रवाशांची तिकिटे

तपासण्यात आली नाहीत. त्यामुळे त्या चार बायकांनी तिकिटे काढली नाहीत. त्यांचे स्थान आल्यावर त्या उतरल्या नि चालू लागल्या. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे आम्ही पहात होतो. समाजऱ्हासामुळे नीतिमत्तेत बदल होतो, का नीतिमत्तेत बदल झाल्याने समाजाचा ऱ्हास होतो?

डॉक्टर आपल्या कामाला गेली. विद्यार्थ्यांच्या वेटिंग रूममध्ये मी वाचत बसलो. गार्डियनमध्ये 'मोरॅलिटी ॲन्ड बॅकलॅश' या शीर्षकाखाली अग्रलेख होता. त्यात म्हटले होते ...'अश्लील साहित्यामुळे कदाचित विकृती निर्माण होत असेल. परंतु त्याबरोबर हेही खरे आहे की, साहित्य नि कला यात चावट नि कामुक गोष्टींना स्थान आहे. सनातनी लोकांना धक्का बसतो म्हणून एखादे पुस्तक किंवा चित्रपट अश्लील ठरत नाही. परप्रत्ययाचा आनंद किंवा एक मौज म्हणून लैंगिकतेला कलेमध्ये का स्थान असू नये हे समजत नाही...' अशा सुरातला अग्रलेख होता. डॉक्टरचे काम संपल्यावर आम्ही बसने एलेफंट ॲन्ड कॅसलकडे निघालो. बसमध्ये गर्दी नव्हती. मुंबईमध्ये ज्याविषयी तक्रार होते ती गोष्ट दिसली. म्हणजे एका पाठोपाठ एक अशा एका रूटच्या दोन-तीन बसेस येत होत्या. कुठेही पळसाला पाने तीन!

पाऊस पडत होता. मोटरींची गर्दी होती. दहा वाजल्यावर ही गर्दी कमी होईल असे सिंहा म्हणाला. ठरलेल्या वेळी टॅक्सी आली. सिंहा आणि मिसेस वॅली – मुंबईला या बाईच्या गेस्ट हाऊसमध्ये पूर्वी सिंहा नि मी राहिलो होतो– यांचा निरोप घेतला. गाव सोडताना थोडे दुःख झाले. टॅक्सी ट्रॅफिक जॅममध्ये सापडली. पण ड्रायव्हरने कौशल्याने मार्ग काढून एका लहान रस्त्याने तिला हायवेकडे आणले.

'यापूर्वी लंडनला आला होतात?' टॅक्सीवाल्याने विचारले.

'वीस वर्षांपूर्वी आलो होतो.'

'इथे येण्यापूर्वी कुठे गेला होतात?'

'युरोपमध्ये फिरलो.'

'लंडन कसे वाटले?'

'भाषेच्या सोयीमुळे नि मित्रांच्या सान्निध्यामुळे लंडन थोडे घरच्यासारखे वाटले.'

तो बोलत असताना गाडी मात्र प्रचंड वेगाने चालवत होता. मी त्याला तसे म्हणालो.

' विमानतळावर तुम्हाला थोडे आधी नेऊन सोडत आहे. म्हणजे तुमची धांदल होणार नाही. ' तो उत्तरला. विमानतळ आल्यावर त्याने सामान खाली काढले. पैसे दिले तेव्हा मदतीला थांबू का असे त्याने मला विचारले. ' नको. आम्ही आमची व्यवस्था करू,' त्याचे आभार मानत मी म्हणालो.

दुपारी सव्वाबाराला विमानात बसण्याची सूचना मिळाली. विमान खूप मोठे होते. मात्र गर्दी अजीबात नव्हती. जवळजवळ मोकळे होते. हवामान वाईट असल्याने विमान वीस मिनिटे उशीरा सुटेल, असे कॅप्टनने सांगितले. मग कॉफी देण्यात आली. एक वाजल्यानंतर विमान सुटले. ढग होते नि पाऊसही पडत होता. पाच मिनिटांत विमान ढगाच्या वर गेले. नंतर काही वेळ आकाश मोकळे होते. पण पुन्हा ढगांची गर्दी झाली. खालचा भाग दिसेनासा झाला. दीड वाजल्यानंतर ढग कमी होऊ लागले. आता समुद्रावरून विमानप्रवास सुरू झाला. हवामान इतके थंड झाले की, पायावर घेण्यास रग देण्यात आले. नंतर एअर होस्टेसने विचारले, ' काय पेय घेणार ? '

' काय आहे ? ' मी विचारले.

' सेवन अप आहे,' ती उत्तरली.

ते पेय मागवले. ते निघाले लिंबू सरबत. पाण्यात लिंबाची फोड टाकून त्याला लाकडी टाचणी लावलेली होती. तेव्हा मी होस्टेसला विचारले, ' याचा उपयोग काय ? '

' केवळ सजावट, ' ती हसत म्हणाली.

खुर्चीच्या पाठीमागच्या पिशवीत नेहमीप्रमाणे एक नकाशा नि इंग्रजी वृत्तपत्रे होती. गार्डियनमध्ये अग्रलेख होता तो पूर्व पाकिस्तानातून आलेल्या शरणार्थी-विषयी. त्यात म्हटले होते, ' स्वतःच्या शरणार्थींचा प्रश्न सुटलेला नसताना तसेच आर्थिक परिस्थिती कमकुवत असताना भारताला अधिक जबाबदारी घ्यायला लावणे हे मूर्खपणाचे आहे. झालेले नुकसान भरून काढण्यासाठी नि अधिक न होऊ देण्यासाठी आंतरराष्ट्रीय साहाय्य आवश्यक आहे. पूर्व पाकिस्तानातल्या दुर्दैवी नागरिकांना अन्न आणि निवारा यांचे साहाय्य परदेशांनी दिले पाहिजे. '

विमानाच्या पहिल्या वर्गात कोणी नव्हते. दुसऱ्या वर्गात जेमतेम वीस-पंचवीस प्रवासी असावेत. त्यामुळे म्हणा, पण होस्टेस् नि पर्सर हे कर्मचारी सेवाभावी झाले होते. माझ्या डाव्या हाताकडे तीन आसने मोकळी होती. म्हणून तिकडे जाऊन मी आडवा झालो. होस्टेस आली नि तिने उशा दिल्या. मग पर्सर आला नि त्याने अंगावर रग घातला. नाइलाजाने मला तासभर झोपावे लागले.

विमान एकतीस हजार फुटांवरून उडत होते. वर संपूर्ण निळे आकाश, खाली धवल मेघ, त्यामुळे बर्फाच्छादित प्रदेशावरून आपण जात आहोत असे वाटले. मधूनच ढगाच्या फटीतून खाली निळ्या पाण्याचा भाग दिसे. विमान क्वचित हाले. त्यामुळे भूमी सोडून आपण प्रवास करत आहो असे वाटले नाही. मॉंट्रीलपर्यंतचे उड्डाण सहा तासांचे होते. माझ्या घड्याळात सहा वाजले तेव्हा विमानाने गुजबें-पर्यंतचा टप्पा गाठला होता. विमान लंडन, वेल्स, उत्तर आयर्लंड, समुद्र मग ग्रीनलॅंडच्या बाजूने फेअरवेलजवळून गुजबेकडे आल्याचे पर्सरने नकाशावरून दाखवले. आता ढग अजीबात गेले. खाली नद्या नि छोटी सरोवरे गोठलेल्या स्थितीत दिसली. नदीच्या प्रवाहाने निर्माण केलेली खोरी, लहान मोठ्या दऱ्या, त्यात असलेले शुभ्र हिम, त्याच्यावरची निळी झाक, क्षितिजापाशी असलेले पांढुरके ढग, नि त्यावर चढत जाणारे निळे आकाश, हे दृश्य बराच वेळ दिसले.

आता सेन्ट लॉरेन्स नदी दृष्टिपथात आली. आमच्या घड्याळात सात वाजले होते. विमान क्विबेकच्या दिशेने जात होते. क्विबेकने वुल्फची आठवण दिली. गड आला पण सिंह गेला असेच काहीसे इथे झाले. इंग्लंडने क्विबेक जिंकले. पण या लढाईत वुल्फ मारला गेला. सेन्ट लॉरेन्स नदी मागे पडली. साडेसातला विमान उतरू लागले. सेन्ट लॉरेन्स पुन्हा ओलांडली. डाव्या हाताला शहर दिसले. विमानाने भूमीला स्पर्श केला. त्या वेळी मॅंट्रीलमध्ये दुपारचे दोन चाळीस झाले होते.

सुमारे अर्धा मैल चालावे लागले. त्यातला काही भाग सपाट एस्कॅलेटरचा होता. कस्टममध्ये तपासणी झाली नाही. मॉंट्रीलमध्ये फ्रेंच भाषेचा प्रभाव आहे. इंग्रजी हटाववाले. हवी ती माहिती नीट मिळेना. इतक्यात आमच्या विमानातली एअर होस्टेस दिसली. तेव्हा सामान कुठे घ्यायचे हे तिला विचारले. पण तिलाही निश्चित सांगता येईना. एवढ्यात एक अधिकारी आला. त्याला तिने अडचण

सांगितली. तो म्हणाला की, सामान पलीकडे ठेवा, ते न चुकता ओटाव्याला येईल. यानंतर तो म्हणाला की, मी भारतात प्रवासाला येणार आहे. पण मला तिथली भाषा येत नाही. इंग्रजी येत असेल त्याला भारतात प्रवास करताना फारशी अडचण येत नाही असे मी त्याला आश्वासिले. पुन्हा बरेच चालावे लागले. सांगितलेल्या गेटकडे आलो तर तिथे दुसऱ्याच विमानाचा क्रमांक आढळला. थोड्या वेळाने तुमच्या विमानाचे लोक येतील असे तिथल्या मुलीने सांगितले. त्याप्रमाणे काही समयाने दोन एअर होस्टेसीस आल्या. त्यांनी तिकिटे तपासण्यास सुरुवात केली. आमचे लठ्ठ तिकीट पाहून एक दुसरीला म्हणाली, 'असं तिकीट मी पाह्यलं नव्हतं.'

'जगाच्या सफरीचं तिकीट आहे.'

'तुमची ही सफर मोठी रोमहर्षक असेल!'

'तिकिटावरून गैरसमज करू नका. मी रॉकफेलर नाही. ठिकठिकाणी आमचे मित्र आहेत म्हणून हा प्रवास शक्य झाला,' असे मी म्हणालो तेव्हा ती हसली.

माझ्या घड्याळातल्या साडेआठला, म्हणजे इथल्या साडेतीन वाजता, विमानात बसण्याची सूचना मिळाली. विमान लहान होते. नेहमीप्रमाणे वृत्तपत्रे देण्यात आली. द मॉन्ट्रील स्टारमध्ये सेन्ट जीनमध्ये झालेल्या भयंकर भूकंपाची वार्ता होती. विमान पंचवीस हजार फुटांवरून गेले. अर्ध्या तासात ओटावा आले. पृथ्वीवरच्या नवीन खंडात आमच्या जगाच्या सफरीचा पुढील टप्पा सुरू झाला होता. विमानतळावर डॉ. देहेजिआ हजर होते. ते नि त्यांच्या डॉक्टर पत्नी ही दोघेही मुंबईची. ओटावाला येत आहे असे पत्र डॉक्टरने त्या दोघांना टाकले होते. 'वाट पहात आहे,' अशी त्यांची तार आम्ही प्रवासाला निघण्याच्या आदल्या दिवशी आली होती. विमानतळावरून मोटरीने डॉ. देहेजिआ यांच्या घरी आलो.

नदीवरचा संगम हा ओटाव्याचे एक रम्य विश्रामस्थान आहे. तिथे एक छोटा धबधबाही आहे. आम्ही आलो तेव्हा तिथे अजीबात माणसे नव्हती. आम्ही चारजण आणि आम्हाला भेटलेले चार भारतीय इतकेच लोक तिथे दिसले. डाऊज लेक हे ओटावाचे दुसरे आकर्षण आहे. हिवाळ्यात पाणी गोठल्यावर त्यावर मोटर रेसींग होते. ग्रीष्म ऋतूत त्याच्यात सेलबोटींचे पीक येते. आर्ट सेंटर हेही ओटावाचे लक्षणीय स्थान आहे. पण न्यूयॉर्कचे लिंकन सेंटर पाहिल्यावर हे सेंटर फारच लहान वाटते.

पार्लमेंटच्या आवारात ३०२ फूट उंचीचे ' पीस टॉवर ' आहे. त्याच्या गाभाऱ्यात कॅनडाच्या लष्कराने पहिल्या महायुद्धात काय कामगिरी केली त्याची थोडक्यात कथा दिली असून ती चार भागांत आहे. द कॉल, द क्रॉसिंग, येप्रेस १९१५, आरास १९१८, होम कमिंग. या टॉवरवरून ओटावाचे चित्र छान दिसते. कोणी तरी इथून उडी टाकून आत्महत्त्या केल्याने आता भोवताली जाळी लावलेली आहे. गावाबाहेर पिंक सरोवर नि ब्लॅक सरोवर आहेत. या वर्षी विलक्षण हिमवर्षाव झाल्याने सरोवराच्या काठी हिमाचे थर होते. त्यामुळे हवेत गारवा खूप होता. रात्रीपासून पाऊस पडत होता त्यामुळे रस्ते ओले होते. कॅनडाची भूमी किती मोकळी आहे याची कल्पना देहेजिआबरोबर नायगराला जाताना आली. मैलोमैल

वस्ती दिसत नाही. इतकेच काय रस्ताही मोकळा होता. बऱ्याच वेळानंतर एखादी मोटर भेटे. ओटाव्याचा संस्थापक कर्नल बॉय. त्याच्या नावाने शहर वसले ते बॉयटाऊन. पण पुढे १८५४ मध्ये गावाचे नाव बदलून ओटावा ठेवण्यात आले. मार्गावर मॅपेल नि बर्च या झाडांची जंगले लागली. कॅनडाच्या ध्वजावर मॅपेलचे पान असते असे डॉ. देहेजिआंनी सांगितले.

तासाभराने प्रेसकॉटपाशी हायवे लागला. मग डाव्या हाताला लेक ओंटारिओ दिसले. या सरोवरात १४०० बेटे आहेत म्हणून या भागाला हजार बेटांचा प्रदेश म्हणतात. वाटेत एक प्रचंड ट्रक दिसला. त्यावरून छोटे घर नेण्यात येत होते.

साडेआठला पाऊस कमी झाला. आकाश उघडू लागले. वाटेवर एक छोटी नदी नि टुमदार गाव लागले. नऊनंतर शेनॉनव्हिल आले. त्यानंतर ट्रेंट नदी आली. आकाश निरभ्र झाले. सूर्य तळपू लागला. गावाच्या वस्तीची कल्पना पुढील आकड्यांनी येईल. एक गावाची वस्ती होती २५०० तर दुसऱ्याची ८५००. हॅमिल्टन गावानंतर एरी सरोवर आले. साडेअकराच्या सुमाराला नायगरा नगरपालिका लागली. पुन्हा ओंटारिओ सरोवर दिसले. त्याच्याकडे पाहिले की, समुद्राचा भास होतो. बारा वाजता नायगरा धबधब्यापाशी आलो. इथे शेकडो मोटारी नि हजारो प्रवासी होते. इथल्या उद्यानात हिंडत असताना घाटकोपरच्या डॉ. चंद्रा शहा अकस्मात भेटल्या. त्यांच्याबरोबर जितेंद्र शहा नि त्यांची पत्नी होती.

नायगऱ्याच्या धबधब्याचे दोन भाग आहेत. एक कॅनेडियन नि दुसरा अमेरिकन. कॅनेडियन मोठा आहे. घोड्याच्या नालाच्या आकाराचा तो असून त्याची उंची १६० फूट नि लांबी २,००० फूट आहे. अमेरिकन भागाची उंची १६७ फूट नि लांबी १,००० फूट आहे. धबधब्याभोवती सुंदर उपवने केलेली आहेत. पाण्याच्या धारेला हिरवी छटा असून प्रवाहातून बर्फाच्या लाद्या वाहात येत होत्या. आणि इतक्या दूरवर थंड जलतुषार अंगावर येत होते. खाली बोगदे असून त्याला सिनिक टनेल्स म्हणतात. तिथे जाण्यासाठी माणशी दीड डॉलर द्यावा लागतो नि लिफ्टने खाली जाण्यापूर्वी रेनकोट नि गम शू घालावे लागतात. प्रपाताचा जोर असा होता की, भूमीला कंप आहे असे वाटते. पाण्याच्या दाबाने हा भाग ढासळला तर ! असा विचार मनात येतो आणि...!

टनेल्सचे तीन विभाग आहेत. रेनबो, कॅटॅरॅक्ट, नि ग्रेट फॉल. इथे धबधबा खालच्या पाण्याला भिडताना दिसतो, नि जवळ उभे राहिले की, पाण्याच्या फवाऱ्याने सचैल स्नान होते.

नायगराचा धबधबा उंच जागेवरून पाहाण्यासाठी तीन टॉवर्स आहेत. आम्ही नायगरा इंटरनॅशनल सेंटर स्कायलॉन यावर गेलो. लिफ्टने वर जाण्यासाठी तिकीट काढावे लागते. स्कायलॉनचे तीन भाग आहेत. पहिल्यात राईडस नि गेम्स आहेत, दुसऱ्यात मॅझेनीन फ्लोअर आहे नि शेवटी टॉवर व्ह्यू आहे. इथे उभे राहिले की, आयफेल टॉवरची आठवण येते. खूप लांबवरून वाहात येणारी विशाल पात्राची नदी इथून दिसते.

टोरँटोला जाण्याचे रद्द केल्याने येताना त्या गावातून आलो. वाटेवर लेक शोअर लागले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोटारींची गर्दी होती. पण टोरँटोला परतणाऱ्या लोकांची गर्दी अधिक आढळली. भोवतालचा प्रदेश सपाट होता. सात वाजले होते पण सूर्यास्त झाला नव्हता. सूर्य मावळला. अंधार झाल्यावर चंद्रबिंब वर आले. पौर्णिमेचा चंद्र होता. थंड हवा, रम्य निशा, मोकळा रस्ता आणि पिठोरी चांदणे– वाटले प्रवास संपूच नये.

कॅनेडियन पार्लमेंटची इमारत थॉमस पुलरने १८५९ ते ६५ च्या दरम्यान बांधली. १९१९ मध्ये तिचा मोठा भाग आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. फक्त ग्रंथालय वाचले. जॉर्ज पिकॉकने ती इमारत पुन्हा बांधली. पार्लमेंटचे ग्रीन चेंबर लोकसभा नि रेड चेंबर– राज्यसभा– असे दोन भाग आहेत. आम्ही रेड चेंबर नि ग्रंथालय त्यांच्यातून वाटाड्याबरोबर हिंडलो. रेड चेंबरमधली पहिल्या महायुद्धावरची चित्रे बेव्हरब्रूकने दिली आहेत. छतावरच्या नक्षिकामात कॅनेडियन लोकांची वंशकथा सांगितली आहे.

मिसेस शहाणींचे एक बंधू श्री. बस्तिकर ओटाव्याला एका कंपनीत इंजिनियर आहेत. त्यांच्याकडे रात्री जेवायला गेलो. त्यांची पत्नी युरोपीय आहे. पण त्या दोघांनी अस्सल भारतीय जेवण तयार केले होते. त्यांच्या कंपनीत कसे काम चालते ते पाहाण्यास दुसऱ्या दिवशी गेलो. श्री. बस्तिकरांनी एक तांत्रिक शोध लावला होता. श्री. बस्तिकरांच्या फोटोसहित असलेला त्या शोधाचा न्यूज रिलिज तिथल्या जनता संपर्क अधिकाऱ्याने मला दिला. ओटावाला ठरल्यापेक्षा आम्ही जास्त राहिलो होतो. तेव्हा जाताना बोस्टनला उतरावे का न्यूयॉर्कहून

तिकडे यावे याचा विचार करत असताना डॉ. देहेजिआ म्हणाले की, जातानाच उतरा. डॉ. पाटील तिथे आहेत. मी त्यांना फोन करतो.

ओटाव्याहून अर्ध्या तासात मॉंट्रिलला आलो. बोस्टनचे विमान एक तासाने सुटणार होते. फक्त पंधरा मिनिटे आधी सामान आले. नंतर अमेरिकन कस्टम तपासणी झाली. मग पळत गेलो. पण दरवाजावर अडविले. ठराविक पत्रक भरल्याशिवाय पासपोर्टवर शिक्का बसणार नाही असे तिथल्या माणसाने सांगितले. घाईने पत्रक भरून पळत विमानाकडे आलो. आत शिरलो नि दरवाजा बंद झाला. आम्हाला शेवटची आसने मिळाली. माझ्या उजव्या हाताला खिडकीपाशी अमेरिकन मुलगी होती नि डाव्या हाताला निग्रो तरुण होता. अमेरिकेच्या सामाजिक जीवनाच्या अनुभवाची सुरुवात झाली. या प्रवासात कोणी कोणाशी बोलले नाही.

विमान धुक्यातून गेले. बोस्टन जसे जवळ आले तसे धुके वाढले. उतरताना काहीच दिसले नाही. विमानतळावर पावसाचे शिंतोडे पडत होते. विमानतळाचा विस्तार अफाट आहे. अमेरिकेतील क्रांतियुद्धाला बोस्टनपासून सुरुवात झाली. या क्रांतीचा इतिहास लिहिण्याचा माझा विचार असल्याने बोस्टनविषयी मी बरेच वाचले. त्या बोस्टनच्या भूमीवर मी उभा होतो !

सकाळी डॉ. मिसेस पाटील यांनी गावात जायच्या एका थांब्यापाशी आम्हाला सोडून तिथून ट्रॅम कशी घ्यायची नि परत कसे यायचे याची माहिती दिली. काही घटना योगायोगाच्या असतात. आम्ही उभे होतो तिथेच एक तरुण मुलगी उभी होती. ती वर्षभर जयपूरला शिकायला होती. आम्ही गावात नवखे आहोत हे तिच्या लक्षात आल्याने ट्रॅम आल्यावर पैसे किती द्यायचे, कोठे उतरायचे हे तिने डॉक्टरला सांगितले. इतकेच नाही तर स्वतःच्या कामाची घाई असूनही ती आमच्याबरोबर शेरटॉन हॉटेलपर्यंत आली नि नगरसहलीची तिकिटे काढून देण्यापर्यंत तिने मदत केली. मी हॉटेलच्या बाहेर उभा होतो. पलीकडे एक भारतीय तरुण उभा होता. थोड्या वेळाने तो माझ्याकडे आला आणि भारतातून आलात का, अशी त्याने पृच्छा केली.

‘ होय मी मुंबईचा. दोन दिवस बोस्टनला राहणार आहे. ’

‘ अस्सं, माझे नाव दांडेकर. जोगळेकर या माझ्या मित्राची वाट पहात आहे.’

‘ अच्छा, माझे नावही जोगळेकर, ’ मी सांगितले. मग सहलीच्या गप्पा मारत उभे राहिलो. तेही सहलीला येणार होते. पण त्यांच्या मित्राला उशीर झाल्याने आमची भेट इथेच संपली.

बस-ड्रायव्हरकडे गाईडचे काम होते. तो चांगला उंच नि धिप्पाड होता. त्याच्या बोलण्याची लकबही छान होती. त्याने सुरुवात केली ‘ फोक्स ’ या शब्दाने. लंडनला ‘ लेडीज ॲण्ड जंटलमेन ’ अशी सुरुवात झाली होती. सिगारेट ओढायला मनाई असल्याची सूचना बसमध्ये होती. पण स्वतः सिगारेट ओढायला सुरुवात करून तुम्ही ओढू शकता असे त्याने आम्हाला सांगितले. नंतर तो म्हणाला, ‘ तुम्ही आपापसात बोलू नका असे मी म्हणणार नाही. पण मोठ्याने बोलू नका. कारण मग मी बोलेन ते नीट ऐकू येणार नाही.’ इंग्रजी न समजणाऱ्या लोकांनी तरीही मोठ्याने बोलणे चालू ठेवल्याने तो खूप रागावला. मग शेवटी अजिजीच्या शब्दात म्हणाला, “ त्यांच्या भाषेत त्यांना समजावणारे कोणी नाहीत काय? ” एक इसम निघाला तेव्हा हा कटू प्रसंग संपला.

बोस्टन लायब्ररी, फ्रॉगलेन, बोस्टन स्ट्रीट, बेकन स्ट्रीट, बेकन हील असे करत बस ओल्ड स्टेट हाऊसवरून गेली. याच भागात इंग्रज शिपायांनी गोळीबार केला होता. त्यात चार-सहा अमेरिकन मारले गेले होते. अमेरिकेच्या क्रांतीच्या इतिहासात याला बोस्टन मॅसेकर म्हणतात. अमेरिकन स्वातंत्र्याचा श्रेष्ठ प्रचारक सॅम्युएल ॲडम्स याचा येथे पुतळा आहे. येथून लहान नागमोडी रस्त्याने आम्ही पॉल रिव्हिरीच्या घराकडे नि कारखान्याकडे आलो. तेथून कोप्स हील, वगैरे भागातून हिंडत आम्ही बंदराकडे आलो. इथे कॉन्स्टिट्यूशन ही अमेरिकन युद्धनौका ठेवलेली आहे. १७९७ मध्ये ती बांधली गेली. कोणत्याही सागरी लढाईत तिचा पराभव झाला नाही हा तिचा लौकिक. सुमारे ऐंशी वर्षांनंतर तिला निवृत्त करण्यात आले. १९२० मध्ये तिला मोडीत काढण्याचे ठरले. परंतु शाळेतल्या मुलांना ही गोष्ट समजली तेव्हा त्यांनी या युद्धनौकेला वाचविण्यासाठी निधी जमवण्यास सुरुवात केली. मग अमेरिकन शासनाने तिला मोडीत न काढायचे ठरवले. तिच्यावर त्या काळातल्या वस्तू जतन केलेल्या आहेत. १७९९ मध्ये ऑगस्ट ते डिसेंबर या काळात ज्या लढाया झाल्या त्याचे कागदपत्र इथे आहेत. मला कौतुक वाटले ते मात्र खलाशांच्या ग्रंथालयाचे. त्यातले एक पुस्तक होते ‘ प्राचीन श्रेष्ठ चित्रकार नि मूर्तिकार यांची

चरित्रे.' दोनशे वर्षापूर्वीचा अमेरिकन खलाशी असे पुस्तक वाचतो यावरून काय दिसते !

बंकर हील स्मारकाच्या बाजूने चार्लस नदीकडे आलो. तेथून लाँग ब्रीज, एम. आय. टी., हॉवर्ड बिझनेस स्कूल यावरून म्युझियमकडे आलो. त्यात काचेच्या वस्तूंचा संग्रह आहे. लिओपोल्ड ब्लॉशका हा कल्पक जर्मन. काचेच्या माध्यमातून, फळे, फुले, झाडे यांची मॉडेल्स करण्याची पद्धती त्याने शोधून काढली. जर्मनीमधल्या ड्रेसडेनपासल्या होस्टेरव्हित्झ या गावात त्याचा कारखाना होता. ही विद्या त्याच्या कुटुंबाबरोबरच संपली. रुडॉल्फ ब्लॉशका याने मेरी वेअर या अमेरिकन बाईस ही मॉडेल्स दिली. तिने वडिलांच्या नावाने– डॉ. वेअर– ही मॉडेल्स हॉवर्डला दिली. इथे प्रवेश शुल्क आहे पंचवीस सेंट. कापलेले केळे, केळफूल, लहान मुळा, रंगीबेरंगी फुले, गुलाबाची फुले, इत्यादी कृती काचेच्या कपाटात होत्या. स्पंदनाने वस्तू मोडतात, कृपया रेलू नका अशी सूचना इथे होती. फार थोड्यांनी ती पाळली. आता बस हॉवर्ड लॉ स्कूल, खाईस्ट,कॉलेज केंब्रिज कॉमन,ब्रीड हील, वगैरे भागांतून गेली. नंतर वॉशिंग्टनने स्वातंत्र्ययुद्धाचे सेनापत्य स्वीकारले त्या जागी ती काही वेळ थांबली. त्या काळातल्या तीन तोफा तिथे होत्या. मग अमेरिकन कवी लाँगफेलो याच्या घराकडे बस आली. जॉन व्हॅसेलने हे घर बांधले. युद्धकाळात वॉशिंग्टन त्यात राहिला होता.

संध्याकाळी डॉ. पाटील यांनी आम्हाला बंकर हील मॉन्युमेंटकडे नेले. तिथे पोहोचायला लांब पल्ल्याने जावे लागले. स्मारक टेकडीवर असून दोनशे फूट उंच आहे. त्याच्या डाव्या नि उजव्या हाताला जुनी जॉर्जियन पद्धतीची घरे आहेत. स्मारकापाशी कर्नल प्रेसकॉटचा पुतळा आहे. जानेवारी १, १७७६, ला अमेरिकन ध्वज इथे उभारण्यात आला. मात्र हे स्मारक आहे १९०३ चे.

ब्रिटनविरुद्ध लढाईचा प्रसंग उभा झाला तर हाताशी शस्त्रे असावीत म्हणून अमेरिकन क्रांतिकारकांनी कंकॉर्डला दारूगोळा जमा करून ठेवला होता. ब्रिटिश सेनापतीला याची बातमी होती. तेव्हा तो हस्तगत करण्याचे त्याने ठरवले. याची कुणकुण अमेरिकन क्रांतिकारकांना लागली होती. तेव्हा त्यांनी ब्रिटिशांचा डाव हाणून पाडण्याचे ठरवून ब्रिटिश सैन्य कंकॉर्डकडे निघाले की, अमेरिकन क्रांतिकारकांना त्यांनी सूचना मिळावी अशी योजना केली. ही बातमी

पोहोचवण्याचे काम पॉल रिव्हिरीकडे होते. ब्रिटिश सैन्य कंकॉर्डकडे निघाले आहे याची वार्ता मिळताच पॉल रिव्हिरी निघाला. त्याने नदी कशी ओलांडली तो लेक्झिंगटनला कसा गेला, पुढे वाटेत कसा पकडला गेला हा इतिहास रोमांचकारी आहे.

लेक्झिंगटन नि कंकॉर्डची सहल दुपारी दोनला सुरू झाली. कडक उन्ह होते. चार्लस नदी शेजारीच महाविद्यालय असल्याने असंख्य तरुण-तरुणी नदीच्या काठावर सूर्यस्नान करत होते. सुरुवातीला बस कालच्या मार्गाने गेली. नंतर पॉल रिव्हिरी ज्या मार्गाने गेला त्याने निघाली. वाटेवर लागणाऱ्या घरांविषयी नि स्थानाविषयी ड्रायव्हर माहिती देत होता. मला त्यातली बरीच ठाऊक होती. पण ज्या भूमीवर हा इतिहास घडला ती भूमी पाहण्याचाही एक आनंद असतो ! जोनाथन हॅरिंगटनचे घर, जखमी ब्रिटीश सैनिक जिथे ठेवले होते ते सँडरसनचे घर, मन्रो टॅव्हर्न, मिनिटमेन रेस्टॉरंट– मिनिटमेन म्हणजे निरोप मिळताच क्षणार्धात कामावर हजर होणारे सैनिक– वगैरे स्थाने पाहात आम्ही लेक्झिंगटनला आलो.

इथले स्मारक त्रिकोणी असून त्यात पार्करचा पुतळा आहे. मध्यभागी अमेरिकेचा ध्वज आहे. ब्रिटिश सैन्य लेक्झिंगटनला आल्यावर कॅप्टन पार्कर आपल्या मूठभर सैनिकांना घेऊन इथे उभा राहिला नि म्हणाला, ' समोरून गोळीबार झाल्याशिवाय तुम्ही बंदुका चालवू नका. पण प्रतिपक्षाला लढाई हवीच असेल तर मात्र ती याच जागी सुरू होऊ द्या. ' हुकूम कोणी दिला याविषयी इतिहास मौन पाळतो. पण फैरी झडल्या. ब्रिटिश अधिकाऱ्याने आपल्या सैनिकांना आवरले. तरी आठ अमेरिकन सैनिक मारले गेले. लेक्झिंगटनला बंदुकीच्या फैरी झडल्या हे सॅम्युएल ॲडम्सला कळले तेव्हा तो म्हणाला, ' व्हॉट ए ग्लोरिअस मॉर्निंग इज धिस. '

कंकॉर्डला जाताना काही वेळ बस पूर्वीचा रस्ता सोडून नवीन रस्त्याने धावली. मग पुन्हा पूर्वीच्या रस्त्यावर आली. पॉल रिव्हिरी ब्रिटिशांच्या हाताला लागला त्या जागी दगडी स्मारक आहे, नि त्याच्या जवळच एक हॉटेल आहे. उष्मा फार होत असल्याने लोकांनी इथे आइस्क्रिम घेतले.

थोड्या वेळात कंकॉर्ड आले. इथे घडलेल्या इतिहासाची माहिती ठराविक वेळेला सांगण्याची व्यवस्था आहे. नदी छोटी आहे. पण तिचा प्रवाह जोराचा

आहे. त्यात काही हौशी लोक नौकाविहार करत होते. नदीवरचा लाकडी पूल ओलांडून पलीकडे गेले की, एका हातात नांगर नि दुसऱ्या हातात बंदूक असलेला शेतकऱ्याचा पुतळा आहे. या स्मारकावर पुढील काव्यपंक्ती आहेत :

"By the rude bridge that arched the flood,
Their flag to April's breeze unfurled,
Here once the embattled farmers stood,
And fired the shot heard round the world."

अमेरिकन स्वातंत्र्य सैनिकांनी ब्रिटीश सैन्यावर हल्ला करताच त्या सैन्याने बोस्टनच्या दिशेला पाय वळवले. थोड्याच वेळात या माघारीला पळापळीचे स्वरूप आले. पुलाच्या अलीकडेही एक स्मारक आहे. त्यावर लिहिले होते की, ब्रिटिश आक्रमणाला पहिला विरोध या स्थानी १९ एप्रिल १७७५ या दिवशी करण्यात आला. नदीपलीकडे अमेरिकन सैनिक होते, आणि या स्मारकाच्या जागी ब्रिटिश सैन्य उभे होते. ज्या युद्धाने अमेरिकेला विमोचित केले त्यातला पहिला शत्रु-सैनिक इथे कामाला आला. परमेश्वराचे आभार मानण्यासाठी नि स्वातंत्र्याविषयी प्रेम व्यक्त करण्यासाठी हे स्मारक १८३६ मध्ये उभारण्यात आले.

पाचनंतर सहल संपली. वेळ होता म्हणून बोस्टन पब्लिक गार्डनमध्ये गेलो. ईथरचा शोध, यादवी युद्ध, बोस्टन मॅसॅकर इत्यादी स्मारके इथे आहेत. ती पाहून आम्ही पार्क स्ट्रीटकडे आलो. या स्थानकावरली घाण पाहिल्यावर अचंबा वाटला. इतकी घाण भारतीय स्थानकांवर क्वचित दिसते! येथून भुयारीने परतलो.

# न्यूयॉर्क

न्यूयॉर्कच्या दिशेला जेव्हा विमान उडाले तेव्हा खाली बोस्टन शहर तसेच बंदर, आणि त्यातल्या बोटी नि वाफ्से पावसात धुऊन निघालेले दिसले. आमच्या शेजारी बोल-घेवडी मुलगी होती. तिच्या आई-वडिलांनी घटस्फोट घेतलेला होता. आईविषयी तिला प्रेम नव्हते. रजेच्या काळात तिच्याकडे जाण्याऐवजी ती बहिणीकडे जात होती. स्पॅनिश भाषा नि इतिहास यांची ती विद्यार्थिनी असून हिप्पी संप्रदायी होती. पण तिच्या शब्दात सांगायचे म्हणजे खरी हिप्पी ! ' स्थापित समाजरचनेला विरोध हे हिप्पींचे ध्येय आहे. पण त्याच लोकांत नवीन आचारविचारांची बंधने निर्माण होत आहेत. माझा त्याला विरोध आहे. म्हणून मी मद्यपान करत नाही किंवा सिगारेट वा मॅरिहॉना ओढत नाही.' तिचे हे म्हणणे ऐकत असताना न्यूयॉर्क आले. अर्ध्या तासाचा प्रवास झाला. सामान घेऊन बाहेर आलो. पण डॉ. चंद्रा शहा नि त्यांचे बंधू हेमंत कुठेच दिसेनात. टॅक्सी करण्याचा विचार करत असताना ती दोघे आली. मोटारीने त्यांच्या घरी आलो.

जगातली आश्चर्ये आठ आणि ती म्हणजे पिरॅमीड, हॅंगीग गार्डन ऑफ बॅबिलॉन, स्टॅच्यू ऑफ झेप, टेंपल ऑफ डायना, टूंम ऑफ मौसालस, कलोसस ऑफ ऱ्होडस, लाईट हाऊस ऑफ फॅरॉस, नि एंपायर स्टेट बिल्डिंग. यांतले हे शेवटचे न्यूयॉर्कमध्ये आहे. तिकडे जाण्यासाठी

क्विन्स या भुयारी स्थानकावर आलो. इथे टोकन्सची पद्धत आहे. स्थानकात प्रवेश करण्यासाठी घेतलेले टोकन दारापासल्या यंत्रात टाकले की, पुढे जाण्याचा मार्ग मोकळा होतो. गाडीत गर्दी नव्हती. सुरुवातीला काही स्थानके ती वरून जाते. मग भूमिगत होते.

इमारत मॅनहॅटनच्या मध्यभागी असून सुमारे पाव मैल उंच आहे. म्हणून तिला कॅथिड्रल ऑफ द स्काइज असे म्हणतात. आतापर्यंत सुमारे चार कोटी लोकांनी ती पाहिली आहे. ती बांधताना जितकी खडक नि माती हलविण्यात आली त्याच्या एक-तृतीयांश वजनाची ही इमारत असून तिची किंमत ५५कोटी डॉलर्स आहे. वर जाण्यासाठी लिफ्टचे तिकीट काढले. पहिला टप्पा होता ८६ व्या मजल्यावर आणि नंतरचा होता १०२ व्या मजल्यावर. दोन्ही मजल्यांवरून सगळे न्यूयॉर्क दिसते. कोणता भाग कुठे आहे हे दाखवणारा नकाशा इथे मिळतो. त्यात न्यूयॉर्क चार भागात दाखवून प्रत्येक भागातील महत्त्वाची इमारत, उद्यान वगैरे स्थळांचा निर्देश केलेला आहे. या नकाशाच्या साहाय्याने न्यूयॉर्कची चटकन माहिती होते.

वास्तुशिल्पाचा एक छान नमुना अशी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या इमारतीची ख्याती आहे. ती पाहण्यास शुल्क द्यावे लागते. आमच्या गटाचे स्वागत एका भारतीय मुलीने करून नंतर तिने आम्हाला एका युरोपीय गाईडच्या स्वाधीन केले. या नवीन गाईडने जनरल असेंब्ली, सिक्युरिटी कौन्सिल, ट्रस्टीशिप कौन्सिल इत्यादी विभागांतुन हिंडवले आणि तिथे काम कसे चालते याची माहिती दिली. आम्ही जनरल असेम्ब्लीच्या सभागृहात असताना, क्रुश्चेवने इथेच पायातला जोडा काढला होता का? असा प्रश्न अनेकांनी गाईडला विचारला. खाली तळघरात छोटी दुकाने आहेत. तसेच एक उपाहारगृह असून बाहेर कॉफी, आइस्क्रिम देणारी यंत्रे होती. पण त्यातली दोन चालत नव्हती. ज्यांनी पैसे टाकले होते अशी दोन चार पोरे यंत्राला लाथ मारून पैसे परत मिळतात काय ते पाहात होती. अमेरिकेतही यंत्रे बंद पडतात नि त्यांच्याकडे कोणी लक्ष देत नाही ही गोष्ट अजब करणारी होती.

मुंबईप्रमाणे न्यूयॉर्क अस्वच्छ आहे. 'पोस्ट नो बील्स' अशा पाट्या असूनही जाहिराती डकवलेल्या होत्या. एका स्थानकाच्या नकाशावरच जाहिरात डकव-लेली होती. रस्त्यावर घाण होती. गटारांतले पाणी काही रस्त्यावरून वाहात

होते. तसेच गटाराच्या बंद तोंडातून अशुद्ध वाफा वर येत होत्या. कागदाचे तुकडे, सिगारेटची थोटके मुबलक होती. धूम्रपानास मनाई असणाऱ्या डब्यात लोक सिगारेट ओढत. गाडीत किंवा रस्त्यावर एखादा तरी आंधळा भिकारी भेटे. २५ मेच्या न्यूयॉर्क टाइम्सच्या अंकात पुढील टिपण होते : " शहरी अमेरिका सचेतन होण्यासाठी आक्रोश करत असताना पैशाच्या अभावी शहरातल्या सोयी बंद कराव्या लागत आहेत. "

स्टॅच्यू ऑफ लिबर्टीकडे जाण्यासाठी साऊथ फेरीकडे आलो. बोटीला वेळ असल्याने तिथल्या उद्यानात बसलो होतो. आमच्यासारखे शेकडो हौशी प्रवासी तिथे होते. कोणी फराळ करत होते, कोणी थंड पेय पीत होते. आणि नको असलेला पदार्थ किंवा कागदाचे ग्लास जवळच्या पेटीत टाकत होते. काही समयाने निर्वासितासारखा दिसणारा एक मध्यमवयीन गोरा इसम त्या पेटीपाशी आला. नंतर त्याने कागद दूर करून काही पदार्थ उचलले. ही गोष्ट सर्व लोक पाहात होते. समृद्ध देशातली ही स्थिती पाहून मी अस्वस्थ झालो नि उठून गेलो.

स्वतंत्रता देवीच्या पुतळ्याचा इतिहास मोठा गंमतीदार आहे. फ्रेंच इतिहासकार लाबोटे यांच्या घरी भोजनासाठी समाजातले प्रतिष्ठित लोक जमले होते. त्यात शिल्पकार बॉर्थोल्डी हाही होता. या वेळी मैत्रीचे प्रतीक म्हणून असा पुतळा फ्रान्सने अमेरिकेला द्यावा अशी कल्पना निघाली. पण तिच्याविषयी फार उत्साह न दिसल्याने ती मागे पडली. नंतर काही वर्षांनी ती कल्पना पुन्हा पुढे आली. मग असे ठरले की, अमेरिकेने चौथरा दिला तर फ्रान्सने पुतळा द्यावा. पण गंमत म्हणजे या स्मारकाला अमेरिकेत विरोध झाला. पुतळा न्यूयॉर्कमध्ये उभा राहाणार असल्याने इतर राज्यांनी चौथऱ्यासाठी द्रव्य का द्यावे या मुद्द्यावर वाद सुरू झाला. ' न्यूयॉर्क लाईट हाऊस ' असे चेष्टेचे वर्णन या स्मारकाच्या संबंधात करण्यात आले. शेवटी पुलित्झर यांनी आपल्या वृत्तपत्रातून सदर स्मारकाची कल्पना उचलून धरली. पुढे शाळेतल्या मुलांनी पैसे जमवण्यास सुरुवात केली. इकडे फ्रान्समध्येही सरकारी मदतीशिवाय स्मारकासाठी द्रव्य जमा करण्यात आले. अशा प्रकारे स्मारकाची कल्पना सर्वमान्य झाली.

या स्मारकाचे काम बार्थोल्डीकडे सोपविण्यात आले होते. त्याने अनेक आराखडे काढले होते. पण हल्लीच्या स्मारकाची कल्पना त्याला न्यूयॉर्कला बोटीने येत असताना सुचली. स्मारकाचे उद्घाटन प्रेसिडेन्ट क्लिव्हलँड यांनी

ऑक्टोबर १८८६ मध्ये केले. या पुतळ्याकडे यायला बोटीने पंधरा मिनिटे लागतात. लिफ्टने चौथऱ्यावर आले की, त्यावरून न्यूयॉर्कची स्कायलाईन छान दिसते. वर जाण्यासाठी आत १६८ पायऱ्यांचा गोल जिना आहे. समुद्र-सपाटीपासून स्वतंत्रतादेवीच्या हातातील मशालीपर्यंत ३०० फूट होतात. माझ्या भूगोलाच्या पुस्तकात या पुतळ्याचे चित्र होते. या पुतळ्याच्या डोळ्यातून न्यूयॉर्कला मी पाहीन असे त्या वेळी मला स्वप्नात वाटले नव्हते.

पॅरिसचा लुव्हे, लंडनची नॅशनल गॅलरी, त्याप्रमाणे न्यूयॉर्कचा मेट्रोपोलिटन म्युझियम ऑफ आर्ट आहे. इथे प्रवेश मोफत आहे. मात्र काही तरी देणगी द्या अशी विनंती होती. या म्युझियमची कल्पना जॉन जे या अमेरिकन राजदूताची. १८७० मध्ये या कल्पनेने मूर्त स्वरूप घेतले. म्युझियममधली काही वचने कलेचे स्वरूप विशद करतात. ( १ ) हे लक्षात ठेवायला हवे की, लढाईचा घोडा, वस्त्रहीन स्त्री, किंवा एखादी घटना हे चित्र होण्यापूर्वी मुळात एक विशिष्ट क्रमाने रंगवलेला सपाट कागद असतो. ( २ ) वस्तूविषयी मला जे वाटते त्याप्रमाणे मी चित्रे काढतो. ती दिसतात तशी नाही— पॉब्लो पिकॅसो. ( ३ ) अपघात, रानटीपणा, लूट, युद्ध— यातून काय टिकणार ? मानवी प्रेम नि कला— विस्मृतीविरुद्धच्या लढ्यातील दोन सुंदर शस्त्रे.

या समयी म्युझियममध्ये क्युबिस्ट चित्रांचे प्रदर्शन होते. या पद्धतीच्या चित्रकलेचा पिकॅसो हा निर्माता. १९०६ ते २१ हा या कलेचा खरा काल. तिचे दुसरे पुरस्कर्ते म्हणजे ब्रॉक, ग्राइस, लेगर होत. इतर कलाकारांच्याही कलाकृती इथे होत्या. त्यांची संख्या ३०० होती. ग्राइसने ‘ पोर्ट्रेट ऑफ पिकॅसो ’ हे चित्र काढले आहे. ते पाहिल्यावर हे चित्र आपलेच आहे का असा प्रश्न पिकॅसोच्या मनात आला असेल का ? ते चित्र पिकॅसोच्या नियमाप्रमाणेच होते.

एका अंधाऱ्या खोलीत अती प्राचीन इजिप्शियन जीवनाच्या प्रतीमा ठेवलेल्या असून त्या पाहाताना पुढील भाष्य ऐकू येते. ‘ चार हजार वर्षे हा अनंतकाल आहे. नुसते पुन्हा पुन्हा म्हणून किती युगे संपली याची कल्पना येणार नाही. थांबा नि विचार करा की, विलियम द कॉंकररचा काल किती दूर आहे तो. परंतु त्यामुळे तुम्ही फक्त एक-चतुर्थांश काळ मागे जाता. ज्युलियस सिझरबरोबर अर्धा नि सौल नि डेव्हिड यांच्याबरोबर तीन-चतुर्थांश काळ मागे जाता. तरीही एक हजार वर्षांचा काळ कल्पनेने मागे जाण्याचा बाकी राहतो. त्या लहान

अंधाऱ्या शुष्क कोठडीत या इवल्याशा नावा नि प्रतिमा बाहेरच्या जगात काय चालले आहे याविषयी बेफिकीर होत्या. परंतु त्यांच्यात जराही फरक पडलेला नाही. त्यांना या जागी ठेवणाऱ्या माणसांच्या बोटांचे ठसे अजूनही त्यांच्यावर ताजे आहेत.' हे भाष्य ऐकताना आपले मनही प्राचीन काळात जाते.

याशिवाय उत्खननात सापडलेल्या वस्तू, पुतळे, यांचेही प्रदर्शन होते. त्यातले पुतळे हे रोमन, ग्रीक, फ्रेंच, इंग्लिश इत्यादी प्रदेशातले होते. या प्रदर्शनातले पुढील टिपण मला बोधप्रद वाटले —' इतिहासाच्या राजपथावर शतकाशतकांच्या मानवी आठवणीतल्या मैलांच्या दगडाप्रमाणे असणाऱ्या मानवाच्या विस्मयकारक मूर्ती या नश्वर असणाऱ्या त्याच्या देहाचे चिरस्थायी स्मारक आहे.' दक्षिण भारत, ओरिसा इथल्याही कलाकृती आहेत. एका बोधिसत्वाला कुंकुमतिलक नि मिशा आहेत. सिंबल विभागात जपानी, आफ्रिकन, मध्ययुगीन ख्रिश्चन सिंबॉलिझमचे प्रदर्शन आहे. याशिवाय रुबेन, डाईक, जॉर्डन, ग्रेको, रेंब्रॉ, व्हॅलेक्झुझ यांची चित्रे आहेत.

कोलंबिया युनिव्हर्सिटीच्या मेडिकल सेन्टरकडे भुयारीने जाण्यास आम्ही निघालो. वाटेत एका स्थानकावर गाडी बदलावी लागली. तिथल्या एका जाहिरातीने माझे लक्ष वेधून घेतले. त्यात विद्यार्थ्यांना शाळेत राहण्याविषयी आवाहन होते, ' शिकलेल्या मुलांच्या दुप्पट न शिकलेली मुले बेकार आहेत. तेव्हा शाळेत असल्यास तिथेच राहा.' मेडिकल सेंटरवरून आम्ही लिंकन सेंटर फॉर परफॉर्मिंग आर्टसकडे आलो. सेन्टर पाहाण्यास प्रवेश शुल्क आहे. या सेन्टरमध्ये फिलहॉर्मोनिक हॉल, न्यू यॉर्क स्टेट थिएटर, लायब्ररी अॅन्ड म्युझियम ऑफ परफॉर्मिंग आर्टस, बुमॉन्ट थिएटर, नि मेट्रो पोलिटन ऑपेरा हाऊस यांचा अंतर्भाव होतो. सेन्टर भव्य असून त्याचे आश्रयदाते रॉकफेलर, फोर्ड वगैरे आहेत. प्रत्येक तासाला या सेन्टरची सहल असते.

फिलहॉर्मोनिक हॉलचा कारभार कॉम्प्युटरवर चालतो. इथला ऑर्केस्टा या देशातला जुना असून त्याचे कंडक्टर लिओनार्ड बर्नस्टिन आहेत. न्यूयॉर्क स्टेट थिएटरमध्ये चालू असलेल्या नाटकाला प्रेक्षक उशिरा आला तर त्याला अंक संपेपर्यंत नाटक बाहेरच्या टेलिव्हिजनवर पाहावे लागते. लायब्ररी अॅन्ड म्युझियममध्ये संगीत, नाट्य, नृत्य यावरची पुस्तके संग्रहीत करण्यात येत आहेत. मेट्रो पोलिटन ऑपेरा हाऊसमधली झुंबरे खरोखर शोभिवंत

आहेत. आतल्या चार रंगमंचांपैकी तीन रिमोट कंट्रोलने चालतात. इथले सर्व काही अवाढव्य आहे.

रॉकफेलर सेन्टरचे वर्णन ' सिटी विदीन सिटी ' असे करतात. त्याच्या आवारात सतरा इमारती असून त्यात दोन लाख लोक कामाला आहेत. व्यापार नि लोकरंजन याचे इतके मोठे खाजगी मालकीचे केन्द्र दुसरे नाही. यात रेडिओ सिटी, म्युझिक हॉल-शो, प्लेस ऑफ द नेशन आहे. इथले मनोरंजनाचे कार्यक्रम साठ लाख लोक दरवर्षी पाहातात. खेळ सकाळी साडेदहाला सुरू होऊन दिवसभर चालतो. केव्हाही तिकीट काढून आत जाता येते आणि कितीही वेळ बसता येते.

वाद्यवृंद, चित्रपट, ऑर्केस्ट्रा नि सांघिक नृत्य गायन असा चार विभागांत या आठवड्याचा कार्यक्रम होता. प्लाझा सूट हा चित्रपट मला आवडला. वॉल्टर मॅथॉचे काम फारच सुंदर झाले होते. टाइम मॅगेझिनने मॅथॉवर एक लेख त्याच सुमारास लिहिला होता. संगीत नृत्याचा कार्यक्रम डोळे दिपवणारा होतो. प्रकाश-योजना, रंगमंचाच्या शेजारी दुसरा मंच वाद्यवृंदासह वर येणे, रंगीबेरंगी पेहेरावातल्या लयबद्ध पदन्यास करणाऱ्या मुली, विशिष्ट क्षणी एकत्र होणारा वाद्यांचा झणत्कार– यांमुळे कार्यक्रम मनोज्ञ होतो.

अमेरिकेच्या स्वातंत्र्ययुद्धातील काही महत्त्वाचे प्रसंग न्यू जर्सी संस्थानात घडले. ही स्थळे मला बघायची होती. मुम्बईचे डॉ. तळवलकर यांचे एक चिरंजीव न्यूयॉर्कला असतात. त्यांनी एके दिवशी मोटारने काही स्थळांना आम्हांला नेऊन आणले. सन १७८०–८१ मध्ये वॉशिंग्टनचे सैन्य मॉरिस टाऊनमधल्या डोंगराळ भागात तळ ठोकून होते. इथे पायथ्याशी हॉस्पिटल असून डोंगरावर झोपड्या आहेत. प्रत्येक झोपडीत बारा माणसांची सोय होती. जवळच वीक हाऊस आहे. हेन्री वीक हा शेतकरी त्या काळी जशी बागाईत करत होता तशीच बागाईत आज होती.

रॉकी हिलला रॉकिंगहॅम नावाचे दुमजली घर आहे. या घरात युद्धाच्या काळात वॉशिंग्टन राहात होता. तो इथे असतानाच शस्त्रसंधी झाला. आम्ही गेलो तेव्हा घर बंद होते. पण थोड्या वेळाने उघडले. इथल्या बाईने आम्हाला रॉकिंगहॅमची माहिती देणारे पत्रक तसेच ट्रेंटॉन, प्रिस्टन येथील लढायांची माहिती देणारी पुस्तिका दिली. या घरातल्या ब्ल्यू रूममध्ये वॉशिंग्टनने सैन्याचा

निरोप घेणारे भाषण तयार करून ते मग सञ्जात येऊन वाचले. घराभोवतीच्या उद्यानातील झाडे पांढऱ्या फुलांनी डवरली होती.

प्रिंस्टनच्या लढाईचे स्मारक शोधून काढताना थोडी यातायात झाली. त्या लढाईचे हे स्मारक सहा डोरिक स्तंभांचे आहे. ३ जानेवारी १७७७ ला ब्रिटिशांचा इथे वॉशिंग्टनने पराभव केला. या लढाईत गारद झालेल्या ब्रिटीश नि अमेरिकन सैनिकांचे दफन इथे झाले. जवळच ऑल्फ्रेड नॉयेस या कवीच्या या लढाईच्या संबंधातील काही काव्यपंक्ती कोरलेल्या आहेत.

ट्रेंटॉन ही न्यू जर्सी संस्थानाची राजधानी. पण स्वातंत्र्ययुद्धातली अनेक घटनास्थाने इथे असल्याने गावाला महत्त्व अधिक. ट्रेंटॉनच्या लढाईत ब्रिटीश सैन्याचा अमेरिकन सैन्याने पराभव केला. अमेरिकन तोफखाना ज्या जागी होता तिथे १५० फूट उंचीचा विजयस्तंभ आहे. या स्मारकासाठीची चळवळ १८४३ मध्ये, म्हणजे स्वातंत्र्ययुद्धानंतर साठ एक वर्षांनी, सुरू झाली. पण निधी जमून स्मारक उभे राहाण्यास १९ ऑक्टोबर १८९३ हा दिवस उजाडावा लागला. स्वातंत्र्याच्या स्मारकाविषयी परदेशातही किती उत्साह असतो याची कल्पना यावरून यावी !

इथल्या अर्ले कोर्ट हाऊसपाशी अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा वाचण्यात आला. तसेच न्यू जर्सी नॅशनल बँकेच्या इमारतीच्या कोपऱ्यातल्या एका शिला-लेखात म्हटले आहे की, न्यू जर्सीच्या ३९ प्रतिनिधींनी अमेरिकन घटनेला मान्यता दिली ती ही जागा. फ्रेंच नि अमेरिकन इंडियन यांच्याशी १७५८ मध्ये झालेल्या लढाईत भाग घेण्यासाठी जे ब्रिटिश सैन्य आले होते त्यांच्या राहण्यासाठी ओल्ड बरॅक्स बांधण्यात आल्या होत्या. ट्रेंटॉनच्या लढाईपूर्वी ब्रिटिशांतर्फे लढणारे जर्मन सैनिक — हेसियन — इथे राहिले होते.

आता संध्याकाळ होऊ लागली होती. तेव्हा वॉशिंग्टनने डेलावर नदी जिथे ओलांडली त्या जागी थॉमप्सन निली हाऊस, नि मॅकॉंकी फेरी पाहून मग व्हॅली फोर्जपर्यंत आलो नि परत वळलो.

वेस्ट पॉईन्ट हे आपल्याकडच्या खडकवासल्याप्रमाणे अमेरिकेचे मुख्य सैनिक विद्यालय आहे. एके दिवशी जितेन्द्र शहाने मोटारने आम्हाला तिकडे नेले. शाळा डोंगरमाथ्यावर आहे. तिची जागा रमणीय असून भोवतालीही डोंगराची माळ आहे, नि पलीकडे हडसन नदीचे विशाल पात्र दिसते.

स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात ही जागा सैनिकी दृष्टीने महत्त्वाची होती. इथे काही समय वॉशिंग्टनचे सैनिक कार्यालय होते. पुढे अमेरिका स्वतंत्र झाल्यावर या जागी सैनिक विद्यालय काढावे अशी सूचना वॉशिंग्टनने केली. ४ जुलै १८०२ या दिवशी हे विद्यालय सुरू झाले. त्या वेळी यात दहा विद्यार्थी होते. कर्नल थाएर त्याचा पहिला संचालक. त्याचा इथे पुतळा आहे. त्याचप्रमाणे यादवी युद्धात कामास आलेल्या सैनिक अधिकाऱ्यांच्या स्मृतीचे मोठे स्मारक आहे. रजा असल्याने शाळा बंद होती. विद्यार्थ्यांना भेटायला आलेले त्यांचे नातलग नि आमच्यासारखे हौशी प्रवासी यांचीच गर्दी होती.

संध्याकाळ झाली होती. झाडी दाट असल्याने तिची सावली पडून रस्त्यावर थोडा काळोख पडला आहे असे वाटले. मात्र झाडांच्या माथ्यांवर सोनेरी-नारंगी रंगाची सूर्यप्रभा पडून त्यांना पिवळसर झालर आली होती. रस्त्यावर मोटारींची इतकी गर्दी होती की, वॉशिंग्टन ब्रिजकडे पोहोचायला तास लागला. लाल, पांढरे दिवे, गावाचे जलाशयात दिसणारे प्रतिबिंब, मोटारींच्या रांगा, धूसर वातावरण– त्या रात्री वॉशिंग्टन ब्रिजवरून दिसलेले हे चित्र माझ्या मनःपटलावर उठलेले आहे.

## वॉशिंग्टन नि शिकॅगो

न्यूयॉर्कहून संध्याकाळी वॉशिंग्टनकडे येण्यास निघालो. या विमानतळावर पाच मिनिटांत पाच विमाने उतरली. यावरून विमान-वाहतुकीच्या गर्दीची कल्पना येईल. विमान वर गेले होते तेव्हा सूर्य कलला होता. त्याची नारंगी रंगाची किरणे खिडक्यांतून आत येत होती. काही वेळाने नदीचे पात्र दिसू लागले. वनश्री हिरवीगार असून दाट झाडी होती. या निसर्गचित्राकडे पहात असताना वॉशिंग्टन येत आहे असे कॅप्टन म्हणाला नि थोड्याच वेळात विमान उतरले. आम्हांला घेण्यासाठी डॉ. मिसेस देहेजिआ आल्या होत्या. मिसेस देहेजिआंचे यजमान हे ओटावाच्या डॉ. देहेजिआंचे बंधू.

नगरसहलीची चौकशी ग्रे लाईन बस स्थानकावर प्रथम केली. नंतर ट्रेलवेजकडे आलो. पण तिथेही हवी ती माहिती मिळेना. मग एअर टर्मिनलकडे गेलो. तिथे डायमंड टूअर्सचे छोटे कार्यालय पाहिले. म्हणून चौकशी केली. दर पंधरा मिनिटांनी त्यांची नगरसहल निघत होती. त्या सहलीत दाखल झालो.

भुयारीसाठी रस्ता खणला जात होता. त्याच्याकडे सुरुवातीलाच बस ड्रायव्हने लक्ष वेधले. मग फोर्ड थिएटर लागले. या थिएटरमध्येच लिंकनवर गोळी झाडण्यात आली होती. येथून बस यू. एस्. कोर्ट ऑफ मिलिटरी अपील, सिनेट हाऊस, सिनेट लायब्ररीवरून सुप्रीम

कोर्टापाशी आली. सर्वोच्च न्यायालयाच्या या इमारतीच्या दर्शनीय भागाचे साम्य मुंबईच्या टाऊन हॉलशी आहे. तशाच पायऱ्या, तसेच स्तंभ. 'कायद्याप्रमाणे समान न्याय' हे वचन प्रवेशदारावर लिहिले होते. ही इमारत एक कोटी डॉलर खर्च करून १९३१ मध्ये बांधण्यात आली. तिच्यासाठी लागलेला पाषाण आफ्रिका, आलाबामा या प्रदेशातून आणण्यात आला. इथल्या एका जिन्याला आधारासाठी स्तंभ नाही हे त्याचे वैशिष्ट्य. नऊ न्यायाधीश कुठे बसतात, त्यांना मदत करणारे रिसर्च स्कॉलर खाली कुठे बसतात, वकील नि प्रेक्षक कुठे बसतात ही माहिती सुप्रीम कोर्टाच्या गाईडने दिली.

यु. एस्. आर्काईव्जमध्ये डिक्लरेशन ऑफ इंडिपेन्डन्स, बिल ऑफ राईटस्, तुर्कस्थानच्या सुलतान हमीदचे अमेरिकन प्रेसिडेन्टला आलेले १८६० चे पत्र, चिनी साम्राज्याशी झालेला १८४४ च्या तहाचा कागद, वगैरे महत्त्वाचे दस्ताएवेज आहेत. याशिवाय वॉशिंग्टन नगराची रचना कोणी, कशी केली हे दाखविणारी चित्रे नि माहितीपत्रके होती. वॉशिंग्टन नगराचा आलेख पेरी चार्लस् लफाँ याने तयार केला. नगररचना ही कलेची प्रतीक असली पाहिजे अशी त्याची कल्पना. अर्थात त्याप्रमाणे झालेल्या गोष्टी दोनच– कॅपिटॉल नि व्हाईट हाऊस. राजधानीचा बाकीचा भाग आवश्यकतेप्रमाणे बांधला गेला.

वॉशिंग्टन मॉन्युमेन्ट हे हिस्टरी ॲन्ड टेक्नॉलॉजिकल म्युझिअमच्या शेजारी आहे. या स्तंभासाठी पाषाण आणण्यात आला तो जपान, सयाम, स्वित्झर्लेन्ड, वेल्स अशा भिन्न देशांतून. पोप पायसनेही एक प्रस्तर पाठवला होता. परंतु कॅथॉलिक संप्रदायविरोधी लोकांनी तो दगड पळवला त्यामुळे स्मारकासाठी येणाऱ्या द्रव्याचा ओघ आटून स्तंभाचे काम बंद पडले. पुढे कॉंग्रेसने पैशाची व्यवस्था केल्यावर स्मारक-स्तंभ उभारला गेला.

स्मिथसोनिअन इन्स्टिटय़ूट ही वॉशिंग्टनचे वैभव आहे असे म्हणावयास हरकत नाही. जेम्स स्मिथसन या इंग्लिश वैज्ञानिकाने दिलेल्या देणगीतून ही संस्था १८४६ मध्ये स्थापन झाली. या संस्थेचे नऊ विभाग असून त्यातल्या प्रत्येक वस्तूसाठी एक मिनिट द्यायचे ठरले तरी सर्व गोष्टी पाहाण्यास अडीच वर्षाचा काळ लागेल असा अंदाज सांगतात. म्युझिअम ऑफ हिस्टरी ॲन्ड टेक्नॉलॉजी या विभागातून आम्ही फेरी टाकली. हा म्युझिअम इतका मोठा आहे की, प्रत्येक वस्तूला एक मिनिट देण्याऐवजी इथल्या प्रत्येक विभागाला

एक मिनिट दिले. फोर्ड गाडीचे– टी मॉडेल, १८८० मधली हॅक पॅसेंजर मेल, शेतीची अवजारे, नदीतली मोठी जहाजे, बाल्टिमोर ट्रॅन्झीट कंपनीची पंधरा प्रवाशांची गाडी, फार्म वॅगन, स्त्री-पुरुषांचे चुंबन दाखविणारे मॉडेल नि चुंबन घेताना निघणारी विद्युत चमक, १६४० ते १७५० मधला अमेरिकेचा विकास, अमेरिकेची लोककला, नाणी, तिकिटे, अशा अनेक लक्षात राहाणाऱ्या गोष्टी इथे पाहिल्या.

आता बस व्हाईट हाऊस, ब्लेअर हाऊस, नॅशनल जिऑग्रॉफिक सोसायटी, रशियन दूतालय, सेन्ट मॅथ्यू कॅथिड्रल वगैरे स्थानांकडून लिंकन मेमोरिअलकडे आली. लिंकनच्या व्यक्तित्वासारखेच हे भव्य स्मारक आहे. त्यात उभे राहिले की, समोर मॉन्यूमेन्ट, मॉल नि कॅपिटॉलचे सुंदर चित्र दिसते. इथे खुर्चीत बसलेल्या लिंकनचा पुतळा आहे. पुतळ्यापाठीमागे लिहिले होते की, ‘ज्या लोकांसाठी त्याने राष्ट्राच्या अखंडत्वाचे रक्षण केले त्यांच्या मनात ज्याप्रमाणे त्याची स्मृती आहे त्याप्रमाणे या मंदिरातही ती जतन केली आहे.’ पुतळ्याच्या डाव्या नि उजव्या हाताला लिंकनची गाजलेली भाषणे आहेत. एक आहे ते त्याचे दुसरे अध्यक्षीय भाषण आणि दुसरे आहे ते गेटीझबर्ग. या दुसऱ्या भाषणाविषयी लॉर्ड चार्नवूड लिंकनच्या चरित्रात लिहितो की, गेटीझबर्ग राष्ट्रीय दफनभूमी करण्याचे ठरल्यावर त्या समारंभासाठी मुख्य वक्ता म्हणून एव्हरेटला निमंत्रित करण्यात आले. एव्हरेट हा फर्डा वक्ता. त्याने आपल्या वक्तृत्वाने दोन तास लोकांना मंत्रमुग्ध केले. मग लिंकनला बोलण्याची विनंती करण्यात आली. तो मात्र थोडा वेळ बोलला. आज एव्हरेटचे भाषण लोक विसरले आहेत. पण इंग्रजी भाषा जिवंत असेपर्यंत गेटीझबर्गचे लिंकनचे भाषण अमर आहे.

अर्लिंग्टन नॅशनल सिमेटरीमध्ये अमेरिकेतल्या अनेक श्रेष्ठ सेनानी नि राजधुरंधरांचे दफन झाले आहे. पण लोकांना औत्सुक्य असते ते केनेडींचे दफन झाले त्या जागेविषयी. केनेडींचे स्मारक साधे असून उंचवट्यावर आहे. त्यासाठी शुभ्र प्रस्तराचा वापर केला आहे. केनेडींच्या दोन्ही बाजूला त्यांच्या मुलांचे दफन केले असून थोड्या खालच्या भागाला सतत तेवती ज्योत आहे. पायऱ्या उतरून जरा खाली गेल्यावर भोवताली छोटी गोलाकार भिंत आहे. त्यावर केनेडींच्या अध्यक्षीय भाषणातील काही उत्तम वाक्ये कोरलेली आहेत.

ती वाक्ये वाचत असताना केनेडींच्या जीवनाचे चित्र माझ्या डोळ्यांपुढून सरकले.

येथून आम्ही ली कर्टिस मॅन्शनवरून अज्ञात सैनिकांच्या स्मारकाकडे आलो. इथे चेंजिंग ऑफ द गार्डस् कार्यक्रम पाहिला. त्यासाठी नेमलेले सैनिक १७८४ मध्ये स्थापन झालेल्या थर्ड इन्फंट्रीमधले असतात. परत येताना बस थांबा शोधताना थोडा त्रास झाला. इथल्या बसमध्ये कंडक्टर नसतो. ड्रायव्हरजवळच्या यंत्रात भाडे टाकायचे असते. त्यासाठी अचूक मोड जवळ ठेवावी लागते. हवी ती मोड जवळ नसेल तर बसमधून प्रवाशाला बाहेर जावे लागते. मग तो इसम कितीही मोठा असो. बस फ्रेन्डशिप हाईटवर आली. येथून मिसेस देहेजिआंनी मोटारने आम्हांला घरी नेले.

माऊंट व्हर्नानच्या सहलीला थोडा वेळ होता. म्हणून एअर टर्मिनलवरच्या दुकानात गेलो. शेंगदाणे नि चॉकलेट विकत घेतली. इथे वृत्तपत्रेही विकण्यास ठेवलेली होती. मात्र ‘ वाचण्यापूर्वी वृत्तपत्रांचे दाम चुकवा ’ अशी तिथे सूचना होती. मोफत वाचण्याची प्रवृत्ती सर्वच ठिकाणी असते ! फोर्ड थिएटर, एफ्. बी. आय., जॅफरसन मेमोरिअल या कालच्या रस्त्यावरून बस माऊंट व्हर्नानच्या राजमार्गावर आली. वॉशिंग्टनच्या दोनशेव्या जन्मदिनाचे स्मारक म्हणून हा पंधरा मैलाचा रस्ता तयार करण्यात आला. मार्गावर उजव्या हाताला हिरवी गर्द झाडी नि डाव्या हाताला पोटोमॅक नदी होती. नॅशनल एअरपोर्ट, अॅलेक्झांड्रिया वगैरेवरून बस गावात आली. गॅड्स्बी टॅव्हर्न, ओल्ड प्रेसब्रिटेरिअन मिटिंग हाऊस, ख्राईस्त चर्च, लॉर्ड फेअरफॅक्स नि ली कुटुंबाची घरे या जुन्या काळातल्या ऐतिहासिक स्थानावरून आम्ही माऊंट व्हर्नानपाशी आलो. इथे माऊंट व्हर्नान नि परतीच्या नौकाप्रवासाची तिकिटे आम्हाला देऊन ड्रायव्हर म्हणाला की, आगबोट पाच वाजता सुटते. ती चुकवू नका. नौकास्थानकावर कंपनीची बस असेल. तिने तुम्हाला एअर टर्मिनलवर नेण्यात येईल.

माऊंट व्हर्नान हे वाशिंग्टनचे निवासस्थान आता राष्ट्रीय वास्तू आहे. प्रवेश-द्वारापाशी दोन माहितीपत्रके मिळाली. वास्तूचे संगोपन कसे होते त्याची माहिती एकात होती आणि दुसऱ्यात मुख्य सदन तसेच बाजूची छोटी घरे, उद्यान, त्यांचा छोटा नकाशा नि त्यांच्याविषयी माहिती होती. अमेरिकन क्रांती यशस्वी होण्यास जी तीन-चार प्रमुख कारणे सांगतात त्यातील एक म्हणजे वॉशिंग्टनचे

व्यक्तित्व. सगळ्या बाजूने संकटे आली असतानाही क्रांतियुद्धाच्या सैनिक विभागाचा सगळा बोजा वॉशिंग्टनने एकट्याने पेलला.

शेतकी युगातल्या श्रीमंत शेतकऱ्याच्या घरासारखी ही वास्तू आहे. त्या काळातल्या वॉशिंग्टनच्या गोष्टी तशाच ठेवलेल्या आहेत. मुख्य सदन पाहिल्यावर पाठीमागच्या भागाकडे गेलो. त्याला जॉर्ज वॉशिंग्टन व्ह्यू म्हणतात. सुमारे दोनशे फुटांवर खाली पोटोमॅकचे पात्र आहे. निसर्गाचा हा सुंदर देखावा निवांतपणे पहाता यावा म्हणून प्रवाशांना बसण्यासाठी व्हरांड्यात खुर्च्या ठेवलेल्या आहेत. पूर आलेल्या नदीसारखे पोटोमॅकचे पात्र दिसते. आकाशात आभाळ होते. हवा थंड होती. झाडावरची फुले डोलत होती. वातावरण शांत होते. युद्धानंतर जनरल लाफायेटच्या बायकोला वॉशिंग्टनने व्हर्नोनहून पत्र पाठवले. त्यात तो लिहितो. ' आय ॲम एन्जॉइंग डोमेस्टिक इझ ॲन्ड आय एक्स्पेक्ट टू ग्लाईड जंटली डाऊन धी स्ट्रीम ऑफ लाईफ. ' सत्तेची लालसा नसणाऱ्या माणसाला वरील विचार सुचावे असेच हे स्थान आहे.

वॉशिंग्टनची समाधी पाहून आम्ही खाली नौकास्थानकाकडे आलो. हळूहळू परतीच्या प्रवाशांची गर्दी झाली. पाचच्या सुमारास जॉर्ज वॉशिंग्टन नौका आली. मिसिसिपी गॅम्बलर या चित्रपटामधल्या बोटीसारखी ही नौका वाटली. आवतीभोवती डोंगर असल्याने नि पात्र विशाल असल्याने लहान सरोवराचा काही क्षण भास होतो. पण थोडे पुढे गेल्यावर नदीचे पात्र नागमोडी झालेले दिसते. वॉशिंग्टनचे घर आता दृष्टिआड गेले. नदीच्या बाजूच्या रस्त्यावरून मोटारी जात होत्या. नौकाविहारासाठी काहीजण सेल बोटम् चालवत होते. मार्गावरच्या एका लहानशा बेटात उद्यान नि कारंजे होते.

सफर संपली. बाहेर आमच्या कंपनीशिवाय इतरांच्या बसेस उभ्या होत्या. आता काय करायचे ? शेवटी एका ड्रायव्हरने आम्हाला त्याच्या बसमध्ये घेऊन १२ पेन्सिलव्हेनियापाशी आणून सोडले. बसने घराकडे निघालो. वाटेतच दिल्लीचे वैद्य नावाचे गृहस्थ भेटले. वर्ल्ड बँकेत ते नोकरीला आहेत. परदेशात मराठी बोलणारा कोणी भेटला म्हणजे पिठल-भात जेवल्याचा आनंद !

सकाळी पावणेदहाला विमान शिकॅगोकडे निघाले. पाऊस थांबला होता. पण ढगांची गर्दी खूप होती. होस्टेसने मासिके नि वृत्तपत्रे दिली. २९ मेच्या न्यूयॉर्करच्या अंकात मॉस्कोचे वार्तापत्र होते. त्यातल्या गमतीदार भाग : " पॅशन

सॅटरडे हा सबोटनीक म्हणजे कामाचा शनिवार निघाला. एप्रिलमधल्या एका शनिवारी रशियातल्या लोकांनी समाजवादाच्या बांधणीसाठी श्रमदान करावे ही लेनिनची कल्पना. एका रशियन माणसाने मला सांगितले की, सबोटनिकच्या दिवशी माझे श्रमदान म्हणजे माझी स्वतःची मोटर धुणे.

लेनिनग्राडला आलेल्या एका अमेरिकन मुलीने टॅक्सीवाल्याकडे अचंबा व्यक्त केला की, मॉस्कोप्रमाणे इथेही सबोटनिक आहे ! ' होय. इथेही सबोटनिक आहे. फक्त तो साम्यवादी पक्षापुरता मर्यादित आहे, ' तो म्हणाला.

काळ्या सुटातली काही वयस्क माणसे हातात झाडू घेऊन गप्पा मारत उभी होती. माझ्याबरोबरच्या एका रशियन माणसाला मी ते लोक काय काम करत आहेत असे विचारले. ' ते बुद्धिवंत आहेत. प्राध्यापक लोक आहेत. शारीरिक श्रमाचे माहात्म्य ते दाखवत आहेत, ' तो म्हणाला.

सुमारे अर्ध्या तासाने वातावरण मोकळे होऊ लागले. खालची जमीन दिसू लागली. हिरवी झाडी दृष्टीला भेटली. नंतर बुद्धिबळाच्या पटावर जसे चौकोन असतात त्याप्रमाणे कापलेल्या शेतीचे काळे पिवळसर तुकडे असलेले विस्तृत मैदान दिसू लागले. मधेच मोठे शहर दिसे. बराच वेळ असे दृश्य अधूनमधून आढळले. अकराच्या सुमारास उंच इमारती, लहान उपनगरे दिसू लागली. विमान उतरू लागले. शिकॅगो आले.

बेस्टमधील माझे एक सहकारी श्री. नवकल यांनी आपल्या बंधूंना माझी व्यवस्था करण्यासाठी पत्र टाकले होते. त्यामुळे ते विमानतळावर आले होते. घर बदलण्याच्या ते गडबडीत असल्याने आमचे उद्याचे बुकिंग असलेल्या हॉटेलात आजच जाऊ असे त्यांना मी सुचवले. पण शेवटी त्यांच्या घरी सामान नेण्याचे ठरले. त्याप्रमाणे सामान ठेवून दुपारची शिकॅगोची सहल घेण्यासाठी आम्ही कोनराल्ड हिल्टनपाशी आलो.

१८३७ मध्ये शिकॅगोला नगराचे स्थान प्राप्त झाले तेव्हा त्याची वस्ती सुमारे चार हजार होती. आज ती आहे सत्तर लाख नि त्यात अकरा हजारांची भर दरवर्षी पडते. जगातले मोठे इनलँड पोर्ट असलेले शहर, राहाण्याची सोय असलेली सत्तर मजल्याची इमारत असलेले शहर, फुकट अन्नोदकाची सोय असलेले शहर, अमेरिकेतले अत्यंत स्वच्छ शहर, अल्प किमतीत घर बांधण्याची सोय असलेले शहर, अशी आपल्या गावाची बस ड्रायव्हरने स्तुती केली. हिल्टन

हॉटेलमध्ये ३००० खोल्या असून अमेरिकन प्रेसिडेन्ट शिकॅगोत आले असता या हॉटेलात उतरतात. वर्षाच्या अवधीत प्रवाशांनी किती टॉवेल्स या हॉटेलातून लंपास केले हेही ड्रायव्हरने सांगितले. असे आहे हे शिकॅगो !

नगरसहलीचे दोन भाग असतात. लूप ॲन्ड नॉर्थ लेक शोअर ड्राईव्ह आणि लूप ॲन्ड साऊथ लेक शोअर ड्राईव्ह. आम्ही दोन्ही सहलीला गेलो. सुरुवातीला भेटली ती मरिना सिटी. नगरातील उपनगर असे या इमारतीचे वर्णन करतात. तिची रचना गोलाकार असून त्यातले पहिले वीस मजले मोटारी ठेवण्यासाठी आहेत. त्याशिवाय नाट्यमंदिर, बँक्स, रेस्टॉरंट, भांडारे, दुकाने, बर्फावरून घसरण्याची रिंग, इत्यादी सोयी इथे आहेत. रहिवाश्याला इमारती-खाली यायचे नसेल तर त्याचे अडणार नाही !

द एल्क मेमोरिअलची उभारणी १९२६ सालची. हे स्मारक एगंटन स्वार टाऊन याने बांधले नि आतली मुरल्स आहेत युजेन सॅव्हेजची. स्मारक डोळ्यात भरत नाही. शिकॅगोतल्या अनेक उद्यानांपैकी लिंकन उद्यानात आम्ही फेरी टाकली. बाहेर शेक्सपिअरचा पुतळा असून त्यावर 'व्हॉट ए पीस ऑफ वर्क इज मॅन' हे वाक्य कोरलेले आहे. हॅम्लेटमधले हे वाक्य घेण्याचे काय कारण कोणास ठाऊक !

म्युझिअम ऑफ सायन्स ॲन्ड इंडस्ट्रीज हा अमेरिकेतल्या मोठ्या म्युझि-अमपैकी एक. दरवर्षी तीस लाख लोक तो पाहातात. सर्वांचे लक्ष वेधणारी गोष्ट म्हणजे अमेरिकन आरमाराने दुसऱ्या महायुद्धात पकडलेली जर्मन पाण-बुडी. एका दर्यासारंगाच्या आत्मचरित्रात– 'क्लिअर द डेकम्'– पाणबुडी पकडल्याची कथा आहे. ती कथा या पाणबुडीविषयी आहे की काय हे मात्र समजले नाही. ही पाणबुडी पहाण्यासाठी लोकांनी तुफान गर्दी केली होती.

आता बस प्ले बॉय बिल्डिंग, शिकॅगोला लागलेल्या भीषण आगीतून वाचलेल्या थोड्या वस्तूंपैकी एक म्हणजे वॉटर टॉवर, दिवसातून दोनदा धुतली जाणारी रिग्लि बिल्डिंग, वीस लाख पुस्तकांचा संग्रह असलेली पब्लिक लायब्ररी, हृदया-वर शस्त्रक्रिया होते ते मायकेल रिज् हॉस्पिटल, वगैरे भागातून पूर्वीच्या शिकॅगोच्या भागात आली. १८५० ते १९०० या काळात श्रीमंत लोकांची इथे वस्ती होती. पुढे त्यांनी स्थलांतर केल्यावर या विभागाच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. मग तिथे स्लम्म् झाले. आता इथले बहुतेक रहिवाशी निग्रो आहेत. या भागावर

एक भकास छाया आढळते. अर्थात शिकॅगोच्या पुनर्विकासाच्या योजनेनुसार हे भाग साफ करून तेथे कमी उत्पन्नाच्या लोकांना राहाण्यासाठी नवीन इमारती बांधण्यात येत आहेत. त्या टोलेजंग असून अद्ययावत् आहेत. त्यातली वस्ती संमिश्र आहे.

आता बस शिकॅगो युनिव्हर्सिटीच्या कॅम्पमध्ये शिरली, इथे ॲटम बॉम्बचा शोध लागला त्याचे स्मारक असून ते हेन्री मूर या शिल्पकाराने केले आहे. वाटेवर रॉकफेलर मेमोरियल चॅपेल, जॅक्सन गार्डन वगैरे स्थाने लागली. त्यांच्यावरून बस मिशिगन सरोवराच्या बाजूने हिंडत मूळ स्थानी परत आली. नंतर आम्ही स्वतंत्रपणे सरोवराच्या बाजूने हिंडायला गेलो. तेथून परत आलो ते स्टेट स्ट्रीटवर. इथल्या एका उपाहारगृहात कॉफी घेतली. रात्रीच्या सुमारास श्री. नवकल आले. त्यांच्या मोटारीतून परतलो.

सकाळी आम्ही रमाडा इनवर आलो. इथे खोली रक्षित केलेली होती. गावापासून इन बरीच दूर होती. परंतु गावात यायला किंवा एअरपोर्टवर जायला इनचे वाहन होते. हॉटेलमध्ये राहण्याचा अमेरिकेतला हा पहिला अनुभव. मॅनेजरने खोलीचा दर जास्त लावल्याने डॉक्टरने वॉशिंग्टनला काय दर दिला होता त्याची चिठ्ठी दाखविली. तेव्हा मॅनेजर म्हणाला की, वरच्या अधिकाऱ्याला विचारून बिलात बदल करीन.

ही इन एक मजली इमारत असून हायवेला लागून होती. अशा एकाला एक लागून तीन-चार इमारती होत्या. रात्रीसाठी किंवा दुपारच्या भोजनासाठी मोटर प्रवासी अशा इनचा उपयोग करतो. पेरी मेसनच्या कथेमध्ये मोटेलची वर्णने येतात. ती वाचून कल्पनेने जे चित्र मनात तयार होते त्याचे खरे चित्र आज पाहिले. प्रक्षालयात अस्पष्ट उजेड होता. दिवे मंद होते. चारी बाजूला उत्तम पडदे होते आणि खाली गालिचे होते. लाल रंगाचा वापर जास्त आढळला. एका मोठ्या कॉरिडॉरच्या दोन्ही बाजूला खोल्या होत्या. तिकडे जाण्यापूर्वीच प्रक्षालयाला लागून एका बाजूला लाउंज, दुसऱ्या भागाला कॉफी हाऊस नि पाठीमागे पोहोण्याचा तलाव होता.

मऊ गाद्या, शुभ्र चादरी, दूरध्वनी नि एअर-कंडिशन अशा सोयी असलेली मोठी खोली होती. पण वॉश बेसीनचे बूच नीट लागत नव्हते नि टेलिव्हिन खरखरत होता ! बिछान्यात पडून सिगरेट ओढण्याला बंदी असणारा शासकीय

नियम ठळक अक्षरात इथे लिहिलेला होता. खोलीत सामान ठेवून न्याहरी केली. मग बरेच दिवसाचे तुंबलेले लहान-मोठे कपडे धुतले.

संध्याकाळी विमानतळाच्या बाजूला हिंडायला गेलो. मिनिटा-मिनिटाला विमाने निरनिराळ्या दिशेने उतरत होती. रात्री कॉफी हाऊसमध्ये फराळ केला. बिल द्यायला गेलो तेव्हा पैसे घेणारी बाई म्हणाली की, इथे वसंत नावाचा मुलगा काम करत होता. त्याचा पत्ता तिने दाखवला. त्यावरून तो सुरतेकडचा होता असे आढळले.

५१५४ ५५२ अ. प्रवास १५।३।७०

## ग्रँड कॅनयन नि लास व्हेगास

सकाळी निघताना डॉक्टर पैसे भरायला गेली तेव्हा दराविषयी तिने मॅनेजरला पुन्हा विचारले. तेव्हा तो म्हणाला की, वरिष्ठांशी मी बोललो असून त्यांनी कमी पैसे घ्यायला सांगितले आहे. हा फॉर्म भरा म्हणजे अधिक घेतलेले पैसे परत देतो. त्याप्रमाणे फॉर्म भरल्यावर त्याने पैसे परत केले. मग इनच्या स्टेशनवॅगनने आम्ही विमानतळावर आलो. सव्वा नवाला विमानाची चाके हालली. पण लगेच विमान थांबले. ट्रॅफिक जॅममुळे उड्डाणाला उशीर लागेल तेव्हा सिगारेट ओढू शकता असे कॅप्टन म्हणाला. पंधरा मिनिटाने विमान चालू लागले. पण पुन्हा थांबले. या वेळी पुढे तीन विमाने होती नि पाठीशी दहा. मग कॉफी देण्यात आली.

दहाच्या सुमारास विमानाने भूमी सोडली. पसतीस हजार फुटांवरून सुमारे साडेसातशे मैलांच्या वेगाने ते जाणार होते. उड्डाणाच्या वेळेस थोडे धुके होते. वर जाताच शुभ्र मेघांची गर्दी झाली नि ब्लँकेट घेण्याइतकी थंडी वाजू लागली. न्याहरी संपल्यावर लाईफ वाचला. बोस्टन युनिव्हर्सिटीच्या प्रेसिडेन्टची निवड कशी होते हा लेख बोधप्रद होता. अशी काळजी आपल्याकडे केव्हा घेतली जाणार कोणास ठाऊक ! एक छायाचित्र-कथाही छान वाटली. हरिणांचा कळप नदीवर आला असता एका पाडसाला सुसरीने पकडले. तेव्हा बाकीची हरणे पळाली.

ही गोष्ट पाणघोड्याने पाहाताच तो सुसरीवर चालून आला. त्याबरोबर सुसर पाण्यात गडप झाली. त्या पाणघोड्याने, पाडसाला ढकलत जमिनीवर नेऊन त्याच्या पोटाची जखम चाखली, नि त्याला उठवण्याचा प्रयत्न केला. पण पाडस अखेर मेले. थोड्या वेळाने पाणघोडा निघून गेला. मग गिधाडे आली. तेव्हा सुसर वर येऊन त्या पाडसाला ओढून घेऊन गेली. दया, साहाय्य, इत्यादी गुण प्राणिजगातही असतात.

तासाभराने ढग गेले. डोंगराळ जमीन दिसू लागली. दूरवर रूक्ष डोंगरांची रांग आढळली. त्यातून नागमोडी रस्ते जात होते. कॅप्टन म्हणाला की, विमान रॉकी माउंटनच्या बाजूने जात आहे. काही डोंगरमाथे हिमाच्छादित होते. मधूनच तळी दिसत. नंतर लहान गावे दिसू लागली. उजव्या हाताला सॉल्ट लेकचे विस्तृत जलाशय आले नि डाव्या हाताला शहराचा काही भाग. जगातील सर्वांत मोठी तांब्याची खाण इथे आहे.

सॉल्ट लेक सिटी उटाह संस्थानाची राजधानी. आणि या संस्थानाची तीन-चतुर्थांश वस्ती या गावात नि त्याच्या उपनगरात आहे. या प्रदेशात डायनाशोर वगैरे अजस्र प्राण्यांचे अवशेष सापडले होते. पाऊणच्या सुमारास विमानाने जमीन पकडली. घड्याळ एक तास मागे करावे लागले. सॉल्ट लेक सिटीची सहल दुपारी दीड वाजता होती. पण ती संपत होती पाचला. त्यामुळे या सहलीला जाणे शक्य नव्हते. टॅक्सीवाले गावात नेऊन सोडायला तयार होते. परंतु परत यायला वेळेवर वाहन मिळाले नाही तर काय? या विचाराने मी गावात गेलो नाही.

विमानतळ लहान होता. पण त्याचा लाउंज खूपच मोठा होता. तसेच खुर्च्या मुबलक होत्या नि त्यांपैकी काहींना टेलिव्हिजन लावलेला होता. इथे प्रथम रेड इंडियन मनुष्य मी पाहिला. गावाची माहिती देणारा टेले मॅप लाउंजमध्ये होता. त्याच्या पलीकडे भूमीवर जगाचा नकाशा कोरलेला असून त्यात सॉल्ट लेक सिटी दाखवली होती. सुव्हेनिअरच्या दुकानात इथल्या दगडापासून केलेल्या कलात्मक वस्तू तसेच डॉयनाशोर वगैरे प्राण्यांची चित्रे होती. विमानतळाच्या बाहेर उभे राहून कुठल्याही दिशेला पाहिले तरी डोंगरांची रांग दिसे. काहींची शिखरे हिमात होती. दुपार असूनही वारा बोचरा होता. मला पेहलगामचे स्मरण झाले.

ग्रँड कॅनयनला जाणाऱ्या विमानात बसण्याची सूचना चारच्या सुमारास

मिळाली. उन्ह अगदी स्वच्छ होते. विमान पंचवीस तीस माणसे बसतील एवढे होते. ते उडत होते ते दहा-बारा हजार फुटांवरून. शिवाय हालतही फार होते. आता पर्वताच्या रांगा दिसू लागल्या. त्यांच्या दऱ्यातून धुक्याचे लोटच्या लोट वर येऊन त्यांनी काही क्षण विमानाला गुरफटून टाकले. काहीच दिसेनासे झाले. मधूनच बाजूला डोंगराचे एखादे शिखर दिसे. धुक्यामुळे विमानाला अपघात झाला वगैरे वार्ता आपण वाचतो. अशा वेळी त्या कथांचे स्मरण होते !

धुके संपले. खाली हिरवा गालिचा पसरला आहे असा भास व्हावा अशी मोठी दरी दृष्टिपथात आली. त्याच्या पलीकडे उत्तुंग हिमाच्छादित गिरिशिखरे होती. नंतर मोठे सरोवर लागले. त्याच्या पाण्याचा रंग पोपटी वाटला. आता पुन्हा प्रदेश रूक्ष झाला. भूमीचा रंग पिवळसर झाला. उन्हाळ्यात सह्याद्रीच्या दऱ्यांमध्ये जसे दृश्य दिसते तसेच थोडेसे हे होते. इथे विमान फार हादरले. साडेपाचला सेडार सिटी आले. पंधरा मिनिटांनी विमान पुन्हा सुटले. आता दिसली ती मरूभूमी. हा लालसर डोंगराळ प्रदेश राजस्थानची आठवण देत होता. झाडी तुरळक होती. पुन्हा एकदा पाषाणाचा रंग बदलला. एका बाजूकडचे काळ्या नि पिवळ्या रंगाचे होते नि दुसऱ्या बाजूचे लालसर होते. काही डोंगरमाथ्यांवर थोडे हिम होते. इथल्या प्रदेशातली झाडी कमालीची खुरटलेली होती. डोंगरही कापलेले आढळले. काही ठिकाणी ते मिनारासारखे होते तर काही ठिकाणी भिंतीसारखे.

आता मात्र या डोंगराळ भागातल्या नैसर्गिक चित्राचे दृश्य श्वासाचा अवरोध करील असे झाले. एका जागी चंद्रकोरीसारखे कापले गेलेले लाल रंगाचे प्रचंड डोंगर दिसले. पण त्यात पिवळ्या रंगाच्या पाषाणाचेही डोंगर आढळले. अशा डोंगराच्या माथ्यावर लाल रंगाचा मोठा प्रस्तर विराजमान झालेला दिसे. यानंतर डोंगरांच्या रांगाच रांगा लागल्या. त्याच्या जमिनीचा रंग भुरसट होता. एकही झाड दिसले नाही. मधूनच पठारे लागायची, नि खणल्या गेलेल्या डोंगरात सरोवरे भेटायची. त्यातले एक प्रचंड होते नि त्यात पडाव होते. हाणामारीच्या अमेरिकन चित्रपटात जसे डोंगर दिसतात अगदी तसेच हे डोंगर दिसले.

पेज गाव आले. चार प्रवासी उतरले. चार-पाच चढले. पुन्हा विमानाने आकाश गाठले. मागच्यासारखीच सगळी मरूभूमी होती. पाण्याचा टिपूस

दिसला नाही. दुभंगलेली पृथ्वी कशी असेल याची थोडी कल्पना हे दृश्य पाहाताना येते. आता प्रचंड खोरी लागली. त्यातून वाहाणारे छोटे ओहोळ तेवढेच पाणी. पण जेव्हा पूर येत असेल तेव्हा या खोऱ्यातले दृश्य नजर फिरवणारे असावे. थोड्याच वेळात ग्रॅंड कॅनयन आले.

विमानतळ छोटा होता. आमच्या विमानासारखी किंवा त्याहूनही छोटी विमाने संभाळणारा. सामान तिथेच ठेवण्याचा विचार होता. पण तिथल्या कोपऱ्यात उघड्यावर सामान ठेवावे लागेल असे कळल्यावर आम्ही ते बरोबर न्यायचे ठरवले. इथे एक गुजराती कुटुंब भेटले. आमच्याशी गुजरातीतून बोलताना त्यांना काय आनंद वाटला ! तसेच सोरेंटोला पाहिलेले नि इंग्रजीचा एक शब्द न येणारे पण जगाचा प्रवास करणारे म्हातारे जपानी जोडपे दिसले. बस आली. तिचा ड्रायव्हर वेस्टर्न चित्रपटातल्या पात्रासारखा चालत नि बोलत होता. एल टोव्हरपाशी बसने आम्हाला आणून सोडले. हॉटेल एक मजली असून शे-दीडशे वर्षांपूर्वीच्या अमेरिकन जीवनाची आठवण करून देत होते. प्रक्षालयाच्या भिंतीला जुन्या काळच्या बंदुकी नि पारध केलेल्या श्वापदांची डोकी लावली होती. दिवे लाल रंगाचे होते.

खोलीत सामान ठेवून आम्ही हिंडायला बाहेर गेलो. शंभर फुटांवर ग्रॅंड कॅनयनचा एक पॉईंट होता. पलीकडे रेड इंडियनचे एक घर होते. इथे रोज संध्याकाळी रेड इंडियन आपले नृत्य करून दाखवतात. आज थंडी कमालीची होती. सूर्यास्त होऊ लागला होता. या वेळचे इथले दृश्य क्षणाक्षणाला बदलत होते. अंधार झाल्यावरही आम्ही किती वेळ तरी बसलो होतो. अनादिकालाची कल्पना अशा स्थानी बसले असताना काही वेळा थोड्या प्रमाणात येते.

ग्रॅंड कॅनयन – खोल दरी – ही विस्मयकारक गोष्ट आहे. नदी, पाऊस, हिम, वायू, ताप यांच्या माऱ्यामुळे झिजून ग्रॅंड कॅनयन निर्माण झाला. ही दरी २१७ मैल लांब नि ४ ते १८ मैल रुंद आहे, नि त्यातून कोलोरॅडो नदी वाहाते. स्पॅनिश भाषेत कोलोरॅडोचा अर्थ लाल असा आहे. नदीचे पाणी लाल म्हणून त्यास कोलोरॅडो हे नाव पडले. या प्रदेशात युरोपियन लोकांच्या आगमनापूर्वी इंडियन लोकांच्या टोळ्या शेकडो वर्षे राहात होत्या. डॉ. लोपेस द कार्डेनास हा या प्रदेशातला पहिला युरोपीय प्रवासी. १५४० मध्ये तो आला. तेव्हापासून या प्रदेशाला थोडे महत्त्व येऊ लागले. पण १९०८ मध्ये त्याला राष्ट्रीय स्मारकाचे

स्थान प्राप्त झाल्यापासून विशेष महत्त्व आले.

न्याहरी आटोपल्यावर आम्ही कॅनयनच्या बाजूला फिरायला गेलो. रस्ता नागमोडी असून तो दरीच्या बाजूने जातो. अगदी कोपऱ्याकडे खाली उतरण्याचा रस्ता आहे. खेचरावर बसून नदीच्या पात्रापर्यंत जाता येते. तशी एक सहल रोज निघते. सुमारे वीस एक जणांचा तांडा या मार्गाने जाताना दिसला. रस्त्याच्या कडेला अंतराअंतरावर लाकडाची बाके आहेत. एका ठिकाणी लिहिले होते, 'ड्रीम ऑफ माऊंटन्स ॲज इन देअर स्लीप दे ब्रुड ऑन थिंग्ज इटर्नल.' या बाकावर बसून काही जण असे चिंतन करत असावेत !

ग्रँड कॅनयन पाहण्यासाठी अनेक सहली आहेत. आम्ही वॉच टॉवर सहलीत दाखल झालो. साडेनवाला बस निघाली. सुरुवातीला ग्रँड कॅनयन खेडेगाव लागले. त्यातली घरे छोटी नि बसकी होती. त्याशिवाय बँक, पोस्ट ऑफिस, स्टोअर वगैरे गोष्टी होत्या. त्यानंतर सांटा फे हे लोहमार्गाचे स्थानक लागले नि त्या नावाचा चित्रपट पाहिल्याचे स्मरण झाले.

आम्ही प्रथम थांबलो ते यावापाई पॉईंटपाशी. या जागी छोटा म्युझियम आहे. त्यात दुर्बिणी ठेवलेल्या आहेत. त्यांच्या साहाय्याने दरीतली नदी, तिच्यावरचा पूल, निरनिराळे पाईंटस पाहाता येतात. याशिवाय या भागातले भिन्न प्रकारचे दगड, नि प्राणी यांची माहिती देणारे प्रदर्शन होते. एक सरडा तप्त वाळूवरून गेला असताना त्याच्या पायाचे ठसे उमटले. तसेच ते थंड झाले. त्या ठश्यांचा पाषाण इथे आहे. त्यानंतर आम्ही थांबलो ते ग्रँड व्ह्यू पॉईंटपाशी. ड्रायव्हरने इथल्या डोंगरमाथ्याची त्यांच्या आकाराप्रमाणे वर्णने केली. हे लाईट हाऊस, तो स्फिंक्स, ते पलीकडचे सिंकिंग शिप. मग गमतीने ड्रायव्हर म्हणाला की, नवऱ्याला दरीत ढकलण्याची संधी बायकांना इथे आहे. नंतर गंभीरपणे म्हणाला की, इथून माणसे खाली कोसळली आहेत. तरी फार कडेला जाऊ नका.

याच पॉईंटपाशी नकाशा होता. त्यात विष्णू टेंपल असा शब्द वाचला. मला आश्चर्य वाटले. तेव्हा आमच्या बरोबरचे हैद्राबादकडचे मुसलमान गृहस्थ म्हणाले की, सहलीची तिकिटे मिळतात तिथेच कॅनयनचा नकाशा मिळतो. त्यात अनेक हिंदू देवतांची नावे दिली आहेत. सहलीच्या नंतर हा नकाशा घेतला. त्यात पुढील नावे होती. शिवा टेंपल, मनू टेंपल, बुद्ध टेंपल, ब्रह्मा

टेंपल, विष्णू टेंपल, रामा श्राईन, कृष्णा श्राईन. शिवाय हिंदू ॲम्पिथिएटर नि विष्णू क्रिक होतीच. हिंदूधर्म की जय ! असे शब्द माझ्या जिभेवर आले होते. लगेच पण लक्षात आले की, ही नावे ख्रिश्चन संप्रदायी साहेबाने दिली आहेत.

सहलीचा अंतिम बिंदू होता वॉच टॉवर ॲन्ड डेझर्ट व्ह्यू. हा भुईकिल्ला प्राचीन काळचा नाही. १९३२ मध्ये फ्रेड हार्वे नि सांटा फे कंपनींनी रेड इंडियन लोकांच्या जीवनाची नीट माहिती व्हावी यासाठी हे वॉच टॉवर बांधले. मात्र पाहाताना प्राचीन आहे असे वाटते. आत गेल्यावर प्रथम छोटी दुकाने भेटतात. त्यात रेड इंडियन लोकांच्या हस्तकलेच्या गोष्टी मिळतात. इथून लहान जिन्याने आपण वर जातो. एका बाजूला किवा, म्हणजे रेड इंडियन्सचे पूजास्थान आहे. आणखी वर गेल्यावर होपी रूम येते. या खोलीत रेड इंडियन्सची चित्रकला दाखवली आहे. ही चित्रे होपी कलाकार कॅबोटीने काढली आहेत.

एल टोव्हर हॉटेलच्या पाठीमागच्या बाजूला थोड्या अंतरावर कोल्ब ब्रदर्सचा स्टुडियो आहे. त्यात कोलेरॅडो नदीचा जलप्रवास करून कसा शोध घेतला गेला त्याचा चित्रपट दाखवण्यात येतो. अमेरिका समृद्ध नि बलिष्ठ व्हायला धाडसी माणसांनी कसा हातभार लावला होता हे या चित्रपटावरून दिसते.

संध्याकाळी बसने विमानतळावर आलो. सहानंतर विमान सुटले. थोड्या क्षणाने विमानातून खालच्या सृष्टीचे भयप्रद रूप दिसू लागले. उजव्या हाताला ग्रॅंड कॅनयन नि डाव्या हाताला छोटे कॅनयन होते. नुकताच भूकंप झाला आहे असे वाटले. एका बाजूच्या दरीत नदीचे शुष्क पात्र दिसले. नंतर प्रचंड खोरी दिसू लागली. त्यातून नदीचे फाटे गेलेले आढळले. एक फाटा बराच मोठा होता. नंतर लागले नदीचे पात्र. ते मात्र विशाल होते. दऱ्या, खोरी, नदीचे पात्र, लाल, पिवळा, काळसर पाषाण, त्यांच्यावर पडणारी लाल गुलाबी सोनसळी किरणे— सृष्टीचे हे चित्र खरोखरच विलक्षण नि मती गुंग करणारे होते.

आता मीड सरोवर आले. नंतर हुवर डॅमवरून विमान गेले. सूर्यास्त होत आला होता. आकाशाला निळसर शुभ्र नि लाल रंगाची छटा आली होती नि त्याला पिवळी झालर होती. वातावरण धूसर अस्पष्ट झाले. डोंगर कृष्ण-वर्णाचे झाले. आता हिरवी झाडी, शेते, टुमदार घरे, जांभळी सडक दुरून

दिसू लागली. लास व्हेगास येत होते. अमेरिकेचा दोन तृतीयांशापेक्षा अधिक भाग आम्ही मागे टाकला होता. विमान उतरले. लास व्हेगास आले.

नेव्हाडा संस्थानातले हे प्रसिद्ध गाव. मुक्त जुगार, सहज घटस्फोट, प्रसिद्ध नाईट क्लब, इत्यादी गोष्टींमुळे मनोरंजनाच्या जगाची राजधानी अशी या गावची ख्याती आहे. फ्रिमॉंट हॉटेलच्या बसने आम्ही गावाकडे येण्यास निघालो. वाटेवर घरांपेक्षा हॉटेलेच जास्त आढळली आणि जुगाराची सोय बहुतेक ठिकाणी होती. आमच्या हॉटेलात मैदानाएवढा तळमजला त्यासाठी वापरला जात होता नि खेळ चोवीस तास चालत होता.

संध्याकाळी साडेपाचला आम्ही कॅसिनोच्या सहलीला निघालो. या सहलीतली बरीच माणसे हॉलंडमधली होती. थोडी अमेरिकन नि बाकीची इतर देशातली. प्रथम आम्ही हॅसिंडा हॉटेलवर आलो. इथे सर्वांना शॅम्पेन देण्यात आली. मला हे मद्य काही अवर्णनीय वाटले नाही. बूफेरूममध्ये खाद्यपदार्थ ठेवलेले होते नि आपला हात नि जगन्नाथ अशी सूचना होती. जेवणाच्या टेबलापाशी आमचेबरोबर एक अमेरिकन जोडपे होते. त्यांचा एक मुलगा व्हिएतनॉममध्ये होता आणि दुसरा नुकताच ग्रॅज्युएट झाला होता. अंतराळाचे संशोधन करणाऱ्या संस्थेतील एका विभागात ते गृहस्थ काम करीत होते. भोजनोत्तर त्यांनी स्लॉट मशिनवर आपल्या नशिबाची परीक्षा पाहिली. एका कोपऱ्यात तीन मुली गाण्याच्या ठेक्यावर नाचत होत्या. त्यांचे नृत्य यांत्रिकपणे चालले होते.

येथून आम्ही फ्रॉन्टियर हॉटेलकडे येण्यास निघालो. वाटेत लागणाऱ्या हॉटेलची वर्णने गाईड करत होती. सगळा हिशेब करोडो रुपयांतला होता. या हॉटेलच्या रंगमंचावर अनेक गायक गाणार होते. आम्ही आलो तेव्हा प्रसिद्ध गायक– ही माहिती त्या अमेरिकन जोडप्याने दिली– जेरी व्हेल याचे गाणे होणार होते. ते थोड्याच वेळात सुरू झाले. त्याने काही स्वतःची नि काहीं फ्रॅंक सिनेट्राची गाणी म्हटली. त्याला मिळालेल्या प्रतिसादावरून तो गायक लोकप्रिय वाटला.

हॉटेल ट्रॉपिकानावर फॉली ब्रर्जेर हा खेळ होता. इथे आम्ही बसलो. असताना उपरोक्त अमेरिकन गृहस्थाशी एक बेल्जियम गृहस्थ गप्पा मारू लागला. तो बेल्जियन गृहस्थ अमेरिकेला नावे ठेवत होता. शंभर मजली इमारत,

शंभर कोटी डॉलरची वास्तू, इतक्या लक्ष मोटारी असा अवाढव्यतेचा तुम्हला हव्यास आहे. संस्कृतीचे महत्त्व युरोपियन माणसाप्रमाणे तुम्हांला वाटत नाही असा त्याचा आरोप होता.

तो अमेरिकन हसत ऐकत होता. काही वेळा समर्थाला पंगू नि कर्तृत्वशून्य लोकांची अकारण टीका सहन करावी लागते ! त्या अमेरिकन माणसाला अशा टीकेची संवय असावी. पण मला मात्र अस्वस्थ वाटले. सर्व समाजात दोष असतात. तसे अमेरिकन समाजात दोष आहेत, पण त्यांच्यात गुणही आहेत. बेल्जम हे टिचभर राष्ट्र आहे. ते अवाढव्य काय बांधणार ! त्याला साधने हवी, मनुष्यबळ हवे आणि इच्छाशक्ती हवी.

माझ्या मनात असे विचार चालले असताना वाद्याचा प्रचंड घोष झाला. पडदा उचलला गेला. एका पाठोपाठ एक नर्तिका रंगमंचावर येऊ लागल्या. त्यांचे डौलदार किरीट, आवश्यक तेव्हढेच वस्त्र, रंगीत प्रकाशयोजना, प्रतीकात्मक नृत्य– पॅरिसला पाहिलेल्या कार्यक्रमाचीच ही आवृत्ती होती. फक्त इथे जवळून पाहात होतो. त्या मुली रंगमंचावरून इकडून तिकडे जात होत्या. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहाताना मला पुन्हा पुन्हा वाटे की, वस्त्रहीन स्थितीतही त्या मनाने किती अलिप्त आहेत. ठराविक वेळेपर्यंत नाचायचे नि मग घरी पळायचे. आणि गंमत म्हणजे खेळ संपल्यावर चेहऱ्यावरचा रंग जेमतेम काढून एका हातात पर्स नि दुसऱ्या हातात कार्डिगन अशा अवस्थेत त्यांना आमच्या आधी बाहेर पळताना आम्ही पाहिले.

बस यायला वेळ असल्याने त्या अमेरिकन गृहस्थाशी मी बोलत उभा होतो. मी त्याला विचारले, ‘ त्या बेल्जियन इसमाला लिंकन, जेफरसन यांच्या सारखे महापुरुष आपल्याकडे का झाले नाहीत हा प्रश्न तुम्ही का केला नाहीत ? शिवाय संयुक्त युरोपचे व्यापारी आकडे अफाट नसतात का ? ’

‘ खरं आहे. पण जगाची जबाबदारी पेलण्याचा अमेरिकन लोकांना आता कंटाळा आला आहे. दहा वर्षांपूर्वी अमेरिकन मनुष्य चंद्रावर गेला पाहिजे असे मला वाटे. पण भोवतालची सामाजिक परिस्थिती पाहिल्यावर हा खर्च कशाला असे वाटते ! ’

‘ अमेरिकन मनुष्य चंद्रावर गेला यापेक्षा मनुष्य चंद्रावर गेला हे अधिक बरोबर नाही का ? चंद्राचा हव्यास माणसाला प्राचीन काळापासून आहे.

चंद्रासाठी हट्ट धरल्याची कथा आमच्या महाकाव्यात आहे. अमेरिकेने प्रयत्न केला नसता तर दुसऱ्या कोणी केला असता आणि या वेळी नाही तर कदाचित दोनशे वर्षांनी आज रानटी समजल्या जाणाऱ्या जातीतून कोणी एखादा चंद्रावर गेला असता, ' मी म्हणालो.

' मला असे वाटते की, हे प्रयत्न इतरांनीच करावे, ' तो हसत उत्तरला. त्याची थकलेली मनःस्थिती बोलत असावी. एवढ्यात बस आली. आम्ही निरोप घेतला. सहा फूट उंचीचा तो अमेरिकन नि त्याचा हसरा चेहेरा अजून माझ्या डोळ्यांसमोर आहे.

हॉटेलपाशी बस थांबली. आम्ही उतरलो. खालच्या मोठ्या हॉलमध्ये जुगाराचे खेळ जोरात चालले होते. अनेकजण आपल्या नशिबाची परीक्षा पाहात होते ! आणि काही वेळा हट्टाने. लाख लोक फसल्याशिवाय एकजण लक्षाधीश होत नाही. पण प्रत्येकाला आशा असते की, असा सुदैवी तो असेल !

## डिसनी लँड नि हॉलीवूड

लॉस एंजेलेसकडे जाणारे विमान घेण्यासाठी आम्ही विमान-तळावर आलो. इथल्या लाउंजमध्ये बसलो असताना श्री. वेद नावाचे गृहस्थ भेटले. त्यांचा मुंबईत लहानसा कारखाना असून ते धंद्यानिमित्त पृथ्वी-प्रदक्षिणा करत होते. साडेदहाच्या सुमारास विमानाने आकाशाकडे झेप घेतली. खालचा प्रदेश वालुकामय, उजाड नि रखरखीत दिसला. म्हणून अमेरिकन एअर लाईन्सने दिलेल्या नकाशात पाहिले. त्यावरून ते माजावे वाळवंट असल्याचे दिसले. डोंगर बोडके नि काळे होते. झाडी नव्हतीच. मात्र मध्येच एखाद्या डोंगराचा माथा हिमाच्छादित दिसे. तासाभराने लॉस एंजेलेस आले.

लॉक-अपमध्ये बॅगा राहातील की नाही याची शंका वाटली. पण जरा दाबल्यावर त्या राहिल्या. मग माहिती-केंद्रातल्या बाईकडे हॉटेलकडे जाण्याच्या मार्गाची चौकशी केली. तिने सांगितले की, इथून बस तुम्हाला स्टॅडलर हिल्टनपाशी घेऊन जाईल. तेथून पाच मिनिटांच्या रस्त्या-वर तुमचे गाला हॉटेल आहे. या हॉटेलवर आल्यावर प्रथम सहलींची चौकशी केली. दुपारी मरीन-लँडची सहल आहे असे समजल्यावर त्या सहलीची तिकिटे काढली. दोन वाजता बस आली. तिने आम्ही ग्रे लाईनच्या मुख्य स्थानकावर गेलो. तेथून सहलीची बस दोन वाजता निघाली.

मरीनलँडला जाणारा सगळा रस्ता पॅसिफिकच्या किनाऱ्याने आहे. वाटेत डेटपामची नि नारळीची चिकार झाडे लागली. काही वेळाने रस्त्याला चढ लागला. रस्त्याच्या बाजूची घरे एक मजली नि रेखीव होती. या भागातली जमीन खचणारी आहे. डोंगरावरची घरे कशी खाली सरकत आहेत, तसेच रस्त्यावरची मधली ओळ कशी नागमोडी झाली आहे ते गाईडने दाखवले.

मरीनलँड ऑफ द पॅसिफिक ही माशांची सर्कस आहे. एका कार्यक्रमात चार खेळ दाखवण्यात येतात. पहिला खेळ होता किलर व्हेल कलोशिअममध्ये. त्यामध्ये व्हेल हस्तांदोलनासाठी खवला पुढे करतो, माणसाचे चुंबन घेण्यासाठी पाण्यातून दहा फूट उंच उडतो, तसेच विचित्र आवाज काढतो नि शिटी वाजली की, आवाज बंद करतो. दुसरा खेळ होता जायंट फिश टँकमधला. ह्या टँकमध्ये पाणबुड्या पाण्याखाली जातो, मग स्वतःजवळच्या टोपलीतून मासे काढून तो टँकमधल्या माशांना ते खाऊ घालतो. हे काम करताना तो त्यांच्याशी खेळतो, त्यांना गुदगुल्या करतो. या वेळी मासे त्याच्याभोवती फेर धरतात.

तिसरा खेळ सी एरिनामध्ये होता. तेथे प्रथम सील माशाचे खेळ दाखवले. एका सीलने नाकाने पाण्यातला चेंडू उडवल्यावर दुसऱ्या सीलने तो नाकावर झेलला. तसेच एका सीलने पाठीमागच्या पायांवर चालत नाकावर चेंडू तोलला. नंतर डॉलफीनचे खेळ झाले. या वेळी हॉरिझाँटल स्पीन, समर सॉल्ट, पाण्यावर धरलेल्या दोरीवरून उडी मारणे. पाण्यावरून शेपटीच्या साहाय्याने चालणे, कुत्रा बसवलेली बोट ढकलत नेणे— या गोष्टी डॉलफीनने केल्या. शेवटचा खेळ सिसाईड स्टेडिअममध्ये होता. इथे शिक्षकाच्या सूचनेप्रमाणे व्हेल पाण्यात लोळतात, विचित्र आवाज काढून गाणी म्हणतात. माशांना अशी कामे शिकवून नंतर त्याप्रमाणे त्यांच्याकडून खेळ करून घेणे हे खरोखर अवघड म्हणून कौतुकास्पद काम आहे.

अमेरिकेत प्रवाशाला ज्या अनेक गोष्टींविषयी कुतूहल वा जिज्ञासा असते त्यापैकी एक म्हणजे डिसनीलॅन्ड. तिथे कोण जात नाही? नेहरू, आयझेन-हॉवर यांच्यासारखे नेते गेले असल्याने सामान्य माणसांनी रोज तिथे गर्दी केली तर आश्चर्य नाही! डिसनीलँडची कल्पना वॉल्ट डिसनींना कशी सुचली? त्याचे असे झाले की, आपल्या छोट्या मुलींना दर शनिवारी डिसनी हिंडायला नेत असे. अशा वेळी त्यांच्या मनात विचार येई की, मुलांना आपल्या आई-

वडिलांसह करमणुकीच्या गोष्टी पाहाता येतील असे एखादे स्थान का असू नये? या विचाराला मूर्त स्वरूप यायला वीस वर्षे लागली. डिसनीलँडची पायाभरणी १९५४ मध्ये झाली नि सुमारे दीड वर्षांनी डिसनेंचे स्वप्न सत्यसृष्टीत आले. इथे आलेल्या माणसाला आपण निराळ्या जगात आहोत असे वाटले पाहिजे हा डिसनीलँडच्या निर्मितीपाठीमागचा हेतू असल्याचे डिसनी म्हणाले होते.

तासाभरात आमची बस डिसनीलँडच्या सीमेबाहेर येऊन थांबली. तिथे गाईड हजर होता. त्याने ट्रॅमने आम्हाला प्रवेशद्वारापाशी आणले. इथे प्रवाशांचे गट करण्यात येऊन प्रत्येक गटाला एक मुलगी गाईड म्हणून देण्यात आली. आमच्या गटाची गाईड सतरा वर्षांची होती. अंगाने सडपातळ, गहूवर्णी नि देखण्यात जमा होणारी. तिचा आवाज इतका लहान होता की तिच्या भोवती वर्तुळात उभे राहिले तर दुसऱ्या रांगेतल्या व्यक्तीला तिचे बोलणे ऐकू येत नसे. हातातला छोटा ध्वज दाखवून त्याच्या पाठोपाठ राहा असे तिने आम्हाला सांगितले.

प्रथम आलो ते आगगाडीच्या स्थानकाकडे. गाडीचे डबे, तिचा गार्ड, स्थानकाचे रूप इत्यादी गोष्टी शंभर वर्षांपूर्वी अमेरिकेत होत्या तशाच होत्या. ही आगगाडी डिसनीलँडच्या भोवताली जाते. या वेळी जुने बोगदे, डायनाशोर, रेड इंडियन, त्यांचे तंबू, प्राचीन पक्षी, ग्रँड कॅनयन या अमेरिकन गोष्टींच्या प्रतिकृती आपणाला दिसतात. ॲडव्हेंचर लँडमधल्या जंगलकुंझसाठी नावेतून जावे लागते. आशिया नि आफ्रिका खंडातल्या अरण्यांची इथे छोटी प्रतिकृती केली होती. बुद्धाचे पुतळे, दाट जंगल, गणपती, धबधब्यापाशी सोंड उभारून फवारे सोडत बसलेला हत्ती, सुसरी, पाणघोडे, गोरिला वानर, हेडहंटर्स, वगैरे गोष्टी आपणाला इथे भेटतात. यातले काही प्राणी तुमच्या अंगावर येत आहेत असा भास होतो. या वेळी नावेतला रक्षक पिस्तुलाचा आवाज काढतो. हा जल-प्रवास चालला असताना नाव एकदम धबधब्याखालून जाते. साहजिकच सगळे प्रवासी दचकतात.

द पायरेटस ऑफ द कॅरिबिअन हा खेळ न्यू ऑर्लिन्स स्क्वेअरमध्ये आहे. त्यासाठी प्रचंड रांग होती. त्यात आम्ही उभे राहिलो. आमचा क्रमांक आल्या-वर आम्ही लहानशा होडीत बसलो. ती होडी पाण्यातून ओढली जाऊन एका गुहेत गेली. अंधार, पाण्यातले चढउतार, विचित्र आवाज, यामुळे माणसाला

भीती वाटते. एरोल फ्लिनचा कॅप्टन ब्लड नावाचा चित्रपट होता. त्यात पाहिलेली काही दृश्ये इथे होती. चाचेगिरी करणारे लोक, त्यांचे ध्वज, त्यावरचे कवटीचे चिन्ह, मुसक्या बांधलेल्या बायका, त्यांचे लिलाव, पिंपाचे झाकण उघडून तोंड बाहेर काढणाऱ्या मुली, ती बळजबरी, ते भेसूर हास्य, दोन लढाऊ जहाजांची तोफातोफी, शेवटी गावाला लावण्यात आलेली आग, त्या वेळचा भयंकर आवाज ही चित्रे चित्तथरारक होती.

रॉकेटशीप, पाणबुडी, मोनोरेल इत्यादी गोष्टी टुमॉरोलँडमधली आकर्षणे आहेत. त्यातल्या स्ट्रीट कारमध्ये बसून उद्याचे जग कसे दिसेल याचे चित्र वरून पाहिले. या जगात अद्ययावत नगर, त्याचे उपनगर, मोटरी, मिशन कंट्रोल, रॉकेटस् वगैरे गोष्टी होत्या. ' फॅंटसीलॅंड ' हा गाईडबरोबर केलेल्या सहलीतला शेवटचा टप्पा. इथेही आम्ही छोट्या नावेत बसलो नि ती नाव कल्पनासृष्टीच्या जगात शिरली. त्यातल्या किती गोष्टींचे वर्णन करणार ! फ्लाइंग कार्पेट, बाली, जपानी, आफ्रिकन नृत्य, वाद्यसंगीत, सर्वच काही मनोरंजक होते. लक्षात राहिले ते ' इट इज ए स्मॉल वर्ल्ड ' हे नादमधुर गाणे. कोणीही सतत गुणगुणेल असेच होते.

आम्हांला सहा खेळांची तिकिटे या सहलीत देण्यात आली होती. त्यांपैकी पाच संपली होती. राहिलेले एक तिकिट मनपसंत खेळाला जाण्यासाठी होते. त्याचा उपयोग आम्ही हॉंटेड मॅन्शनसाठी केला. भुताटकीने झपाटलेल्या घराच्या खोलीत शिरल्यावर अंधार होतो. मग विचित्र आवाज सुरू होतात. प्रथम ते दूर असतात. शेवटी ते इतके जवळ येतात की, थोडी भीती वाटते. येथेही एक छोटी गाडी होती. त्यातून जाताना विचित्र चेहेऱ्याची भुते भेटतात. त्यांचे हास्य भेसूर असते, नि ती अंगावर येतात. हे खोटे आहे हे माहीत असूनही मनाला भीतीचा स्पर्श होतो.

गेल्या शतकात अमेरिकेत वेस्ट व्होडव्हील शो हा करमणुकीचा खेळ होत असे. त्या काळातले नृत्य, गायन, विनोद वगैरे प्रकार या खेळात दाखवतात. हा खेळ मनोरंजक झाला. कुत्र्यांना विनोद समजत नाही म्हणून त्यांना आत प्रवेश नाही अशी सूचना हॉलच्या प्रवेशद्वाराबाहेर ठेवलेली होती. डिसनीलॅंड-मधला मेन स्ट्रीट हा पन्नास वर्षांपूर्वीच्या अमेरिकन गावातल्या मेन स्ट्रीटची प्रतिकृती होता. छोटी दुकाने, नाट्यगृह, केमिस्ट, बसड्रायव्हर, कंडक्टर, बॅंडचा

ताफा, या ताफ्यामागून जाणारी लोकांची टोळकी यामुळे जुन्या काळातल्या गावात आपण आहोत असे वाटते. आणखीही करमणुकीच्या गोष्टी होत्या. पण वेळ झाला होता. शिवाय पायही थकले होते.

चित्रपट पाहाण्याचा मला आता फारसा छंद राहिलेला नाही. पण वीस वर्षांपूर्वी इंग्रजी चित्रपटाचे मला जबर वेड होते. रोनाल्ड कोलमन, क्लार्क गेबल, स्पेन्सर ट्रेसी, गॅरी कूपर, चार्लस बॉयर, जेम्स कॅग्ने, फ्रेड अस्टायर, जिंजर रॉजर्स, ग्रेटा गार्बो, व्हिव्हिअन ली, मर्ना लॉय, मार्लिन डिट्रीच – काय तो काळ, काय ते चित्रपट, नि काय तो मोह! त्याचा आज विचार केला म्हणजे हसू येते. ज्या चंदेरी दुनियेचा आपल्याला एक वेळ मोह होता त्या दुनियेच्या जवळपास येऊन ती न पाहाता जाणे काही बरोबर नाही असे वाटल्याने मी हॉलिवूडच्या सहलीला जायचे ठरविले.

हॉलिवूड हे लॉस एंजेलेसच्या बाहेर असून डोंगरकुशीत वसलेले आहे. आमची बस डोंगरमाथ्यावर आल्यावर युनिव्हर्सल स्टुडिओचे काही अधिकारी आले. त्यांनी स्टुडिओची सहल कशी होईल याची माहिती दिली. मग आम्ही छोट्या ट्रममध्ये बसलो. आमचा गाईड कॉलेजचा विद्यार्थी होता. फावल्या वेळात हे गाईडचे काम करणारा.

प्रथम थांबलो ते मेक-अप् डिपार्टमेंटपाशी. इथली लाना टर्नरची मेक-अप रूम गाईडने दाखवली. त्याच्या पलीकडची होती ग्रेगरी पेकची. या खोल्या दाखवून झाल्यावर गाईडने मिस्किलपणे विचारले, ‘ लाना टर्नरला कोणाला पाह्यचे आहे? ’ बहुतेकांचे हात वर गेले. यानंतर त्याने आम्हाला आतल्या बांधलेल्या सेटकडे आणले. हा सेट एक मोटार नि रस्त्याचा होता. जगातल्या कुठल्याही रस्त्याचा चित्रपट या सेटवर तयार होऊ शकतो. दुसरा सेट होता मिसिसिपीमधल्या बोटीचा. तिसरा होता विमानतळाचा. येथून आम्ही उघड्या सेटकडे आलो. दोन-तीन मोठ्या रस्त्यांच्या भागाचा हा सेट होता आणि या रस्त्यांवर निरनिराळ्या काळातील घरे नि रस्ते बांधलेले होते. ज्या काळातील कथा त्या भागात चित्रीकरण होते. इन्व्हिजिबल मॅन, कैरो किंवा काउबॉय चित्रपट इथे चित्रित झाले. येथून आमची ट्रम एका बाजूच्या रस्त्याने जात असताना एकदम पाऊस पडू लागला. ट्रम थांबली. पाण्याचे ओहोळ सुरू झाले. एक झाड कोलमडून जमिनीला टेकले. नंतर पुन्हा उभे झाले. चित्रपटातले

नैसर्गिक देखावे कसे घेतात त्याचे हे प्रात्यक्षिक होते.

ॲनिमल ॲक्टर ट्रेनिंग सेंटरवर खेळाची सुरुवात कबुतरापासून झाली. शिक्षकाने कबुतराला दूरवर असलेल्या एका माणसाच्या डोक्यावर बसून परत येण्यास सांगितले. कबुतराने तसे केले. तीच गोष्ट गिधाडाची. ते हल्ला कसे करते ते दाखवल्यावर शिक्षक म्हणाला की, हिचकॉकचा बर्ड चित्रपट कसा तयार झाला असेल याची यावरून कल्पना येईल. नंतर पोपट, मांजर, कुत्रा यांचे खेळ दाखवल्यावर शिक्षक म्हणाला, ' कुत्र्याला भाषा समजत नाही असे शास्त्रज्ञ म्हणतात. मला ते मान्य नाही. पाहा मी काय सांगतो ते आणि तो काय करतो ते.' मग तो कुत्र्याला म्हणाला, ' खाजव,' कुत्रा अंग खाजवू लागला. ' मेल्याचे सोंग कर, ' ते सोंग कुत्र्याने इतके हुबेहूब केले की, जेव्हा शिक्षकाने त्याला उचलले तेव्हा त्याची मान लडबडली.

स्टँट शोच्या विभागात मारामारीच्या चित्रपटातले प्रसंग कसे घेतले जातात याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यात घराभोवती झालेली पिस्तुलाची गोळागोळी, नंतर घराच्या पहिल्या मजल्याच्या खिडकीतून रस्त्याकडे झालेली बंदुकीची गोळागोळी आणि मग धराच्या छपरावरून खाली झालेली गोळागोळी दाखवण्यात आली. शेवटी या छपरावरून, म्हणजे दोन मजल्यांवरून, एक मनुष्य कसा खाली कोसळतो ते दाखविण्यात आले. ही कामे करणाऱ्या लोकांना सेकंड युनिट ॲक्टर्स म्हणतात.

या सहलीचा अखेरचा टप्पा होता मेक-अप विभागात. इथल्या तंत्रज्ञाने कोणाचाही चेहेरा मेक-अपने किती बदलता येतो याचे प्रात्यक्षिक आमच्यातल्या एका माणसाच्या चेहेऱ्यावर प्रयोग करून दाखवले. त्या माणसाला खुर्चीत बसवल्यावर त्याने त्याला कल्ले लावले, त्याच्या भुवया बदलल्या नि चेहेऱ्यावर रंगरंगोटी केली. मग तो मनुष्य लिंकनसारखा दिसू लागला. असे होते क्षणार्धात बदलणारे हॉलिवूडचे विश्व !

सहल संपली. हॉटेलवर परत येऊन सामान घेतले नि हिल्टनवर आलो. तेथून बसने विमानतळावर आलो. मोठ्या बॅगा लॉक-अपमधून काढून पुढे रवाना केल्या. तासाभराने विमान सॅन् फ्रॅन्सिस्कोकडे निघाले. थोड्याच क्षणात ते ढगात शिरले आणि त्यांच्या वरती गेले. अगदी लख्ख उन्ह होते. वरती निळे आकाश, खाली शुभ्र मेघ. काही वेळेला निळ्या आकाशाच्या छटा खालच्या

मेघांवर पडून त्यांना निळी झाक चढलेली दिसे.

आता ढग पाठीमागे पडले, नि डोंगराळ प्रदेश दिसू लागला. पण तो रूक्ष नव्हता. एवढ्यात ।ढगांचा लोट आला. त्यात विमान गुरफटले. पण काही क्षण. पुन्हा डोंगरांची रांग दिसली, तोच ढग आले. त्यातून विमान बाहेर आले नि समुद्रकिनारा दृष्टिपथात आला. तोही पुन्हा ढगाआड गेला. आता डोंगरांच्या रांगेवरून विमान जात होते. आणखी एकदा विमानाने मेघपटल ओलांडले. मग समुद्रकिनारा नि पर्वतराजी स्पष्ट दिसली. विमान किनाऱ्याच्या बाजूने जाऊ लागले. खाली गावे दिसू लागली. डोंगरांच्या रांगेने समुद्राला बांध घातला आहे असे वाटावे अशीच किनाऱ्याच्या बाजूला डोंगरांची रांग होती. साडे-सहाच्या सुमारास सॅनफ्रॅन्सिस्को दिसू लागले. गाव खोऱ्यात वसलेले वाटते. विमान समुद्रावरून धावपट्टीकडे गेले.

प्रथम हॉटेलविषयी खालच्या काउंटरवर चौकशी केली. पण हवी ती माहिती न मिळाल्याने वरच्या मजल्यावर गेलो. तिथल्या काउंटरवरच्या मुलीने दोन-चार हॉटेलची नावे सुचविली. बेरेसफोर्ड हॉटेल गावाच्या मध्यभागी होते. शिवाय बरेच स्वस्त होते. त्या हॉटेलात बुकिंग केले. मग बसने एअर टर्मिनलवर आलो. येथून हॉटेल जवळ होते. पण रस्त्याला चढ होता. म्हणून टॅक्सी केली. टॅक्सीवाला कॉलेज विद्यार्थी होता. त्याच्या बोलण्यावरून त्याचा एक भारतीय मित्र होता असे दिसले. भारताच्या इतिहासाची त्याला तोंडओळख होती. भारताचा प्रवास करण्याचा विचार आहे असे तो म्हणाला.

## सॅन फ्रॅन्सिस्को नि होनोलुलू

सहलीच्या बसगाड्या युनिअन स्क्वेअरमधून निघत होत्या. आणि तो चौक आमच्या हॉटेलपासून दहा मिनिटांच्या रस्त्यावर होता. आम्ही आलो तेव्हा बस उभीच होती. मात्र त्यात निरनिराळ्या सहलीला जाणारे प्रवासी होते. त्या सर्वांना घेऊन बस टर्मिनलवर आली. तिथे प्रवाशांची सहलीप्रमाणे विभागणी होऊन नगर-सहल निघाली.

सुरुवातीला बस बे ब्रीजवरून ट्रेझर आयलॅंडकडे गेली. हा सेतू आठ मैलांचा आहे. ट्रेझर आयलॅंडवर १९३९ मध्ये जागतिक प्रदर्शन भरले होते. येथे बस काही वेळ थांबली. मग तेथून मिशन डोलारेसकडे आली. या चर्चेची स्थापना जून १७७६ मध्ये म्हणजे अमेरिकन स्वातंत्र्याची घोषणा होण्यापूर्वी काही दिवस झाली. त्याच्या इमारतीच्या भिंती चार फूट जाड असून त्याचे छप्पर रेडवूड लाकडाचे आहे, नि त्याच्या फळ्या चामड्याच्या वादीने बांधलेल्या आहेत. छतावर रेड इंडियन कलाकारांनी वनस्पतीच्या रंगांनी चित्रे काढली आहेत. ती अजूनही तुकतुकीत दिसत होती. फादर सेरांनी सोळा मिशन्स काढली. त्यांपैकी मिशन डोलारेस हे आठवे. त्याच्या शेजारी नवीन चर्च आहे. ते चाळीस वर्षांपूर्वी बांधण्यात आले. गावातल्या घरांवर स्पॅनिश रचनेची छाप दिसते.

आता बस डोंगर चढू लागली. वाटेवर रशियन लोकांची जुनी वसाहत लागली. त्यातच ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्च

आहे. सोनेरी रंगाच्या गोल घुमटावरून ते दुरून ओळखता येते. डोंगर चढून आम्ही ट्वीन पिक्सवर आलो. रस्ता अगदी घाटासारखा वाटतो. खंडाळ्याला ज्याप्रमाणे पहाता पहाता धुके जमते तसेच इथे जमले. त्यातून खालचे शहर अस्पष्ट दिसत होते. सनसेट डिस्ट्रिक्ट ही श्रीमंत लोकांची वसाहत. येथून पॅसिफिक महासागरावरचा सूर्यास्त दिसतो. यातला अगदी अद्ययावत विभाग म्हणजे फ्रान्सिसवूड. इथली घरे टुमदार असून त्यांच्यापुढच्या वाटिकाही सुंदर होत्या. ही सगळी वस्ती डोंगराळ भागात आहे. एका विभागातला रस्ता नागमोडी असल्याने त्याला क्रुकेड स्ट्रीट हे नाव आहे.

गोल्डन गेट पार्कमध्ये जपानीज टी गार्डन नि यंग मेमोरिअल म्युझिअम आहेत. त्या दोन्ही गोष्टी पहाण्यासाठी आम्हाला अर्धा तास देण्यात आला होता. यापूर्वी मोठे म्युझिअम पाहिलेले असल्याने नि पुढे जपानला जाणार असल्याने त्या दोन गोष्टी पहाण्याची आम्ही फार दगदग केली नाही. येथून आम्ही सील रॉक्सकडे आलो. या खडकावर सील येऊन बसतात म्हणून त्यांना ते नाव मिळाले आहे. या वेळी तिथे एकही सील नव्हता. मात्र त्या स्थानावरून अथांग पॅसिफिक महासागराचे दर्शन होते. येथून बस गोल्डन गेट ब्रीजवरून प्रेसिडियो विभागाकडे आली. पूर्वी येथे स्पॅनिश सैन्याचा तळ होता. आता तिथे सहावा अमेरिकन सेना-विभाग आहे. आता बस पॅलेस ऑफ फाइन आर्ट, फिशरमन वार्फ, चिनी वस्ती इत्यादी भागांतून फिरत फिरत युनियन स्क्वेअरकडे परत आली.

दुपारी दोन वाजता आम्ही मुईरवूड सहलीला गेलो. या उपवनात रेडवूडचे वृक्ष आहेत. झाडाच्या सालीत पाण्याचा अंश खूप असल्याने ती सहज पेटत नाही. तसेच तिच्यात असे रस आहेत की, ज्यामुळे कृमी किटकांपासून झाडांचे रक्षण होते. ५४० मैल लांब नि ३० मैल रुंद असणाऱ्या या भूपट्टीत ही झाडे वाढतात. त्यासाठी आवश्यक असणारे मुबलक धुके, दमट हवा या गोष्टी या मुईर दरीत मिळतात. इथली काही झाडे ३६० फूट उंच होती, मात्र या झाडांची मुळे जमिनीत केवळ सहा फूट जातात. या झाडांचे महत्त्व ओळखून विलियम केंट या अमेरिकन लोकप्रतिनिधीने ही झाडे ज्या पट्टीत आहेत तो भाग अमेरिकन केन्द्र शासनाला दिला आणि जॉन मुईर या प्रसिद्ध वनस्पति-शास्त्रज्ञाचे नाव या उपवनाला द्यावे असे सुचविले. प्रेसिडेन्ट थिओडोर रूझवेल्टनी

एका शासकीय घोषणेने मुईरवूडस नॅशनल मॉन्युमेंटची स्थापना केली.

हे उपवन सॅन फ्रॅन्सिस्कोपासून सतरा मैलांवर असून तिकडे जाणारा सगळा रस्ता डोंगराळ पण झाडीने भरलेल्या प्रदेशातून होता. सुमारे तासाभरात आम्ही या उपवनाकडे आलो. आत शिरल्याबरोबर थंडी वाजण्याइतकी हवा गार झाली. झाडाच्या वयाचा अंदाज उंचीऐवजी बुंध्याच्या घेरावरून करतात अशी माहिती इथे दिली होती. संयुक्त राष्ट्रसंघाचे सभासद रूझवेल्ट यांच्या स्मृती-निमित्त या उपवनात १९ मे १९४५ या दिवशी जमले होते. परत येताना आम्ही सौसॅलिटो या गावात थांबलो. गावाचे मूळ नाव आहे स्पॅनिश—सॅलसेडो. हे गाव सधन लोकांची तसेच कलावंतांची नगरी म्हणून प्रसिद्ध आहे.

युनिअन स्क्वेअरमध्ये परत आल्यावर अमेरिकन एअरलाइन्सच्या कार्यालयात गेलो नि होनालुलूला एक दिवसासाठी एखाद्या स्वस्त हॉटेलात खोली रक्षित करता येईल काय असे तिथल्या अधिकाऱ्याला विचारले. ‘ मी राहिलो होतो त्याच हॉटेलात तुमची व्यवस्था करतो. दहा डॉलर खर्च येईल, ’ तो म्हणाला. ‘ फारच छान, ’ तिकिटे त्याच्या हातात देत मी उत्तरलो. ‘ उद्या तिकिटे नि हॉटेल रिझर्वेशनचे कागद घेऊन जा,’ असे मग त्याने सांगितले.

बे क्रुज फिशरमन वार्फपासून सुरू होतो. तिथे जाण्याचे स्वस्त साधन ट्रॅम होते. त्यासाठी युनिअन स्क्वेअरमध्ये आलो. गेल्या शतकापासून चालत आलेले नि अजून जीव धरून असलेले हे वाहतुकीचे साधन आहे. आम्हाला हवी असलेली ट्रॅम आली. मुंबईची बस तिच्यापेक्षा थोडी मोठी असेल. आम्ही आत चढलो. म्हणजे काय उभे राहण्याच्या जागेवर इतरांसारखे लोंबकळत उभे राहिलो. ठणठण घंटा वाजत, थांबे घेत ट्रॅम फिशरमन वार्फच्या थोडी अलीकडे येऊन थांबली.

तिकिटे काढून आम्ही रांगेत उभे राहिलो. रांग मोठी होती. पण चारशे पाचशे माणसांना घेईल इतके मोठे जहाज होते. सहलीची माहिती देणारी पत्रिका तिकिटाबरोबरच मिळाली होती. त्यावरून सहलीच्या मार्गाची नि भोवतालच्या स्थानांची कल्पना येत होती. याशिवाय माईकवरून एक अधिकारी माहिती देत होता.

जहाजाने किनारा सोडला नि मरिना, यॉट हार्बर, प्रेसिडियो या बाजूने गोल्डन गेट ब्रीजच्या खाली ते आले. या सेतूच्या खाली आल्यानंतर तो किती प्रचंड

आहे याची कल्पना येते. जहाज या सेतूच्या खालून थोडे पुढे गेले नि परत वळले. या वेळी स्वच्छ ऊन्ह असूनही हवेत विलक्षण गारवा होता नि वाऱ्याला जोर होता. परतीच्या मार्गावर एंजल आयलँड, एल कट्राझ आयलंड, ट्रेझर आयलँड, फेरी बिल्डिंग, इत्यादी ठिकाणे लागली. एल कट्राझ आयलंड हे समुद्रसपाटीपासून सुमारे सव्वाशे फूट उंच आहे. स्पॅनिश लोकांना १५४५मध्ये ते सापडले नि सुमारे दोनशे वर्षांनी त्याला वरील नाव मिळाले. पुढे अमेरिकन लोकांनी त्याचा ताबा घेतला नि नंतर त्याचा उपयोग सैनिक तुरुंग म्हणून करण्यात आला. १९३४ ते ६३ या काळात तेथे भयंकर समजले गेलेले कैदी ठेवण्यात येत असत. एल कॅपोनेसारखे गुन्हेगार इथे होते. तुरुंग फोडून कैदी पळून जाऊ शकणार नाही असा कडक बंदोबस्त असूनही काही कैदी त्यातून बाहेर पडण्यात यशस्वी झाले. पण प्रवाहाला वेग असल्याने ते वाहून गेले असे सांगतात.

सॅन फ्रॅन्सिस्कोमध्ये १९०६ मध्ये सर्वात मोठा धरणीकंप झाला. सगळे शहर उध्वस्त झाले. त्या वेळी फेरी बिल्डिंगवर जे घड्याळ होते ते बंद पडले. ते तसेच ठेवण्यात आले आहे. बंदरात उतरण्याच्या जिन्यापाशी खूप गर्दी असल्याने मी डेकच्या एका बाजूला उभा होतो. त्या वेळी माझे लक्ष जहाजातल्या भिंतीवरच्या पत्रकाकडे गेले. त्यात एका माणसाची माहिती होती. जोशूआ नॉर्टन हा इंग्लिश मनुष्य. गेल्या शतकाच्या सुरुवातीला सॅन फ्रॅन्सिस्कोला तो चाळीस हजार डॉलर्स घेऊन आला. या भांडवलावर तो लक्षाधीश झाला. परंतु तांदुळाच्या व्यापारात तो बुडाला. म्हणून काही काळ तो गायब झाला. पुढे भ्रमिष्टावस्थेत प्रगट झाला. तो स्वतःला सम्राट समजत असे. त्याला कुठल्याही हॉटेलात मोफत जेवण मिळे. शिवाय पन्नास सेंटपर्यंतचा त्याचा चेक बँक विनातक्रार वटवत असे. बे ब्रीज बांधण्याची योजना प्रथम त्याने सुचविली ही त्याची ख्याती !

वार्फजवळ खेकड्यांची विक्री करणारी दुकाने आहेत. त्यातल्या प्रचंड कढयांत हातभार लांबीचे खेकडे तळले जात होते. असे तळलेले खेकडे कागदाच्या पिशवीतून लोक घरी नेत होते. बंदरापाशी ज्या काही इतर गोष्टी दिसतात त्याही इथे होत्या. सॅन फ्रॅन्सिस्कोमध्ये बरीच चिनी वस्ती आहे. तो भाग चायना टाऊन म्हणून प्रसिद्ध आहे. त्यात चिनी वस्तूंची दुकाने आहेत.

संध्याकाळी कांती रावळ आले. ते इथे नोकरीला आहेत. त्यांच्या घरी गेलो. त्यांचा भाऊ नि बहीण तसेच त्या दोघांच्या बायका वाट पहात होत्या. जेवणे झाली. आम्ही सर्व बडोद्याकडचे असल्याने गावाकडच्या जुन्या गोष्टींविषयी किती तरी वेळ गप्पा मारल्या. परत येताना एका दुकानात आंबा दिसला. म्हणून तो घेतला. तो फ्लॉरिडाचा असून त्याची किंमत एक डॉलर होती. पण त्याला अजीबात चव नव्हती.

होनोलुलूकडे जाणारे विमान दुपारी होते. मोकळा वेळ असल्याने युनिअन स्क्वेअरच्या भागाकडे हिंडायला गेलो. वाटेत पुस्तकांचे दुकान लागले. त्यात छान पुस्तके होती. जुन्या पुस्तकांच्या विभागातून मी ' द प्राईस ऑफ रेव्होल्युशन ' हे पुस्तक विकत घेतले नि हॉटेलकडे परत आलो. टर्मिनल बिल्डिंगकडे जाण्याचा रस्ता उताराचा असल्याने सामान घेऊन पायी निघालो. उतार असला तरी दोन बॅगा फर्लांगभर नेण्याचे काम दमविणारे होते. टर्मिनलवरून सामान रवाना झाले. आम्ही बसने विमानतळावर आलो. इलेक्ट्रॉनिक चेकिंग आटोपल्यावर आम्ही विमानात शिरलो.

दोन वाजण्याच्या सुमारास विमान निघाले. आज उत्तम शाकाहारी जेवण मिळाले. नंतर चित्रपट दाखवण्यात आला. मी मात्र सकाळी घेतलेले पुस्तक वाचत बसलो. विमान सुमारे अडतीस हजार फुटांवरून जात होते. ते क्वचितच हाले. बाहेर गडद निळे आकाश, क्षितिजापाशी निळसर छटा असलेले ढग काही वेळ दिसले. मग थोडा वेळ शुभ्र मेघांची गर्दी झाली. नंतर ढग विखुरले गेले. तरीही इतस्ततः हेलकावणारे पांढरे ढग नि निळे आकाश यांची सोबत बराच वेळ राहिली. हे धवल मेघ पाठीमागे राहिल्यावर मात्र मग वर निळे आकाश नि खाली अथांग, शांत, निळसर पॅसिफिक महासागर हे चित्र अखेरपर्यंत बरोबर राहिले. आता दूरवर भूमीचा भास होऊ लागला. जलाशयावरही लाटा येऊ लागल्या. मग डोंगर दिसले. भूमी जवळ आली. किनाऱ्यापाशी पाण्याचा रंग पोपटी झाला. आता छोटी बेटे दृष्टिपथात आली. त्यांवर वस्ती होती. साडेसहाला विमान उतरू लागले. पंधरा मिनिटांत विमानाने जमिनीला स्पर्श केला.

होनोलुलू जसा सैनिक तळ आहे तसेच ते सहलीचे ठिकाण आहे. हवाई बेटे ही मूळची पोलिनेशिअन लोकांच्या वंशाची भूमी. आता इथली वस्ती मिश्र

आहे. विमानतळावर परिचितांचे स्वागत पोलिनेशिअन रिवाजाप्रमाणे फुल-हारांनी करण्यात येत होते. अननसाचा रस मात्र सर्वांसाठी मोफत होता.

सामान ठेवण्यासाठी मुख्य तळावर जावे लागत होते. त्यासाठी छोटी बस सर्व्हिस होती. सामान क्लोकरूममध्ये ठेवले नि गावात जाण्यासाठी बसची वाट पाहात उभे राहिलो. बसला बराच अवधी असल्याने ग्रे लाईनच्या माणसाने तिघांसाठी एक टॅक्सी ठरवून दिली. तिच्यातून आम्ही रॉयल प्रिन्स हॉटेलवर आलो. त्यात फारशी गर्दी नव्हती. उष्मा विलक्षण होता. हॉटेलच्या खोलीत हातातल्या बॅगा ठेवून आम्ही बाहेर पडलो.

इथला बीच चंद्रकोरीच्या आकारासारखा असून दोन्ही टोकांवर आलिशान इमारती दिसतात. मधला बराच भाग मोकळा होता नि त्यात नारळीची वने दिसत होती. सायंकाळच्या थंड कोमट वाऱ्यावर ती डोलत होती. दूरवर एक प्रचंड आगनाव जात होती. तिच्या बऱ्याच अलीकडे शिडनावा वाऱ्याच्या जोरावर इकडून तिकडे जात होत्या. किनाऱ्यापासल्या लाटा खूप उंच उसळत होत्या. त्यावर असंख्य लोक सर्फ रायडिंग करत होते. बहुतेक रेस्टॉरंटच्या बाहेर मशाली पेटल्या होत्या. आत वाद्यांचा झणत्कार होत होता. त्याच्या तालावर काही वेळा मंदगतीचे तर काही वेळा द्रुतगतीचे सांघिक नृत्य चालले होते. मधूनच गाण्याचा आवाज येत होता. आणखी एक ठिकाणी पोलिनेशिअन नृत्य चालले होते. सूर्यास्त झाला होता. तरी पण संधिप्रकाश होता. काही युगुले कटीला कटी लावून नि डोक्याला डोके लावून समुद्राकडे पाहात बसली होती. वातावरण मस्त, धुंद नि मनाला आल्हाद देणारे होते. काही क्षण असे असतात की, ज्या वेळी जीवनाला गती असते असे वाटत नाही.

आतापर्यंत अनेक नगरसहलीला गेलो होतो. इथली नगरसहल घेतली नसती तर हुला नृत्य पहाण्याचे हुकत होते. पोलिनेशिअन लोकांचे हे राष्ट्रीय नृत्य आहे नि त्यात इतिहास, काव्य नि संप्रदाय यांचे धागे विणलेले आहेत. म्हणूनच हे नृत्य पहाण्यास जायचे मी ठरवले. हमरस्त्यावरून जात असताना एक मोठे उपाहारगृह दिसले. तिथे सेल्फ सर्व्हिस होती. लोणी-पाव, अननसाचा रस, चहा वा कॉफी अशी न्याहरी होती. ती आटोपून हुला नृत्याच्या जागेकडे जाण्यास निघालो. अंतर बरेच होते. आम्ही गेलो तेव्हा स्टेडियम भरला होता. जेमतेम जागा मिळाली. हुला नृत्याची माहिती दिल्यावर त्याचे प्रकार सुरू झाले.

प्रथम पंधरा बायका हिरव्या स्कर्टमध्ये आल्या. त्यांच्या पाठीमागे गिटार वाजवत काही बायका गाणे म्हणाल्या. त्याच्या तालावर सांघिक नृत्य झाले. दुसऱ्या नृत्यप्रकारातील गाण्यात प्रियकराच्या शरीराचे वर्णन होते. नृत्य करणाऱ्या मुलींत दोघी जणी परकर नेसलेल्या असून बाकीच्यांनी हिरवा स्कर्ट नि लाल पोलके घातले होते. नितंबांच्या लालित्यपूर्ण हालचाली हा या नृत्याचा विशेष. तिसरा प्रकार हा आपल्याकडच्या टिपरीसारखा होता. त्यानंतरच्या प्रकारात एकाने पाट्यावर वरवंटा फिरविण्याचे काम केले नि बाकीच्या बायकांनी गाणे म्हटले. सर्वांच्या पाठीमागे वाद्यवृंद होता. शेवटी प्रेक्षकांनी एका सांघिक नृत्यात भाग घेतला. वरील नृत्याचे प्रकार चालू असताना त्यांची माहिती देणाऱ्या व्यक्तीने एक गंमतीदार गोष्ट सांगितली. तो म्हणाला की, या बेटावर प्रथम मिशनरी आले तेव्हा इथल्या स्त्रिया फारसे कपडे घालत नाहीत हे पाहून त्यांना आश्चर्य वाटले नि सभ्यतेचा भाग म्हणून त्या बायकांना कपडे घालण्याचे शिक्षण दिले. आता जवळजवळ वस्त्रहीन युरोपीय स्त्री-पुरुष पोलिनेशिअन लोक पहातात तेव्हा अचंबा वाटून संस्कृती म्हणजे काय याचा त्यांना प्रश्न पडतो !

स्टेडियमच्या बाहेर शहाळ्याची दुकाने होती. आम्ही शहाळी घेतली. त्यातले पाणी बेचव होते. येथून आम्ही गोल्डन क्रेटरकडे आलो. वेळ थोडा असल्याने नि ऊन फार असल्याने पायथ्यापासून परतलो आणि बीचकडे आलो. इथे शेकडो लोक समुद्रस्नान करत होते. पाणी स्वच्छ पण निळसर रंगाचे होते. इथल्या स्वस्त उपाहारगृहात डॉक्टरने नुडल्स घेतली. त्यात होते मांसाचे तुकडे. तेव्हा ती प्लेट माझ्याकडे आली.

दुपारनंतरच्या बसने विमानतळाकडे जाण्यास पायी निघालो. वाटेत एक टॅक्सी भेटली. टॅक्सीवाला तरुण होता. तो म्हणाला की, बसला साडेतीन डॉलर्स पडतात. मी चार डॉलर्समध्ये तुम्हाला नेतो. मी त्याला नकार दिला. तेव्हा तो म्हणाला की, मला द्रव्याची फार गरज आहे. मग त्याच्या टॅक्सीने निघालो. तो कॅनडिअन होता. स्वदेशातल्या जीवनाला तो कंटाळला होता. त्याला शांत नि संथ जीवन हवे होते. म्हणून तो स्पेन किंवा हॉलंडमध्ये राहायला जाणार होता. पोलिनेशिअन लोकांना आपल्यावर आक्रमण झाले आहे असे वाटते ही गोष्ट त्यानेच मला सांगितली.

परत आल्यावर हवाई बेटांविषयी माहिती देणारे पुस्तक मी वाचले.

त्यात हवाई बेटांच्या भूमिपुत्रांच्या हातून राजसत्ता कशी काढून घेण्यात आली, त्यासाठी अमेरिकन व्यापाऱ्यांनी काय कारस्थाने केली, लिलीओकालानी राणीने आपल्या राज्याचे स्वातंत्र्य टिकवण्याचा कसा प्रयत्न केला, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष क्लिव्हलँड यांनी आंतरराष्ट्रीय नीतिमत्ता टिकविण्यासाठी आपल्या व्यापाऱ्यांना कसा विरोध केला, पण पुढे स्पॅनिश-अमेरिकन युद्धात ही बेटे अमेरिकेला कशी स्वामित्वाखाली घ्यावी लागली, हा इतिहास कळला. काश्मीर-विषयी प्रश्न विचारणाऱ्या अमेरिकन नेत्यांना त्यांच्या पूर्वसूरींनी हवाई बेटे कशी लाटली याचे स्मरण काही वेळेला करून देणे आवश्यक आहे !

विमानतळावर आल्यावर सामान क्वांटासच्या माणसाकडे सोपवले. सिडनीला जाणारे विमान रात्री निघणार होते. पण त्याला खूप अवधी होता. इथे वेळ जाता जाईना. करमणुकीसाठी भोवतालच्या प्रवासी लोकांचे निरीक्षण अधूनमधून करीत होतो. कोणी शून्य दृष्टीने खिडकीतून आकाशाकडे पाहात बसले होते, कोणी स्वतःच सोडलेल्या सिगरेटच्या धुराकडे पहात बसले होते, कोणी पेरी मेसन वाचत होते. काही लष्करी अधिकारी चक्क झोपले होते. काही हिप्पी तरुण-तरुणी खुर्च्यांऐवजी जमिनीवर बसली होती. छोटी मुले खुर्चीला लावलेल्या टेलिव्हिजनवर चित्रे पाहात होती. संध्याकाळ झाल्यावर विमानांची रहदारी खूप वाढली. ती पहाण्यासाठी बाहेर जाऊन बसलो. कसा तरी वेळ निघाला.

अखेर आमचे विमान आले. बसण्याची सूचना मिळाली. साडेअकराला विमान धावू लागले. विमानतळावर असंख्य निळे दिवे होते. नंतर पिवळ्या दिव्यांची रांग लागली. विमानाने भूमी सोडली. काही वेळाने नवीन प्रवाशांना उपाहार देण्यात आला. नंतर दिवे मालवण्यात आले. मला झोप अनावर झाली. प्रवासी कमी होते. काही लोक तीन खुर्च्यांचा बिछाना करून लवंडले. मी खुर्चीतच डुलकी घेतली. पण दीडच्या सुमारास एका मोकळ्या जागेत जाऊन पडलो. चाराला जाग आली. परत झोपलो. साडेपाचला स्टयुअर्डने उठवले. तोंड पुसण्यास गरम रुमाल दिला. नंतर चहा झाला. सहाला फिजी बेटांच्या नंदी या राजधानीच्या विमानतळावर विमान उतरले. विमान इथे उतरते हे आधी माहीत झाले असते तर एक दिवसासाठी आम्ही थांबलो असतो. विमानतळावर बहुतेक भारतीय लोक कामाला होते.

साडेसहाला विमान सुटले. पाऊण तासाने पूर्वेकडे एक लाल रेघ दिसू लागली. हळूहळू ती मोठी झाली. मग पाणी नि क्षितिज जिथे भेटले आहे असे वाटे तो भाग गुलालाची पिचकारी मारल्यासारखा झाला. नंतर तो रंग जाऊन तिथे पिवळसर छटा आली. तारे अदृश्य होऊ लागले. दिशा उजळू लागली. खाली संथ पाणी होते. आता आमचे विमान हो बेटाच्या जवळून गेले. मग शुभ्र मेघांची गर्दी झाली. क्षणभरात काहीच दिसेनासे झाले. असे किती तरी वेळा झाले. मग विमान सिडनीजवळ आहे असे घोषित झाले. थोड्या वेळात विमानाची चाके जमिनीला टेकली.

# सिडनी नि मॅनिला

विमानातून बाहेर आलो तेव्हा आभाळ आलेले होते. प्रथम पासपोर्ट-तपासणी झाली. डॉक्टरचा पासपोर्ट पाहून तिथला अधिकारी म्हणाला, 'आमच्याकडे एका बाईला चार-पाच मुलं झाली आहेत. ती जगतील का?' 'ते कसं सांगणार? जगवण्याचा प्रयत्न करायचा.' डॉक्टर म्हणाली. मग माझ्याकडे वळून त्याने विचारले, 'खाण्याच्या वस्तू आहेत का?' 'चिकार आहेत,' मी उत्तरलो. तेव्हा तो हसला नि त्याने पासपोर्टवर शिक्के मारले. नंतर सामान घेऊन आम्ही बाहेर आलो. डॉक्टरची धाकटी बहीण उषा विमानतळावर आली होती. तिच्याबरोबर एलिझबेथ नि तिचे यजमान रिचर्ड आले होते. १९५२ मध्ये आमच्या-बरोबर एलिझबेथ स्पेनच्या सहलीत होती. विमानतळा-वरून आम्ही उषाच्या घरी आलो.

दुपारी सिडनी हार्बर क्रूजला गेलो. कॅप्टन फिलिपने १७८८ मध्ये सिडनीला सर्वोत्तम बंदर असे प्रशंसापत्र दिले होते ते अजूनही योग्य आहे असे म्हणतात. नालाच्या आकाराचे जलाशय असून भोवतालचे दृश्य मनोहारी आहे. उन्ह असूनही हवा थंड होती. शिडाच्या बोटी इकडून तिकडे जात होत्या. ऑस्ट्रेलियन क्रूझर सिडनीने जर्मन विनाशिका एमडेन बुडविली होती. त्या सिडनीचा वरचा मास्ट एका बाजूला उभा ठेवलेला आहे.



आमच्या राहण्याची व्यवस्था गेस्ट हाऊसमध्ये उषाने

केली होती. एका मोठ्या वाड्याचे रूपांतर गेस्ट हाऊसमध्ये केलेले आहे. पण त्यात शेकोट्यांची व्यवस्था नव्हती. अधूनमधून पाऊस पडे. शिवाय थंडी प्रचंड होती. त्यामुळे या घरात जाताना मला डिकन्सच्या ब्लिक हाऊस या कादंबरीच्या नावाची आठवण यायची. इथे राहणारे लोकही भिन्न वयाचे नि व्यवसायाचे होते. एका वयस्क इसमाच्या स्मरणशक्तीवर मोटार अपघातामुळे परिणाम झालेला होता. त्याचा भाऊ त्याला भेटायला यायचा नि मी तुझा भाऊ असे त्याला सांगायचा. म्हणून हा त्याला भाऊ मानायचा. त्याची उषाशी ओळख असल्याने तो डॉक्टरशी गप्पा मारायला बसायचा. दुसरी एक म्हातारी बाई होती. ती पण डॉक्टरशी बोलायची. एके दिवशी ती मला म्हणाली की, मी नातीला बेबी सिर्टींग करायला जात आहे. नातीसाठी बेबी सिर्टींग करायचे ही कल्पना कशी वाटते !

सिडनीला आलो त्याच्या दुसऱ्या दिवशी आम्ही कॅन्बराला क्लेअर कॅम्बेल-स्मिथकडे जायला निघालो. स्पेनमधल्या प्रवासात क्लेअरही आमच्याबरोबर होती. एलिझबेथ, रिचर्ड, उषा, डॉक्टर आणि मी असे मोटारीने निघालो. सिडनीची उपनगरे काही वेळा लंडनच्या नि काही वेळा मुंबईच्या उपनगरांची आठवण करून देतात. प्रवासाचा बराच रस्ता हा डोंगराळ नि गडद झाडीतून होता. मात्र वाटेवर कुठेही कांगारू दिसले नाही. दुपारी चारनंतर डोंगर नि झाडी मागे पडली नि विस्तृत पठार लागले. लोणावळा ते पुणे या परिसराची आठवण देणारे ते पठार होते. कॅन्बरात शिरलो तेव्हा दिवेलागणी झाली होती.

क्लेअर वाट पाहात उभी होती. डॉक्टर तिला चार वर्षांपूर्वी भेटली होती. मी मात्र १९५२ नंतर प्रथम भेटत होतो. घरात गेलो. स्वागतासाठी क्लेअरने भिन्न प्रकारची मद्ये टेबलावर ठेवली होती. त्यांचा आस्वाद घेत युरोपातल्या प्रवासाच्या जुन्या आठवणी ताज्या केल्या.

ऑस्ट्रेलियाची लोकवस्ती विरळ आहे. तेव्हा अशा देशाच्या राजधानीची वस्ती किती असणार ! कॅन्बरा शब्द इथल्या आदिवासी लोकांच्या भाषेतून घेतलेला आहे. त्याचा अर्थ भेटण्याची जागा. इथली पार्लमेन्टरी इमारत संगमरवरी दगडाची आहे. त्याच्यासमोर पाचव्या जॉर्जचे स्मारक असून जवळ पहिल्या महायुद्धाचे स्मारक आहे. तसेच ऑस्ट्रेलियाच्या संघराज्याचा शिल्पकार नि पहिला पंतप्रधान बार्टन याचा पुतळा इथे आहे.

नॅशनल लायब्ररीत सुमारे साडेबारा लाख ग्रंथ आहेत. त्याच्या पहिल्या मजल्यावर नंदलाल नि गौतम वाघेला यांच्या चित्राचे प्रदर्शन होते. वॉर मेमोरिअलमधील गेल्या महायुद्धातील विमानाचे प्रदर्शन मला आवडले. जी फॉर जॉर्ज हे विमान १९४२ मध्ये रणभूमीवर आले नि त्याने जर्मनीतल्या कलोनवर १९४४ मध्ये शेवटचा हल्ला केला. बॉमर कमांडमधल्या कोणत्याही विमानापेक्षा या विमानाने अधिक हल्ल्यांत भाग घेतला होता अशी तिथे नोंद होती. पकडलेली एक जर्मन यू बोट बाहेर ठेवलेली होती. संध्याकाळी कॅन्बराहून निघताना क्रेअरला मुंबईला येण्याचे आमंत्रण दिले. सुटीवरून लोक परत येत असल्याने सिडनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोटारींची गर्दी फार होती.

सिडनीतल्या आर्ट सेन्टरमधला ' आवर यस्टरडेज ' हा म्युझिअम पाहण्यासारखा आहे. १७८८ ते १९०० या काळातील ऑस्ट्रेलियन राष्ट्राच्या विकासातील गोष्टींचे त्यात प्रदर्शन होते. त्यात इथल्या आदिवासी लोकांच्या जीवनाशी निगडित असलेल्या काही वस्तू ठेवलेल्या आहेत. त्यांपैकी बुमरँगने माझे लक्ष वेधून घेतले. त्याचे किती तरी प्रकार होते. दुपारी रिचर्डबरोबर त्याच्या स्टाफ लंच रूममध्ये जेवायला गेलो. पहिल्या ब्रेडमध्ये फंगस निघाला. दुसरा ब्रेड मोडला त्यात तेच ! ऑस्ट्रेलियात बाहेरून खाद्यपदार्थ आणण्यास बंदी आहे. अशी काळजी घेऊनही स्वदेशी ब्रेडमध्ये फंगस निघतो ! ऑस्ट्रेलियात आलो नि कांगारू पाहिला नाही असे होऊ नये म्हणून संध्याकाळी झूमध्ये गेलो.

उषाने आपल्या भारतीय नि ऑस्ट्रेलिअन मित्रमैत्रिणींना भोजनाला बोलावले होते. त्यासाठी तिने बरेच पदार्थ विकत आणले. पण त्यात लोणचे नव्हते. मी विचारले तेव्हा ती म्हणाली की, जवळपास मिळत नाही. भारतीय भोजन नि लोणचे नाही हे काही खरे नाही असे म्हणून मी बाहेर पडलो. थोडे दूर जाऊन चार-सहा दुकानांत चौकशी केली. एका दुकानात लोणची होती. त्यांचे दोन-तीन प्रकार घेतले आणि किंमत विचारली. दुकानातल्या बाईने लहान बाटलीची जी किंमत सांगितली ती ऐकून मी म्हणालो, ' एवढ्यात आमच्याकडे बरण्या मिळतील. ' त्यावर ती म्हणाली, ' घरी गेल्यावर लोणची कर नि कळव. तुझ्या बरण्या मी उतरवून घेईन. नफा होईल तो वाटून घेऊ. ' पार्टीला आलेल्या मंडळीत इथे स्थाईक झालेले आपटे कुटुंब होते. निघण्याच्या आदल्या दिवशी

त्यांच्याकडे जेवायला गेलो होतो.

एक दिवस एलिझाबेथकडे पार्टी झाली. तिने मित्रपरिवाराला बोलावले होते. बहुतेकजण डाव्या विचारसरणीचे होते. चीन–भारत, भारत–पाक नि पूर्व बंगालमधील निर्वासित यांविषयी चर्चा झाली. चीन नि पाकिस्तान या दोन देशांशी संघर्ष झाल्यास काय होईल असा एकाने प्रश्न विचारला. ‘ एकाच देशाशी लढण्याचा प्रसंग आल्यास आम्ही पुरून उरू, ’ मी उत्तरलो आणि नंतर भाऊसाहेब पेशव्यांचे स्मरण ठेवून म्हणालो, ‘ चीन नि पाकिस्तान चालून आल्यास दाटून उभे राहू, कत्तल होऊन जाऊ, पण १९६२ सालची पुनरावृत्ती होणार नाही.’

सिडनीहून मॅनिलाला जाणारे विमान साडेआठला होते. उषा, रिचर्ड नि एलिझाबेथ यांचा निरोप घेऊन अकरा दहाला विमानात बसलो. ठीक समयाला विमान सुटले. विमान २६,००० फुटांवरून जात होते नि वाऱ्याला जोर असल्याने त्याचा वेग कमी होता. सुरुवातीला डाव्या हाताला डोंगराची मोठी रांग दिसली. ते ब्ल्यू माउंटन असावेत. आता खाली सपाट प्रदेश, अर्धवट झाडी नि दूरवर माळरान असे दृश्य दिसू लागले. वस्ती नि गावे मैलोमैल लागत नव्हती. मध्येच एक सरोवर लागले आणि दूरवर हिरवी वनश्री दिसली. काही वेळाने जमिनीचा रंग लाल झाला. सुमारे तासभर हा रंग दिसला. नदीच्या प्रवाहाने जमिनीला काही ठिकाणी असे विलक्षण आकार आलेले होते की एखाद्या कलाकाराने त्या आकृत्या काढल्या आहेत असे वाटावे. आता सपाट प्रदेश संपून डोंगराळ प्रदेश सुरू झाला. त्यातून नद्यांचे अनेक फाटे उतरताना दिसले. या भागात लोकवस्ती अशी दिसलीच नाही. आजही शाकाहारी जेवण छान होते. जोडीला थंड बीअर. वाटले प्रवास नेहमी असा असावा. दोनच्या सुमारास वाऱ्याचा जोर कमी झाला. आकाश निरभ्र होते. दूरवर काही वेळा सरोवर असल्याचा भास होई. तीनच्या सुमारास प्रचंड निळे जलाशय दिसल्याने नकाशा पाहिला. तो आराफूरा समुद्र होता.

आज विमानात चार-पाच भारतीय प्रवासी होते. त्यांपैकी एक आनंद प्रकाश माझ्याकडे गप्पा मारण्यास येऊन बसले. हे सर्व भारतीय फिजीचे होते. गेल्या तीन पिढ्यांत त्यांना भारताचे दर्शन झालेले नाही. तरीही त्यांना भारताविषयी विलक्षण ममत्व होते. केव्हा तरी भारताला निदान धावती भेट देण्याची त्यांची मनीषा

होती. फिजीमध्ये त्यांची शेती होती. शिवाय ते नोकरी करीत होते. भातशेतीच्या शिक्षणासाठी ते मॅनिलाला जात होते. फिजीमधल्या भारतीय लोकांचे आचार-विचार, जीवनमूल्ये, भोजनपद्धती ही भारतीय आहे. मात्र भारतातून आलेल्या मुसलमानांची वृत्ती पृथकपणाची असते अशी माहिती आनंद प्रकाश यांनी दिली. या लोकांना उत्तेजन द्यायला पाकिस्तानातून धर्मगुरू येतात. मुसलमानांच्या फिजीमधल्या मागण्या नि भारतातल्या मागण्या यात बरेच साम्य आहे असे ते म्हणाले. मागण्या एक, भूमी भिन्न !

आता ढग आले. त्यांची खूप गर्दी झाली. बराच वेळ खालचे काही दिसत नव्हते. पाचच्या सुमारास ढगांची गर्दी कमी होऊ लागली. खाली अथांग जलाशय दिसू लागले. त्यात बेटे होती. अजूनही प्रवासाचा टप्पा बराच बाकी होता. वेळ जाण्यासाठी लाईफ, इकॉनॉमिस्ट, पंच यांचे अंक चाळले. पंचमधली दोन विनोदी चित्रे छान होती. पहिल्या चित्रात जुन्या वस्तूंच्या दुकानाबाहेर दोन ग्राहक उभे आहेत असे दाखवले होते. त्यातला एक दुसऱ्याला म्हणतो, "आतल्या वस्तू पाहण्याचे संपले की तू ओरड. आग रे आग. मग आपल्याला दिसेल दुकानदार कोणत्या वस्तू प्राचीन समजतो ते." दुसऱ्या चित्रात एकजण दुसऱ्याला म्हणतो, 'हे चित्र बेकार आहे. पण त्याच्यावरची धूळ मात्र खरोखर सतराव्या शतकातली आहे.'

आता ढग गेले. धुके विरळ झाले. पावणेसहाला कॅप्टनने सांगितले की, आपण फिलिपाइन्सच्या आसमंतात आहोत. मिंडॅनो बेट लागत आहे. आता दोन्ही बाजूला फिलिपाइन्सची बेटे दिसू लागतील. पुन्हा एकदा निळे आकाश, खाली पांढऱ्या ढगांची चादर नि त्यावर पडलेली सूर्यप्रभा आणि त्यातून बाणासारखे जाणारे विमान असे दृश्य काही वेळ होते. पावणेसातला जवळपासचे ढग विखरून गेले. मग खाली निळे पाणी नि बेटे दिसू लागली. दूरच्या ढगांवरच्या आकृत्या नितांत रमणीय होत्या. वाटले की, ध्रुव प्रदेशाकडेच विमान जात आहे. सव्वासातला विमान उतरू लागले. पाहता पाहता ते जमिनीला टेकले. बाहेर आलो तो सुमार नाही असा उकाडा सुरू झाला.

मॅनिलाचा विमानतळ लहान आहे. सामान मिळायला फार वेळ लागला नाही. इथली रहाण्याची व्यवस्था क्वॉन्टास कंपनीतर्फे होती. त्यामुळे त्यांचा मनुष्य आम्हांला शोधत आला. नंतर त्याने मोटारीत सामान ठेवण्याची

व्यवस्था केली. मग आम्ही हॉटेलकडे निघालो. तिकडे जाण्याचा रस्ता समुद्र-मार्गाने आहे. थोड्याच वेळात आम्ही हॉटेल फिलिपिनासवर आलो.

डॉक्टर चार वर्षांपूर्वी मॅनिलाला आली होती. त्यामुळे गावाची तिला थोडी फार माहिती होती. तेव्हा आम्ही हिंडत उद्यानाकडे आलो. त्यात फिलिपाईन्सच्या स्वातंत्र्ययोद्ध्यांची स्मारके आहेत. या उद्यानातल्या कारंज्याचे पाणी दोनशे फूट उंच उडत असावे. इथे सिगारेट विकणारा पाहिला नि त्याच्याकडे सुटी सिगारेट मिळत होती. हे दृश्य भारत सोडल्यापासून प्रथम पाहिले.

अंधार पडला म्हणून परत वळलो. इतक्यात गोळीबाराचा आवाज झाला. उद्यानातले तसेच बाहेरचे लोक पळू लागले. काय घडत आहे ते समजेना. रस्ता माहीत नसल्याने आम्ही कुठे पळणार ! वेळ आल्याशिवाय गोळी लागत नाही असे म्हणतात. तेव्हा प्रसंग आल्यास जमिनीवर पडायचे पण पळायचे नाही, असे मी ठरवले. मग चालत रस्त्याच्या कडेला आलो. तिथे शेकडो चपला नि बूट पडले होते. शंभर पावले चाललो नि पुन्हा गावठी बॉम्बचा आवाज झाला. मग पुन्हा पळापळ सुरू झाली. पण या वेळेपर्यंत आम्ही हॉटेलच्या जवळपास आलो होतो.

नगरसहलीला फक्त चार जण होते. आम्ही दोघे आणि एक वयस्क चिनी जोडपे. हे चिनी जोडपे कॅनडाचे नागरिक होते. मॅनिलाचे विभाग तीन. एक प्राचीन, दुसरा स्पॅनिश नि तिसरा अमेरिकन. सुरुवातीला टॅक्सी गेली ती रोक्झास-अॅव्हेन्यू या अद्ययावत विभागातून. वाटेवर अमेरिकन दूतालय व नेव्ही क्लब लागले. कोणता देश किती प्रबळ आहे हे ओळखण्याचा, इतक्या दिवसांच्या प्रवासाने, मी एक नियम बसवला. एखाद्या राजधानीतून हिंडताना गाईड कोणत्या देशाच्या दूतालयाचा उल्लेख करतो यावरून त्या देशाच्या वजनाची आपल्याला कल्पना येते.

जुन्या विभागात बस शिरली नि मला १९५२ मध्ये स्पेनमध्ये प्रवास करताना जे गावाचे चित्र दिसले होते त्याचे स्मरण झाले. काळ्या कपड्यांतल्या बायका, छोटी घरे, बसकी दुकाने, अस्वच्छ गल्लया, मधूनच दिसणारा पाद्री, मोटार रिक्शा, त्यात स्वारीने बसलेले प्रवासी, लाकूडतोड्याची वखार– जग एकदम बदललेले दिसले.

हा विभाग मागे टाकून आम्ही मॅनिलाच्या अमेरिकन सिमेटरी नि मेमोरिअलकडे निघालो. वाटेवर फोर्बस पार्क लागला. ही लक्षाधीश लोकांची वसाहत. या भागात घर घेण्यास किती द्रव्य लागते याचे ड्रायव्हरने कौतुकाने वर्णन केले. इथल्या रस्त्याला चिंचेची झाडे विपुल होती. मोटार एअर कंडिशन्ड होती. त्यामुळे बाहेरच्या उन्हाची कल्पना आली नाही. सिमेटरीच्या दरवाजापाशी मोटारमधून बाहेर पडल्यावर मला उन्हाचा चटका बसला नि लगेच घामाच्या धारा लागल्या. सिमेटरीचे क्षेत्रफळ १५२ एकरांचे असून त्यात सुमारे १७२०६ सैनिकांचे दफन करण्यात आले आहे. या सिमेटरीच्या लॅन्डस्केपचे निर्माते सॅन फ्रॅन्सिस्कोचे गार्डनर डॅली आहेत. स्मारकाच्या भिंतीवर कोणते सैन्य कुठे लढले, कोण कुठे कामास आले, याची माहिती कोरलेली आहे. म्हणून स्मारकाविषयी अमेरिकन माणसाला जिज्ञासा वाटणे स्वाभाविक आहे.

शहराचा जुनाट भाग दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटच्या काळात बराच नष्ट झाला. वाचले फक्त सॅन ऑगास्टिन चर्च. सर्वांत जुने. १५९९ मध्ये त्याच्या बांधणीला सुरुवात झाली नि दहा वर्षांनी ते काम पुरे झाले. धरणीकंपातून ते वाचले अशी त्याची ख्याती आहे. मॅनिलाचा ताबा अमेरिकेने घ्यावा या करारावर १८९८ मध्ये इथे स्वाक्षऱ्या झाल्या. येथून आम्ही स्पॅनिश फोर्टकडे आलो. जवळ जवळ तो उध्वस्त झालेला आहे. जपानी अधिराज्याच्या काळात इथल्या एका खोलीत ६०० सैनिकांना कोंडून ठेवण्यात आले होते. त्या अंधाऱ्या खोलीतून हिंडताना आजही मोकळा वारा मिळत नाही.

खोलीच्या पलीकडच्या तटावर समुद्राचे पाणी आदळत होते. कोंडलेल्या नि त्यातून वाचलेल्या सैनिकांची मन:स्थिती कशी असेल याची कल्पना भयप्रद वाटते.

डॉ. रिझाल यांना फिलिपाईन्सचे स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणायला हरकत नाही. इथल्या एका भागात ते बंदिस्त होते. त्यांच्या जीवनाशी निगडित असलेल्या गोष्टींचे इथे प्रदर्शन आहे. वेळ अगदी थोडा असल्याने मी निवडक गोष्टींची टिपणी केली. बंडाच्या आरोपाखाली त्यांना देहान्ताची शिक्षा होऊन १८९८ मध्ये फाशी देण्यात आले. अखेरच्या पत्रात ते लिहितात, ' आज ना उद्या मला मरावेच लागणार. तेव्हा सर्व शक्ती जागृत असताना मला मृत्यू यावा ही गोष्ट इष्ट आहे. माझे दफन करा. बाहेरच्या स्तंभावर जन्मदिन नि

मृत्युदिन इतकेच लिहा. अधिक काही नको.’

वडिलांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ‘ मी तुम्हाला भेटू इच्छितो. ज्यांची मने कणखर आहेत त्यांनी मला भेटायला यावे. मला महत्त्वाचे असे काहीच सांगायचे नाही. ’ त्यांना ज्या खोलीत बंदिस्त करून ठेवले होते तिथे पुढील नोंद होती. ‘ इथे ते भोजन करत, लोकांना भेटत, इथेच त्यांनी आपला जाहीरनामा लिहिला.इथेच त्यांना मृत्युदंडाची शिक्षा वाचून दाखविण्यात आली.

डॉ. रिझाल कवी होते, वीर सावरकरांप्रमाणे. त्यांचे शेवटचे काव्य ‘ माय लास्ट फेअरवेल ’ वीर सावरकरांच्या ‘ माझे मृत्युपत्र ’ या काव्याचे स्मरण देते. डॉ. रिझाल यांच्या काव्यातल्या दोन ओळी.

“ Feloved Filipinas, hear me the farewell word :
I go here no slaves are—nor butchers : nor oppressors : ”

अगदी खरे सांगायचे म्हणजे मॅनिलाच्या सहलीतले माझ्या दृष्टीने हे सर्वांत महत्त्वाचे स्थान. देशाच्या स्वातंत्र्यासाठी किती मोठे लोक आपल्या जीवाचा भोग देत असतात !

हॉटेलवर परत आल्यावर सामान आवरले. विमानाच्या वेळेची चौकशी केली. ते थोडे उशिरा येणार होते. खोली सोडण्याची वेळ जवळ येत होती. तेव्हा आम्ही भोजन उरकून विमानतळावर आलो. उष्मा भयंकर होता. विमानतळाची इमारत पुन्हा बांधली जात असल्याने लाऊंजमध्ये पंखे नव्हते. जीव बेजार झाला. निदान पंख्याचा वारा मिळावा म्हणून आतल्या लाऊंज-मध्ये गेलो. वेळ जाता जाईना शेवटी विमान पावणेसहाला येणार असे जाहीर झाले. पण आले सव्वासहाला.

सूर्यास्त झाल्याने दिवे लागले. आता एका पाठोपाठ एक विमाने सुटू लागली. आमच्या विमानाचा क्रमांक आला. विमान उडाले नि टोकिओच्या मार्गाला लागले. त्या वेळी काळ्या ढगांतून लाल रंगाची पिचकारी मॅनिलावर मारली आहे असा भास झाला. खाली निळे पिवळे असंख्य दिवे दिसत होते. विमान जसे खूप वर गेले तसे पश्चिम दिशेकडच्या मोठ्या भागाकडे लाल रंग उधळला गेला आहे असे वाटले. थोड्या वेळाने अंधार झाला. थकव्यामुळे किंवा विमानाच्या विशिष्ट आवाजामुळे भोजनोत्तर मला डुलकी येऊ लागली.

साडेदहाला खाली दिवे दिसू लागले. टोकिओ जवळ आले होते. पंधरा मिनिटांनी विमान उतरू लागले. अकराला टोकिओच्या भूमीवर पाय ठेवला.

दुसऱ्या महायुद्धातली वेगवान जपानी चढाई, भारतीय स्वातंत्र्य-लढ्याशीं तिचा असलेला संबंध, जपानवरचा अणुबॉम्ब हल्ला, जपानचा पराभव, स्वतःच्या राखेतून पुनर्जन्म घेणाऱ्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे जपानने केलेली किमया, जपानी सौंदर्य, त्याची राष्ट्रीय अस्मिता, त्याची औद्योगिक प्रगती याविषयी मी खूप वाचले होते. तो जपान पाहण्यासाठी मी आलो होतो.

चार वर्षांपूर्वी डॉक्टर इथे आली असताना तिला भाषेची अडचण जाणवली होती. त्यामुळे मी थोडा अस्वस्थ होतो. जपानी शिष्टाचाराच्या कथा मी ऐकल्या होत्या. पण ज्या प्रकारे पासपोर्ट तपासणी झाली त्यावरून त्या शिष्टाचारांना ओहोटी तर लागली नाही ना असे वाटले! पण हे तितकेच खरे की खूप आतिथ्य नव्हते, तसेच फालतू उद्धटपणाही नव्हता. बाहेर येऊन हॉटेल डायचीवर जाण्याऱ्या बसची चौकशी केली. रात्री बाराच्या सुमाराला एक छोटी बस जात होती. त्यासाठी लाउंजमध्ये थांबलो. अर्ध्या तासाने विमानतळावर शुकशुकाट झाला. फक्त आम्ही सहा-सात प्रवासी होतो. आणि तेही भारतीय. आमच्यात एक शीख दांपत्य होते. त्यातली बाई पडदानशीन होती. बसने आम्ही हॉटेल डायचीवर आलो.

खोली फार लहान होती. एका वेळी दोन माणसे जा-ये करू शकणार नाहीत इतकी छोटी. पण अत्यंत स्वच्छ. सकाळी हिरवा चहा करण्यासाठी टेबलावर गरम पाण्याचा थर्मास होता. झोपताना घालण्यासाठी जपानी पद्धतीचे कपडे होते. ते खूपच सैल वाटले. पलंगाच्या डोक्यावरच्या भागाकडे ‘ मसाज हवा असल्यास दूरध्वनी करावा म्हणजे मसाजिस्ट पाठवण्याची व्यवस्था होईल ’ अशी सूचना होती. बायको बरोबर असल्यास काय करायचे याचा खुलासा नव्हता. म्हणून नुसती सूचना वाचून झोपलो.

सकाळी हिरव्या पातीचा चहा केला. पण तो बेचव वाटला. हॉटेल डायची मोठे आहे नि महाग नाही. त्यामुळे प्रवाशांची रहदारी खूप होती. ‘ टिप किती द्यायची या शंकेने व्याकुळ होऊ नका. ती पद्धत इथं नाही. ’ अशी सूचना काउंटरपासच्या भिंतीवर होती. न्याहरीचा हॉल प्रशस्त होता. त्याच्या डावीकडे सहलीचे कार्यालय होते नि उजवीकडे दुकाने होती. जवळ कॉफी शॉप होते. न्याहरीला सेल्फ सर्व्हिस असून चहा वा कॉफी, मोसंबी वा अननसाचा रस, पाव नि लोणी इतके पदार्थ मिळत.

मेजी क्रांतीनंतर म्हणजे १८६८ नंतर टोकिओला राजधानी आली. टोकिओ म्हणजे ईस्टर्न कॅपिटल. यापूर्वी राजधानी किओटोला होती. नगरसहलीचा पहिला टप्पा होता टोकिओ टॉवरपाशी. हे टॉवर पॅरीसच्या आयफेल टॉवरसारखे आहे. १९५७ मध्ये ते बांधण्यास सुरुवात होऊन वर्षभराने त्याचे काम संपले. टॉवरच्या पायथ्याशी आमचा एकत्र फोटो घेण्यात आला. सहलीच्या अखेर त्याची प्रत विकत मिळाली. इथेही लिफ्टने आपण वर येतो. टॉवरवरून टोकिओ बंदर, सरदारांची दफनभूमी, पॅलेस, उद्याने, इमारती वगैरे दिसतात. टॉवर १८९८ फूट उंच आहे.

इथून बस मिटा विभागाकडे आली. निरुंद रस्ते, वाहनांची गर्दी नि लोकांची घाईगडबड असलेला हा भाग आहे.

त्यातच १८५८ मध्ये स्थापन झालेली केओ युनिव्हर्सिटी आहे. जपानची शिक्षण-पद्धती अमेरिकन धर्तीची असून इंग्रजीच्या अभ्यासावर भर आहे. इथे इंग्रजी हटाव नाही !

चानो यू म्हणजे जपानी टी सेरिमनी. या कार्यक्रमासाठी आम्ही हप्पोएन. टी गार्डनकडे आलो. सेन जो सोएकी याने सोळाव्या शतकात चहा पिण्याची ही पद्धती प्रचलित केली. निसर्गाचे सौंदर्य, चहाच्या कपावरील नक्षीकाम तसेच इतर मनःशांती देणाऱ्या विषयांवर चहा पीत गप्पा मारण्यासाठी सरदार लोक पूर्वी अशा उद्यानात येत. चहाच्या खोलीत जाण्यापूर्वी तिथल्या बायकांशी चार शब्द कसे बोलायचे याची प्रथम तालीम झाली. 'ओहायो – सुप्रभात, केको – छान ' असे शब्द आम्ही पाठ केले. स्वागतानंतर चहाचा विधी सुरू झाला. एक बाई चहा करत होती. दुसरी तिला मदत करत होती. सगळे काही हळुवार हाताने नि निःशब्द वातावरणात झाले. आपल्याकडे चहासाठी इतका दम निघणे कठीण ! प्रथम चहाचा कप तीनदा फिरवायचा. नंतर एक घुटका घेऊन चहाची चव पाह्यची, मग दुसरा नि तिसरा घुटका घ्यायचा. याप्रमाणे चहा घेऊन ' केको ' म्हणालो नि बाहेर आलो. इथे बाजूच्या खोलीत एका जपानी मुलीने एक तंतुवाद्य वाजवले. नंतर त्या उद्यानातली बोनसाई झाडे पाहिली. ही झाडे दोनशे ते तीनशे वर्षांची असतात. एक झाड दोनशे वर्षांचे असून दीड फूट उंचीचे होते.

टोकिओचा एक भाग दुसऱ्या महायुद्धात बॉम्बच्या अग्निदिव्यातून वाचल्याने त्याला लकी म्हणतात. आमची बस त्या भागातून गेली. ओयामा ही टोकियोतली दुसऱ्या क्रमांकाची दफनभूमी आहे. मात्र जमिनीच्या टंचाईमुळे हल्ली प्रेताचे दहन करतात. यानंतर टोगी पॅलेस, ऑलिंपिक स्टेडियम, मेजी शिंटो वगैरेवरून बस आकासाका विभागाकडे आली. हा भाग हॉटेल्स, बार, क्लब यांच्यासाठी प्रसिद्ध आहे. इकडून आम्ही नॅशनल डाएटवरून इंपिरिअल पॅलेसकडे आलो नि सहल संपली. राजवाड्यात कोणालाच प्रवेश मिळत नाही. त्याच्या बाहेर अजूनही खंदक आहे.

काबुकी हा जपानी नाट्यप्रकार सतराव्या शतकातला. त्या काळात तसेच पुढल्या काळात झालेली नाटके आजही केली जातात. त्यात स्त्रियांची भूमिका पुरुष करतात. आणि ते काम नैसर्गिक व्हावे म्हणून बालपणापासून मुलांना

शिक्षण देतात. स्त्री भूमिका पुरुष इतकी उत्तम वठवतात की, काबुकी नाटकात काम करणाऱ्या स्त्रियांचे अनुकरण जपानी बायका करतात.

आम्ही काबुकिझा नाट्यगृहात आलो तेव्हा संध्याकाळच्या प्रयोगाची सुरुवात होऊन पहिला अंक संपला होता. नाट्यगृह फार मोठे होते. आम्ही पाहिला तो शून किनशोचा प्रयोग. एका व्यापाऱ्याला ओकोटो नावाची एक रूपवान पण आंधळी मुलगी असते. तिला कोटो वाद्याचा नाद असतो. त्याच्या तालमीसाठी सासुके तिला वाद्यशिक्षकाकडे रोज नेतो. पुढे सासुके तेच वाद्य वाजवायला शिकतो नि डोळे बांधून वाजवतो. पुढे दोघे संगीताचा वर्ग काढतात. त्यात श्रीमंत व्यापाऱ्याचा एक मुलगा दाखल होतो. ओकोटोच्या सौंदर्याची त्याला भुरळ पडून तो लघळपणा करतो. पुढे ओकोटोच्या चेहऱ्यावर उकळते पाणी टाकले जाते. तेव्हा आपला विद्रूप चेहेरा कोणी पाहू नये म्हणून ती कायमचा झाकते. ते पाहून सासुके आपले डोळे फोडून घेतो.- माहितीपत्रकात दिलेली कथेची ही रूपरेषा. जपानी प्रेक्षकांच्या हसण्यावरून नि टाळ्यांवरून त्यात विनोद वगैरे काही असावे असा मी तर्क केला.

गैशा पार्टीला जाताना खऱ्या अर्थाने माडी चढावी लागली. शिवाय बूट काढून मांडी घालून बसावे लागले. प्रथम बीअर नि इतर साधे पेय देण्यात आले. मग तीन-चार नृत्यप्रकार झाले. जोडीला गाणे नि वाद्ये होती. मोहित झालेली गैशा स्वतःचे मन प्रियकरावर कसे गेले आहे हे गाणे म्हणत अशा आविर्भावाने सांगते की वाहवा ! लोकांना हा भाग फार पसंत पडला. तिच्या प्रियकराची भूमिका एका प्रवाशाकडे आली होती. काही वेळा त्याची तारांबळ झाली. निदान त्याने तसे दाखवले ! एका नृत्याची नि गाण्याची ढब दाक्षिणात्य वाटली, तर एका गाण्याचे सूर सौराष्ट्रातल्या गाण्यासारखे वाटले. ताल मात्र भारतीय वाटला. शेवटच्या जपानी लोकनृत्यात सर्वांना भाग घ्यावा लागला. परत येताना जपानी गाईडने जपानी गाणी म्हटली. त्याचे बोलणे, विनोद नि त्याच्या कथा यावरून जपानी पर्यटनपद्धती पाश्चात्त्य पद्धतीसारखी वाटली.

कामकुरा–हाकोने या भागाकडे बस सकाळी नऊ वाजता निघाली. प्रथम ती टोकिओ टॉवरवरून मेट्रोपोलिटन एक्सप्रेस वेकडे आली. हा रस्ता दुमजली म्हणजे एकावर एक असा आहे. यावरून टोकिओतल्या रस्त्यांच्या कमतरतेची कल्पना येते. अर्थात टोकिओत रस्ते, गाड्या, घरे या सर्वांचीच

कमतरता आहे. भुयारीत इतकी गर्दी असते की, टोकिओ स्थानकात सकाळी नि संध्याकाळी प्रवाशांना डब्यात दाबण्यासाठी ' पुशर ' असतात. हे काम विद्यार्थी करतात. त्यांना तासाला ८० सेंट मिळतात.

जपानचा रिव्हिरा असे कामाकुराचे वर्णन करतात. मिनामोटो योरीटोमा या शोगूनच्या राजवटीत कामाकुराला राजधानीचे महत्त्व प्राप्त झाले. या वेळी झेन बुद्धिझमचा प्रवेश जपानमध्ये झाला. किओटोत जितकी बुद्धमंदिरे आहेत तितकी कामाकुरात आहेत असे म्हणतात. गाव डोंगराळ आहे आणि त्यात प्रवेश करताना बोगदा ओलांडावा लागला. मोटर थांबली ती जागा लक्षात राहील अशीच होती. तिथे उघडे गटार होते, पलीकडे भाताची शेती होती नि त्याच्याजवळ अद्यतन गराज होते.

कामाकुरातील बुद्धाची मूर्ती १२५२ मध्ये ओतण्यात आली. पहिली दोनशे वर्षे ती मूर्ती मोठ्या मंडपात होती. परंतु १४९५ मध्ये प्रचंड लाटा येऊन मंडप वाहून गेल्याने ती मूर्ती तेव्हापासून उघड्यावर आहे. मूर्ती सुंदर नि भव्य असून आकारात जपानमध्ये तिचा क्रमांक दुसरा आहे.

हाकोनेकडे जाणारा रस्ता समुद्रकिनाऱ्याने असल्याने प्रवास रम्य होतो. वाटेवर पीस मेमोरिअल लागले. नंतर नवीन घरांच्या वसाहती लागल्या. कपडा नि अन्न यांचा प्रश्न जरी जपानमध्ये सुटला असला तरी घरासाठी लोकांना दोन वर्षे थांबावे लागते. आता दूरवर ओडुवारा कॅसल दिसला. थोड्या वेळाने हाकोने दृष्टिपथात आले. चढता रस्ता, ढग नि धुके यांची गर्दी, नदीचा प्रवाह, त्याला घातलेला बांध, मग आलेला घाटमाथा, हिरवी गडद झाडी, स्वच्छ रस्ते– वाटते गाव स्वित्झर्लंडातले आहे.

बारा वाजता हाकोनेत प्रवेश केला. भोजनोत्तर आम्ही हाकोने सरोवराच्या काठापाशी आलो. वातावरण शांत होते. गर्दी नव्हती. सरोवर महानदीसारखे वाटते. परतीचा थोडा प्रवास त्यातून होता. तीन वाजता बोट निघाली. डाव्या नि उजव्या हाताला डोंगरांची रांग होती. त्यांच्या कुशीत छोटी घरे होती. पाण्याला हिरवी झाक असून भोवताली गर्द झाडी होती. मला लेक लुझर्न-मधल्या प्रवासाची आठवण झाली. पहिल्या थांब्यापाशी एक मोठे हॉटेल असून प्रवेशभागात उंच कारंजे होते. तेथून केबलकार जात होती नि खालून मोटरीचा रस्ता होता. त्यावरून एखाद दुसरी मोटर जात होती. हवेत विलक्षण गारवा

असल्याने मी खालच्या बंदिस्त खोलीत बसलो. माझ्या शेजारी फिलीपाईन्समध्ये नोकरीला असलेले अहमदाबादचे एक पारशी गृहस्थ होते. भारताला परतण्या-पूर्वी ते इकडचे देश पहाण्यास निघाले होते. या जलप्रवासात पक्षी दिसला नाही.

आता बसने वाटेवरच्या आबा कुडानी या ज्वालामुखीकडे आलो. हजार फूट चढल्यावर पठार येते. तिथे वाफा धूर येत असून त्याला गंधकाचा वास येत होता. काही जागी तारांचे कुंपण घालण्यात आले होते. येथून डोंगराळ रस्त्याने थोड्या समयात आम्ही फुजिआ हॉटेलवर आलो. जुन्या पद्धतीच्या वाड्यासारखे हे हॉटेल असून डोंगरकपारीत आहे. माथ्यावरून वाहणाऱ्या पाणलोटाचे छोटे कृत्रिम धबधबे येथे करण्यात आले होते. अगदी वर पोहोण्याचा तलाव असून भोवताली पाईन वृक्षांचे दाट जंगल आहे. झाडी जंगली फुलांनी डवरली होती. वारा बोचरा होता. येथून माउंट फुजी स्वच्छ दिसला.

आता परतीचा पुढचा मार्ग डोंगरकुशीतून होता. लहान ढग, धुक्याचा पातळ पदर नि सूर्यप्रकाश यांचा पाठशिवणीचा खेळ काही वेळ चालला. उताराबर एक छोटे सरोवर लागले. त्यावर दाट धुके होते. एक फेरी बोट दिसली. आता रस्ता दरीतून होता. इथेही धुके नि ढग होते. बस डोंगर-माथ्याकडे आली तेव्हा खालची दरी धुक्याने भरली. पाहता पाहता ते धुके वर आले. पुढचा रस्ता दिसेनासा झाला. थोड्या वेळात धुक्यातून बाहेर आलो. आता सगळा प्रदेश रमणीय झाला.

अटामी स्थानकावर परतीच्या आगगाडीची वाट पहात असताना टोकॅडो एक्सप्रेस तीर मारल्यासारखी गेली. आमची गाडी लिमिटेड होती. गाडी डोंगरातून खाली उतरताना बोगदे लागले. भोवताली हिरवीगार शेती होती. दूरवर माउंड फुजी नि सूर्याचे लाल बिंब दिसत होते. टोकिओ आले तेव्हा सूर्यास्त झाला.

निक्को टोकिओपासून ८० मैल आहे. तिथे जाण्यासाठी आसाकुसा स्थानका-कडे निघालो. बस सुमिडो नदीच्या बाजूने गेली. सातच्या सुमारास गाडी सुटली. टोकिओच्या गगनचुंबी इमारती मागे पडल्या. गाडी उपनगरातून धावू लागली. घरे लाकडाची नि छोटी असून गर्दीने उभी होती. घरासमोर लहान उद्यान असे. दाट वस्तीचा हा भाग मागे पडल्यावर खूप मोठी शेते लागली.

क्षितिजापर्यंतची सगळी भूमी हिरवीगार होती. या शेतांवर मोठे ट्रॅक्टर होते. जोपर्यंत निक्को पाहिले नाही तोपर्यंत किक्को ( सुंदर ) म्हणू नका अशी एक म्हण आहे.

दोन हजार फुटांवर निक्को आहे. त्याच्या भोवतालचा पाचशे चौरस मैलांचा प्रदेश आता राष्ट्रीय उद्यान झाला आहे. टोशोगू श्राइनकडे जाणारा रस्ता चिंचोळा असून दगडाचा आहे. टोकूगावा कुटुंबाचे अधिराज्य १६०६ ते १८६७ पर्यंत चालले. त्या कुटुंबाचा पहिला प्रमुख आएआसू होता. त्याचे हे स्मारक. ते बांधण्यासाठी किओटो नि नारा येथून १५००० सुतार आले नि पुढे सतरा महिन्यांनी बांधकाम पुरे झाले. इथे वापरलेली सोन्याची पाने खाली पसरली तर सहा एकर जमीन व्यापतील.

गावातून श्राइनकडे येणारा रस्ता संपतो तिथे डाव्या हाताला शेंदरी रंगाचा पूल आहे. त्याचे नाव शिंकिओ. बाराशे वर्षांपूर्वी शोडो नावाच्या भिख्खूने नांटाई पर्वतावर जाण्याचे ठरविले. परंतु डाईया नदीच्या प्रवाहाला जोर असल्याने त्याला पात्र ओलांडता येईना. तेव्हा त्याने बुद्धाची नि जाओ गोंगेन या सर्प-देवतेची प्रार्थना केली. तेव्हा त्या देवतेने लाल नि निळ्या रंगांच्या सर्पांचा सेतू बांधून दिला. तोच हा सेतू. धार्मिक समारंभाशिवाय इतर वेळी तो बंद असतो.

हा श्राइन बांधण्याचे काम सुरू झाल्यावर सर्व सरदारांनी त्याला देणग्या द्याव्या असे ठरले. परंतु मात्सुडारिया या सरदारापाशी द्रव्य नसल्याने त्याने देवदारू वृक्षाची रोपे अर्पण केली. श्राईनकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंला ती रोपण्यात आली. या कामाला वीस वर्षे लागून १६५१ मध्ये ते संपले. गाईडच्या म्हणण्याप्रमाणे इथे सोळा हजार वृक्ष आहेत तर माहितीपत्रकात ती संख्या तेरा हजार दिली आहे. या मार्गाच्या सौंदर्याची कल्पना तो पाहिल्या-शिवाय येणार नाही.

प्रथम पगोडा भेटतो. त्याचे पाच मजले, हे भूमी, जल, वायू, अग्नी, स्वर्ग यांचे प्रतीक आहेत. एका वास्तूच्या प्रवेशद्वारी तीन कपींची चित्रे कोरलेली आहेत. प्रत्येक चढाला टोरी गेट येते. तोरणाच्या कल्पनेचा विकास म्हणजे टोरी गेट. चिनी वास्तुशास्त्राच्या नियमानुसार श्राईन बांधला असला तरी त्याची स्फूर्ती बुद्धधर्म, शिंटोधर्म नि कन्फ्युशिअसचे तत्त्वज्ञान यांच्या त्रिवेणी संगमात आहे. आतले कोरीव काम मन थक्क करते. कलाकारांनी आपले

कौशल्य इथे दोन्ही हातांनी उधळले आहे. अजिंठ्याची लेणी, रोमचे सेंट पिटर यांच्याप्रमाणे श्रेष्ठ श्रेणीचा हा टोशोगू श्राइन आहे.

फुटारासन श्राईनमध्ये धार्मिक नृत्य होते. प्रथम झांजा नि नगारा वाजला. मग लाल परकर नि पांढऱ्या पोलक्यातल्या दोन मुली आल्या. एकीच्या हातात तलवार होती नि दुसरीच्या हातात घंटा होती. त्यांनी एक छोटे नृत्य केले. त्याला मिको कागुरा म्हणतात. मिको म्हणजे देवाच्या सेवेतील कुमारिका. या मुली शिंटो प्रिस्टच्या असून त्यांना नऊ वर्षे देवळात रहावे लागते. पिशाच्चांना पळविणे हा या नृत्याचा हेतू.

कनाया हॉटेल त्याच्या डायनिंग रूमवरून पुराणे वाटते. आमच्या टेबलावर चिली तरुण होता. त्याला इंग्रजीचा गंध नव्हता. वाढलेले खात होता नि मान हलवत होता. सहल संपली तेव्हा कुठे उतरायचे ते त्याला सांगता येईना. अनेक भाषांतून त्याला विचारले. शेवटी एका हॉटेलपाशी त्याला सोडला.

शुझेंजी सरोवराकडे जाण्याचा रस्ता घाटातून आहे. वर जाण्याच्या रस्त्याला तीस वळणे आहेत. परतीच्याला कमी. हा नागमोडी रस्ता प्रेक्षणीय आहे. आकेची डाईरा स्थानकापाशी आम्ही थांबलो. येथून वर जायला केबलकार होती. सरोवराचा घेर १५ मैलांचा असून ते सहाशे फूट खोल आहे. त्याच्या बाजूने रस्ता जातो. केगॉन नि रिऊझू या धबधब्यांचे पाणी या सरोवरातून निघते. केगॉन मोठा. पण नायगारा पाहिल्यावर या धबधब्याचे कौतुक वाटत नाही. केगॉनला खाली जाण्याची सोय आहे. आम्ही दोन मजले खाली गेलो. उंच खडकावरून पाणी वाहात येते म्हणून रिऊझूला धबधबा म्हणायचे !

सहल संपली. टोकिओला परत नेणाऱ्या गाडीत आम्ही बसलो. संध्याकाळ होत होती. शेतकरी घराकडे जात होते. हिरवी शेते नि गर्द झाडी सतत दिसत होती. उजाड भाग नव्हताच. वाटेवर लहान लहान स्थानके लागत. काही शेतकरी दुचाकीने जात होते. लोहमार्गाच्या कडेला बायका उभ्या होत्या. त्यांच्या पाठीवर पिशवीत मुले होती. लहान गावातली घरे दोन खोल्यांची असत. मधूनच कापलेली किंवा जाळलेली शेते दिसत. तसेच चिनी टोप्या घातलेले शेतकरी आढळत. त्यांच्याजवळ हाताने ढकलण्याचा ट्रॅक्टर असे. एखादी जख्खड म्हातारीही दिसे. पण शेतात किंवा रस्त्यात दिसले नाहीत ते म्हणजे बैल, रेडे, घोडे वा कुत्री !

सकाळी मात्सुकाया डिपार्टमेन्ट स्टोअरकडे आलो. इमारतीला काचेची तावदाने होती. प्रत्येक प्रवेशद्वाराच्या पाठीमागे शुभ्र पोशाखात मंद स्मित करीत काही मुली उभ्या होत्या. दहाच्या ठोक्याला दारे उघडली. ग्राहकांनी प्रवेश करताच कमरेपर्यंत वाकून त्यांनी त्यांचे स्वागत केले. या साध्या गोष्टीतही जपानी शिस्तीचे वैशिष्ट्य दिसते. येथून आम्ही स्विस एअरमध्ये येऊन पुढील प्रवासाची व्यवस्था केली नि मेजी गार्डनकडे कसे जायचे याची माहिती घेतली. मग याराकुचा स्थानकाकडे आलो. हा लोहमार्ग टोकिओ भोवतालहून जातो. तिकिटे काढताना एका जपानी तरुणाने मदत केली नि कोणत्या फलाटावर जायचे हेही त्याने दाखवले.

आगगाडीच्या छोट्या प्रवासात देशातल्या सामान्य माणसाचे चित्र चटकन दिसते. गाडीला गर्दी होती. बायका उभे राहून प्रवास करत होत्या. लहान मुले शाळेला जात होती. आमच्याकडे कुतूहलाने पाहात परस्परांशी बोलून ती हसत होती. माझ्या लहानपणी चिनी व्यापारी कापड विकायला येत. त्यांच्या मागे ‘ चिनी च्याव च्याव ’ असे ओरडत पोरे हिंडायची. त्याची आठवण आज झाली. मध्यम वयाची माणसे गाडीत डुलक्या घेत होती. कोणीच फारसे बोलत नव्हते. वाचत अजीबात नव्हते. याराजुकू स्थानकावर उतरलो. कोपऱ्यावर कॉफीचा किऑक्स होता. तिथे कॉफी नि पाव घेऊन मेजी जिंगू गार्डन्सच्या आवारात शिरलो.

जपानच्या आधुनिकीकरणाला सुरुवात झाली ती मात्सुहिटो या राजाच्या कारकीर्दीत. हे परिवर्तन मेजी रेव्होल्यूशन या नावाने प्रसिद्ध आहे. मात्सुहिटो मेजी १९१२ मध्ये दिवंगत झाला. त्याचे स्मारक म्हणून हा मेजी श्राईन पुढे आठ वर्षांनी स्थापन झाला. दुसऱ्या महायुद्धातल्या एका आगीत हे स्मारक नष्ट झाले. पण सामान्य जपानी नागरिकाने दिलेल्या देणगीतून ते पुन्हा उभे झाले.

मेजी सम्राट त्याच्या पत्नीसह या उद्यानात फिरायला येत असे म्हणून त्याचे इथे स्मारक करण्यात आले. जवळच संग्रहालय आहे. त्यामध्ये त्या दोघांच्या वस्तू ठेवलेल्या आहेत. मेजी राज्यघटना इथल्या हॉलमध्ये तयार झाली. या श्राईनमध्ये शिंटो पद्धतीची लग्ने होतात. फॉर्मोसातल्या सुरूच्या लाकडापासून तयार केलेले टोरी गेट या उद्यानात आहे. ते सर्वांत मोठे समजले जाते.

श्राईनचा पुढचा भाग देवळाच्या मंडपासारखा वाटला. आम्ही आत गेलो

तेव्हा फ्रॉक घातलेल्या दोन मुली आल्या. एकीच्या हातात लहान मूल होते. शिंटो विधी करणारा जपानी उपाध्याय गोरापान नि प्रसन्न चेहेऱ्याचा होता. त्याने काळी टोपी नि लाकडाचे बूट घातले होते. तो मंत्र पुटपुटत होता. त्या मुली अधूनमधून वाकत होत्या. विधी संपल्यावर एकीने दुसरीचा त्या मुलासह फोटो घेतला. मग तो उपाध्याय बाहेर आला नि त्याने दूरध्वनी केला. प्राचीन संस्कार नि आधुनिक साधने यांच्यात मनुष्य जगत असतो.

श्राईनच्या अंगणातल्या खोलीच्या ओट्यावर एक आचार्य बसला होता. सुटाबुटातला जपानी लोकांचा एक गट त्याच्याकडे येऊन विनम्रभावाने उभा राहिला. सर्वांच्या डोक्यावरून तोंडाने काही पुटपुटत त्याने एक मोठा विंजणा फिरवला. मग त्या लोकांनी खाली वाकून त्याला अभिवादन केले. थोड्या क्षणाने काही मुली आल्या. देवळातल्या असाव्यात. त्यांनी केशरी परकर नि पांढरे पोलके घातले होते. त्यांच्या अंबाड्यात केशरी फुलांची वेणी होती. त्याच सुमारास निळा कद नेसलेला पुजारी कोणाकडे न पाहता तेथून भराभर चालत गेला. हा सर्व प्रकार मी पहात उभा होतो. मानवी मनाच्या प्रेरणा काय असतात हे समजणे कठीण !

आम्ही बाहेर आलो तेव्हा मोठ्या गटागटाने जपानी लोक मंदिराकडे येत होते. शिवाय लहान मुलामुलींच्या रांगा तिकडे जाताना दिसल्या. लहान मुले हॉपपॅंट मध्ये होती. बाकीचे युरोपियन कपड्यांत होते. मुली मिनीस्कर्टमध्ये होत्या. म्हाताऱ्या बायका मात्र किमोनोत होत्या.

परत हाराजुकू स्थानकावर आलो. हॉटेल डायचीजवळचे स्थानक शिंबाशी होते. त्या स्थानकाचे तिकीट काढून हॉटेल डायचीवर परतलो. सामान आवरले. मग टॅक्सीने विमानतळावर आलो. बराच लवकर आलो असल्याने आधीचे विमान मिळते का याची चौकशी केली. घाई केली तर मिळत होते. तेव्हा पळतच गेलो. विमान गच्च भरले होते. हातातली पिशवी खाली ठेवीपर्यंत घामाघूम झालो. हुश करीत आहे तोच विमान धावू लागले. थोड्याच क्षणात त्याने जमीन सोडली. सुरुवातीला उजव्या हाताला स्लेट रंगाचा समुद्र दिसला. काही समय विमान ढगातून गेले. मग समुद्राचा रंग निळा झाला. नंतर माउंट फुजी दिसला. थोड्याच वेळात ओसाका आले.

## ओसाका

जपानची यांत्रिक राजधानी किंवा जपानचे शिकॅगो अशी ओसाकाची ख्याती आहे. विमान उतरत असताना खाली जे धूर नि धुक्याचे चित्र दिसले त्यावरून वरील ख्याती यथार्थ वाटते. हॉटेल न्यू ओसाकाकडे जाण्यासाठी बस होती. त्या बसच्या रांगेत उभा राहिलो. बस आली. मोठ्या बॅगा आम्ही बसलो तिथेच ठेवण्यात आल्या. त्यांच्यावरून लोकांनी जा ये केली. आपल्याकडच्या तिसऱ्या वर्गातल्या प्रवासाचे स्मरण झाले. हॉटेलात आधीच नाव नोंदलेले असल्याने सामानापाठोपाठ खोलीत गेलो. या हॉटेलाचे वैशिष्ट्य म्हणजे इथे रोज नवीन टूथ ब्रश नि पेस्ट देण्यात येत असे.

आधुनिक जपानचे प्रतीक टोकिओ असेल तर प्राचीन जपानचे प्रतीक किओटो नि नारा आहेत. म्हणून या गावांना जाणाऱ्या सहलीविषयी काउंटरवर चौकशी केली. तिथल्या माणसाने सांगितले की, याची माहिती ओसाका ग्रॅन्ड हॉटेलात मिळेल. तेव्हा त्या हॉटेलाकडे आलो. माहिती केन्द्रावरची मुलगी उत्तम इंग्रजी बोलणारी होती. ती म्हणाली की, ओसाकाकडून किओटोला जाणारी सहल नाही. त्यासाठी तुम्हाला आगगाडीने किओटोला जावे लागेल नि तिथे गावातली सहल मिळेल. मात्र नाराची सहल सकाळी आहे. तेव्हा तिच्याकडून नाराच्या सहलीची तिकिटे घेतली.

सकाळी त्या सहलीसाठी ओसाका ग्रँड हॉटेलवर आलो. इथले प्रक्षालय प्रशस्त होते. त्यात अमेरिकन प्रवाशांची गर्दी होती. सगळे स्वदेशी परतत होते. माझ्यासमोर दोन अमेरिकन नि दोन जपानी बसले होते. त्यांपैकी एक जपानी इंग्रजीत अनभिज्ञ असावा. कारण त्याला दुसरा स्वभाषेत गोष्टवारा सांगत होता. तो ऐकताना पहिला जपानी सिगरेट पीत मान हलवत होता. बाकीच्या वेळी अमेरिकन माणसाकडे नुसते मख्खपणे पाहात होता. नाराला जाणारी बस छोटी होती. जेमतेम पंधरा माणसे बसतील एवढी. आणि त्यापेक्षा प्रवासी कमी होते. या गाडीचे एअरकंडीशनर नीट चालत नव्हते !

नारा ही जपानची ७११ ते ७८४ या काळातली राजधानी होती. गेल्या शतकांत जपानमध्ये जसे एक मोठे सामाजिक परिवर्तन झाले तसेच एक परिवर्तन आठव्या शतकात झाले. टँग राजवंशाच्या काळात चिनी संस्कृतीचा परमोच्च बिंदू गाठला गेला होता. त्या संस्कृतीविषयीची माहिती जपानमध्ये पोहोचली तेव्हा जपानचा विद्वान राजा शोटोकू याने चीनमध्ये आपला राजदूत माहिती गोळा करण्यासाठी पाठवला. त्यानंतर आणखी काही लोक चीनला गेले. त्यांनी आणलेल्या माहितीच्या आधारे जपानमध्ये सामाजिक परिवर्तन करण्यात आले. परंतु जपानने आंधळे अनुकरण केले नाही. जपानी समाजाला परिपुष्ट करतील अशा चिनी गोष्टींचे प्रथम जपानीकरण करून मग त्या स्वीकारण्यात आल्या.

ओसाका शहर जुनेच वाटले. रस्ते लहान होते आणि घरे छोटी नि दुमजली होती. गाईडच्या सांगण्याप्रमाणे इथला यांत्रिक उद्योग हा ऐंशी टक्के लघू उद्योगात जमा होतो. या भागात तांदुळाचे पीक विपुल निघते नि शासन ते विकत घेते. गावाबाहेर जी घरे होती त्यांपैकी बहुतेक घरांना लागून शेतीचा तुकडा दिसला. बस गावाबाहेर आल्यावर समोर डोंगरांची रांग दिसू लागली. कोडाइ-कनालला जाण्यासाठी मदुरेच्या बाहेर पडले म्हणजे समोर जशी डोंगरांची रांग दिसू लागते अगदी तशीच होती. नाराला जाण्यासाठी ही डोंगरांची रांग ओलांडावी लागते. डोंगरमाथा फार उंच नाही. तो ओलांडला की नाराचा आसमंत सुरू होतो. खरे म्हणजे नारा डोंगराच्या कुशीत आहे.

प्रथम आम्ही आलो ते टोडाजी या बुद्ध मंदिराकडे. जपानमध्ये ७३५ मध्ये देवीची मोठी साथ आली होती. ती जावी म्हणून सम्राट शोमूने बुद्धाच्या

विशाल मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचा नवस केला. तीच ही मूर्ती. ती घडवायला चौदा वर्षे लागली. मंदिरात जाताना तिकीट काढावे लागते. त्या तिकिटावर या मंदिराचे चित्र असून त्याची थोडक्यात माहिती दिली होती. मूर्ती ५३ फूट उंच असून डोळ्याची रुंदी सुमारे तीन फूट आहे. तिच्या हातावर सोळा माणसे उभी राहू शकतात. जगातली सर्वांत मोठी लाकडी वास्तू अशी या मंदिराची ख्याती आहे. त्याला दोन वेळा आग लागली. मध्ययुगातील एका यादवी युद्धात या मंदिराच्या वरच्या मजल्यावर सुमारे हजार शिपाई लपले होते. त्यांना बाहेर काढण्यासाठी मंदिराला आग लावण्यात आली. दुसऱ्या प्रसंगी आग कशी लागली ते समजले नाही. मंदिराच्या आवारात मध्यभागी एक मोठा दिवा असून त्यावर कृष्णाची मूर्ती कोरलेली आहे.

नारातले हरिणांचे उद्यान हे जपानमधले सर्वांत मोठे असून त्यात ८०० मोकळी हरणे आहेत. प्रवासी लोकांची या प्राण्यांना इतकी सवय झालेली आहे की, ते त्यांच्या हातातूनही पदार्थ खातात. त्यांना चारण्यासाठी खाद्यपदार्थ इथे विकत मिळतात. कासुगो श्राईन हा प्राचीन शिंटो श्राईन असून ७६५ मध्ये त्याची स्थापना झाली. डोंगराच्या पायथ्याशी तो बांधलेला आहे. त्याला लावण्यासाठी गर्द लाल रंगाचा वापर केलेला आहे. वास्तुकलेचा एक उत्तम नमुना अशी त्याची प्रसिद्धी आहे. या श्राईनमध्ये तीन हजार दगडांचे नि तांब्याचे दिवे आहेत. ते भक्तांनी अर्पण केलेले आहेत. त्यातले काही सातशे वर्षांपूर्वीचे आहेत. नवीन जपानी वर्षाला ते दिवे लावण्यात येतात. हा श्राईन फुजिवारा कुटुंबाचा आहे. जपानमध्ये ७९४ ते ११८५ या काळात या कुटुंबाचे वर्चस्व होते. जपानी सम्राटाच्या बायका या कुटुंबातून येत.

दुपारच्या भोजनाची सोय नारा हॉटेलात होती. हॉटेलचे छप्पर वगळले तर त्याचे बाकीचे स्वरूप आपल्याकडच्या जुन्या वाड्यासारखे होते. त्याच्या पाठीमागच्या भागाला सारूसावा सरोवर आहे नि सरोवराच्या पलीकडच्या काठावर पाच मजली पागोडा आहे. हॉटेलच्या बाहेर एक उंचवटा होता. त्यावरून सारे नारा दिसत होते. घरांना पत्र्यांची छपरे होती. नाराचे चित्र आपल्याकडच्या जुन्या गावाची आठवण देत होते.

होरयूजी टेंपल हे प्रिन्स शोकोटूने बांधले. येथे प्रवेश-तिकिटाबरोबर होरयूजी मंदिराची माहिती देणारा नकाशा मिळाला. सांस्कृतिक नि शैक्षणिक

अभ्यासाचे केन्द्र असल्याने या मंदिराला होरयू गाकूमोंजी हे अभिधान मिळाले. मंदिराचे दोन विभाग आहेत. साई-इन गरन नि टो-इन गरन. मंदिराचे आवार सुमारे पंचवीस एकरांचे आहे. मांदिराचा मुख्य आवारातला पॅगोडा नि गोल्डन हॉल पाहिल्यावर आम्ही म्युझिअमकडे आलो. इथे बुद्धाचे भिन्न आकारांचे पुतळे आहेत. सातव्या शतकातल्या बुद्धाच्या पुतळ्याचा चेहरा जपानी आहे. मैत्रेय नि दुंदुभीश्वर यांचे तसेच सूर्यप्रभा नि चंद्रप्रभा या बायकांचे पुतळे आहेत. आठव्या शतकातल्या शाळूच्या मूर्ती आहेत. त्याच शतकातली सुंदर वॉल पेंटिंग्ज आहेत. बाराव्या शतकातले ब्रॉकेड आहे. शिवाय लाकडावरचेही बरेच साहित्य आहे. शोटोकूच्या स्मरणार्थ राज्यशासनाचे जे सतरा नियम कार्यवाहीत आले ते इथे कोरून ठेवण्यात आले आहेत. जपानी परंपरेच्या प्रतीक असणाऱ्या अनेक गोष्टी इथे असल्याने नाराला सांस्कृतिक महत्त्व आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या अंतापासून जपानमध्ये पूर्वपरंपरेला महत्त्व मिळू लागले आहे. म्हणूनच आमचा गाईड म्हणाला की, जपानी लोक नाराला तीर्थस्थान समजतात.

ओसाकाला सायंकाळी परत आलो. हॉटेलच्या लाउंजमध्ये पुस्तकाचे दुकान होते. त्यात जपानसंबंधी काही पुस्तके होती. त्यात हालोरनचे जपान— इमेजीस अॅन्ड रिॲलिटीज हे पुस्तक होते. जपानमध्ये असताना तिथल्या जीवनाची चटकन माहिती व्हावी या उद्देशाने मी ते पुस्तक विकत घेऊन बराच वेळ वाचत बसलो.

किओटोकडे जायला टॅक्सीने ओसाका स्थानकावर आलो. स्थानक बाहेरून लहान दिसते. किओटोची तिकिटे कुठे मिळतात याची चौकशी करून भीत भीत खिडकीपाशी गेलो. तिकिटे चटकन मिळाली. मग फलाटावर आलो. आम्ही उभे होतो त्याच्या पलीकडेच एक तरुण बंगाली जोडपे उभे होते. शिवाय चार-पाच भारतीय मंडळी दिसली. त्या बंगाली तरुणाचे नाव दत्ता. इंग्लिश जहाजावर तो मरीन एंजिनियर म्हणून काम करत होता. थोड्या वेळाने तो माझ्याकडे आला. मग आमच्या गप्पा सुरू झाल्या. जपानी वनश्री नि सृष्टिसौंदर्य, लोकांची अफाट कष्ट करण्याची तयारी याविषयी तो कौतुकाने बोलला. गाडी वेगाने जात होती. टोकिओच्या बाहेर पडल्यावर जशी गावे लागली तशीच या वेळी दिसली.

तासाभराने आम्ही किओटोला आलो. स्थानकापासून थोड्या अंतरावर स्टेशन हॉटेल होते. तिथे जाऊन सहलीची चौकशी केली. दिवसभराची सहल घेतली तर ४३०० येन खर्च येत होता. त्या ऐवजी सकाळची नि दुपारची सहल घेतली तर ३००० येन खर्च येत होता. शिवाय काही गोष्टी अधिक पाहायला मिळत होत्या. फक्त जेवणाची सोय स्वतःला करावी लागत होती. आम्ही सकाळच्या सहलीची तिकिटे काढली.

नारा ही ७९३ पर्यंत जपानची राजधानी होती. त्यानंतर सम्राट कामूने हायने किओ हे नवे नगर बांधले. तेच आजचे किओटो. १८६८ पर्यंत जपानच्या राजधानीचा मान या गावाकडे राहिला. जपानच्या पुढे चीनचा आदर्श असल्याने किओटोची रचना चिनी राजधानीच्या धर्तीवर करण्यात आली. नारा नि किओटो ही जपानची सांस्कृतिक केंद्रे आहेत. तेव्हा त्यावर बॉम्बहल्ले करू नयेत असे अमेरिकन पौर्वात्य तज्ज्ञांनी स्वतःच्या शासनाला सांगितले. त्याप्रमाणे बॉम्बहल्ले झाले नाहीत. म्हणूनच कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी नाराला लँगडान वॉर्नर या अमेरिकन तज्ज्ञाचे मेमोरिअल जपानी लोकांनी बांधले.

गावातले रस्ते पूर्वी लहान होते. पण बॉम्ब हल्ले झाल्यास कमी आगी लागाव्या म्हणून युद्धकाळात ते मोठे करण्यात आले. उजव्या हाताला कनॉल असून तो आता बुजवण्यात येणार आहे. गावातली घरे दोन मजली असून त्यांच्यावर रंगसफेदी न झाल्याने ती फार जुनी वाटत होती.

किंकाकुजी टेंपल किंवा गोल्डन पॅव्हिलिअन हा सहलीचा पहिला टप्पा होता. अगदी प्रथम किंकाकुजी हा जपानी सरदाराचा बंगला होता. पुढे योशिमिस्टू या आशिकागा शोगूनच्याकडे त्याची मालकी आली. योशिमिस्टू हा मोठा गुलजार प्राणी. त्याला काव्य, वाद्य, संगीत या कलांचा भारी नाद होता. त्याच्या मैफली इथे होत. त्याच्या पश्चात् त्याच्या इच्छेनुसार या वास्तूचे झेन टेंपलमध्ये रूपांतर करण्यात आले. आमराईसारख्या जागेत ही तीन मजली इमारत आहे आणि त्याला सोनेरी वर्ख लावलेला आहे. सन १९५० मध्ये एका बुद्ध तरुण भिक्षूला या वास्तूला आग लावून त्यात स्वतःला जाळून घ्यावे असे वाटले. त्याप्रमाणे त्याने आग लावली. पण ऐन वेळी तो बाहेर आला आणि ती वास्तू जळाली. आता ती पूर्वीसारखी बांधण्यात आली आहे. येथील

मेनीनने ' द फ्लॉवरी स्वोर्ड ' या जपानवरच्या प्रवासवर्णनात ही कथा दिली आहे. अमृतसरचे शिखांचे मंदिर पाहिल्यावर ही वास्तू डोळ्यात भरत नाही असे तिने पुढे म्हटले आहे. हे मूल्यमापन अगदी बरोबर आहे. वास्तूसमोर लहानसे सरोवर आहे. जवळच टी सेरिमनीची छोटी झोपडी आहे. त्याच्या शेजारी एक लहानसे मंदिर आहे. एक वृद्ध जोडपे तिथे दर्शनाला आले होते.

सुटीमुळे राजवाडा बंद असल्याने आम्ही टायटोकुजी टेंपलकडे आलो. हे मंदिर झेन मोनॅस्टरी आहे. जपानी चित्रकलेचे उत्तम नमुने इथे आहेत. आतल्या भागात दोन लहान उद्याने होती. त्यात दगडाचे बेट, नदी, धबधबा, समुद्र वगैरे गोष्टी रूपात्मक दाखवल्या होत्या. त्याचे आध्यात्मिक विवरण तिथल्या संन्यासी तरुणाने केले. त्याची बोलण्याची ढब, त्याचे हातवारे, मूठ आवळणे इत्यादी प्रकार पाहिल्यावर त्याने संन्यासी होण्याऐवजी सैन्यात सार्जन्ट व्हायला हवे होते असे वाटले.

निजो कॅसल हा टोकूगावा शोगून आईआसू याचा वाडा. जपानी सम्राटाला भेटण्यासाठी किओटोला आले असता राहण्यासाठी त्याने १६०३ मध्ये तो बांधला. आता त्याला राष्ट्रीय वास्तूचे स्थान प्राप्त झाले आहे. बाहेर एक मोठा तट असून आत लहान वाडा आहे. त्याची सगळी बांधणी लाकडी आहे. शोगून म्हणजे पेशवा. आईआसूची तुलना बाजीरावाशी होऊ शकेल. प्रक्षालयात आईआसूला भेटायला आलेल्या सरदारांचे पुतळे असून ते सरदार जपानी पद्धतीने बसलेले दाखवले आहेत. दुसऱ्या खोलीत शोगूनसमोर पाच स्त्रिया उभ्या असल्याचे दाखवले होते. जिच्याकडून तो चहा घेईल तिच्याबरोबर रात्र घालवणार असा संकेत असे. इथल्या लाकडाच्या जमिनीवरून चालले की, चीव चीव असा आवाज येतो. मारेकरी आला तर पूर्वसूचना मिळावी म्हणून ही युक्ती. इथल्या निरनिराळ्या खोल्यांतली चित्रे खरोखरच मनोज्ञ आहेत. याच वाड्यात पंधराव्या टोकूगावा शोगूनने १८६७ मध्ये जपानी सम्राटाला राजसत्ता परत केली. मग शोगूनपद रद्द झाले नि जपानच्या आधुनिक वाटचालीला सुरुवात झाली.

दुपारच्या भोजनासाठी स्वस्त उपाहारगृह शोधण्यासाठी निघालो. बहुतेक दुकानात मासे होते. म्हणून दत्ता कुटुंबाला वाटेत सोडून आम्ही स्वतंत्रपणे निघालो. एका कोपऱ्यात कॉफी हाऊस दिसले. चार माणसे जेमतेम बसतील

इतके लहान होते. तिथे टोस्ट नि कॉफी घेतली. मग वाटेवर फळे घेऊन दुपारच्या सहलीसाठी हॉटेलवर परत आलो.

सांज्रुसांजेंडो मंदिर ११६४ मध्ये गोशिराकावा या सम्राटाने बांधले. बोधिसत्व मानवाच्या उद्धारासाठी तेहेतीस जन्म घेतो. म्हणून या मंदिराचे सभागृह तेहेतीस खणांचे आहे. पंच्याऐंशी वर्षांनंतर त्याला आग लागून ते जळाले. तेव्हा सम्राट गोसागाने पूर्वीच्या स्वरूपात ते पुन्हा बांधले. मंदिरात जाण्यापूर्वी आम्हांला बूट काढून खडावा घालाव्या लागल्या.

सभागृहाच्या मध्यभागी अकरा फूट उंचीची बुद्धाची मूर्ती असून तिच्या भोवती एक हजार उभ्या बोधिसत्वांचे पुतळे आहेत. छताला तांब्याचे आरसे आहेत. खाली मेणबत्त्या लावल्या की त्यात सभागृहाचे प्रतिबिंब दिसते. कोझीयो, उंकाई, टांकाई या श्रेष्ठ शिल्पकारांच्या नेतृत्वाखाली शंभर वर्षांच्या अवधीत हे पुतळे तयार झाले. या वास्तूच्या रक्षणासाठी अठ्ठावीस रक्षकांचे पुतळे आहेत. त्यांचे चेहेरे कोणालाही भीती घालतील. मंदिराच्या अंगणातल्या मोकळ्या जागेत धनुर्विद्येची स्पर्धा होत असे. संध्याकाळी सहाच्या सुमाराला स्पर्धा सुरू होऊन ती चोवीस तास चाले. अशा स्पर्धेतला शेवटचा विजेता वासा डरहा हा बावीस वर्षांचा तरुण होता. त्याने १३०५३ बाण मारले, त्यापैकी ८१३५ लक्ष्यापर्यंत जाऊन पोहोचले. ही स्पर्धा सन १८८६ मधली.

हॅअन श्राईनकडे येताना वाटेत एक बुद्धमंदिर लागले. त्याच्या अलीकडे कापराची झाडे लागली. ती सातशे वर्षांची जुनी होती. किओटोच्या स्थापनेला अकराशे वर्षे पूर्ण झाली म्हणून हॅअन श्राईन बांधण्यात आला. किओटोचा निर्माता सम्राट कामू नि किओटोत राहिलेला शेवटचा सम्राट कोमेई यांच्या नावाने हा श्राईन बांधण्यात आला. खूप दुरून तो दिसतो. त्याची रचना इतर श्राईनप्रमाणे आहे. फक्त लाल रंग जास्त भडक होता. श्राईनच्या एका बाजूला टायगर टॉवर आहे, नि दुसऱ्या बाजूला ड्रगून टॉवर आहे. इथे लग्नसंस्कार होतो. अगदी पाठीमागच्या भागाला एक सुंदर उपवन आहे. त्याचा विशेष म्हणजे तिथली झाडी नैसर्गिक अवस्थेत असूनही स्वच्छतेकडे दुर्लक्ष झालेले नाही.

कियोमिझू टेंपल हे डोंगरावर आहे. त्याची स्थापना ८०५ मधली. बस पायथ्याशी थांबते. वर जाण्याचा रस्ता चिंचोळा असून नागमोडी आहे. त्याच्या दोन्ही बाजूंला दुकाने आहेत. मंदिरातल्या मूर्तींचे दर्शन तीस वर्षांतून एकदाच

मिळते. असा उत्सव दोन वर्षांपूर्वी झाला होता. मंदिराचा मंडप लाकडाचा असून तो दरीवर बांधलेला आहे. त्यातून किओटोचा सुंदर देखावा दिसतो. खाली दरीत तसेच आजूबाजूला चेरी नि मॅपल झाडांची वने आहेत. पाठीमागे धबधब्याचे तीन प्रवाह आहेत. त्याचे पाणी तीर्थासारखे घेतात. पहिल्या प्रवाहातले पाणी सुंदरता प्राप्त होण्यासाठी, दुसऱ्यातले बुद्धीसाठी नि तिसऱ्यातले दीर्घायू होण्यासाठी श्रद्धाळू लोक घेतात.

## मुंबईच्या वाटेवर

सकाळी बसने ओसाका विमानतळावर आलो. दहाच्या सुमारास विमानात बसण्याची सूचना मिळाली. खुर्चीत बसलो तोच एअर होस्टेसने तोंड पुसायला गरम रुमाल आणून दिला. या वेळी विमानतळावर फारशी विमाने नव्हती. तसेच विमानात प्रवासी वीस एक असावेत. विमानाने आकाशाकडे झेप घेतली तेव्हा लख्ख उन्ह असल्याने खालचे गाव स्पष्ट दिसले. घराच्या छपरांना निळा नि लाल रंग होता. शिवाय छोटी सरोवरे होती. थोड्या वेळात गाव मागे पडले. आता वर निळे आकाश, मधून तरंगणारे पांढऱ्या ढगाचे पट्टे, खाली निळ्या पाण्याचा उपसागर, त्यातून पाठोपाठ जाणाऱ्या मोठ्या आगबोटी नि एक टँकर असे चित्र दिसले.

उपसागर संपला. आता निळे डोंगर, गर्द झाडी, पोपटी रंगाची शेती नि आकाशात विस्कळित शुभ्र मेघ असे चित्र दिसू लागले. मग विमान वळले नि डोंगरातून जाऊ लागले. करड्या रंगाचे पाणी असलेली नदी या डोंगरातून वाहात होती. तिच्यावरून शुभ्र मेघांचे पुंजके हळूहळू जात होते. पुन्हा जमीन मागे पडली. समुद्र किनारा आला. तोही मागे पडून सागरावरून विमान जाऊ लागले. निळे जलाशय कोठे संपते नि आकाश कोठे सुरू होते तेच समजेना. मध्येच राखाडी रंगाचे ढग येत. त्यांच्यावरही निळ्या रंगाची छटा पडे. क्वचित एखादी आगनाव दिसे.

आता विमानाची दिशा बदलली. डाव्या हाताला कागोशिमा लागले. जपानी भूमी इथे संपली.

किती तरी वेळ विमान समुद्रावरून जात होते. बाराच्या सुमाराला कॅप्टन म्हणाला की, विमान अर्धा तास टायपेला उतरेल. टायपे ही फार्मोसाची राजधानी. थोड्या वेळाने लहान बेटे दिसू लागली. नंतर बोटी दिसल्या. विमान उतरू लागले. पांढऱ्या ढगांची गर्दी झाली. त्यातून जाताना ते हलू लागले. ढगांच्या गर्दीतून ते बाहेर येताच खाली हिरवे डोंगर, गर्द झाडी, व रेखीव नगररचना दृष्टिपथात आली. मोटारी नि ट्रक एका रांगेत जाताना दिसले. नंतर मंदिर दिसले. मग गिरण्यांच्या चिमण्या दिसल्या. पुन्हा एकदम ढगाळले. बारा-वीसला विमानाने जमीन पकडली.

टायपेच्या विमानतळावरच्या लाउंजमधल्या दुकानातील कलावस्तू प्रेक्षणीय होत्या. तासाभराने आम्ही पुन्हा निघालो. आता बरीच माणसे विमानात चढली. आजही छान शाकाहारी जेवण मिळाले. फार्मोसावरून जाताना सगळा प्रदेश हिरवागार दिसला. अधूनमधून बेटे लागत होती. ती सोडली तर बाकीच्या वेळेला निळे आकाश नि निळा सागर हेच सोबतीला होते. काही वेळाने कॅप्टन म्हणाला की, उजव्या हाताला चीनचा किनारा दिसत आहे. हे ऐकताच सर्वजण विमानाच्या त्या भागाकडच्या खिडक्यांकडे गेले. आता डाव्या हातालाही जमीन दिसू लागली. बेटे डोंगराळ होती. विमान उतरू लागले. अगदी शेवटी घराच्या छपराजवळून गेले. विमान हाँगकाँगच्या विमानतळावर उतरले.

हॉटेलकडे जायला लिमोझीन होती. पण तिच्यापर्यंत पोहोचायला मोकळी जागाच नव्हती. फुटबॉलचा एक संघ आला असल्याने त्यातल्या खेळाडूंना पाहण्यासाठी लोकांची तोबा गर्दी झाली होती. ती ओसरल्यावर आम्ही लिमोझीनने हॉटेलवर आलो.

सकाळी साडेआठच्या सुमाराला हाँगकाँग नगरसहलीसाठी लिमोझीन आली. पाऊस पडू लागल्याने सहलीचा बोऱ्या वाजणार असे वाटले. पण पाऊस थांबला. लिमोझीन मुख्य स्थानकाकडे आली. तिथे प्रवाशांची सहलीनुसार विभागणी होऊन नऊच्या सुमारास आमची बस धावू लागली. हाँगकाँग बेट आहे. ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशाला तेच नाव मिळाले. या प्रदेशाचे तीन विभाग होतात. हाँगकाँग, कौलून नि न्यू टेरिटरीज. प्रदेशाचा आकार नि

त्यातली तीस लाखांची वस्ती पाहिली म्हणजे लोकसंख्येच्या दाबाची कल्पना येते.

आमची बस किनाऱ्यापाशी आली. अनेक बसेस, ट्रक्स, मोटारी पुढे उभ्या होत्या. या वेळी समोर समुद्रातून मोठ्या आगनावा, शिडांची जहाजे, चिनी नावा, इत्यादी जात होत्या. समोर डोंगर दिसत होता. त्याच्या पायथ्याशी नि त्याच्यावर टोलेजंग इमारती दिसल्या. हाँगकाँग नि कौलून यांना जोडणारा पाण्याखालचा बोगदा बांधला जाणार आहे असे गाईड म्हणाला.

फेरीने पंधरा मिनिटांत आम्ही पलीकडे गेलो. मग इथल्या केबलकारने डोंगर माथ्यावरच्या व्हिक्टोरिया पिककडे निघालो. मलबार हिलवर जाताना जशी घरे भेटतात. तशीच घरे केबलकारने जाताना रस्त्याला लागली. या कारने प्रवास करताना मला क्लार्क गेबलच्या हाँगकाँग या चित्रपटाची आठवण झाली. व्हिक्टोरिया पिकवरून गावाचे विहंगम दृश्य दिसते.

बस दुसऱ्या रस्त्याने वर आली होती. तिच्यातून आम्ही टायगर बाम गार्डनकडे आलो. एका चिनी व्यापाऱ्याने देशी औषधांच्या धंद्यात गडगंज संपत्ती मिळविली. त्याच्या कुटुंबाने लोकांच्या रंजनासाठी हे उद्यान बांधले. त्यात बुद्धाचे पुतळे आहेत. बुद्धकथा पुतळ्याच्या रूपाने सांगितली आहे. शिवाय निरनिराळ्या प्राण्यांचे पुतळे आहेत. या सर्व पुतळ्यांना लाल, पिवळा नि निळा भडक रंग दिला आहे.

येथून बस फिरत फिरत ॲबरडीन फिशिंग व्हिलेजकडे आली. इथे पिढ्यानपिढ्या चिनी लोक बोटीवर राहातात. काही बोटी खूप मोठ्या होत्या. त्यांचा उपयोग हॉटेलसारखा होतो. या बोटींचे तसेच इथल्या लोकांचे फोटो घेण्यासाठी आमच्या बसमधल्या प्रवाशांची खूप गर्दी उडाली. आणि बोटीवरची माणसे फोटो निघणार म्हणून खुषीत उभी होती.

दोनच्या सुमारास सहल संपली. मग श्री. मथानी यांच्या दुकानात गेलो. तेथून त्यांच्या मोटारीने घरी आलो. पेडर रोडवर जशा टोलेजंग इमारती आहेत तशाच प्रकारची ही इमारत होती. त्यात मथानींचे अपार्टमेंट होते. त्यांच्याकडे भोजन झाले. त्यांच्या बोलण्यावरून चिनी-भारतीय संबंध हाँगकाँगमध्ये गोड नाहीत असे दिसले. संध्याकाळच्या सुमारास टॅक्सीने विमानतळावर आलो. मामुली तपासणी होऊन साडेनवाला विमानात बसलो. पाऊस पडत होता. विमानतळ दिव्यांच्या प्रकाशात न्हाऊन निघाला होता. पाऊस पडल्याने

जमीन चकाकत असल्याचा भास झाला.

विमान जेव्हा उडाले तेव्हा खाली जलाशयात लहान बोटी, नावा, होड्या, रंगीबेरंगी दिव्यांच्या रोषणाईसह डोलत होत्या. काही बोटींवरची रोषणाई नेत्रवेधक होती. त्यांच्यावर लाल, निळे दिवे मिणमिणत होते. विमान खूप वर गेल्यावर बोटींवरचे दिवे पणत्यांसारखे दिसले. थोड्या वेळाने दिव्यांची संख्या कमी झाली. हळूहळू ती संख्या तीन-चारवर आली. मग एकच दिवा दिसला. तोसुद्धा पाठीमागे पडला.

आता अंधार झाला. थोड्या समयाने विरुद्ध दिशेने एक विमान जाताना दिसले. खाली एका मोठ्या बोटीवर दिव्यांचा झगझगाट दिसला. पण तोही अंतर्धान पावला. काही वेळ अंधारातच गेला. मग कॅप्टन म्हणाला, 'आपण व्हिएतनॅमवर आहोत.' खाली अधूनमधून दिवे दिसू लागले. बाराच्या सुमारास दूरवर दिव्यांची माळ आढळली. विमान उतरू लागले. बँकॉक आले होते. इथला विमानतळ छोटा होता. जुजबी तपासणी झाल्यावर बाहेर आलो. नंतर लिमोझीनने हॉटेल आमारीनवर आलो.

सकाळी उशिरा उठल्याने फ्लोटींग मार्केटच्या सहलीला जाता आले नाही. तेव्हा 'बँकॉकमधली देवळे' या सहलीला जायचे ठरवून तिकिटे काढली. पावणेनऊला गाईडने सहलीला चला अशी सूचना केली. मी विचारले, 'बस आली?' तो म्हणाला, 'टॅक्सीने जायचे आहे. कारण सहलीला तुम्ही दोघेच आहात.'

बँकॉकमधले काही रस्ते मोठे विस्तृत आहेत. अशा एका रस्त्याने सुमारे दहा मिनिटे टॅक्सी गेली. मग वळली. त्यानंतर असे रस्ते लागले की मध्य-मुंबईतल्या रस्त्यांची आठवण व्हावी. दुकानाचे रूप, काही ठिकाणी पुढे आलेली दुकानांची छते, जुनेपणा असे बरेच साम्य आढळले. हा भाग मागे टाकून आम्ही पहिल्या मंदिराकडे आलो.

या मंदिराचे नाव होते गोल्डन बुद्ध. मंदिर तसे लहान आहे. इथे पादत्राणे बाहेर काढून ठेवावी लागली. प्रवासी बरेच आले होते. काही भारतीय होते. बरेच युरोपियन होते. मूर्ती तीन मिटर उंचीची आहे. आणि तिचे वजन साडे-पाच टन आहे. ही प्रतिमा सोन्याची आहे. असे सन १९५३ पर्यंत कोणाला ठाऊक नव्हते. कदाचित मूर्तीला धोका पोहोचू नये यासाठी तिच्यावर गिलावा

लावलेला असेल. कांहीही असो; पण त्या वर्षीच्या वादळात मंदिरावर वीज पडली. त्यामुळे गिलाव्याचे काही तुकडे निघाले तेव्हा त्याच्या खाली सोने चमकत होते.

येथून आम्ही दुसऱ्या मंदिराकडे आलो. इथे पहुडलेल्या बुद्धाची मूर्ती आहे. या मंदिराच्या आवारात छोटी मंदिरे आहेत. ही बुद्धाची मूर्ती शंभर वर्षांपूर्वी तयार झाली. द्रव्याच्या अभावी तिची दुरुस्ती झालेली नाही असे तिथे लिहिलेले असल्याने मी थोडे द्रव्य मूर्तीपुढे ठेवले. ती ज्या मंडपात आहे त्याला बारा स्तंभ आहेत नि स्तंभांची जाडी पाच वितींपेक्षा जास्त होती. मूर्तीची लांबी ४९ मिटर्स असून उंची १५ मिटर्स आहे. या मंदिराच्या आवारातून बाहेर पडताना समोरच्या मंदिरातून भिक्षूंची रांग बाहेर आली. एका वयोवृद्ध भिक्षूच्या डोक्यावर दुसऱ्या भिक्षूने छत्री धरली होती. गंमत म्हणजे याच रांगेच्या शेवटच्या भिक्षूच्या तोंडात सिगरेट होती.

एमरॉल्ड बुद्ध हे मंदिर मोठे आहे. पण त्यातली मूर्ती छोटी आहे. आम्ही आत गेलो तेव्हा पूजा चाललेली होती. दर्शनार्थ आलेल्या भक्तांनी पूजा नि नैवेद्य यांचे बरेच साहित्य आणून ठेवलेले दिसले. मार्बल टेम्पल हे शेवटचे मंदिर. इथे प्रवेश करण्याची बंदी होती. पण ती सूचना ध्यानात येण्यापूर्वी आम्ही आत शिरलो. इथला पुजारी पूजेच्या साहित्याची तयारी करत असताना सिगारेट ओढत होता. व्यक्तीच्या नि समाजाच्या पावित्र्याच्या कल्पना सर्व ठिकाणी समान असतात असे नाही ! प्राकाराच्या भिंतींना लागून बुद्धाच्या बावन्न मूर्ती आहेत. ग्रीक, जपानी रचनेच्या काही आहेत. उपोषण करत असलेल्या बुद्धाची प्रतिमा ही लाहोर म्युझियममध्ये असलेल्या मूर्तीची प्रतिकृती आहे. आपल्याकडे मंदिराच्या आवारात गाय, बैल, कुत्रे या प्राण्यांची वस्ती असते. तशी इथे कुत्र्यांची वस्ती होती.

दुपारी खूप उष्मा झाला. लाउंजमध्ये बसून होतो. उन्हे कमी झाल्यावर जवळच्या भागात हिंडायला गेलो. शाळा सुटल्या होत्या. बस-स्टॉपवरची लहान मुलांची गर्दी आपल्याकडच्यासारखी होती. वेळ झाला म्हणून हॉटेलवर परतलो. लिमोझीन आली. आम्ही विमानतळाकडे निघालो. येताना अंधारामुळे रस्त्याची कल्पना आली नाही. आता काही भागातून जाताना मध्यमुंबईच्या काही भागाचे पुन्हा स्मरण झाले. विमानतळाकडे जाणारा राजपथ

मात्र छान आखलेला आहे.

विमानतळ मोठा करण्याचे काम चालले असल्याने तिथल्या लाउंजमध्ये गर्दी फार झाली होती. टोकिओतल्या एका सहलीत बरोबर असलेली काही अमेरिकन माणसे आज इथे भेटली. ती सिंगापूरला जात होती. साडेसातला विमान सुटले. मलेशियन कंपनीचे विमान होते. प्रत्येक प्रवाशाला पाच सिगरेटचे पाकीट एअर होस्टेसने दिले. प्रवास अंधारातच झाला. सव्वानऊला दिवे दिसू लागले. थोड्याच वेळात कौलालंपूर आले. अर्धा तास इथे थांबलो. पुन्हा विमान निघाले. साडेदहाच्या सुमारास सिंगापूर आले. लाउंजमध्ये उभा असताना राहण्याची सोय कुठे आहे याचे सूचनापत्र घेण्याचे आम्हास सांगण्यात आले. लिमोझीनने त्या हॉटेलवर आलो.

सिंगापूर म्हणजे एक वेळचे सिंहपूर. तेराव्या नि चौदाव्या शतकातल्या विजय साम्राज्यातील ती एक महत्त्वाची नगरी होती. सर स्टॅन्डफोर्ड रॅफेल्सने सिंगापूर नदीच्या मुखाशी व्यापाराच्या वखारीसाठी मलायाच्या सुलतानाकडून कराराने जागा घेतली. पुढे गावच ताब्यात घेतले. नंतरच्या काळात सिंगापूरला ब्रिटिश साम्राज्याचा मोठा नाविक तळ होता. या साम्राज्याचा अंत झाल्यानंतर सिंगापूर मलेशियाच्या संयुक्त संस्थानात दाखल झाले. पुढे दोन वर्षांनी बाहेर पडले. त्याची वस्ती वीस लाखांपेक्षा जास्त आहे. त्यातली ७६% चिनी, १५% मलायी, ७% भारतीय नि पाकिस्तानी आणि राहिलेले २% इतर अशी विभागणी आहे. राष्ट्रभाषा मलायी आहे. राज्यव्यवहाराची भाषा इंग्रजी आहे, चिनी नि तामिळ भाषांना राज्यभाषेचे स्थान आहे.

सहलीची बस प्रथम एलिझाबेथ वॉक, वॉर मेमोरिअल, चायना टाऊन, इत्यादी भागांतून हिंदू मंदिराकडे आली. हे मंदिर लहान आहे. पण दीडशे वर्षांचे जुने आहे. त्याच्या प्रवेशद्वारी आज केळीचे खांब होते. मंदिराकडून आम्ही माउंट फेबर पॉइंटकडे आलो. येथून सिंगापूर शहर, मलेशिया व इंडोनेशियाची काही बेटे दिसतात. खालच्या सखल भागाकडे कमी किंमतीची घरे लोकांना देण्यासाठी स्लम नष्ट करून टोलेजंग इमारती बांधल्या जात होत्या. सिंगापूरचे पंतप्रधान ली यांनी झोपडपट्टी नष्ट करण्याची प्रतिज्ञा केली होती आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती प्रतिज्ञा पुरी करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत !

जेव्हा बस आर्मी बॅरॅकवरून गेली तेव्हा गाईड म्हणाला, 'अल्पकाळात ब्रिटिश सेनाविभाग सिंगापूरमधून जाणार. त्याची जागा आमचे छोटे सैन्य घेणार. त्याला शिक्षण देण्यासाठी इझरेल मदत करणार आहे. इथे नॅशनल सर्व्हिस आहे. त्यात पंतप्रधानांचा मुलगा साधा शिपाई म्हणून काम करतो.' पंतप्रधानांचा मुलगा साधा शिपाई आहे ही कल्पना कशी वाटते ?

इथली टायगर बाम गार्डन ही हाँगकाँगमधल्या गार्डनची प्रतिकृती आहे. त्यामुळे त्यात नावीन्य आढळले नाही. मात्र हाऊस ऑफ जेड बघण्यासारखे आहे. सूंग नि चिंग घराण्यांच्या काळातल्या मौल्यवान पाचूंचा इथे संग्रह केला आहे. बोटानिकल्स गार्डनपाशी आलो तेव्हा पाऊस पडू लागला. बसमध्ये काही मंडळी थांबली. त्यातला एक मी. बस व्यापारी विभागात आल्यावर बरीच मंडळी उतरली.

ठरलेल्या वेळी सामान खाली आणवून लिमोझीनची वाट पहात बसलो. वेळ झाला पण ती आली नाही. दूरध्वनीने चौकशी केली. तेव्हा मलेशियन एअरवेजचा मनुष्य म्हणाला की, एल इटालियाची येईल. एल इटालियाचा म्हाणाला की, मलेशियन येईल. अशा आश्वासनावर थांबणार किती ! टॅक्सी घेतली नि विमानतळावर आलो. तिथे एल इटालियाच्या माणसाकडे तक्रार केली. त्याने न बोलता टॅक्सीचे पैसे चुकते केले. विमानात प्रथम पूर्वीचे प्रवासी बसले. मग आम्हाला प्रवेश मिळाला. विमान भरलेले होते. अगदी शेवटची जागा आम्हाला मिळाली. माझ्या शेजारी ऑस्ट्रेलियात स्थाईक झालेला इटालियन इसम होता. तो सुट्टीवर इटलीला जात होता. दम्याच्या विकाराने बेजार होता. किती तरी फालतू गोष्टींविषयी माझ्याशी बोलत होता.

आता खाली अधूनमधून दिवे दिसू लागले. विमान भारतीय भूमीवर होते. मग थोड्या समयाने मुंबई येत आहे असे कॅप्टन म्हणाला. विमानतळावरचे दिवे दिसू लागले. विमानाची उंची सुटू लागली. मग ते भूमीकडे झेपावू लागले. काही क्षणाने ते जमिनीवर धावू लागले. नंतर खूप हादरले नि थांबले. आमची जगाची सफर संपली होती. 'घरी आलो' हे दोनच शब्द. पण त्यात किती मोठा आनंद समावलेला असतो !

REFBK 0019104

REFBK-0019104